

रामायण

युद्धकाण्ड ५

मराठी श्लोक श्री. श्याम कुलकर्णी

२६

मूळ संस्कृत आदिकवी

श्री वाल्मिकी

विरचित

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

-श्रीवाल्मिकी रामायण-

खंड २६- युद्धकाण्ड

मूळ संस्कृत – आद्यकवि वाल्मिकी मुनी

मराठी श्लोकमय अनुवाद-श्री.श्याम कुलकर्णी

-श्रीवाल्मिकी रामायण – खंड २६

मराठी समश्लोकी अनुवाद : श्री. श्याम कुलकर्णी

पत्ता : द्वाराश्री. जयवंत कुलकर्णी, ''गन्धार'' फ़्लॅटक्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे४११०२९
संपर्क – व्हॉट्सऍपक्र. ९७६५४५६५८१
Email : sgk६६४२@gmail. com

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act १९५७ provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

१४ सप्टेंबर २०२६ (गणेश चतुर्थी)

©esahity Pratishthan®2026

•विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

•आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

•हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

श्री श्याम कुलकर्णी (काव्यानुवादक)

यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. १९७५ अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित

प्रास्ताविक

ग्रन्थ पूर्ण होण्यापूर्वीच प्रस्तावना लिहिणे हा मर्यादातिभङ्ग आहे आणि 24,000 श्लोकांच्या "वाल्मीकीय रामायण" या ग्रन्थातील 350-400 श्लोकांचे रूपान्तरण हे तर मूळ ग्रन्थाचा साठावा भाग पूर्ण करण्यासारखे आहे. त्यामुळे हे दोन शब्द केवळ ईसाहित्य चे श्री. सुनीळ सामन्त यांचे ऋण मान्य करण्यासाठी लिहीत आहे. केवळ त्यांच्या आग्रहामुळेच मी हे मोठे काम अंगावर घेतले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या ग्रन्थास डॉ. रविन थत्ते यांच्यासारख्या महान व्यक्तीचा आशीर्वाद लाभणे हे माझे महद्भाग्य!

हे काम माझ्या हातून पूर्ण होण्याचे भाग्य मला लाभो येवढीच ईश्वरचरणी प्रार्थना !

श्याम कुलकर्णी

Dr. Ravin Thatte

श्याम कुलकर्णी ह्यांची आणि माझी ओळख खरे तर माझ्या व्यवसायामुळे (प्लास्टिक सर्जन \ सुघटन शल्य) झाली होती ह्याची त्यांनी मला हल्लीच ह्या त्यांच्या प्रकल्पाबद्दल चर्चा करतांना करून दिली . पुढे मी ज्ञानेश्वरीवर लिहिण्यास सुरुवात केल्या नंतर देखील आमची भेट झाली होती हे मात्र आठवते. हा रामायणावरचा त्यांचा प्रयत्न \प्रकल्प बघून आणि वाचून मी थक्क झालो आहे . केवढे प्रचंड काम आहे हे! ह्या पूर्वी त्यांनी भगवत गीतेवर, रामरक्षेवर आणि मेघदूतावर अशीच समश्लोकी लिहिण्याची कामगिरी केली आहे हे कळल्यावर तर मी अवाक झालो . असला माणूस माझ्या परिचयाचा

आहे हे कळून धन्य वाटले. त्यांनी हे सगळे काम "मी स्वानंदासाठी करत आहे" असे लिहिले आहे . सगळ्या मोठ्या कृती ह्या स्वानंदातूनच निर्माण होतात हे फार जुने सत्य इथे परत उजळले आहे. ही हल्लीची समश्लोकी , रामायणाची, आताच वाचली. ती फार छान उतरली आहे आणि वाचतांना खिळवून ठेवते. प्रकल्प अजून पूर्ण व्ह्यायचा आहे तो नक्कीच पूर्ण होईल अशी खात्री आहे आणि त्यासाठी माझ्या सारख्या अनेकांच्या शुभेच्छा पोहोचवण्याचे काम मी आनंदाने करतो आहे.

Dr. रविन थत्ते

(प्लॅस्टिक सर्जन व संस्कृत पंडित. अध्यात्मावर ११ पुस्तके प्रकाशित)



श्रीवाल्मिकी रामायण- यापूर्वीचे खंड वाचण्यासाठी

https://www.esahity.com/230923432381235123 66234023812350.html

-अथ श्रीवाल्मिकी रामायण- २६

युद्धकाण्ड सर्ग ५९

तस्मिन् हते राक्षससैन्यपाले प्लवंगमानामृषभेण युद्धे।
भीमायुधं सागरवेगतुल्यं विदुद्रवे राक्षसराजसैन्यम्॥१॥
मरता असा राक्षसैन्यपाल वानरश्रेष्ठ नीलासवे लढताना।
वेगशालिनी आयुधयुक्त सेना राक्षसांची ती पळून जाई॥१॥
गत्वा तु रक्षोधिपतेः शशंसु सेनापतिं पावकसूनुशस्तम्।
तच्चपि तेषां वचनं निशम्य रक्षोधिपः क्रोधवशं जगाम॥२॥

जाऊनि रावणाजवळी राक्षस प्रहस्त अन्ताचे वृत्त
सांगती ऐकुनी ते अतिशय क्रोध राक्षसराजास होतसे॥२॥
संख्ये प्रहस्तं निहतं निशम्य क्रोधार्दित शोकपरीतचेता:।
उवाच तान् राक्षसयूथमुख्यानिन्द्रो यथा निर्जरयूथमुख्यान्॥३॥
प्रहस्त मृत युद्धात समजुनी कोपला मग शोकमग्न तो।
बोले राक्षससेनाधिकाऱ्यांना देवतांसह इन्द्र बोले जसा॥३॥
नावज्ञा रिपवे कार्या यैरिन्द्रबलसादन:।
सूदित: सैन्यपालो मे सानुयात्र: सकुञ्जर:॥४॥

रिपुला कमी न माना ज्यांने मारिले मम।
सेनापतीस ज्याने इन्द्र सैन्या संहारिले॥४॥
सोऽहं रिपुविनाशाय विजयायाविचारयन्।
स्वयमेव गमिष्यामि रणशीर्ष तदद्भुतम्॥५॥
शत्रुसंहार करण्या होण्या विजयी मी स्वत:।
युद्धा जाईन कसला विचार न करी आता॥५॥
अद्य तद् वानरानीकं रामं च सहलक्ष्मणम्।
निर्दहिष्यामि बाणौघैर्वनं दीप्तैरिवाग्निभि:।

अद्य संतर्पयिष्यामि पृथिवीं कपिशोणितै:॥६॥

अग्नी जसा वना जाळी तसा बाणांनी करीन मी।

लक्ष्मण वानरसेना यांसवे भस्म रामाचे रणी।

रक्ताने वानरांच्या तृप्त पृथ्वीस करीन मी॥६॥

स एवमुक्त्वा ज्वलनप्रकाशं रथं तुरंगोत्तमराजियुक्तम्।

प्रकाशमानं वपुषा ज्वलन्तं समारुरोहामरराजशत्रु:॥७॥

बोलून ऐसे प्रकाशमान अग्नीसम रथी चढून बैसे।

रथास उत्तम जोडलेले अश्व तैसे दिसे वपु रावणाचे।

अग्नीपरी प्रकाशमान तो प्रज्वलित उद्भासित दिसतसे॥७॥
स शंखभेरी पणवप्रणादैरास्फोटितक्ष्वेडितसिंहनादै:
पुणै: स्तवैश्चापि सुपूज्यमान स्तदा ययौ राक्षसराजमुख्य॥८॥
तो निघताना वाजु लागती शंख भेरी अन् पणवादि।
योद्धे ठोकति ताल गर्जती सिंहनादही करतात।
करति पुण्यवान् समाराधना निघता राक्षसशिरोमणी॥८॥
स शैलजीमूतनिकाशरूपैमांसाशनै: पावकदीप्त नेत्रै:।
बभौ वृतो राक्षसराजमुख्यो भूतैर्वृतो रुग्र इवामरेश:॥९॥

विशालरूपी मांसाहारी नेत्र जयांचे प्रज्वलित।
अग्नीसम उद्दीप्त राक्षसे आवृत्त राक्षसराज दिसे।
भूतगणे आवृत्त शोभतो जणु देवेश्वर रुद्रसम॥९॥
ततो नगर्याः सहसा महौजा निष्क्रम्य तद वानरसैन्यमुग्रम्।
महार्णवाभ्रस्तनितं ददर्श समुद्यतं पादपशैलहस्तम्॥१०॥
निघता नगरीतुन त्या दिसे मेघ महासागरापरी।
गर्जना करी वानरसेना हाती घेउनि गिरिशिखरे ।
तैसे आणी वृक्षहि हाती सज्ज असति युद्धास्तव ते॥१०॥

तद् राक्षसानीकमतिप्रचण्डमालोक्य रामो भुजगेन्द्रबाहु:।
विभीषणं शस्त्रभूतां वरिष्ठमुवाच सेनानुगत: पृथुश्री:॥११॥
पाहुनिया ती प्रचण्ड राक्षससेना भुजगेन्द्रबाहु श्रीराम पुसे।
पृथुश्री बिभीषणास शस्त्रधारी वानरसेनेने जो वेढलेला असे॥११॥
नानापताकाध्वजछत्रजुष्टं प्रासासिशूलायुधशस्त्रजुष्टम्।
कस्येदमक्षोभ्यमभीरुजुष्टं सैन्यं महेन्द्रोपमनागजुष्टम्॥१२॥
सुशोभित नाना प्रकारच्या ध्वजा पताका छत्र यांनी।
प्रास खड्ग शूल आदि शस्त्रास्त्रांनी सम्पन्न निडर।

विशालकाय हत्तींनी भरलेली अशी ही सेना कुणाची असे॥१२॥

ततस्तु रामस्य निशम्य वाक्यं बिभीषण: शक्रसमानवीर्य:।
शशंस रामस्य बलप्रवेकं महात्मनां राक्षसपुंगवानाम्॥१३॥

ऐकोनि हे वाक्य रामाचे इन्द्रासम बलशाली बिभीषण।
परिचय करुनी देई बळाचा राक्षससैनिकशक्तिच्या ॥१३॥

योऽसौ गजस्कंधगतो महात्मा नवोदितार्कोपमताम्रववक्त्र:।
संकल्पयन्नागशिरोऽभ्युपेति ह्यकम्पनं त्वेनमवेहि राजन्॥१४॥

हत्तीवरी स्वार महामनस्वी ज्याचे मुख नवोदित सूर्यासम लाल।

कांपवी जो हस्तिमस्तका स्वभारे येत तॊ अकम्पन असे॥१४॥

हा अकम्पन हनुमानाने मारलेला तो नाही,

योऽसौ रथस्थो मृगराजकेतुर्धुन्वन् धनु: शक्रधनु:प्रकाशम्।
करीव भात्युग्रविवृत्तदंष्ट्र: स इन्द्रजिन्नाम वरप्रधान:॥१५॥

रथात् बसला असे ध्वजेवर सिंहाचे चिह्न त्याच्या असे।
उग्र दांत डोकावती हत्तीसम बाहेर कान्तिमान् जो।
इन्द्रधनूपरी इन्द्रजित् वरदान प्रभावी प्रबल जो॥१५॥

यश्चैष विन्ध्यास्तमहेन्द्रकल्पो धन्वी रथस्थोऽतिरथोऽतिवीर:।

विस्फारयंश्चापतुल्यमानं नाम्नातिकायोऽतिविवृद्धकाय:॥१६॥

महेन्द्रगिरि विन्ध्याचल अस्ताचल यापरी विशालकाय जो।

अनुपम धनुष्यासह रथी बसे खेचत वारंवार नामे अतिकाय जो॥१६॥

योऽसौ नवाकोंदिततामचक्षुरारुह्य घण्टानिनदप्रणादम।

गजं खरं गर्जति वै महात्मा महोदरी नाम स एष वीर:॥१७॥

प्रात:कालिन सूर्यापरी नेत्र लाल घन्टेपरि ध्वनि ज्याचा उत्तम।

क्रूर असे गर्जना करित जो महोदर् नामे महामनस्वी वीर तो॥१७॥

योऽसौ हयं काञ्चनचित्रभाण्डमारुह्य संध्याभ्रगिरिप्रकाशम्।

प्रासं समुद्यम्य मरीचिनद्धं पिशच एषोऽशनितुल्यवेग:॥१८॥

सायंकालिन मेघयुक्त पर्वतासम आभा ज्याची सुवर्णभूषित घोड्यावर।

हाती घेउनि प्रास वेगशाली योद्धा वज्रासम नामे पिशाच जो॥१८॥

यश्चैष शूलं निशितं प्रगृह्य विद्युत्प्रभं किंकरवज्रवेगम्।

वृषेन्द्रमास्थाय शशिप्रकाशमायाति योऽसौ त्रिशिरा यशस्वी॥१९॥

हाती त्रिशूल तीक्ष्ण घेउनी बैलावरी चन्द्रम्यासम श्वेत् बसे।

येई वज्राहूनि अधिक वेगे त्रिशिरा नामे योद्धा तो असे॥१९॥

असौ च जीमूतनिकाशरूप: कुम्भ: पृथुव्यूढसुजात वक्षा:। समाहित:

पन्नगराजकेतुविस्फारयन याति धनुर्विधुन्वन्॥२०॥

कृष्णवर्ण मेघासम ज्याची छाती विशाल सुन्दर असे।

चिह्न ध्वजावर नागराज वासुकीचे तयाच्या दिसे।

धनुष्य हलवित खेचत येई योद्धा कुम्भ नाम तो असे॥२०॥

यश्चैष जाम्बूनदवज्रजुष्टं दीप्तं सधूमं परिघं प्रगृह्य।

आयाति रक्षोबलकेतुभूतो योऽसौ निकुम्भोऽद्भुतघोरकर्मा॥२१॥

दीप्तिमान जो सुवर्ण वज्रे इन्द्रमणी मन्डित।

प्रकाशित त्यामुळे धूम्रयुक्त अग्नीसम परिघ जयाच्या हाती।

राक्षससेना ध्वजासमान येतसे निकुम्भ त्याचे नाम् असे॥२१॥

यथैष चापासिशरौघजुष्टं पताकिनं पावकदीप्तरूपम्।
रथं समास्थाय विभात्युग्रो नरान्तकओऽसौ नगश्रृंगयोधी॥२२॥

धनुष्यबाण तसेच खड्ग दैदिप्यमान् जो अग्निसमान।
रथावरी शोभत तो नरान्तक करी युद्ध नगश्रृंगावरी जो॥२२॥

हा रावणाचा पुत्र आहे.

यश्चैष नानाविधघोररूपौव्याघ्रोष्टनागेन्द्रमृगाश्ववक्त्रै:।
भूतैर्वृतो भाति विवृत्तनेत्रैर्योऽसौ सुराणामपि दर्पहन्ता॥२३॥

यत्रैतदिन्दुप्रतिमं विभाति छत्रं सितं सूक्ष्मशलाकमध्यम्।
अत्रैष रक्षोधिपतिर्महात्मा भूतैर्वृतो रुद्र इवावभाति॥२४॥
आवृत्त व्याघ्र हरिणे गज अश्व रूपी भयंकर भूते असे जो।
जयावरी पूर्ण चन्द्रम्यासम श्वेत सुन्दर् छत्रकमान शोभतसे।
करीतसे सुरांचाहि हरण दर्प जो असे तो राक्षसराज रावण।
सुशोभित जो भूतांनी घेरलेल्या रुद्र देवासमान क्रुद्ध होउनी॥२४॥
असौ किरीटी चककुण्डलास्यो नगेन्द्रविन्ध्योपमभीमकाय:।
महेन्द्रवैवस्वतदर्पहन्ता रक्षोधिप: सूर्य इवावभाति॥२५॥
मुकुट मस्तकी कुण्डल कानी विन्ध्य हिमालय सम।

भव्य देह जो असे भयंकर इन्द्र यमांसही लाजवी॥२५॥
सूर्यासमान असे प्रकाशित राक्षसराज पहा येत् हा॥२५॥
प्रत्युवाच ततो रामो बिभीषणमदिंदम:।
अहो दीप्तमहातेजा रावणो राक्षसेश्वर्:॥२६॥
बिभीषणास श्रीराम वदे ऐकुनि त्यावरी।
दैदिप्यमान तेजस्वी राक्षसराज रावण असे॥२६॥
आदित्य इव दुष्प्रेक्ष्यो रश्मिभिर्भाति रावण:।
न व्यक्तं लक्षये हस्य रूपं तेज: समावृतम्॥२७॥

तेजाने सूर्यासम जो शोभे दुष्कर पहावया।
नच रूप स्पष्ट त्याचे पाहू मी त्यामुळे शके॥२७॥
देवदानववीराणां वपुर्नैवंविधं भवेत्।
यादृशं साक्षसेन्द्रस्य वपुरेतद् विराजते॥२८॥
सुशोभित तनु जैसी राक्षसराजाची दिसे।
तैसी देवता दानव वीरांचीहि न शोभते॥२८॥
सर्वे पर्वतसंकाशा: सर्वे पर्वतयोधिन:।
सर्वे दीप्तयुधधरा योधास्तस्य महात्मन:॥२९॥

पर्वतासम विशाल पर्वतयोद्धे सर्व हे।
प्रखर असती अस्त्रे महान या योद्ध्यांकडे॥२९॥
विभाति रक्षीराजोऽसौ प्रदीप्तैर्भीमदर्शनै:।
भूतै: परिवृतस्तीक्ष्णर्देहवद्भिरिवान्तक:॥३०॥
भीमदर्शन त्यांसंगे राक्षसराज भासतो।
देहधारी भूतांसंगे असणाऱ्या यमासम॥३०॥
दिष्ट्ययमद्य पापात्मा मम दृष्टिपथं गत:।
अद्य क्रोध विमोक्ष्यामि सीताहरणसंम्भवम्॥३१॥।

सौभाग्ये मम पापात्मा मजपुढे आज येतसे।
सीताहरणाचा क्रोध आज काढेन त्यावरी॥३१॥
एवमुक्त्वा ततो रामो धनुरादाय वीर्यवान्।
लक्ष्मणानुचरस्तस्थौ समुद्धृत्य शरोत्तमम्॥३२॥
ऐसे बोलुनि श्रीराम उत्तम बाण धनूवरी।
युद्धास्तव काढू लागे लक्ष्मणही त्याच्यासवे॥३२॥
ततः स रक्षोधिपतिर्महात्मा रक्षांसि तान्याह महाबलानि।
द्वारेषु चर्यागृहगोपुरेषु सुनिर्वृतास्तिष्ठत निर्विशङ्काः॥३३॥

राक्षसराज आपुल्यासंगे आलेल्या महाबली राक्षसां वदे।
नगरद्वारी तैसे राजपथावरि गृहांजवळि निर्विशङ्क रहा॥३३॥
इहागतं मां सहितं भवर्भिर्वनौकसश्छिद्रमिदं विदित्वा।
शून्यां पुरीं दुष्प्रसहां प्रमथ्य प्रघर्षयेयु: सहसा समेता:॥३४॥
तुम्ही आलेले माझ्यासंगे पाहुनि संधी योग्य असे मानुनी।
पुरीत वानर माझ्या शिरुनी विनाश तिचा करण्या धजतिल॥३४॥
विसर्जयित्वा सचिवांस्ततस्तान् गतेषु रक्ष: सु यथानियोगम्।
व्यदारयद् वान्रसागरौघं महाझष: पूर्णमिवार्णवौघम्॥३५॥

आज्ञेनुसार त्याच्या मन्त्रिगण जाता पाठविलेल्या स्थानी।
रावण वानरसेना करी विदीर्ण जैसा महामत्स्य सागरा ॥३५॥
तमापतन्तं सहसा समीक्ष्य दीपेषुचापं युधि राक्षसेन्द्रम्।
म्हत् समुत्पाट्य महीधारग्रं दुद्राव रक्षोधिपतिं।हरीश:॥३६॥
येता तया पाहुनि राक्षसेन्द्रा धनुष्यबाणांसह युद्धस्थानी।
उपटून पर्वतशिखरा महान् सुग्रीव करी आक्रमण त्यावरी॥३६॥
तच्छैलशृंड्गं बहुवृक्षसानुं प्रगृह्य चिक्षेप निशाचराय।
तमापतन्तं सहसा समीक्ष्य चिच्छेद बाणैस्तपनीयपुकै:॥३७॥

सुग्रीव फेकी ते शैलशृंगयुक्त महान शिखर जेव्हां रावणावरी।
करी रावण छिन्नभिन्न त्यां सुवर्णपंखी बाणांनी आपुल्या॥३७॥
तस्मिन् प्रवृद्धोत्तमसानुवृक्षे श्रुंगे विदीर्णे पतिते प्रुथिव्याम्।
महाहिकल्पं शमन्तकाभं समादधे राक्षसलोकनाथ:॥३८॥
विदीर्ण होऊनि तो शैलशृंग भूमीवरी पडता राक्षसराज।
सर्पासमान् यमराजासमान भयंकर बाण सोडीतसे सुग्रीवावरी॥३८॥
स तं गृहीत्वानिलतुल्यवेगं सविस्फुलिङ्गज्वलनप्रकाशम्।
बाणं महेन्द्राशनितुल्यवेगं चिक्षेप सुग्रीववधाय रुष्ट:॥३९॥

स्फुल्लिंग निघती वायुवेगी बाणातुनी प्रकाश अग्नीसम।
सोडतसे रुष्ट रावण सुग्रीववधास्तव जो इन्द्रवज्रवेगी॥३९॥
स सायको रावणबाहुमुक्त:शक्राशनिप्रख्यवपु:प्रकाशम्।
सुग्रीवमासाद्य बिभेद वेगाद् गुहेरिता क्रौंचमिवोन्ग्रशक्ति:॥४०॥
इन्द्रवज्रासमान कान्ति ज्याची त्या सुग्रिवावरी तो बाण जाता।
करी घायाळ तया जसा क्रौञ्चपर्वत कार्तिकेय शक्तिने भयानक॥४०॥
स सायकार्तो विपरीतचेता: कूजन् पृथिव्यां निपपात वीर:।
तं वीक्ष्य भूमौ पतितं विसंज्ञं नेदु: प्रहृष्टा युधि यातुधाना:॥४१॥

बाणाने विद्ध होवोनी आर्तनाद करूनिया।
पडे तो भूमीवरती बेहोश सुग्रीव पाहुनी।
राक्षस सर्व करती सिंहनाद हर्षासवे॥४१॥
ततो गवाक्षो गवय: सुषेणस्त्वथर्षभो ज्योतिमुखो नलश्च।
शैलान् समुत्पाट्य विवृद्ध काया: प्रदुद्रुवुस्तं प्रति राक्षसेन्द्रम्॥४२॥
तेव्हां गवाक्ष सुषेण ऋषभ ज्योतिर्मुख नल हे वानर।
रावणावरी तुटुनी पडती पर्वतशिखरा उखडुनिया॥४२॥
तेषां प्रहारान् स चकार् मोघान् रक्षोधिपो बाणशतै: शिताग्रै:।

तान् वानरेन्द्रानपि बाणजालैबिभेद जाम्बूनदचित्रपुकै:॥४३॥
ते वानरेन्द्रास्त्रिदशारिबाणै भिन्ना निपेतुर्भुवि भीमकाया:।
व्यर्थ करी त्या सर्व प्रहारा रावण शत तीक्ष्ण बाण सोडुनिया।
तसेच क्षतविक्षत करितसे त्या सर्वां विचित्र पंखी बाणसमूहे॥४३॥
वानरेन्द्र घायाळ होउनी त्या बाणांनी भीमकाय पडती भूमिवरी ।
ततस्तु तद् वानरसैन्यमुग्रं प्रच्छादयामास स बाणजालै:॥४४॥
ते वध्यमाना: पतिताश्च वीरा नानद्यमाना भयशल्यविद्धा:।
रावण आपुल्या बाणसमूहे करि आच्छादित वानरसेना॥४४॥

त्या बाणांनी पीडित वानर पडती चित्कार करुनि उच्चस्वरे।
शाखामृगा रावणसायकार्ता जग्मु: शरण्यं शरणं स्मरमम्॥४५॥
ततो महात्मा स धनुर्धनुष्मानादाय राम: सहसा जगाम।
तं लक्ष्मणं प्राञ्जलिरभ्युपेत्य उवाच रामं परमार्थयुक्तम्॥४६॥
रावणबाणे पीडित वानर शरणागतवत्सल श्रीरामाला।
जाता शरण धनुष्य घेउनि निघती पुढती श्रीराम ।
लक्ष्मण तेव्हां पुढे होत जोडुनी हात त्या योग्य वदे॥४६॥
काममार्य सुपर्याप्तो वधायास्य् दुरात्मन:।

विधमिष्याम्यहं चैतमनुजानीहि मां विभो॥४७॥

वधाया त्या दुरात्म्यास पुरेसा मी एकटा असे।

तरी आज्ञापी मजला नाश त्याचा करीन मी॥४७॥

तमब्रवीन्महातेजा राम: सत्यपराक्रम:

गच्छ यत्नपरश्चापि भव लक्ष्मण संयुगे॥४८॥

श्रीराम महातेजस्वी सत्यपराक्रमी बोलला।

जा परी विजयासाठी करी पूर्ण प्रयत्न तू॥४८॥

रावणो हि महावीर्यो रणेऽद्भुतपराक्रम:।

त्रैलोक्येनापि संक्रुद्धो दुष्प्रसह्यो न संशय:॥४९॥
रावण हा महावीर युद्धे अद्भुत पराक्रमी।
कोपता त्याचा त्रिलोकी वेग असह्य नि:संशय॥४९॥
तस्यच्छिद्राणि मार्गस्व स्वच्छिद्राणि च लक्षय।
चक्षुषा धनुषाऽऽत्मानं गोपायस्व समाहित:॥५०॥
स्वदोष जाणुनी त्याच्या दोषावर लक्ष राहु दे।
स्वधनु योग्य दृष्टीने आत्मरक्षण साध तू॥५०॥
राघवस्य वच: श्रुत्वा सम्परिष्वज्य पूज्य च।

अभिवाद्य च रामाय ययौ सौमित्रिराहवे ॥५१॥

ऐकुनी राघव बोल आलिंगन त्यास देउनी।

अभिवादन करुनी त्यास लक्ष्मण युद्धास जातसे॥५१॥

स रावणं वारणहस्तबाहुं ददर्श भीमोद्यतदीप्तचापम्।

प्रच्छादयन्तं शरवृष्टिजालैस्तान् वानरान् भिन्नविकीर्णदेहान्॥५२॥

हत्तीच्या सोंडेपरि रावण भुजात पाहती धनुष्य भयंकर् दीप्तिमान्।

करोनि बाणवर्षाव छिन्नभिन्न करी शरीरा वानरसमूहाच्या ॥५२॥

तमालोक्य महातेजा हनूमान् मारुतात्मजः।

निवार्य शरजालानि विदुद्राव स रावणम्॥५३॥

पाहुनी त्या महातेज हनूमान पवनात्मज।

बाणसमूहा निवारित धावतसे त्याच्याकडे॥५३॥

रथं तस्य समासाद्य बाहुमुद्यम्य दक्षिणम्।

त्रासयन् रावणं धीमान् हनूमान् वाक्यमब्रवीत्॥५४॥

जात रथापाशी त्याच्या दक्षिण हस्त उचलुनी।

भयभीत रावणा करित हनूमान् बुद्धिमान् वदे॥५४॥

देवदानवगन्धर्वैर्यक्षैश्च सह राक्षसै:।

अवध्यत्वं त्वया प्राप्तं वानरेभ्यस्तु ते भयम्॥५५॥

देवदानव गन्धर्वा राक्षसांस अवध्य तू।

परि वानरांपासूनी असे मृत्युचे भय तुला॥५५॥

एष मे दक्षिण बाहु: पञ्चशाख: समुद्यत:।

विधमिष्यति ते देहे भूतात्मानं चिरोषितम्॥५६॥

दक्षिण हस्त माझा उठुनी पाच बोटांसवे।

वेगळा तव जीवात्मा देहापासूनि करील तो॥५६॥

श्रुत्वा हनुमतो वाक्यं रावणो भीमविक्रम:।

संरक्तनयन: क्रोधादिदं वचनमब्रवीत्॥५७॥

ऐकुनी मारुती वाक्य क्रोधाने रक्तनेत्र तो।
भयानक पराक्रमी रावण बोले रोषपूर्वक॥५७॥

क्षिप्रं प्रहर नि:शङ्कं स्थिरां कीर्तिमवाप्नुहि।
ततस्त्वां ज्ञातविक्रान्तं नाशयिष्यामि वानर॥५८॥

करी प्रहार नि:शंक यशयुक्त मजवरी।
तुजला नष्ट करीन जाणुनी तव पराक्रम॥५८॥

रावणस्य वच: श्रुत्वा वायुसूनुर्वचोऽब्रवीत्।

प्रहतं हि मया पूर्वमक्षं तव सुतं स्मर॥५९॥
ऐकुनी रावणबोल वायुपुत्र म्हणे तया।
आठव मारिले पूर्वी तव पुत्र अक्षास मी॥५९॥
एवमुक्तो महातेजा रावणो राक्षसेश्वरः।
आजघानानिलसुतं तलेनोरसि वीर्यवान्॥६०॥
रावण महातेजस्वी बलविक्रमसम्पन्न जो।
ऐकता करि आघात छातीवरी मारुतीच्या॥६०॥
स तलाभिहतस्तेन चचाल च मुहुर्मुहुः।

स्थितो मुहूर्त तेजसी स्थैर्यं कृत्वा महामति:॥६१॥
आजघान च संक्रुद्धस्तलेनैवामरद्विषम्।
आघाते त्या हनुमान करू भ्रमण लागले।
परी मुहूर्ते सुस्थिर उभे होत महामति॥६१॥
मारती थप्पड क्रोधे तया देवद्रोहीस ते।
तत: स तेनाभिहतो वानरेण महात्मना॥६२॥
दशग्रीव समाधूतो यथा भूमितलेऽचल:।
थप्पडे त्या वानराच्या कांपू लागे दशग्रीव॥६२॥

जसा भूकम्प होता लागतो हलण्या गिरि।
संग्रामे तं तथा दृष्ट्वा रावणं तलताडितम्॥६३॥
ऋषयो वानरा: सिद्धा: नेदुर्देवा: सहासुरै:।
पाहुनी थप्पड खाता रावणास रणामध्ये॥६३॥
देवासुर ऋषिसिद्ध हर्षध्वनी करु लागती।
अथाश्वस्य महातेजा रावणो वाक्यमब्रवीत्॥६४॥
साधु वानर वीर्येण श्लाघनीयोऽसि मे रिपु:।
स्थिर होत महातेज वाक्य बोले रावण॥६४॥

शाबास वानरा योग्य अससी प्रतिद्वंद्वी मज।
रावणेनैवमुक्तस्तु मारुतिर्वाक्यमब्रवीत्॥६५॥
धिगस्तु मम वीर्यस्य यत् त्वं जीवसि रावण।
त्यावरी मारुती बोले अजुनी जीवित रावणा॥६५॥
अससी असो धिक्कार पराक्रमाचा या मम।
सकृत् तु प्रहरेदानीं दुर्बुद्धे किं विकत्थसे॥६६॥
ततस्त्वां मामको मुष्टिर्नयिष्यति यमक्षयम्।
कशास करसी वार्ता प्रहार मजवरि करी॥६६॥

दुर्बुद्धे मम प्रत्युत्तर यमलोकी तुज नेइल।
ततो मारुतिवाक्येन कोपस्तस्य प्रजज्वत्ले॥६७॥
संरक्तनयनो यत्नान्मुष्टिमावृत्य दक्षिणम्।
पातयामास वेगेन वान्रोरसि वीर्यवान्॥६८॥
वाक्याने मारुतिच्या या होई क्रोधित रावण ॥६७॥
संरक्तनेत्र राक्षस दक्षिण हस्त ताणुनी।
करी प्रहार वेगाने मारुतीच्या उरावरी॥६८॥
हनूमान् वक्षसि व्यूढे संचचाल पुनःपुनः।

विह्वल तु तदा दृष्ट्वा हनूमन्तं महाबलम्॥६९॥
रथेनातिरथ: शीघ्रं नीलं प्रति समभ्यगात्।
वक्षावरिल प्रहारे होत विचलित मारुती
पाहुनी विह्वल त्यास त्यासमयी रावण॥६९॥
रथात चढुनी जाई नीलावरती चालुनी।
राक्षसानामधिपतिर्दशग्रीव: प्रतापवान्॥७०॥
पन्नगप्रतिमैर्भीमै: परमर्माभिभेदनै:।
शरैरादीपयामास नीलं हरिचमूपतिम॥७१॥

राक्षसराज दशग्रीव सर्पतुल्य भयंकर।
शत्रुमर्म करणारे विदीर्ण बाण सोडुनी।
आरंभी देण्या संताप नीला हरिचमूपति॥७१॥

स शरौघसमायस्तो नीलो हरिचमूपति।
करेणैकेन् शैलाग्रं रक्षोधिपतयेऽसृजत्॥७२॥
बाणांनी पीडित नील पर्वतशिखर एक
उचलुनी फेकुनि देत राक्षसाधिपतीवरी॥७२॥

हनूमानपि तेजस्वी समाश्वतो महामना:।

विप्रेक्षमाणो युद्धप्सु: सरोषमिदमब्रवीत्॥७३॥

नीलेनसह संयुक्तं रावणं राक्षसेश्वरम्।

अन्येनयुद्ध्यमानस्य् न युक्तमभिधावनम॥७४॥

हनूमान सावध पाही युद्धास्तव रावणाकडे।

नीलाशी झुंजणाऱ्या त्या बोले रोषपूर्वक तो॥७३॥

निशाचरा झुंजसि तू अन्यासी त्यामुळे मज।

तुझ्यावर हल्ला करणे उचित वाटत नसे॥७४॥

रावणोऽथ महातेजास्तं श्रुङ्ख सप्तभि: शरै:।

आजघान सुतीक्ष्णाग्रैस्तद् विकीर्ण पपात ह॥७५॥

बाणांनी तीक्ष्ण सात महातेजस्वी रावण।

पर्वतशिखरा विदीर्ण नीले सोडलेल्या करी॥७५॥

तद् विकीर्ण गिरै: श्रुङ्गं दृष्ट्वा हरिचमूपति:।

कालाग्निरिव जज्वाल कोपेन प्रवीरहा॥७६॥

गिरिशिख्ररा विदीर्ण पाहुनी हरिचमूपती।

प्रलयाग्नीसम क्रोधे प्रज्वलित होउनि उठे॥७६॥

सोऽश्वकर्णद्रुमान् शालांश्चूतांश्चापि सुपुष्पितान्।

अन्यांश्च विविधान् वृक्षान् नीलश्चिक्षेप संयुगे॥७७॥

उखडुनी साल आम्र अश्वकर्णादि वृक्षही।

आरंभ करी फेकाया रावणावरी रणी॥७७॥

स तान् वृक्षान् समासाद्य प्रतिचिच्छेद रावण:।

अभ्यवर्षच्च घोरेण शरवर्षेण पावकिम्॥७८॥

समोरुनि येणाऱ्या त्या वृक्षां छेदुनि रावण।

करी वर्षाव बाणांचा अग्निपुत्र नीलावरी॥७८॥

अभिवृष्ट: शरौघेण मेघेनेव महाचल:।

ह्स्वं कृत्वा ततो रूपं ध्वजाग्रे निपपात ह॥७९॥

शरवर्षाव जसा मेघ जलवर्षा गिरीवरी।

होता नील ह्स्वरूपे चढे रावण ध्वजाशिरी॥७९॥

पावकात्मजमालोक्य ध्वजाग्रे समवस्थितम्।

जज्वाल् रावन: क्रोधात् ततो नीलो ननाद च॥८०॥

पाहुनी ध्वजावरी त्यास जळे क्रोधे रावण।

गर्जना जोरजोराने नील तेव्हां करीतसे॥८०॥

ध्वजाग्रे धनुषश्चाग्रे किरीटाग्रे च तं हरिम्।

लक्ष्मणोऽथ हनूमांश्च रामश्चापि सुविस्मिता:॥८१॥

ध्वजावर मुकुटावर धनुष्यावर नीला पाहुनी।
विस्मयचकित होती राम लक्ष्मण मारुती॥८१॥

रावणोऽपि महातेजा: कपिलाघवविस्मित:।
अस्त्रमाहारयामास दीप्तमाग्नेयमद्भुतम्॥८२॥

घेतसे नील तेजस्वी आग्नेयास्त्र हातामधे ।
पाहुनी धाडस त्याचे वाटे आश्चर्य रावणा। ॥८२॥

ततस्ते चुक्रुशुर्दृष्टा लब्धलक्षा: प्लवङ्गमा:।

नीललाघवसम्भ्रान्तं दृष्ट्वा रावणमाहवे॥८३॥

रावण भ्याला पाहुनी हर्षित सर्व वानर।

आरोळ्या ठोकती मोठ्या हर्ष करण्या व्यक्त तो॥८३॥

वानराणां च नादेन संरब्धो रावणस्तदा।

सम्भ्रमाविष्टहृदयो न किंचित् प्रत्यपद्यत॥८४॥

वानरस्वर ऐकोनी क्रोधित होई रावण।

भयभीत तया भान कर्तव्याचे नच उरे॥८४॥

आग्नेयेनापि संयुक्तं गृहीत्वा रावण: शरम्।

ध्वजशीर्षस्थितं नीलमुदेक्षत निशाचर:॥८५॥

ध्वजाग्रे पाही रावण नीलास हाती घेउनी।

आग्नेयास्त्रासवे बाण करुनी अभिमन्त्रित॥८५॥

ततोऽब्रवीन्महातेजा रावणो राक्षसेश्वर:।

कपे लाघवयुक्तोऽदि मायया परया सह॥८६॥

पाहुनी राक्षसराज महातेजस्वी त्या म्हणे।

मायेसवे उच्चकोटी धैर्यही असे तुज कपे ॥८६॥

जीवितं खलु रक्षस्व यदि शक्तोऽसि वानर।

तानि तान्यात्मरूपाणि सृजसि त्वमनेकश:॥८७॥
तथापि त्वां मया मुक्त: सायकोऽस्त्रप्रयोजित:।
जीवितं परिरक्षन्तं जीविताद् भ्रंशयिष्यति॥८८॥

स्वकर्मे जरी करसी भिन्नभिन्न पराक्रम।
तरी दिव्यास्त्रप्रेरित सोडलेला बाण मी॥८७॥
करशील जरी यत्न करील प्राणहीन तुज।
तरी वाचव जीवास जर् शक्य कपे तुज॥८८॥

एवमुक्त्वा महाबाहू रावणो राक्षसेश्वर:।

संधाय बाणमस्त्रेण चमूपतिमताडयत् ॥८९॥

ऐसे बोलून महाबाहू राक्षसराज रावण।

आग्नेयास्त्रयुक्त बाण सोडी चमुपतीवर॥८९॥

सोऽस्त्रनुक्तेन बाणेन नीलो वक्षसि ताडित:।

निर्दह्यमान: सहसा स पपात महीतले॥९०॥

त्याने सोडलेला तीर नीलवक्षावरी लागुनि ।

जखमेने दाह होउनी तो पडे पृथ्वीवर॥९०॥

पितृमाहात्म्यसंयोगादात्मनश्चापि तेजसा।

जानुभ्यामपतद् भूमौ न तु प्राणैर्वियुज्यत॥९१॥

पित्याच्या आशीर्वादे आणि तेजाने आपल्या।

गुडघ्यावर तो पडला परि प्राणा न तो मुके॥९१॥

विसंज्ञं वानरं दृष्ट्वा दशग्रीवो रणोत्सुक:।

रथेनाम्बुदनादेन सौमित्रिमभिदुद्रुवे॥९२॥

बेशुद्ध पाहुनी नीला गर्जना करत रावण।

लक्ष्मणाकडे वळवी रथ गम्भीर नादासह॥९२॥

आसाद्य रणमध्ये तं वारयित्वा स्थितो ज्वलन्।

धनुर्विस्फारयामास राक्षसेन्द्रः प्रतापवान्॥९३॥

रोखुनी वानरसेना पोचे तो लक्ष्मणाकडे।

राक्षसेन्द्र टणत्कार करी धनुष्य रोखुनी॥९३॥

तमाह सौमित्रिरदीनसत्त्वो विस्फारयन्तं धनुरप्रमेयम्।

अवेहि मामद्य बिशाच्चेन्द्र न वानरांस्त्वं प्रतियोभुमर्हसि॥९४॥

अनुपम धनुष्य आपले विस्फारुनी लक्ष्मण शक्तिशाली।

रावणा म्हणे मी येता आता न लढणे वानरांशी तुजला॥९४॥

स तस्य वाक्यं प्रतिपूर्णघोषं ज्याशब्दमुग्रं च निशम्य राजा।

आसाद्य सौमित्रिमुपस्थितं तं रोषान्वितं वाचमुवाच रक्षः॥९५॥

गंभीर ध्वनियुक्त लक्ष्मणवाक्य प्रत्यंचाध्वनि भयानक।

ऐकुनी त्याच्याजवळी जाऊन बोले रोषे राक्षसराज रावण॥९५॥

दिष्ट्यासि मे राघव दृष्टिमार्गं प्राप्तोऽन्तगामी विपरीतबुद्धिः।

अस्मिन् क्षणे यास्यसि मृत्युलोकं संसाद्यमानो मम बाणजालैः॥९६॥

सौभाग्ये मजसमोर येसि तू होईल शीघ्र अन्त तुझा त्याचमुळे।

विपरीत बुद्धि तुज होइ बाणांनी मम पीडित यमलोकि जाशील॥९६॥

तमाह सौमित्रिरविस्मयानो गर्जन्तमुवृत्तशिताग्रदंष्ट्रम्।

राजन् न गर्जन्ति पहाप्रभावा विकत्थसे पापकृतां वरिष्ठ:॥९७॥

न विस्मित लक्ष्मण पाहून त्यास गर्जणाऱ्या दावित दन्तपङ्क्ती तीक्ष्ण।

वदे तया न गर्जति प्रभावशाली तुझ्यासम तू फक्त करसी वल्गना॥९७॥

जानामि वीर्यं तव राक्षसेन्द्र बलं प्रतापं च पराक्रमं च।

अवस्थितोऽहं शरचापपाणिरागच्छ किं मोघविकत्थनेन॥९८॥

मी जाणतो बल वीर्य काय प्रताप पराक्रम तव राक्षसेन्द्रा।

उभा मी धनुष्य बाण् घेउनी करी युद्ध कशास व्यर्थ बात॥९८॥

स एवमुक्त: कुपित: ससर्ज रक्षोधिप: सप्त शरान् सुपुङ्खान।

तांल्लक्ष्मण: काञ्चनचित्रपुङैश्चिच्छेद बाणैर्निशिताप्रधारै:॥९९॥

ऐकून ते क्रोधित राक्षसराज सोडी सात बाण सुन्दर पङ्खी

परी विचित्रपङ्खी सुशोभित तीक्ष्ण तीरे तोडी लक्ष्मण सर्व ते॥९९॥

तान् प्रेक्षमाण: सहसा निकृत्तान् निकृत्तभोगानिव पन्नगेन्द्रान्।

लङ्केश्वर: क्रोधवशं जगाम ससर्ज चान्यान् निषितान् पुषक्तान॥१००॥

पाहून शतखण्डित बाण आपले जसे महासर्पाचे अनेक तुकडे।

होऊनि क्रोधवश लङ्केश्वर अनेक दुसरे सोडी तीक्ष्ण बाण॥१००॥

स बाणवर्षं तु ववर्ष तीव्र रामानुज: कार्मुकसम्प्रयुक्तम्।

क्षुरार्धचन्द्रोत्तमकर्णिभल्लैः शरांश्च चिच्छेद न चुक्षुभे च॥१०१॥

विचलित नच होता लक्ष्मण करी भयंकर वर्षा क्षुर अर्धचंद्र।

उत्तम् कर्णी भल्ल शरांची तोडण्यास सर्व शरा रावणाच्या ॥१०१॥

स बाणजालान्यपि तानि तानि मोघानि पश्यंस्त्रिदशारिराजः।

विसिस्मिये लक्ष्मणलाघवेन पुनश्च् बाणान् निशितान् मुमोच॥१०२॥

सर्व बाण आपले निष्फल झाले पाहुनि राक्षसराज होतसे विस्मित।

लक्ष्मणाच्या कौशल्याने आणि पुन्हा सोडु लागे तीक्ष्ण बाण तो॥१०२॥

स लक्ष्मणश्चापि शिताशिताग्रान् महेन्द्रतुल्योऽशनिभीमवेगान्।

संधाय चापे ज्वलनप्रकाशान् ससर्ज रक्षोधिपतेर्वधाय्॥१०३॥

पराक्रमी इन्द्रासम लक्ष्मण धनूवरी वज्रासम भयानक वेगवान।

अग्नीसम प्रकाशित तीक्ष्ण बाण ठेवी राक्षसवधास्तव॥१०३॥

स तान् प्रचिच्छेद हि राक्षसेन्द्रः शिताश्रांल्लक्ष्मणामाजघान।

शरेण कालाग्निसमप्रभेण् स्वयंभुदत्तेन ललाटदेशे॥१०४॥

त्या सर्व तीक्ष्ण बाणां काटुनि रावण तेजस्वी बाण ।

ब्रह्मे दिलेला कालाग्निसम सोडी ललाटावरि लक्ष्मणाच्या ॥१०४॥

स लक्ष्मणो रावणसायकार्तश्चचाल चापं शिथिलं प्रगृह्य।

पुनश्च संज्ञां प्रतिलभ्य कृच्छ्राच्चिच्छेद चापं त्रिदहेब्द्रशत्रौ:॥१०५॥

रावण बाणे पीडित पडे लक्ष्मणाची मूठ धनुष्याची ढिली।

परी कष्टाने सांभाळून स्वत:स रावणधनुष्याचा छेद करी॥१०५॥

निकृत्तचापं त्रिभिराजघान बाणैस्तदा दाशरथि: शिताग्रै:।

स सायकार्तो विचचाल राजा कृच्छ्राच्च संज्ञा पुनराससाद्॥१०६॥

नंतर तीन तीक्ष्ण बाण लक्ष्मण रावणास मारुनी पीडित करी।

रावण होई व्याकुळ आणि पुन्हा मोठ्या कष्टाने शुद्धीवर येतसे ॥१०६॥

स कित्तचाप: शरताडितश्च मेदागात्रो रिधिरावसिक्त:।

जग्राह शक्तिं स्वयमुग्रशक्तिः स्वयंभुदत्तां युधि देवशत्रुः॥१०७॥

धनुष्य तुटुनी खोल जखम करी मेद रक्ताने न्हाउनि जाई।

रावण तेव्हा उचली शक्ती ब्रह्माजीने दिलेली त्या युद्धस्थली॥१०७॥

स तां सधुमानलसंनिकाशां वित्रासनां संयति वानराणाम्।

चिक्षेपशक्तिं ज्वलन्ती सौमित्रये राक्षसराष्ट्रनाथः॥१०८॥

धूमयुक्त अग्नीसम शक्ती करी भयभीत युद्धात् वानरां।

सोडि राक्षसराज शक्ति वेगाने ज्वलन्त लक्ष्मणावरी ती॥१०८॥

तामापतन्तीं भरतानुजोऽस्त्रैजघान बाणैश्च हुताग्निकल्पैः।

तथापि सा तस्य विवेश शक्तिजान्तरं दाशरथैर्विशालम्॥१०९॥

प्रहार त्या शक्तीवर् करी लक्ष्मण अग्नितुल्य तेजस्वी बाणे।

परि ती शक्ती शिरत असे व:क्षस्थलि विशाल भरतानुजाच्या॥१०९॥

स शक्तिमाशक्तिसमाहत: सन् जज्वाल भूमौ स रघुप्रवीर:।

तं वुह्वलन्तं सहसाभ्युपेत्य जग्राह राजा तरसा भुजाभ्याम्॥११०॥

जरी लक्ष्मण शक्तिशाली परि शक्तिआघाते पडे खालती।

विह्वल त्याच्या जवळ जाउनी रावण त्या उचलू लागे॥११०॥

हिमवान् मन्दरो मेरुस्त्रैलोक्यं वा सहामरै:।

शक्यं भुजाभ्यामुद्धृतुं न शक्यो भरतानुजः॥१११॥

देवतासह तिन्ही लोक हिमालय मेरु मन्दर।

उचले तो उचलू न शके भरतानुज लक्ष्मणा॥१११॥

शक्तया ब्राह्मया तु सौमित्रिस्ताडितोऽपि स्तनान्तरे।

विष्णोरमीमांस्यभागमात्मानं प्रत्यनुस्मरत्॥११२॥

आघात छातीवरी झाला तरी लक्ष्मण चिन्तन।

करी भगवान विष्णुच्या अचिन्त्य अंशरूपाचे॥११२॥

ततो दानवदर्पणं सौमित्रिं देवकण्टकः।

तं पीडयित्वा बाहुभ्यां न प्रभुर्लङ्घनेऽभवत्॥११३॥

त्यामुळे दानवदर्प चूर्ण करणाऱ्या लक्ष्मणा।
न शके बाहुंनी आपल्या हालवण्या रावण॥११३॥

ततः क्रुद्धो वायुसुतो रावणं समभिद्रवत्।
आजघामोरसि क्रुद्धो वज्रकल्पेन मुष्टिना॥११४॥

हनुमान् तदा क्रुद्ध धावे रावणाकडे।
वज्रमुष्टिचा आपुल्या प्रहार करि त्यावरी॥११४॥

तेन मुष्टिप्रहारेण रावणो राक्षसेश्वरः।

जानुभ्यामगमद् भुमौ चचाल च प्रपात च॥११५॥

प्रहारे रावण टेकी गुडघे जमिनीवरी।

कम्प पावे आणि अन्ती लोळू लागे भूवरी॥११५॥

आस्यैश्च नेत्रै: श्रवणै: पपात रुधिरं बहु।

विघूर्णमानो निश्चेष्टो रथोपस्य उपाविशत्॥११६॥

कानानाकातुनी येई रक्त त्यामुळे निश्चेष्ट।

होउनी जाउनी बैसे रथी मागिल बाजूस ॥११६॥

विसंज्ञो मूर्छितश्चासीन्न च स्थानं समालभत्।

विसंज्ञं रावणं दृष्ट्वा समरे भीमविक्रमम्॥११७॥

ऋषयो वान्राश्चैअव नेदुर्देवाश्च सासुराः।

शुद्ध हारपुनी होई मूर्च्छित जागी तडफडे।

रावणा भीमविक्रम पाहुनी मूर्च्छित तैसे॥११७॥

ऋषि देवता वानर हर्षनाद करु लागले।

हनुमानश्च तेजस्वी लक्ष्मणं रावणार्दितं॥११८॥

आनयद् राघवाभ्याशं बाहुभ्यां परिगृह्य तम्।

लक्ष्मणा रावणपीडित हनूमान् उचलूनिया।

श्रीरघुनाथा जवळी घेउनि येई हातावर ।
वायुसूनोः सुहृत्त्वेन भक्तया परमया च सः।
शत्रूणामप्यकम्प्योऽपि लघुत्वमगमत् कपेः॥११९॥
हलवू न शकती ज्या तो शत्रूंना भारी लक्ष्मण।
भक्ति सौहार्दामुळे त्याच्या हलका भासे हनुमाना ॥११९॥
तं समुत्सृज्य सा शक्तिः सौमित्रिं युधि निर्जितम्।
रावणस्य रथे तस्मिन् स्थानं पुनरुपागमत्॥१२०॥
युद्धे पराजित लक्ष्मणा सोडुनी शक्ती ती पुन्हा।

परत येतसे पुन्हा रावणाच्या रथावरी॥१२०॥

रावणोऽपि महातेजा: प्राप्य संज्ञा महाहवे ।

आददे निशितान् बाणाज्जग्राह च महद्धनु:॥१२१॥

शुद्धीवर येता पुन्हा विशाल धनु आपुले।

उचली आणि बाण घेतसे हातामध्ये॥१२१॥

आश्वस्तश्च विशल्यश्च लक्ष्मण: शत्रुसूदन:।

विष्णोर्भागममीमांस्यमात्मानं प्रत्यनुस्मरन्॥१२२॥

अचिन्तनीय अंशरूपे चिन्तुनी भगवान् विष्णू

शत्रुसूदन लक्ष्मण निरोगी स्वस्थ होतसे॥१२२॥

निपातितमहावीरां वानराणां महाचमूम्।

राघवस्तु रणे दृष्ट्वा रावणंसमभिद्रवत्॥१२३॥

पाहुनी वानरवीरा अनेक मारले रणी।

रावणावर् चालुनि जाती युद्धास्तव राघव॥१२३॥

अथैनमनुसंक्रम्य हनूमान् वाक्यमब्रवीत्।

मम पृष्ठं समारुह्य राक्षसं शास्तुमर्हसि॥१२४॥

विष्णुर्यथा गरुमन्तमारुह्यामरवैरिणम्।

हनूमान बोले तेव्हां त्यांच्याजवळ् जाउनी।
गरुडावरि विष्णु जैसा संहार दैत्यांचा करी॥१२४॥
तैसा मम पृष्ठावर चढुनी राक्षसा वधा।
तच्छ्रुत्वा राघवो वाक्यं वायुपुत्रेण भाषितम्॥१२५॥
अथारुरोह सहसा हनूमन्तं महाकपिम्।
ऐकुनी हनुमानाचे वाक्य त्याच्या पाठीवर॥१२५॥
तत्काळ श्रीरघुनाथ बैसती चढुनी तदा ।
रथस्थं रावणं संख्ये ददर्श मनुजाधिपः॥१२६॥

तमालोक्य महातेजा: प्रदुद्राव स रावणम्।
वैरोचनमिव कृद्धो विष्णुरभ्युद्यतायुध:॥१२७॥
रणी रथी बसलेल्या रावणा पाहि श्रीराम।
आणि धावे त्याच्याकडे जसा चक्रासह विष्णु।
तुटुनि पडे विरोचनकुमार बलीवर ॥२७॥
ज्याशब्दमकरोत् तीव्र वज्रनिष्पेषनिष्ठरम्।
गिरा गम्भीरया रामो राक्षसेब्द्रमुवाच ह॥१२८॥
टणत्कार धनुष्याचा वज्रासम करोनिया।

श्रीराम राक्षसराजा गम्भीर वाणीने वदे॥१२८॥

तिष्ठ तिष्ठ मम त्वंहि कृत्वा विप्रियमीदृशम्।

क्व नु राक्षसशार्दूल गत्वा मोक्षमवाप्स्यसि॥१२९॥

थांब रे राक्षसव्याघ्रा करुनी अपराधा मम।

कसा सुटशील आता प्राणसंकटातून तू॥१२९॥

यदीन्द्रवैवस्वतभास्करान् वा स्वयंभूवैश्वानरशंकरान् वा।

गमिष्यसि त्वं दशधा दिशो वा तथापि मे नाय गतो विमोक्षसे॥१३०॥

जरि इन्द्र यम वा सूर्य ब्रह्मा अग्नि वा शंकर यांच्याकडे ।

जाशील किंवा पळता दशदिशांना सुटशील ना मज हातुनी॥१३०॥

यश्चैष शक्त्या निहतस्त्वयाद्य गच्छन् विषादं सहसाभ्युपेत्य।

स एष रक्षोगणराज मृत्यु: सपुत्रपौत्रास्य तवद्य युद्धे॥१३१॥

ज्या शक्तिने लक्ष्मणास ताडिले तू तो मूर्च्छित होतसे जीमुळे।

त्याचाच घेण्या सूड उपस्थित मी होऊनि मृत्यु पुत्रपौत्रासह तुझा॥१३१॥

एतेन चात्यद्भुतदर्शनानि शरैर्जनस्थानकृतालयानि।

चतुर्दशान्यात्तवरायुधानि रक्ष:सहस्राणि निषूदितानि॥१३२॥

ज्याने जमस्थानवासी चौदा सहस्र राक्षसां संहारिले आपल्या बाणे।

होते जे उत्तम योद्धा तसेच उत्तमोत्तम अस्त्रशस्त्र सम्पन्न ॥१३२॥

राघवस्य वच: श्रुत्वा राक्षसेन्द्रो महाबल:।

वायुपुत्रं महावेगं वहन्तं राघवं रणे॥१३३॥

रोषेण महताऽऽविष्ट: पूर्ववैरमनुस्मरन्।

आजघान शरैर्दीप्तै: कालानलशिखोपमै:॥१३४॥

ऐकुनी वचन रामाचे राक्षसराज रावण ।

अतिक्रोधित होई तो स्मरुनी वैर पूर्वीचे ॥१३३॥

वायुपुत्र हनुमाना वाहक् रामाचा जो असे ।

योजुनी दीप्तिशाली शर घायाळ करीतसे॥१३४॥

राक्षसेनाहवे तस्य ताडितस्यापि सायकै:।

स्वभावतेजोयुक्तस्य भूयस्तेजोऽभ्यवर्धत॥१३५॥

ताडित होता ऐसे राक्षसाच्या शरे असा।

स्वाभाविक तेज त्याचे वर्धित होई आणखी॥१३५॥

ततो रामो महातेजा रावणेन कृतव्रणम्।

दृष्ट्वा प्लवगशार्दूलं क्रोधस्य वशमेयिवान् ॥१३६॥

पाहुनि रावणे केले घायाळ प्लवगशार्दुला।

महातेजस्वी राम अतिक्रोधित होतसे॥१३६॥

तस्याभिसंक्रम्य रथं सचक्रं साश्वध्वजच्छत्रमहापताकम्।
ससारथि साशनिशूलखड्गं राम: प्रचिच्छेद शितै: शराणै:॥१३७॥

करूनि आक्रमण त्यावरी श्रीराम घोडे ध्वजा छत्र पताका।
सारथि शूल खड्गसहित रथा तयाच्या छिन्न करी तीक्ष्ण शरे॥१३७॥

अथेन्द्रशत्रु तरसा जघान बाणेन वज्राशनिसंनिभेन।
भुजान्तरे व्यूढसुजातरूपे वज्रेण मेरुं भगवानिवेन्द्र:॥१३८॥

वज्रे जसा आघात करि इन्द्र मेरु पर्वतावरी तसा तेजस्वी बाणे।

श्रीराम इन्द्रशत्रु रावणाच्या वेगे करी आघात विशाल छातीवरी॥१३८॥

यो वज्रपाताशनिसंनिपातान्न चुक्षुभे नापि चचाल राजा।

स रामबाणाभिहतो भृशार्तश्चाल चापं च मुमोच वीर:॥१३९॥

आघाते वज्र अशनिच्या जो रावण विचलित झाला नसे।

घायाळ कम्पित रामचंद्रबाणे धनुष्य हातातुनि त्याच्या सुटे॥१३९॥

तं विह्वलन्तं प्रसमीक्ष्य राम: समामदे दीप्तमथार्धचन्द्रम्।

तेनार्कवर्णं सहसा किरीटं विच्छेद रक्षोधिपतेर्महात्मा॥१४०॥

घायाळ रावणा ऐसा पाहुनि योजुनि दीप्त अर्धचन्द्राकार बाण।

सूर्यासम दीप्त मुकुटाचा राक्षसराजाच्या करी भंग श्रीराम महात्मा॥१४०॥

तं निर्विषशीविषसंनिकाशं शान्तार्चिषं सूर्यमिवाप्रकाशम्।

गतश्रियं कृत्तकिरीटकूटमुवाच रामो युधि राक्षसेन्द्रम्॥१४१॥

निष्प्रभ रावण निर्विष सापापरी निस्तेज सायंकालिन सूर्यापरी।

श्रीहीन मुकुट नसता अवस्थेत श्रीराम् रणी वदे रावणा अश्या॥१४१॥

कृतं त्वया महत् सुभीमं हतप्रवीरश्च कृतस्त्वयाहम्।

तस्मात् परिश्रान्त इति व्यवस्य न त्वां शरैर्मृत्युवशं नयामि॥१४२॥

केलेस महान कृत्य रावणा तू मारुनी मुख्य वीरां मम सेनेमधील।

श्रान्त तू म्हणुनि बाणाने मम मृत्युच्या अधीन न करीन मी॥१४२॥

प्रयाहि जानामि रणार्दितस्त्वं प्रविश्य रात्रिंचरराज लङ्काम्।

आश्वस्य निर्याहि रथीच धन्वी तदा बलं प्रेक्ष्यसि मे रथस्थ:॥१४३॥

राक्षसराज युद्धपीडित करी विश्राम लंकेस जाउनी आज्ञा ही मम।

येई पुन्हा रथ धनुष्यासह आणि रथी तेव्हां मम बल पहा ॥१४३॥

स एवमुक्तो हतदर्पहर्षो निकृत्तचाप: स हताश्वसूत:।

शरार्दितो भग्नमहाकिरीटो विवेश लङ्कां सहसा स्म राजा॥१४४॥

ऐकून ते रावण घुसे लंकेत ज्याचा हर्ष अभिमान धुळीस मिळे।

धनुष्य,रथ,किरिट सारथ्यांसह खण्डित आणि स्वत: बाणे पीडित॥१४४॥

तस्मिन् प्रविष्टे रजनीचरेन्द्रे महाबले दानवदेवशत्रौ।

हरीन् विशल्यान् सह लक्ष्मणेन चकार राम: परमाहवाग्रे॥१४५॥

जाता लंकेत शत्रु देवता दानवांचा राक्षसराज रावण।

वानरशरीरातील बाण काढी स्वत: श्रीराम लक्ष्मणासह॥१४५॥

तस्मिन् प्रभग्ने त्रिदशेन्द्रशत्रौ सुरासुरा भूतगणा दिशश्च।

ससागरा: सर्षिमहोरगाश्च तथैव भूम्यम्बुचरा: प्रहृष्टा:॥१४६॥

रणातुनि पळे रावण तेव्हां विचार करुनी पराभवाचा त्याच्या।

प्रसन्न होती असुर,ऋषि,भूत दिशा नाग भूचर् आणि जलचर॥१४६॥

इत्याचे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे एकोनषष्टितम: सर्ग:॥५९॥

युद्धकाण्ड सर्ग ६०

स प्रविश्य पुरीं लङ्कां रामबाणभयार्दित:।
भग्नदर्पस्तदा राजा बभूव व्यथितेन्द्रिय:॥१॥
प्रवेश करि लंकेत भ्यालेला रामबाणाने।
गर्वहरण झालेला राजा व्याकुल इन्द्रिये॥१॥
मातंग इव सिंहेन गरुडेनेव पन्नग:।
अभिभूतोऽभवद् राजा राघवेण महात्मना॥२॥

गजराजा जसा सिंह नागास गरुड जसा।
करी पराजित तैसा राघव रावणा करी॥२॥
ब्रह्मदंडप्रतीकानां विधुच्चलितवर्धसाम्।
स्मरन् राघवबाणानां विव्यथे राक्षसेश्वरः॥३॥
ब्रह्मदण्डासम बाण विजेसम दीप्तिमान्।
रामाचे आठवूनी व्यथित रावण होतसे॥३॥
स कांचनमयं दिव्यमाश्रित्य परमासनम्।
विप्रेक्षमाणो रक्षांसि रावणो वाक्यमब्रवीत्॥४॥

सिंहासनावरी दिव्य सुवर्णमय बैसुनी।
राक्षसांना उद्देशून रावण बोलु लागला॥४॥
सर्व तत् खलु मे मोघं यत् तं परमं तपः।
यत् समानो महेन्द्रेण मानुषेण विनिर्जितः॥५॥
परम तप माझे सर्व व्यर्थ आज होतसे ।
रावणा महेन्द्रतुल्य परास्त केले मानवे॥५॥
इदं तद् ब्रह्मणो घोर वाक्यं मामभ्युस्थितम् ।
मानुषेभ्यो विजानाहि भयं त्वमिति तत्तथा॥६॥

वचन ब्रह्म्याचे घोर माणसाचे भय तुला।
सत्य होऊनि ते आज मजसमोर उपस्थित॥६॥
देवदानवगन्धर्वैर्यक्षराक्षसपन्नगै:।
अवध्यत्वं मया प्रोक्तं मानुषेभ्यो न याचितम्॥७॥
देव दानव गन्धर्व राक्षस सापांपासुनी।
मी अभय मागितले परि न मनुजापासुनी॥७॥
तमिमं मानुषं मन्ये रामं दशरथात्मजम्।
इक्ष्वाकुकुलजातेन अनरण्येन यत् पुरा॥८॥

उत्पत्स्यति हि मदंशपुरुषो राक्षसाधम ।
यस्त्वां सपुत्रं सामात्यं सबलं साश्वसारथिम्॥९॥
निहनिष्यति संग्रामे त्वां कुलाधम दुर्मते।
इक्ष्वाकुवंशी राजाने अनरण्य ज्याचे नाव ।
शाप मज दिला पूर्वी कुलांगारा राक्षसाधमा॥८॥
जन्मेल मम वंशात ऐसा श्रेष्ठ एक नर ।
तुज पुत्र मन्त्री सेना सारथ्यासहित रणी ॥९॥
वधील तोच श्रीराम असावा मज वाटते ।

सम्नोऽहं वेदवत्या च यथा सा घर्षिता पुरा॥१०॥

सेवं सीता महाभागा जाता जनकनन्दिनी।

शाप मज दिला होता वेदवतीने मज पूर्वी ।

जिच्यावर केला होता बलात्कार मी त्यावेळी॥१०॥

वाटते ती पुन्हा आज प्रकटे जनकनन्दिनी।

उमा नन्दीश्वरश्चापि रम्भा वरुणकन्यका।

यथोक्तास्तन्मया प्राप्तं न मिथ्या ऋषिभाषितम् ।

जैसा उमा नन्दीश्वर रम्भा वरुणकन्यका ।

यांनी सांगितला तैसा परिणाम प्राप्त मला।
खरेच आहे ऋषींचे असत्य न होती वच ।
एतदेव समागम्य यत्नं कर्तुमिहार्हथ॥१२॥
राक्षसाश्चापि तिष्ठन्तु चर्यागोपुरमूर्धसु ।
हे टाळण्यासाठी प्रयत्न करतो मी तुम्हीसुद्धा॥१२॥
करा प्रयत्न रक्षुनी राजमार्ग गोपुरे।
स चाप्रतिमगाम्भीर्यो देवदानवदर्पहा॥१३॥
ब्रह्मशापाभिभूतस्तु कुम्भकर्णो विबध्यताम्।

अतुलनीय गम्भीर देवदानवांचा दर्प जो।
उतरवी आणि निद्रा ब्रह्मदेव शापे ज्याची॥१३॥
सदैव राहे अश्या त्या कुम्भकर्णा जागवा।
समरे जितमात्मानं प्रहस्तं च निषूदितम्॥१४॥
ज्ञात्वा रक्षोबलं भीममादिदेश महाबलः।
द्वारेषु यत्नः क्रियतां प्राकारश्चाधिरुह्यताम्॥१५॥
निद्रावशसमाविष्टः कुम्भकर्णो विबोध्यताम्।
ऐकोनि प्रहस्त मृत पराभूत रणाङ्गणी॥१४॥

भयानक राक्षससैन्या देई आदेश रावण।
करा रक्षण द्वारांचे चढूनि परकोटावरी॥१५॥
करा जागृत् निद्रेच्या अधीन कुंभकर्णास।
सुखं स्वपिति निश्चिन्त: कामोपहतचेतन:।
नव सप्त दशाष्टौ च मासान् स्वपिति राक्षस:।
मन्त्र कृत्वा प्रसुप्तोऽयमितस्तु नवमेऽहनि॥१७॥
झोपला असे निवान्त मुक्त कामभोगापासुनी।
कधी सात आठ नऊ मासही झोपत तो असे।

नऊ मासापूर्वी होता झोपला मजसी बोलुनी॥१७॥

तं तु बोधयत क्षिप्रं कुम्भकर्णं महाबलम्।
स हि संख्ये महाबाहु:ककुदं सर्वरक्षसाम्।
वानरान् राजपुत्रौ च क्षिप्रमेव हनिष्यति॥२८॥

तरी शीघ्र करा जागे कुम्भकर्णा महारथी।
राक्षसात असे सर्व युद्धात् पराक्रमी।
वानरां राजपुत्रां तो समरी शीघ्र वधेल॥१८॥

एष केतु: परं संख्ये मुखो वै सर्वरक्षसाम्।

कुम्भकर्ण: सदा शेते मूढो ग्राम्यसुखे रत:॥१९॥

राक्षसात सर्व मुख्य असे सर्वोत्तम् तो रणी।

ग्राम्यसुखे परि आसक्त सदैव झोपला असे॥१९॥

रामेणाभिनिरस्त्रस्य संग्रामेऽस्मिन् सुदारुणे।

भविष्यति न मे शोक: कुम्भकर्णे विबोधिते॥२०॥

जागृत् केल्यास तया युद्धात रामाकडुनी ।

पराजित होण्याचे दु:ख मजला नच् होइल॥२०॥

(कारण होणार् नाही पराभव माझा त्यामुळे)

किं करिष्याम्यहं तेन शुक्रतुल्यबलेन हि।
ईदृशे व्यसने घोरे यो न साह्यास कल्पते॥२१॥
काय उपयोग जरी इन्द्रासम पराक्रमी।
संकटी मजला साह्य करण्या असमर्थ जो॥२१॥
ते तु तद् वचनं श्रुत्वा राक्षसेन्द्रस्य राक्षसा:।
जग्मु: परमसंभान्ता: कुम्भकर्णनिवेशनम्॥२२॥
ते राक्षसेन्द्राचे बोल ऐकुनी सर्व राक्षस।
भयभीत होउनि जाती कुंभकर्णाच्या घरी॥२२॥

ते रावणासमादिष्टा मांसशोणितभोजना:।
गन्धं माल्यं महद्भक्ष्यमादाय सहसा ययु:॥२३॥
आज्ञेने रावणाच्या ते रक्तमांसाहारी राक्षस।
घेउनिया गन्धमाल्य जाती खाद्यसामग्रीसह॥२३॥
तां प्रविश्य महाद्वारा सर्वतो योजनायताम्।
कुम्भकर्णगुहां रम्यां पुष्पगन्धप्रवाहिनीम्॥२४॥
कुम्भकर्णस्य नि:श्वासादवधूता महाबला:।
प्रतिष्ठमाना: कृच्छ्रेण यत्नात् प्रविविशुर्गुहाम्॥२५॥

सुगन्धी सुन्दर् मोठ्या कुम्भकर्ण गुहेत तो ।
एक योजन जी लाम्ब एक योजन रुन्दही॥२५॥
श्वासाने त्याच्या सर्व राक्षस जाती फेकले।
प्रयासे परि मोठ्या ते गुहेमध्ये प्रवेशती॥२५॥
तां प्रविश्य गुहां रम्यां रत्नकाञ्चनकुट्टिमाम्।
ददृशुर्नैर्ऋतव्याघ्राः शया भीमविक्रमम् ॥२६॥
रत्नकाञ्चनजडित रम्य गुहेत प्रवेशता।
पाहती राक्षस सुप्त कुम्भकर्णा पराक्रमी॥२६॥

ते तु तं विकृतं सुप्तं विकीर्णमिव पर्वतम्।
कुम्भकर्ण महानिद्रं समेता: प्रत्यबोधयन्॥२७॥
निद्रिस्त विकृतावस्थी पसरे जो पर्वतापरी।
घोरत असे त्या सर्व राक्षस एकत्र होउनी।
प्रयत्न करती त्याला जागृत करण्यास्तव॥२७॥
ऊर्ध्वलोमाञ्चिततनुं श्वन्तमिव पन्नगम्।
भ्रामयन्तं विनि:श्वासै: शयानं भीमविक्रमम्॥२८॥
केसाळ शरीरे सर्व सर्पासम श्वास घेतसे ।

निश्वासे ढकली लोकां भीमविक्रम राक्षस॥२८॥

भीमनासापुटं तं तु पातालविपुलाननम्।

शयने न्यस्तसर्वाङ्गं मेदोरुचिरगन्धितम्॥२९॥

विशाल पाताळासम मुख नाकपुड्याही महा।

तनूस शय्येवरिल गन्ध रक्त चरबीसम॥२९॥

काञ्चनाङ्गदनद्धाङ्गं किरीटेनार्कवर्चसम्।

ददृशुर्नैर्ऋतव्याघ्रं कुम्भकर्णमरींदमम्॥३०॥

बाजूबंद भुजांमध्ये किरीट तेजस्वी शिरी।

प्रकाशित सूर्यापरी त्यास राक्षस पाहती॥३०॥

ततश्चक्रुर्महात्मान: कुम्भकर्णस्य चाग्रत:।

भूतानां मेरुसंकाशं राशिं परमतर्पणम् ॥३१॥

मेरुपर्वतासम ढीग प्राण्यांचे त्याच्यासमोर।

लावती तया अत्यन्त करति जे तृप्ति प्रदान॥३१॥

मृगाणां महिषाणां च वराहाणां च संचयान् ।

चक्रुर्नैर्ऋतशार्दूला राशिमन्नस्य चाद्भुतम्॥३२॥

समूह रेडे डुक्कर मृग यांचे त्याच्यापुढे।

अन्नाच्या अद्भुत राशी आणती श्रेष्ठ राक्षस॥३२॥

तत: शोणितकुम्भांश्च मांसानि विविधानि च।

पुरस्तात् कुम्भकर्णस्य चक्रुस्त्रिदशशत्रव:॥३३॥

घडे रक्ते भरलेले मांस नाना प्रकारचे।

समोर कुम्भकर्णाच्या आणुनी ते ठेवती॥३३॥

लिलिपुश्चपरायेन चन्दनेन परंतपम्।

दिव्यैराश्वासयामासुर्माल्यैर्गन्धैश्च गन्धिभि:॥३४॥

धूपगन्धाश्च ससृजुष्टुवुश्च् परंतपम्।

जलदा इव चानेदुर्यातुधानास्ततस्तत:॥३५॥

शरीरा चन्दनलेप बहुमूल्य त्याच्या लावती।

सुगन्ध चन्दनपुष्प धूपाचा पसरवती॥३४॥

संतुष्ट करण्या त्यास करूनिया स्तुतिपाठ।

मेघांसम गम्भीरध्वनिने गर्जना करु लागती॥३५॥

शंखाश्च पूरयामासु: शशांकसदृशप्रभान् ।

तुमुलं युगपच्चापि विनेदुश्चाप्यमर्षिता:॥३६॥

अनेक चन्द्रम्यासम शुभ्रशंख फुंकूनिया।

करती तुमुलध्वनिने गर्जना ते राक्षस॥३६॥

नेदुरास्फोटयामासुश्चिक्षिपुस्ते निशाचरा:।

कुम्भकर्णविबोधार्थं चक्रुस्ते विपुलं स्वरम्॥३७॥

निशाचर सिंहनाद करण्या ताल ठोकण्या।

जागविण्या कुम्भकर्णा करती गम्भीर ध्वनि॥३७॥

सशंखभेरिपणवप्रणादं सास्फोटितक्ष्वेलितसिंहनादम्।

दिशो द्रवन्तस्त्रिदिवं किरन्त: श्रुत्वा विहंगा: सहसा निपेतु:॥३८॥

वाजती भेरि पणव शंख गर्जना सिंहनाद तालहि ठोकति सवे।

नादे त्या उडति सर्वत्र पक्षी उडताना पृथ्वीवरही पडती अचानक॥३८॥

यदा भृशं तैर्निनदैर्महात्मा न कुम्भकर्णो बुबुधे प्रसुप्त:।

ततो भुशुण्डिर्मुसलानि सर्वे रक्षोगणास्ते जगृहुर्गदाश्च॥३९॥

महान कोलाहले अश्या जागृत न होत कुंभकर्ण तदा ।

समस्त राक्षस घेती हाती भृशुण्डी मुसळ आणि गदा॥३९॥

तं शैलशृङ्गैर्मुसलैर्गदाभिर्वक्षस्थले मुद्गरमुष्टिभिश्च।

सुखप्रसुप्तं भुवि कुम्भकर्णं रक्षांस्युदग्राणि तदा निजघ्नु:॥४०॥

तरीहि सुखे सुप्त त्याच्या छातीवरी आरम्भ करति मारण्या ।

पर्वतशिखरे मुसळे मुद्गर आणि बुक्क्यांनी ते प्रचंड राक्षस॥४०॥

तस्य नि:श्वासवातेन् कुम्भकर्णश्च रक्षस:।

राक्षसा: कुम्भकर्णस्य स्थातुं शेकुर्न चाग्रत:॥४१॥

परि निश्वासवायुने कुम्भकर्णाच्या प्रेरित।

उभे न राहू शकती त्याच्यापुढे निशाचर॥४१॥

तत: परिहिता गाढं राक्षसा भीमविक्रमा:।

मृदङ्गपणवान् भेरी: शंखकुम्भगणास्तथा॥४२॥

दशराक्षससाहस्रं युगपत्पर्यवारयत् ।

नीलांजनचयाकारं तेतु तं प्रत्यबोधयन्॥४३॥

बांधुनी तदनंतर वस्त्रे कसुनी राक्षस ।
दशसहस्र संख्येने कुम्भकर्णा वेढुनिया॥४२॥
प्रयत्न लागले करू जागवण्या निशाचरा।
मृदंग पणव भेरी शंख कुम्भ फुंकुनीया॥४३॥
अभिनन्तो नन्दतश्च न च सम्बुबुधे तदा।
यदा चैनं न शेकुस्ते प्रतिबोधयितुं तदा॥४४॥
ततो गुरुतरं यत्नं दारुणं समुपाक्रममन्।

प्रयत्न करिता ऐसा नच जागृत होइ तो।
जेव्हां हरप्रयत्नांनी जागवू शकती न त्या॥४४॥
त्याहुनी प्रयत्न श्रेष्ठ करण्या ते आरम्भती।
अश्वानुष्ट्रान् खरान् नागाजघ्नुर्दण्डकशाङ्कशैअ:॥४५॥
भेरीशङ्खामृदंगांश्च सरप्राणैरवादयन्।
निजजुश्चास्य गात्राणी महाकाष्ठकटंकरै:॥४६॥
मुद्गरैर्मुसलैश्चापि सर्वप्राणसमुद्यतै:।
तेन नादेन महता लङ्का सर्वा सपूरिता।

सपर्वतवना सर्वा सोऽपि नैव प्रबुध्यते॥४७॥

हत्ती घोडे गधे उंट दंडे अंकुश मारुनी।

त्याच्यावर नाचवती परि सर्व निरर्थक॥४५॥

भेरी मृदङ्ग् शंख फुंकती सर्व शक्तिनिशी।

करती प्रहार तैसे काष्ठे मुसळ मुद्गरे ॥४६॥

महान नादाने त्या पर्वत वनासहित ।

लंका दुमदुमे परी कुम्भकर्ण न जागृत॥४७॥

ततो भेरीसहस्रं तु युगपत् समहन्यत।

मृष्टलांचनकोणानामसक्तानां समन्तत:॥४८॥

भेरी सहस्र एकत्र वाजवती न थाम्बता ।

वाजवण्यास्तव दंडे सुवर्णाचे वापरुनी॥४८॥

एवमप्यतिनिद्रस्तु यदा नैव प्रबुध्यते।

शापस्य वशमापन्नस्तत: कृद्धा निशाचरा:॥४९॥

निशाचर शापाधीन तरिही जागृत होत ना।

त्यामुळे क्रोधित होती आलेले सर्व राक्षस॥४९॥

तत: कोपसमाविष्टा: सर्वे भीमपराक्रमा:।

तद् रक्षो बोधयिष्यन्तश्चक्रुरन्ये पराक्रमम् ॥५०॥

होउनिया अतिक्रुद्ध निशाचर पराक्रमी ।

राक्षसा जागवण्या अन्य करती पराक्रम ॥५०॥

अन्ये भेरी: समाजघ्नुरन्ये चक्रुर्महास्वनम्।

केशानन्ये प्रलुलुपु: कर्णानन्ये दशन्ति च॥५१॥

भेरी वाजवती काही करती ध्वनि भयंकर।

केस ओढती काही कानास काही चावती॥५१॥

उदकुम्भशतानन्ये समसिञ्चन्त कर्णयो:।

न कुम्भकर्ण पस्पन्दे महानिद्रावशं गत:॥५२॥

शतकुम्भ जल काही त्याच्या कानी ओतती।

परी महानिद्रावश कुम्भकर्ण न जागृत॥५२॥

अन्ये च बलिनस्तस्य कूटमुद्गरपाणय:।

मूर्ध्नि बक्षसि गात्रेषु पातयन् कूटमुद्गरान् ॥५३॥

काही बलवान हाती काटेरी मुद्गर् घेती।

बडवती वक्ष मस्तक सर्वाङ्ग त्याच्यासवे॥५३॥

रज्जुबन्धनबद्धाभि: शतघ्नीभिश्च सर्वत:।

वध्यमानो महाकायो न प्राबुध्यत राक्षस:॥५४॥

चाबुक घेउनि सर्व अंगावर फटके ओढती।

परी न जागृत होत महाकाय तो राक्षस॥५४॥

वारणानां सहस्रं च शरीरेऽस्य प्रभावितम् ।

कुम्भकर्णस्तदा बुद्ध्वा स्पर्श परमबुध्यत॥५५॥

पळविती सहस्र हत्ती त्याच्या शरीरावर

स्पर्श तो जाणवे त्याला जागृत आणि जाहला॥५५॥

स पात्यमानैर्गिरिश्रुङ्गवृक्षरचिन्तयंस्तान् विपुलान् प्रहारान्।

निद्राक्षयात् क्षुभ्दयपीडितश्च विजृम्भ्माण: सहसोत्पपात्॥५६॥

न दाद देई पर्वतशिखरे वृक्ष पडले शरीरावरि जरी परी गजस्पर्शे।

निद्रेतुनी जागृत होउनि क्षुधेने व्याकुळ उठुन उडी मारुनि उभा॥५६॥

स नागभोगाचलश्रृंगकल्पौ विक्षिप्य बाहू जितवज्रसारौ।

विवृत्य वक्त्रं वडवामुखाभं निशाचरोऽसौ विकृतं जजृम्भे॥५७॥

भुजा ज्याच्या नागशरीरी पर्वतशिखरासम जिंकती ज्या वज्रशक्तिस।

जाम्भई घेता मुख ज्याचे विक्राळ दिसे वडवानलासम॥५७॥

तस्य जाजृम्भमाणस्य वक्त्रं पातालसंनिभम् ।

ददृशे मेरुशृंगाग्रे दिवाकर इवोदित:॥५८॥

पाताळासारखे त्याचे मुख घेताना जाम्भई ।

दिसे सूर्यासमान मेरु पर्वतशिखरावरी ॥५८॥

स जृम्भमाणोऽतिबल: प्रबुद्धस्तु निशाचर:।

नि:श्वासश्चास्य संजज्ञे पर्वतादिव मारुत:॥५९॥

जाम्भई देता त्याने श्वास त्याच्या मुखातुनी।

निघे वायुसम भासे वाहे जो पर्वतशिखरी ॥५९॥

रूपमुत्तिष्ठस्तस्य कुम्भकर्णस्य तद् बभौ।

युगान्ते सर्वभूतानि कालस्येव दिधक्षत॥६०॥

जागृत कुम्भकर्णाचे दिसे मुख कालासम।

युगान्ते इच्छि जो करण्या संहार सर्व प्राण्यांचा॥६०॥

तस्य् दीप्ताग्निसदृशे विद्युत्सदृशवर्चसी।

ददृशाते महानेत्रे दीप्ताविव महाग्रहौ॥६१॥

प्रज्वलित अग्नि आणि विजेसम मोठे नेत्र।

दिसती ग्रह महान जणु होती प्रकाशित॥६१॥

ततस्त्वदर्शयन् सर्वान् भक्ष्यांश्च विविधान् बहून्।

वराहान् महिषांष्चैव बभक्ष स महाबल:॥६२॥

आद्द् बुभुक्षितो मांसं शोणितं तृषितो पिबत्।

मेद:कुम्भाश्च मद्यांश्च पपौ सक्ररिपुस्तदा॥६३॥

ततस्तृप्त इति ज्ञात्वा समुत्पेतुर्निशाचरा:।

शिरौभिश्च प्रणम्यैन सर्वत: पर्यवारयन्॥६४॥

निद्राविशदनेत्रस्तु कलुषीकृतलोचन:।

चारयन् सर्वतो दृष्टिं तान् ददर्श निशाचरान्॥६५॥

पाहतसे तेव्हां सर्व भक्ष्ये विविध बहु।

सर्व ते डुक्करे रेडे खातसे तो महाबळी॥६२॥

करुनी भक्षण मांस रक्ते तहान भागवी।

मद्य चरबीचे कुम्भ पीतसे इन्द्रशत्रु तो॥६३॥

तृप्त पाहुनि त्यास समाधानी निशाचर ।

वन्दुनी मस्तके तया जाती सर्व निघोनिया॥६४॥

निद्रेने अर्धोन्मीलित नेत्र उघडुनि पाहता।

सर्वत्र दिसती त्याला निशाचर पुढती उभे॥६५॥

स सर्वान् सान्त्वयामास नैर्ऋतान् नैर्ऋतर्षभः।

बोधनाद् विस्मितश्चापि राक्षसानिदमब्रवीत्॥६६॥

सान्त्वना देउनी सर्वां जागृत केल्याकारणे।

विस्मित होवोनि त्याने सर्वं ऐसे विचारले॥६६॥

किमर्थमहमादृत्य भवद्भि: प्रतिबोधित:।

कच्चित् सुकुशलं राज्ञो भयं वा नेह किंचन्॥६७॥

आदरे ऐशा तुम्ही का सांगा जागविले मज।

असे का राजा कुशल भय न काही उपस्थित॥६७॥

अथवा ध्रुवमन्येभ्यो भयं परमुपस्थितम्।

यदर्थमेव त्वरितैर्भवद्भि: प्रतिबोधित:॥६८॥

किंवा होइ उपस्थित कसले भय् निश्चित।

ज्यामुळे तुम्ही मजला तातडीने जागविले॥६८॥

अद्य राक्षसराजस्य भयमुत्पाटयाम्यहम्।

दारयिष्ये महेन्द्रं वा शीतयिष्ये तथानलम्॥६९॥

भय राक्षसराजाचे आज उखडुनी फेकिन।

मारीन महेन्द्रासहि करीन थण्ड अग्निस॥६९॥

न ह्यल्पकारणे सुप्तं बोधयिष्यति मादृशम्।

तदाख्यातार्थतत्त्वेन मत्प्रबोधनकारणम्॥७०॥

न कारणे छोट्यामोठ्या असे जागविले मज।

म्हणुनी निश्चित तुम्ही सांगा कारण मला॥७०॥

एवं ब्रुवाणं संरब्धं कुम्भकर्णमरिंदमम् ।

यूपाक्ष: सचिवो राज्ञ: कृतांजलिरभाषत ॥७१॥

रोषे कुम्भकर्ण असा जेव्हां विचारू लागला।

रावणसचिव यूपाक्ष बोले हात जोडुनी॥७१॥

न नो देवकृतं किंचिद् भयमस्ति कदाचन ।

मानुषन्नो भयं राजंस्तुमुलं सम्प्रबाधते॥७२॥

नसे देवतापासूनी भय आम्हा किंचितही।

माणसापासुनी राजन् तुमुल भय बाधते ॥७२॥

न दैत्यदानवेभ्यो वा भयमस्ति न नः क्वचित्।

यादृशं मानुषं राजन् भयमस्मानुपस्थितम्॥७३॥

मानवाचे भय एका जसे आज उपस्थित ।

तसे न कधिही झाले देवदैत्यांपासुनी ॥७३॥

वानरैः पर्वताकारैर्लङ्केयं परिवारिता ।

सीताहरणनसंतप्ताद् रामान्नस्तुमुलं भयम् ॥७४॥

घेरले असे लंकेस वानरे सर्व बाजूंनी

सीताहरणे संतप्त रामापासूनि आम्हा भय ॥७४॥

एकेन वानरेणेय् पूर्वं दग्धा महापुरी।

कुमारो निहतश्चाक्ष: सानुयात्र: सकुञ्जर:॥७५॥

एका वानराने पूर्वी लङ्कापुरी जाळली।

मारले राजकुमार अक्षा गज सोबत्यांसह॥७५॥

स्वयं रक्षोधिपश्चापि पौलस्त्यो देवकण्टक:।

व्रजेति संयुगे मुक्तो रामेणादित्यवर्चसा॥७६॥

सूर्यासम तेजस्वी रामाने देवशत्रु पौलस्त्या ।

युद्धात हारवुनि जीवित सोडले जाण्या लंकेस॥७६॥

यन्न देवै: कृतो राजा नापि दैत्यैर्न दानवै:।

कृत: स इह रामेण विमुक्त: प्राणसंशयात् ॥७७॥

जे न साधले देवांना दैत्यां दानवांनाहि न जे।

केले रामाने त्यांचे प्राण वाचले संकटातुनी ॥७७॥

स यूपाक्षवच: श्रुत्वा भ्रातुर्युधि पराभवम्।

कुम्भकर्णो विवृत्ताक्षो यूपाक्षमिदमब्रवीत् ॥७८॥

भावाच्या पराभवाचे य़ुपाक्षाकडुनि ऐकता।

फाडफाडुनी डोळे कुंभकर्ण त्या बोलला॥७८॥

सर्वमद्यैव यूपाक्ष हरिसैन्यं सलक्ष्मणम्।

राघवं च रणे जित्वा ततो द्रक्ष्यामि रावणम्॥७९॥

सर्व मी वानरसेना रामास लक्ष्मणासह ।

जिंकूनच रणामध्ये जाईन रावणाकडे॥७९॥

राक्षसांस्तर्पयिष्यामि हरीणां मांसशोणितै:।

रामलक्ष्मणयोश्चापि स्वयं पास्यामि शोणितम्॥८०॥

रक्तमांसे वानरांच्या करीन तृप्त राक्षसां ।

रक्त राम लक्ष्मणांचे मी स्वत: करिन प्राशन ॥८०॥

तत् तस्य वाक्यं ब्रुवतो निशम्य सगर्वितं रोषविवृद्धदोषम्।

महोदरो नैर्ऋतयोधमुख्य: कृतांजलिर्वाक्यमिदं बभाषे॥८१॥

ऐकूनि ते त्याचे वाक्य रोषयुक्त गर्वाने बोलला जे।

योद्धा मुख्य राक्षासांमधिल हात जोडुनि बोले तया ॥८१॥

रावणस्य वच: श्रुत्वा गुणदोषो विमृश्य च।

पश्चादपि महाबाहो शत्रून् युधि विजेष्यसि॥८२॥

रावणवच ऐकोनी विचार गुणदोषांचा ।

करुनी नंतर युद्धी परास्त शत्रूस करा॥८२॥

महोदरवच: श्रुत्वा राक्षसै: परिवारित:।

कुम्भकर्णो महातेजा: सम्प्रतस्थे महाबल:॥८३॥

ऐकुनी महोदर वाक्य घेतलेला राक्षसे ।

महाबली कुम्भकर्ण उद्यत् निघण्यास्तव ॥८३॥

सुप्तमुत्थाप्य भीमाक्षं भीमरूपपराक्रमम्।

राक्षसास्त्वरिता जग्मुर्दशग्रीवनिवेशनम्॥८४॥

सुप्त कुम्भकर्ण ज्याचे नेत्र रूप भयानक ।

पराक्रमी जो उठुनी जाई रावणमहाली ॥८४॥

तेऽभिगम्य दशग्रीवमासीनं परमासने।

ऊचुर्बद्धाञ्जलिपुटा: सर्व एव निशाचरा:॥८५॥

सिहासनी उत्तम आरूढ रावणाकडे ।

जाउनी निशाचर सर्व हात जोडुनि बोलती॥८५॥

कुम्भकर्ण: प्रबुद्धोऽसौ भ्राता ते राक्षसेश्वर् ।

कथं तत्रैव निर्यातु द्रक्ष्यसे तमिहागतम्॥८६॥

कुम्भकर्ण जागे झाले आता काय करायचे।

जावे युद्धस्थली सरळ की भेटण्या यावे इथे॥८६॥

रावणस्त्वब्रवीद्धृष्टो राक्षसांस्तानुपस्थितान् ।

द्रष्टमेनमिहेच्छामि यथान्यायं च पूज्यताम्॥८७॥

हर्षाने रावण बोले राक्षसां त्या उपस्थित।

त्यास पाहू इच्छितो मी सत्कारण्या यथोचित ॥८७॥

तथेत्युक्त्वा तु ते सर्वे पुनरागम्य राक्षसाः।

कुम्भकर्णमिदं वाक्यमूचू रावणचोदिता:॥८८॥

मान्य ते करुनी सर्व राक्षस रावणाकडुनी

जाउनी कुम्भकर्णाकडे बोलले त्याला असे ॥८८॥

द्रष्टुं त्वां कांक्षते राजा सर्वराक्षसपुङ्गव:।

गमने क्रियतां बुद्धिर्भ्रातरं सम्प्रहर्षय ॥८९॥

भेटण्या इच्छिती तुम्हा राक्षसराज् रावण ।

म्हणुन् चलावे बंधू होतिल हर्षित त्यामुळे॥८९॥

कुम्भकर्णस्तु दुर्धर्षो भ्रातुराज्ञाय शासनम्।

तथेत्युक्त्वा महावियर्: शयनादुत्पपात ह॥९०॥

बन्धूच्या आदेशाने या कुम्भकर्ण पराक्रमी।

बोलुनी “तैसे करतो” शय्येवरुनी तो उठे॥९०॥

प्रक्षाल्य वदनं हृष्ट: स्नात: परमहर्षित:।

पिपासुस्त्वतयामास पानं बलसमीरणम् ॥९१॥

मुखप्रक्षालन स्नान करुनी पर्महर्षित।

आणण्यासाठी आज्ञापी पेय बलवर्धक ॥९१॥

ततस्ते त्वरितास्तत्र राक्षसा रावणाज्ञया।

मद्यं भक्ष्यांश्च विविधान् क्षिप्रमेवोपहारयन्॥९२॥

राक्षस रावणाज्ञेने सर्व ते घेउनी येती ।

नाना प्रकारचे भक्ष्य पदार्थ तैसे मद्यही॥९२॥

पीत्वा घटसहस्रे द्वे गमनायोपचक्रमे।

ईषत्समुत्कटो मत्तस्तेजोबलसमन्वित:॥९३॥

घट मद्याचे द्विसहस्र पिउनी जाण्या उद्यत।

होत उत्साही तेजस्वी शक्तिसंपन्न त्यामुळे॥९३॥

कुम्भकर्णो बभौ रुष्ट: कालान्तकयमोपम:।

भ्रातु: स भवन् गच्छन् रक्षोबलसमन्वित:।
कुम्भकर्ण: पदन्यासैरकम्पयत् मेदिनीम् ॥९४॥
भवनाकडे भ्रात्याच्या जाताना प्रलयकारी ।
विनाशक यमराजासम रोषपूर्ण दिसे ।
पृथ्वी कम्पित होतसे त्याच्या चालण्यामुळे ॥९४॥
स राजमार्ग वपुषा प्रकाशयन् सहस्ररश्मिर्धरणीमिवांशुभि:।
जगाम तत्राञ्जलिमालया वृत: शतक्रतुर्गेहमिव स्वयंभुव:॥९५॥
करीत् तो राजमार्ग स्वतेजे प्रकाशमान् जसा करी सूर्य भूतला।

येतसे गृही बन्धूच्या जैसे देवराज इन्द्र ब्रह्माजीच्या सदनी ॥९५॥

स राजमार्गस्थममित्रघातिनं वनौकसस्ते सहसा बहि:स्थिता:।

दृष्ट्वाप्रमेयं गिरिशृङ्गकल्पं वितत्रसुस्ते सह यूथपालै:॥९६॥

चालता मार्गावरुनी शत्रुघाती कुम्भकर्ण पर्वतशिखरासम ।

पाहुनी त्या वानर नगराबाहेरील भयभीत सेनपतींसह ॥९६॥

केचिच्छरण्यं शरणं स्म राम् व्रजन्ति केचिद् व्यथिता: पतन्ति।

केचिद् दशश्च व्यथिता: पतन्ति केचिद् भयार्ता भुवि शेरते स्म॥९७॥

काही शरण जाती श्रीरामाकडे काही व्यथित पडती भूमीवरी।

दशदिशांस पळती काही होत धराशायी काही भूमीवरी झोपती॥९७॥

तमद्रिशृङ्गप्रतिमं किरीटिनं स्पृशन्तमादित्यमिवात्मतेजसा।
वनौकस: प्रेक्ष्य विवृद्धमद्भुतं भयार्दिता दुद्रुविरे यतस्तत:॥९८॥

पर्वतशिखरासम उंच शिरी मुकुट शोभे तेजस्वी सूर्यासम।
पाहुनी राक्षसा विशालकाय त्या पळती भये वनवासी वानर॥९८॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे षष्टितम: सर्ग:॥६०॥

युद्धकाण्ड सर्ग ६१

ततो रामो महातेजा धनुरादाय वीर्यवान् ।
किरीटिनं महाकायं कुम्भकर्ण ददर्श ह ॥१॥
तेव्हां श्रीराम तेजस्वी धनुष्य हाती घेउनी।
कुम्भकर्णा महाकाय किरिटधारी पाहती ॥१॥
तं दृष्ट्वा राक्षसश्रेष्ठं पर्वताकार दर्शनम् ।
क्रममाणमिवाकाशं पुरा नारायणं यथा ॥२॥

सतोयाम्बुदसंकाशं कांचनांगदभूषणम्।
दृष्ट्वा पुन:प्रदुद्राव वानराणां महाचमू:॥३॥
पाहुनी पर्वताकार अतिभव्य राक्षसा त्या।
आकाशा मोजण्या पूर्वी नारायण होतसे जसा॥३॥
सजल मेघासम कृष्ण सुवर्ण बाजूबन्दासह।
पाहुनी वानरसेना त्या पुन्हा वेगाने पळे॥३॥
विद्रुतां वाहिनीं दृष्ट्वा वर्धमानं च राक्षसम्।
सविस्मितमिदं रामो बिभीषणमुवाच ह॥४॥

राक्षसा वाढणाऱ्या आणि पळणाऱ्या सैन्यास।
विस्मित होत श्रीराम बिभीषणास पुसतसे॥४॥
कोऽसौ पर्वतसंकाश: किरीटी हरिलोचन:।
लङ्कायां दृश्यते वीर: सविद्युदिव तोयद:॥५॥
किरीटासह हा कोण वीर पिंगट नेत्र ज्या।
वीर लंकेतिल जैसा जलद बिजलीसह ॥५॥
पृथिव्यां केतुभूतोऽसौ महानेकाऽत्र दृश्यते।
यं दृष्ट्वा वानरा: सर्वे विद्रवन्ति ततस्तत:॥६॥

भूतली हा एकमात्र महान ध्वजासम दिसे।
पळताति सैरावैरा पाहुनी त्यास वानर ॥६॥
आचक्ष्व सुमहान् कोऽसौ रक्षो वा यदि वासुरः।
न मयैवंविधं भूतं द्रुष्टपूर्वं कदाचन॥७॥
सांग् हा एवढा मोठा राक्षस किंवा असुर ।
अश्या प्राण्यास पूर्वी मी कधीही पाहिला नसे॥७॥
सम्पृष्टो राजपुत्रेण रामेणाक्लिष्टकर्मणा।
बिभीषणो महाप्राज्ञः काकुत्स्थमिदमब्रवीत् ॥८॥

महान् कृत्ये करणाऱ्या रामाने विचारता असे।
बिभीषण महाबुद्धि सांगे काकुत्स्था असे ॥८॥
येन वैवस्वतो युद्धे वासवश्च पराजित:।
सैष विश्रवस: पुत्र: कुम्भकर्ण: प्रतापवान् ।
अस्य प्रमाणसदृशो राक्षसोऽन्यो न विद्यते॥९॥
पराजित केले याने यमासह इन्द्रासही ।
कुम्भकर्ण प्रतापी हा विश्रव्याचा पुत्र असे।
राक्षस याच्याइतका भव्य कोणी अन्य नसे॥९॥

एतेन देवा युधि दानवाश्च यक्षा भुजंगा: पिशिताशनाश्च।
गन्धर्वविद्याधरकिन्नराश्च सहस्रशो राघव सम्प्रभग्ना:॥१०॥
युद्धात् याने देवता दानव यक्षा भुजङ्गा विद्याधरां।
गन्धर्वा किन्नरा राक्षसा मारुनी पळविले सहस्रदा राघवा॥१०॥
शूलपाणिं विरूपाक्षं कुम्भकर्णं महाबलम्।
हन्तु न शेकुस्त्रिदशा: कालोऽयमिति मोहिता:॥११॥
कुम्भकर्ण शूल हाती घेउनी उभा राहता ।
देवता न शकती मारू कालरूप हा मानती॥११॥

प्रकृत्या ह्येष तेजस्वी कुम्भकर्णो महाबल:।
अन्येषां राक्षसेन्द्रानां वरदानकृतं बलम्॥१२॥
मुळात असे तेजस्वी कुम्भकर्ण महाबळी।
अन्य राक्षसांचे बळ वरदाने प्राप्त असे॥१२॥
बालेन जातमात्रेण क्षुधार्तेन महात्मना।
भक्षितानि सहस्राणि प्रजानां सुबहून्यपि॥१३॥
जन्मताच या बाळाने सहस्र प्रजाजनांना।
भूक लागल्यामुळे खाऊन टाकले होते ॥१३॥

तेषु सम्भक्ष्यमाणेषु प्रजा भयपीडिता:।
यान्त स्म शरणं शक्रं तमप्यर्थं न्यवेदयन् ॥१४॥
भक्षणक्रियेने त्याच्या या प्रजाजन् भयपीडित।
शरण जाउनी इन्द्रा पीडा आपलि सांगती ॥१४॥
स कुम्भकर्णं कुपितो महेन्द्रो जघान वज्रेण शितेन वज्रौ।
स शक्रवज्राभिहतो महात्मा चचालकोपाच्च भृशं ननाद ॥१५॥
महेन्द्र कोपवशे वज्राने तीक्ष्ण करी घायाळ कुम्भकर्णास।
आघाते राक्षस तो क्षुब्ध होऊन सिंहनाद जोराने करु लागला ॥१५॥

तस्य नानद्यमानस्य कुम्भकर्णस्य रक्षसः।
श्रुत्वा निनादं वित्रस्ताः प्रजा भूयो वितत्रसुः॥१६॥
गर्जना त्याने करिता वारंवार प्रजाजन ।
ऐकुनी तो सिंहनाद भयभीत होती आणखी॥१६॥
ततः कृद्धो महेन्द्रस्य कुम्भकर्णो महाबलः।
निष्कृष्यैरावताद् दन्तं जघानोरसि वासवम्॥१७॥
क्रुद्ध कुम्भकर्ण तेव्हां ऐरावताचा उपटी ।
दन्त आणि छातीवर प्रहार इन्द्राच्या करी॥१७॥

कुम्भकर्णप्रहारार्तो विजज्वाल स वासवः।
ततो विषेदुः सहसा देवा ब्रह्मर्षिदानवाः॥१८॥
प्रहारे कुम्भकर्णाच्या इन्द्र व्याकुळ होतसे।
पाहुनी ब्रह्मर्षि देव जाहले सर्व व्याकुळ॥१८॥
प्रजाभिः सह शक्रस्य ययौ स्थानं स्वयंभुवः।
कुम्भकर्णस्य दौरात्म्यं शशंसुस्ते प्रजापतेः॥१९॥
प्रजाजनांसह इन्द्र जाती ब्रह्माजींच्या गृही।
दुष्टता कुम्भकर्णाची विस्ताराने सांगती॥१९॥

प्रजानां भक्षणं चापि देवांना चापि घर्षणम्।
आश्रमध्वंसनं चापि परस्त्रीहरणं भृशम्॥२०॥
याचे प्रजाभक्षण देवतांचा तिरस्कार।
ऋषिआश्रम विध्वंस परस्त्रीहरण अनेकदा॥२०॥
एवं प्रजा यदि त्वेष भक्षयिष्यति नित्यश:।
अविरेणैव कालेन शून्यो लोको भविष्यति॥२१॥
प्रजा करील भक्षण हा याप्रकारे नित्यश:।
होईल काळात थोड्या शून्य होईल हे जग॥२१॥

वासवस्य वच: श्रुत्वा सर्वलोकपितामह:।
रक्षास्यावाहयामास कुम्भकर्णं ददर्श ह॥२२॥
इन्द्राचे वच ऐकोनी सर्वलोकपितामह ।
बोलावी राक्षसां सर्व कुम्भकर्णास भेटण्या॥२२॥
कुम्भकर्णं समीक्ष्यैव वितत्रास प्रजापति:।
कुम्भकर्णमथाश्वास्त: स्वयंभूरिदमब्रवीत्॥२३॥
कुम्भकर्णास पाहून प्रजापतिहि कांपति।
परि साम्भाळून स्वत:स ऐसे बोलती त्याप्रति॥२३॥

ध्रुवं लोकविनाशाय पौलस्त्येनासि निर्मित:।
तस्मात् त्वमद्यप्रभृति मृतकल्प: शयिष्यसे॥२४॥
निश्चित पौलस्त्ये तुज जगनाशार्थच निर्मिले।
म्हणुनी आजपासुनि झोपशील् मृतासम॥२४॥
ब्रह्मशापाभिभूतोऽथ निपतताग्रत: प्रभो:।
तत: परमसम्भ्रान्तो रावणो वाक्यमब्रवीत्॥२५॥
पडे शापाने ब्रह्म्याच्या रावणासमोरच तो ।
पाहून ते घाबरून रावण ऐसे बोलला ॥२५॥

प्रबुद्धः काञ्चनो वृक्षः फलकाले निकृत्यते।
न नप्तारं स्वकं न्याय्यं शप्तुमेव प्रजापते॥२६॥
वाढता काञ्चनवृक्ष फळ् देण्या लागता।
तोडणे नसे योग्य तसे शाप देणे यास।
नसे न्याय्य स्वकीया ह्या न शापावे प्रजापते ॥२५॥
न मिथ्यावचनश्च त्वं स्वप्स्यत्येव न संशयः।
कालस्तु क्रियतामस्य शयने जागरे तथा॥२७॥
मिथ्यावचन न तुम्ही झोपेल हा निःसंशय।

परी या जागृत सुप्त काल करावा निश्चित॥२७॥
रावणस्य वच: श्रुत्वा स्वयंभूरिदमब्रवीत्।
शयिता ह्येष षण्मासमेकाहं जागरिष्यति ॥२८॥
रावणवच ऐकून स्वयम्भू ब्रह्मा वदे।
झोपेल हा सहा मास दिनी एका जागृत ॥२८॥
एकेनाना त्वसौ वीरश्चरन् भूमिं बुभुक्षित:।
व्यात्तास्यो भक्षयेल्लोकान् संवृद्ध इव पावक:॥२९॥
जागृत होउनि एक दिवस राहील भूवर।

अग्नीसम प्रज्वलित खाईल प्राणी अनेक॥२९॥

सोऽसौ व्यसनमापन्नः कुम्भकर्णमबोधयत।

त्वत्पराक्रमभीतश्च राजा सम्प्रति रावणः॥३०॥

पडून आपत्तिमध्ये जागवी कुम्भकर्णास ।

भयभीत पराक्रमे आपल्या सम्प्रति रावण॥३०॥

स एष निर्गतो वीरः शिबिराद् भीमविक्रमः।

वानरान् भृशसंक्रुद्धो भक्षयन् परिधावति॥३१॥

महापराक्रमी वीर बाहेर शिबिरातुनि ।

येऊनि वानरां खाण्या धावे क्रुद्ध हो उनी॥३१॥

कुम्भकर्णं समीक्ष्यैव हरयोऽद्य प्रदुद्रुवु:।
कथमेनं रणे क्रुद्धं वारयिष्यन्ति वानरा:॥३२॥

पाहुनिया कुम्भकर्णा पळती सारे वानर।
कसे रणी कृद्ध वीरा रोखतील पुढे येण्या ॥३२॥

उच्यन्तां वानरा: सर्वे यन्त्रमेतत् समुच्छ्रितम्।
इति विज्ञाय हरयो भविष्यन्तीह निर्भया:॥३३॥

सांगूनि वानरां सर्व ही व्यक्ति न यन्त्र असे।

समजूत करिता ऐसी ते निर्भय होतिल ॥३३॥

बिभीषणवचः श्रुत्वा हेतुमत् सुमुखोद्गतम्।
उवाच राघवो वाक्यं नीलं सेनापतिं तदा ॥३४॥

ऐकूनि वाक्य सयुक्तिक बिभीषणाच्या सुमुखे।
सेनापति नीलास श्रीराम ऐसे बोलती॥३४॥

गच्छ सैन्यानि सर्वाणि व्यूहा तिष्ठस्व पावके।
द्वाराण्यादाय लङ्कायाश्चर्याश्चास्याथ संक्रमान् ॥३५॥

जाउनी सर्व सैन्याचा व्यूह बनवी पावक।

घेउनि ताब्यात द्वारे लंकेचे राजमार्गही ॥३५॥

शैलशृङ्गाणि वृक्षांश्च शिलाश्चाप्युपसंहृन्।
भवन्तः सायुधाः सर्वे वानराः शैलपाणयः॥३६॥

पर्वताची शिखरे शिळा वृक्ष करूनिया ।
अस्त्रे पत्थरां घेउनि सर्व तयारीत रहा ॥३६॥

राघवेण समादिष्टो नीलो हरिचमूपतिः।
शशास वानरानीकं यथावत् कपिकुञ्जरः॥३७॥

आज्ञा राघवाची होता देई कपिश्रेष्ठ नील।

यथोचित कार्यास्तव आदेश सर्व वानरां॥३७॥

ततो गवाक्ष: शरभो हनूमानङ्गदस्तथा।
शैलशृङ्गाणि शैलाभा गृहीत्वा द्वारमभ्ययु:॥३८॥

तदा गवाक्ष शरभ अंगदादि हनूमान।
पर्वतशिखरांसह द्वारी राहती जाउनी॥३८॥

रामवाक्यमुपश्रुत्य हरयो जितकाशिन:।
पादपैरर्दयन् वीरा वानरा: परवाहिनीम् ॥३९॥

उल्लासे वीर वानर आज्ञा रामाची ऐकुनी।

पीडित करती शत्रूंना वरूक्षा हाती घेउनी॥३९॥

ततो हरीणां तदनीकमुग्रं रराज शैलोद्यतवृक्षहस्तम्।
गिरेः समीपानुगतं यथैव मन्महाम्भोधरजालमुग्रम्॥४०॥

तदा वानरसेना भयंकर उग्र पर्वतापाशी जमलेल्या।
मेघांपरी महान उग्र घटा असावी तशी सुशोभित दिसे॥४०॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे एकषष्टितमः सर्गः॥६१॥

युद्धकाण्ड सर्ग् ६२

स तु राक्षसशार्दूलो निद्रामदसमाकुलः।
राजमार्गं श्रिया जुष्टं ययौ विपुलविक्रमः॥१॥
राक्षसशार्दूल निद्रा मदे व्याकुळ होउनी।
आळसात चाले राजमार्गावरुनी शोभित॥१॥
राक्षसानां सहस्रैश्च वृत्तः परमदुर्जयः।
गृहेभ्यः पुष्यवर्षेण कीर्यमाणस्तदा ययौ ॥२॥

चाले दुर्जय वीर तॊ सहस्र राक्षसांसह ।
रस्त्यावरिल् घरातूनी पुष्पवर्षाव होतसे॥२॥
स हेमजालविततं भानुभास्वरदर्शनम्।
ददर्श विपुलं रम्यं राक्षसेन्द्रनिवेशनम्॥३॥
हेमजाले आच्छादित असल्यामुळे दिसे। ।
सूर्यासम दीप्तिमान् त्यास रावण भुवन ॥३॥
स तत्तदा सूर्य इवाभ्रजालं प्रविश्य रक्षोधिपतेर्निवेशनम् ।
ददर्श् दूरेऽग्रजमासनस्थं स्वयंन्हुव शक्र इवासनस्थम्॥४॥

अभ्रजाली सूर्य लपावा तसा कुम्भकर्ण प्रवेशे रावणगृही।
पाही बन्धूस जसा इन्द्र करी दर्शन ब्रह्म्याचे कमलासनी॥४॥
भ्रातु: स भवनं गच्छन् रक्षोगणसमन्वित:।
कुम्भकर्ण: पदन्यासैरकम्पयत मेदिनीम्॥५॥
बन्धुच्या भवनी जाता राक्षसगणांसमेत।
कुम्भकर्ण पदन्यासे धरणीस कांपवित्॥५॥
सोऽभिगम्य गृहण् भ्रातु: कक्ष्यमभिविगाह्य च।
ददर्शिद्विग्नमासीनं विमाने पुष्पके गुरुम्॥६॥

बन्धुगृही जाउनी शिरे कक्षेत आतल्या।
पाही बन्धूस उद्विग्न पुष्पक विमानी स्थित॥६॥
अथ दृष्ट्वा दशग्रीव: कुम्भकर्णमुपस्थितम्।
पूर्णमुत्थाय संहृष्ट: संनिकर्षमुपायनयत्॥७॥
पाहुनिया दशग्रीव त्या राही उठुनी उभ।
आणि हर्षाने त्यास बोलवी जवळि आपल्या॥७॥
अथासीनस्य पर्यङ्के कुम्भकर्णो महाबल:।
भ्रतुर्वन्दे चरणौ किं कृत्यमिति चाब्रवीत्॥८॥

सिंहासनस्थ बन्धूच्या प्रणाम चरणी करुनी।
विचारी कोणते कार्य आहे करावयाचे मज॥८॥
उत्पत्य चैनं मुदितो रावण: परिषस्वजे।
स भ्रात्रा सम्परिष्वक्तो यथावच्चाभिनन्दित:॥९॥
उठुनो आनन्दाने कुम्भकर्णा हृदयी लाविले।
आलिंगुनि रावणाने त्यास अभिनन्दले ॥९॥
कुम्भकर्ण: शुभं दिव्यं प्रतिपेदे वरासनम्।
स तदासनमाश्रित्य कुम्भकर्णो महाबल:॥१०॥

संरक्तनयन: क्रोधाद् रावणं वाक्यमब्रवीत्।
त्यानन्तर् कुम्भकर्ण सुन्दर् दिव्य आसनी।
आसनावरी बसुनी त्या कुम्भकर्ण महाबली॥१०॥
क्रोधे नेत्र लाल करुनी रावणास पुसतसे ।
किमर्थमहमादृत्य त्वया राजन् प्रबोधित:॥११॥
शंस कस्माद् भयं तेऽत्र को वा प्रेतो भविष्यति।
आदरे मज कशाला मज जागविलेस तू ॥११॥
सांग भय कोणापासूनी तुजला उत्पन्न होतसे।

किंवा कोण परलोकी जाण्यास सिद्ध होतसे ।
भ्रातरं रावण: क्रुद्धं कुम्भकर्णमवस्थितम्॥१२॥
रोषेण परिवृत्ताभ्यं नेत्राभ्यं वाक्यमब्रवीत्।
तदा रावण त्याच्यापाशी बैसलेल्या बन्धूस॥१२॥
फिरवीत रोषे नेत्र कुम्भकर्णास बोलला ।
अद्य ते सुमहान् काल: शयानस्य महाबल॥१३॥
सुषुप्तस्त्वं न जानीये मम रामकृतं भयम्।
दीर्घ काल झोपेत घालविलास महाबली॥१३॥

त्यामुळे जाणसी ना तू रामाचे मजला भय ।
एष दाशरथिः श्रीमान् सुग्रीवसहितो बली॥१४॥
समुद्रं लवयित्वा तु मूलं न परिकृन्तति।
हा दाशरथि श्रीमान सुग्रीवासह येतसे॥१४॥
सागरा लंघूनि कुलाचा नाश करण्या आपल्या ।
हन्त पश्यस्व लंकायां वनान्युपवनानि च॥१५॥
सेतुना सुखमागत्य् वानरैकार्णवं कृतम्।
हाय पहा लंकेतील वने उपवने तशी॥१५॥

सेतु बान्धुन येऊन वानरार्णव केला जणु।
ये राक्षसा मुख्यतमा हतास्ते वानरैर्युधि॥१६॥
वानराणां क्षयं युद्धे न पश्यामि कथंचन।
न चापि वानरा युद्धे जितपूर्वा: कदाचन॥१७॥
मारले वानरे मुख्य राक्षस आपुले रणी॥१६॥
पण दिसे न होताना संहार त्यांचा मज।
पूर्वी न जिंकले गेले वानर युद्धात कधी॥१७॥
तदेतद् भयमुत्पन्नं त्रायस्वेह महाबल।

नाशय त्वमिमानद्य तदर्थं बोधितो भवान्॥१८॥

त्यांपासुनि भय उत्पन्न वाचवी आम्हा महाबली।

करण्या वानरांचा त्या नाश जागविले मी तुज॥१८॥

सर्वक्षपितकोशं च स त्वमभ्युपपद्य माम् ।

त्रायस्वेमां पुरीं लङ्कां बालवृद्धासेविताम् ॥१९॥

कोश सर्व माझा रिक्त तरी अनुगृह मजवरी।

आता बालवृद्ध फक्त उरले लङ्का वाचवि तू॥१९॥

भ्रातुरर्थे महाबाहो कुरु कर्मं दुष्करम्।

मयैव नोक्तपूर्वो हि भ्राता कश्चित् परंतप॥२०॥
कर पराक्रम दुष्कर बन्धूस्तव महाबाहो।
यापूर्वी न मी कधी बन्धूपाशी कोणत्या ।
असेल ऐसा मी केला अनुनय परंतप ॥२०॥
त्वय्यस्ति मम च स्नेह: परा सम्भावना च मे।
देवासुरेषु युद्धेषु बहुशो राक्षसर्षभ॥२१॥
त्वया देवा: प्रतिव्युह्य निर्जिताश्चासुरा युधि॥२२॥
तुझ्यावरी बहु स्नेह आशाही तुजपासुनी।

प्रतिद्वंद्वी स्थान घेत देवासुरसंग्रामात तू
परास्त केले आहेस देवांस असुरांसही॥२२॥
तदेतत् सर्वमातिष्ठ वीर्यं भीमपराक्रम।
नहि ते सर्वभूतेषु दृश्यते सदृशो बली॥२३॥
तरी पराक्रमी वीरा दाखव भीमपराक्रम्।
न दिसे मज् कोणीही तुझ्यासम पराक्रमी॥२३॥
कुरुष्व मे प्रियहितमेतदुत्तमं यथाप्रियं प्रियरण बान्धवप्रिय।
स्वतेजसा व्यथय सपत्नवाहिनी शरद्धनं पवन् प्वोयतो महान्॥२४॥

करी मम प्रिय आणि उत्तम हित करसी प्रेम सर्व बन्धुबान्धवांवरी।
व्यथा दे शत्रुसेनेस जसा प्रचण्ड वायु छिन्नभिन्न करी शरद्घनां॥२४॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे द्विषष्टितम: सर्ग:॥६२॥

युद्धकाण्ड सर्ग ६३

तस्य राक्षसराजस्य निशम्य परिदेवितम्।
कुम्भकर्णो बभाषेदं वचनं प्रजहास च॥१॥
विलाप राक्षसराजाचा ऐकुनीया सर्व हा।
जोराने हंसुनी बोले कुम्भकर्ण असे तया॥१॥
दृष्टो दोषो हि योऽस्माभि: पुरा मन्त्रविनिर्णये।

हितेष्वनभियुक्तेन् सोऽयमासादितस्त्वया॥२॥

आम्ही दाखविला होता दोष पूर्वीच आज तो।

होई प्राप्त तुम्हां तेव्हां विश्वास नच ठेवला॥२॥

बिभीषण व कुम्भकर्णाने सीतेस रामास परत् करण्याचा उपदेश केला होता.

शीघ्रं खल्वभ्युपेतं त्वां फलं पापस्य कर्मण:।

निरयेष्वेव पतनं यथा दुष्कृतकर्मण:॥३॥

कुकर्मी पुरुषास नरकात पडणे निश्चित।

अवश्य होते तुजला मिळणे दुष्कर्म फळ॥३॥

प्रथमं वै महाराज कृत्यमेतदचिन्तितम्।
केवलं वीर्यदर्पण नानुबन्धो विचारित:॥४॥
पर्वा न करसी गर्वे पापकर्माची तू स्वत:।
विचार परिणामाचा त्याच्या तेव्हां केला न तू॥४॥
य:पश्चात्पूर्वकार्याणि कुर्यादैश्र्यमास्थित:।
पूर्वं चोत्तरकार्याणि न स वेद नयानयौ॥५॥
ऐश्वर्याभिमाने कार्य योग्य करणे टाळुनी।
अयोग्य करतो कार्य प्रथम जो तो नच जाणतो।

नीति अनिति दोन्हींचे भान ते राखावे कसे॥५॥

देशकालविहीनानि कर्माणि विपरीतयत्।

क्रियमानानि दुष्यन्ति हवींष्यप्रयतेष्विव ॥६॥

कर्मे देशकालोचित नसती विपरीत ती।

हविष्यापरी दु:खद संस्कारहीन अग्नीतिल॥६॥

त्रयाणां पञ्चधा योगं कर्मणां य: प्रपद्यते।

सचिवै: समयं कृत्वा स सम्यग् वर्तते पथि॥७॥

सचिवांसह विचार करुनी आचरी तीन कर्मे जो।

पाच प्रकारे उत्तम नीति मार्गी तो चालतो ॥७॥

साम दान दण्ड ही तीन कर्मे

यथागमं च यो राजा समयं च चिकीर्षति।

वध्यते सचिवैर्बध्या सुहृदश्चानुपश्यति॥८॥

समय जाणुनि जो राजा कर्तव्य करीतसे।

कर्तव्य अकर्तव्याचा विचार तो करीतसे।

आपल्या बुद्धीने जाणे सुहृदांसहि तो आपल्या॥८॥

धर्ममर्थं हि कामं वा सर्वान् वा रक्षसां पते।

भजेत पुरुष: काले त्रीणि द्वण्द्वानि वा पुन:॥९॥
धर्म अर्थ तसा काम या सर्वांचे राक्षसपते।
उपयुक्त समयी यांचे सेवन करणेच योग्य ते॥९॥
त्रिषु चैतेषु यच्छ्रेष्ठं श्रुत्वा तन्नावबुध्यते।
राजा वा काजमात्रो वा व्यर्थ तस्य बहुश्रुतम्॥१०॥
उपेक्शी जो अर्थ काम धर्माचे सेवन करी।
न जाणतो हे जो राजा व्यर्थ त्याचे बहुश्रुतत्व ॥१०॥
उपपदानं सान्त्वं च भेदं काले च विक्रमम् ।

योगं च रक्षसां श्रेष्ठ तावुभौ च नयानयौ॥११॥
काले धर्मार्थकामान् य: समन्त्र्य सचिवै:सह।
निषेवेतात्मवांल्लोके न स व्यसनमाप्नुयात्॥१२॥
सल्ल्याने मन्त्र्यान्च्या दान भेद पराक्रम।
पांच प्रकारचे योग नयानय यांचा करुनी।
विचार सेवन करी धर्म अर्थ काम यांचा।
विपत्ती तयावर या लोके न येत असती॥११,१२॥
हितानुबन्धमालोक्य कुर्यात् कार्यमिहात्मन:।

राजा सहार्थतत्त्वज्ञै: सचिवैर्बुद्धिजीविभि:॥१३॥

असे कर्तव्य राजाचे परिणामी हितकर ।

कार्य करी बुद्धिजीवी मन्त्र्यांचा सल्ला घेउनी॥१३॥

अनभिज्ञाय शास्त्रार्थान् पुरुषा: पशुबुद्धय:।

प्रागल्भ्याद् वक्तुमिच्छन्ति मन्त्रिष्वभ्यन्तरीकृता:॥१४॥

असती पशुबुद्धीचे मन्त्र्यांच्या मध्ये सामिल।

शास्त्रार्थ न जाणता ते करिती व्यर्थ बडबड॥१४॥

अशास्त्रविदुषां तेषां कार्यं नाभिहितं वच:।

अर्थशास्त्रानभिज्ञानां विपुला श्रियमिच्छताम्॥१५॥
अनभिज्ञ अर्थशास्त्रे शास्त्रही नच जाणती ।
असती सम्पत्तिलोभी त्यांचे बोल न ऐकणे॥१५॥
अहितं च हिताकारं धाष्ट्याज्जल्पन्ति ये नरा:।
अवश्यं मन्त्रबाह्यास्ते कर्तव्या: कृत्यदूषका:॥१६॥
वदती अहितासच हितकर दूर त्यां करी।
कारण त्यांच्या सल्ल्याने बिघडे कार्य निश्चित॥१६॥
विनाशयन्तो भर्तारं सहिता: शत्रुभिर्बुधै:।

विपरीतानि कृत्यानि कारयन्तीह मन्त्रिण:॥१७॥
शत्रुला मिळुनी काही करती स्वामीकडुनी ।
विपरीत कृत्य मन्त्री स्वामीविनाश ज्यामुळे॥१७॥
तान् भर्ता मित्रसंकाशानमित्रान् मन्त्रनिर्णये।
व्यवहारेण् जानीयात् सचिवानुपसंहितान् ॥१८॥
शास्त्रात जे अनभिज्ञ परि सम्पत्तिलोभाने।
अयोग्य देती जो सल्ला मानावा नच तो कधी॥१८॥
चपलस्येह कृत्यानि सहसानुप्रधावत:।

छिद्रमन्ये प्रपद्यन्ते क्रौन्चस्य खमिव द्विजा:॥१९॥

संकटी मधुर बोल ऐकोनि सन्तुष्ट होत जो।
अविचारे धावतसे कार्य करण्या वर्म हे ।
तयाचे ताडती जैसे क्रौन्च पर्वतछेदा खग॥१९॥

यो हि शत्रुमवज्ञाय आत्मानं नाभिरक्षति।
अवाप्नोति हि सोऽनर्थान् स्थानाच्च व्यवरोप्यते॥२०॥

तुच्छ लेखुनि शत्रूस स्वरक्षण प्रबन्ध जो।
न करी अनर्थ पावे तो स्थानभ्रष्टहि होतसे॥२०॥

यदुक्तमिह ते पूर्वं प्रियया मेऽनुजेनच।
तदेव नो हितं वाक्यं यथेच्छसि तथा कुरु॥२१॥
बिभीषण बोलला जे आम्हासाठी हितकर।
होते ते परि करी जे तुजला योग्य वाटते॥२१॥
तत् तु श्रुत्वा दशग्रीव: कुम्भकर्णस्य भाषितम्।
भृकुटि चैव संचक्रे क्रुद्धश्चैनमभाषत॥२२॥
ऐकुनी कुम्भकर्णाचे बोल दशमुख रावण।
कोपाने भृकुटि भंग करुनी बोले तयास॥२२॥

मान्यो गुरुरिवाचार्य: किं मां त्वमनुशाससे।
किमेव वाक्श्रमं कृत्वा यद उक्तम् तद् विधीयताम् ॥२३॥
गुरु आचार्यासम का उपदेश मज देसि तू।
न घेता भाषणश्रम उचित जे कार्य ते करी॥२३॥
विभ्रमाच्चित्तमोहाद् वा बलवीर्याश्रयेण वा।
नाभिपन्नमिदानीं यद् व्यर्था तस्य पुन: कथा॥२४॥
विभ्रमे वा स्वबलगर्वे मोहे वा तुमचे वच।
मानले ना व्यर्थ त्याची चर्चा करणे पुन्हा आता॥२४॥

अस्मिन् काले तु यद् युक्तं तदिदानी विचिन्त्यताम्।
गतं तु नानुशोचन्ति गतं तु गतमेव हि॥२५॥
ममापनयजं दोषं विक्रमेण समीकुरु।
बुद्धिमान करती न शोक झाले ते झाले आता।
जे योग्य असे या काली विचार त्याचा करी॥२५॥
आपुल्या पराक्रमे शान्त करी मम दु:खा आता।
यदि खल्वस्ति मे स्नेही विक्रमं वाचिगच्छसि॥२६॥
यदि कार्यं ममैतत्ते हृदि कार्यतमं मतम् ।

जर तुझा मजवरि स्नेह पराक्रमी समजसी स्वता ।
जर तू मम कार्यास परम कर्तव्य मानसी॥२६॥
हृदयी स्थान देऊनी युद्धाचे कार्य हे करी।
स सुहृद् यो विपन्नार्थं दीनमभ्युपपद्यते॥३७॥
स बन्धुर्योऽपनीतेषु साहायायोपकल्पते।
तो मित्र खरा जो करी अनुग्रह स्वजनावरि ।
आणि बन्धु तो सहाय्य करी संकटातील ॥२७॥
पुरुषा जो ओढवूनि घेई अनीतिमार्गे जाउनी।

तमथैव ब्रुवाणं स वचनं धीरदारुणम्॥२८॥
रुष्टोऽयमिति विज्ञाय शनैः श्लक्ष्णमुवाच ह।
ऐकुनी वच गम्भीर जाणुनी रुष्ट होत हा॥२८॥
हळूहळू कुम्भकर्ण मधुर बोलू लागला।
अतीव हि समालक्ष्य भ्रातरं क्षुभितेन्द्रियम्॥२९॥
कुम्भकर्णः शनैर्वाक्यं बभाषे परिसान्त्वयन् ।
पाहूनी आपला बन्धू सर्व इन्द्रिय क्षोभित॥२९॥
करण्या सान्त्वन त्याचे कुम्भकर्ण बोलतसे।

श्रुणु राजन्नवहितो मम वाक्यमरिंदम् ॥३०॥
अल् राक्षसराजेन्द्र संतापमुपपद्य ते।
रोषं च सम्परित्यज्य स्वस्थोभवितमर्हसि॥३१॥
सावध होउनिया ऐक राजा मी जे बोलतो।
संताप करणे आता व्यर्थ राजेन्द्रा असे।
त्यागुनिया रोष आता हवे स्वस्थ रहायला॥३१॥
नैतन्मनसि कर्तव्यं मयि जीवति पार्थिव।
तमहं नाशयिष्यामि यत् कृते परितप्यते॥३२॥

मी जीवित असताना न ऐसा भाव आणी मनी
संताप तुला ज्याचा त्याचा नाश करीन मी॥३२॥
अवश्यं तु हितं वाच्यं सर्वावस्थं मया तव ।
बन्धुभावादभिहितं भ्रातृस्नेहाच्च पार्थिव॥३३॥
तुझ्या हिताचे बोलणे जे योग्य अवस्थेत या।
बन्धुभावे भ्रातृस्नेहे बोललो मी तुला तसे॥३३॥
सदृशं यच्च कालेऽस्मिन् कर्तुं स्नेहेन बन्धुना।
शत्रूणां कदनं पश्य क्रियमाणं मया रणे॥३४॥

आता बन्धू म्हणुनी जे उचित करीन तेच मी।
रणभूमीवरी पहा आता संहार शत्रुचा जो मी करी॥३४॥
अथ पश्य महाबाहो मया समरमूर्धनि।
हते रामे सह भ्रात्रा द्रवन्ती हरिवाहिनीम्॥३५॥
आता पहा महाबाहो भ्रात्यासह रामासही।
रणी मी मारता कैसी वानरसेना पळेल ती॥३५॥
अद्य रामस्य तद् दृष्ट्वा मयाऽऽनीतं रणाच्छिरः।
सुखीभव महाबाहो सीता भवतु दुःखिता॥३६॥

आज पाहून रामाचे शिर मी रणातुनी आणता।
होशील सुखी तू आणि सीता दु:खी होइल॥३६॥
अद्य् रामस्तु पश्यन्तु निधनं सुमहत् प्रियम्।
लङ्कायां राक्षसा: सर्वे ये ते निहतबान्धवा:॥३७॥
रणी ज्या राक्षसांचे मृत बान्धव असति जाहले।
पाहतील रामाचा मृत्यु त्यांच्यासाठी प्रिय जो असे॥३७॥
अद्य शोकपरीतानां स्वबन्धुवधशोचिनाम्।
शत्रोर्युधि विनाशेन करोम्यश्रुप्रमार्जनम्॥३८॥

मृत्युने स्वबान्धवांच्या शोकग्रस्त लोक जे।
शत्रुनाशे रणी आज तयांचे पुसेन अश्रु मी॥३८॥
अद्य पर्वतसंकाशं ससूर्यमिव तोयदम् ।
विकीर्ण पश्य समरे सुग्रीवं प्लवगेश्वरम्॥३९॥
विशाल पर्वतासम वानरराज् सुग्रिव।
रक्तलांछित रणी देख सूर्यासह मेघासम॥३९॥
कथं च राक्षसैरेभिर्मया च परिसान्त्वित:।
जिघांसुभिर्दाशरथिं व्यथसे त्वं सदानघ्॥४०॥

राक्षस लोक हे सर्व आश्वासन देत असता।
रामास मारण्याचे तू व्यथित होसी का बरे॥४०॥
मां निहत्य किल त्वां हि निहनिष्यति राघवः।
नाहमात्मानि संतापं गच्छेयं राक्षसाधिप॥४१॥
मज मारूनच राम करू शकेल तव वध।
मी न परि त्याविषयी संतप्त वा भयशंकित॥४१॥
कामं त्विदानीमपि मां व्यादिश त्वं परंतप।
न परः प्रेक्षणीयस्ते युद्धायातुलविक्रम॥४२॥

देई आदेश युद्धाचा मजला हे परंतप।
नच अन्य कुणी देख झुंजण्यास शत्रूसवे॥४२॥
अहमुत्सादयिष्यामि शत्रूस्त्व महाबलान् ।
यदि शक्रो यदि यमो यदि पावकमारुतौ॥४३॥
तानहं योधयिष्यामि कुबेरवरुणात्वपि।
तुझे महाबलि शत्रु यम इन्द्र अग्नि वायु।
कुबेर वरुण जरी येती तरी लढून मी॥४३॥
त्यांसवे आणखी सर्वां टाकीन उखडून मी।

गिरिमात्रशरीरस्य शितशूलधरस्य मे॥४४॥
नर्दतस्तीक्ष्णदंष्ट्रस्य बिभीयात् वै पुरंदरः।
पर्वताकार शरीर हाती तीक्ष्णत्रिशूल मम॥४४॥
दाढाही तीक्ष्ण माझ्या सिंहनादे इन्द्रा भय।
अथ वा त्यक्तशस्त्रस्य मृद्नतस्तरसा रिपून्॥४५॥
न मे प्रतिमुखः कश्चित् स्थातुं शक्तो जिजीविषुः।
न घेता शस्त्रही वेगे रणी मी तुडवीत रिपु॥४५॥
तर जीवितेच्छु असा कोणी न येइल मजपुढे।

नैव शक्त्या न गदया नासिना निशितै: शरै:॥४६॥
हस्ताभ्यामेव संरभ्य हनिष्यामि सवज्रिणम् ।
गदा तलवार बाण तीक्ष्ण शक्तिशिवाय मी॥४६॥
रागाने केवळ हस्ते वधेन इन्द्रा वज्रासह ।
यदि मे मुष्टिवेगं स राघवोऽद्य सहिष्यति॥४७॥
तत: पास्यन्ति बानौघा रुधिरं राघवस्य मे।
जर मुष्टिवेग माझा करील सहन् राम॥४७॥
करेल मम शरवर्षाव त्याचे रकतपान निश्चित।

चिन्तया तप्यसे राजन् किमर्थं मयि तिष्ठति॥४८॥
सोऽहं शत्रुविनाशाय तव निर्यातुमुद्यतः।
मी इथे असता का चिंताग्नीत जळसि तू॥४८॥
रणी जाण्या उद्यत् मी शत्रुविनाशा तव ।
मुञ्च रामाद् भयं घोरं निहनिष्यामि संयुगे॥४९॥
राघवं लक्ष्मणं चैव सुग्रीवं महाबलम्।
सोड भय रामाचे तू युद्धात वधीन मी॥४९॥
राघवा लक्ष्मणा तैसे सुग्रीवास महाबलि।

हनूमन्तं च रक्षोभं येन लङ्का प्रदीपिता॥५०॥
हरीश्च भक्षयिष्यामि संयुगे समुपस्थिते।
असाधारणमिच्छामि तव दातुं महद् यशः॥५१॥
न जीवित सोडीन हनुमाना लङ्का जाळि जो॥५०॥
आणखी वानरा अन्य तेथील भक्षीन मी।
इच्छितो असाधारण यश देण्यास मी तुज ॥५१॥
अपि देवा शयिष्यन्ते क्रुद्धे मयि महीतले।
यमं च शमयिष्यामि भक्षयिष्यामि पावकम् ॥५२॥

मजवरी क्रुद्ध जर येती देवही महीतली।
हरवीन यमालाही अग्नीसही भक्षीन मी॥५२॥
आदित्यं पातयिष्यामि सनक्षत्रं महीतले।
शतक्रतुं वधिष्यामि पास्यामि वरुणालयम्॥५३॥
आदित्या नक्षत्रांसह पाडीन मी भूमीतळी।
शतक्रतूसही वधेन जिंकेन वरुणालय ॥५४॥
पर्वतांश्चूर्णयिष्यामि दारयिष्यामि मेदिनीम्।
दीर्घकालं प्रसुप्तस्य कुम्भकर्णस्य विक्रमम् ॥५४॥

पर्वता चूर्ण करीन पृथ्वीस त्यां मिळवीन।
पराक्रम कुम्भकर्णाचा दीर्घकाल प्रसुप्त् जो॥५४॥
अद्य पश्यन्तु भूतानि भक्ष्यमाणानि सर्वश:।
नन्विदं त्रिदिवं सर्वमाहारस्य न पूर्यते॥५५॥
पहा सर्व प्राण्यांना भक्षण करताना मला।
खात मी जरि सर्वांना भागेल न भूक मम॥५५॥
वधेन ते दाशरथे सुखार्ह।
सुखं समाहर्तुमहं व्रजामी

निकृत्य राम सह लक्ष्मणेन ।
खादामि सर्वान्हरियूथमुख्यान्॥५६॥
तुझ्या सुखास्तव दाशरथीस।
मारून मी मिळवीन सुखास।
मारून रामास लक्ष्मणासह ।
खाईन सर्व वानरप्रमुखा मी॥५६॥
रमस्व कामं पिबचाग्र्यवारुणीं।
कुरुष्व कृत्यानि विनीयतां ज्वर:।

मयाद्य रामं गमितेयमक्षयं ।
चिराय सीता वशगा भविष्यति ॥५७॥
उपभोग घे पिऊनि वारुणी।
कृत्ये करी शमवुनि संताप।
मी आज रामास मारता।
घे करूनि सदैव सीतेस वश॥५७॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे त्रिषष्टितम: सर्ग:॥६३॥

युद्धकाण्ड सर्ग ६४

तदुक्तमतिकायस्य बलिनो बाहुशालिन:।
कुम्भकर्णस्य वचन् श्रुत्वोवाच महोदर:॥१॥
कुम्भकर्ण महाबाहु विशालकाय बोलता।
वचन ऐसे ऐकुनी महोदर त्यास बोलला॥१॥
कुम्भकर्ण कुले जातो धृष्ट: प्राकृतदर्शन:।
अवलिप्तो न शक्नोषि कृत्यं सर्वत्र वेदितुम् ॥२॥

जन्मसी उत्तम कुळी परि बुद्धि तव प्राकृत।
न जाणसि योग्य कृत्या गर्व घमेंड यामुळे॥२॥
नहि राजा न जानीते कुम्भकर्ण नयानयौ ।
त्वं तु कैशोरकाद् ध्रूष्ट: केवलं वक्तुमिच्छसि॥३॥
न जाणती महाराज नीति अनीति ऐसे नसे।
बोलसी बालबुद्धिने वचन उद्धट तू तयां॥३॥
स्थानं वृद्धिं च हानिं च देशकालविधानवित्।
आत्मनश्च परेषां च बुध्यते राक्षसर्षभ॥४॥

जाणती शत्रुपक्षाचे स्थान वृद्धि क्षयासह।
कर्तव्या राक्षसराज देशकालोचित जाणती ॥४॥
यत् त्वशक्यं बलवता वक्तुं प्राकृतबुद्धिना।
अनुपासितवृद्धेन कः कुर्यात् तादृशं बुधः॥५॥
कर्म जे पुरुष बलिष्ठ न करू शके असे।
कैसे करू शकेल ते बालबुद्धि तुझ्यासम॥५॥
यांस्तु धर्मार्थकामांस्त्वं ब्रवीषि पृथगाश्रयान्।
अवबोद्धुं स्वभावेन नहि लक्षणमस्ति तान्॥६॥

ज्या धर्म अर्थ कामाचे बोलसी पृथगत्व तू।
जाणण्या योग्यप्रकारे नसे शक्ति तुझ्यामध्ये।
कर्म चैव हि सर्वेषां कारणानां प्रयोजनम्।
श्रेय: पापीयसां चात्र फलं भवति कर्मणाम्॥७॥
धर्म अर्थ काम यांचे कर्म हेच प्रयोजन्।
मिळते फळ कर्त्यास व्यापारांचे शुभाशुभ॥७॥
नि:श्रेयसफलावेव धर्मार्थावितरावपि।
अधर्मानर्थयो: प्राप्तं फलं च प्रत्यवायिकम्॥८॥

फल निष्काम कर्माचे मोक्षरूप जरी असे।
अधर्म अनर्थाचे फल् प्रत्यवायजनित ते॥८॥
ऐहलौकिकपारक्यं कर्म पुंभिर्निषेव्यते।
कर्माण्यपि तु कल्याणि लभते काममास्थित:॥९॥
इहलोकी वा परलोकी नरा कर्मफल मिळे।
कामनाउद्देशे कर्मे मिळे सुख इहलोकी॥९॥
तत्र क्लृप्तमिदं राज्ञा हृदि कार्यं मतं च न:।
शत्रौ हि साहसं यत् तत् किमिवात्रापनीयते॥१०॥

कामरूपी पुरुषार्थ उचित राजास वाटते।
शत्रूविरुद्ध साहस करण्यात अनीति नसे।
येन पूर्व् जनस्थाने बहवोऽतिबला हता:।
राक्षसा राघवं तं त्वं कथमेको जयिष्यसि॥१२॥
पूर्वी ज्याने जनस्थानी मारले राक्षस बहू।
राघवास तू एकटा करशील परास्त कसा॥१२॥
ये पूर्वं निर्जितास्तेन जनस्थाने महौजस:।
राक्षसांस्तान् पुरे सर्वान् भीतानद्य न पश्यसि॥१३॥

पूर्वी पळविले ज्यांना महाविरा जनस्थानी।
घाबरलेले राक्षस लंकेत आजही दिसती ॥१३॥
तं सिंहमिव संक्रुद्धं रामं दशरथात्मजम्।
सर्पं सुप्तमहो बुद्ध्वा प्रबोधयितुमिच्छसि॥१४॥
सिंहासम पराक्रमी श्रीराम दशरथात्मज।
लढण्याचे त्याच्यासवे साहस करण्या जासि तू।
बुद्ध्या सुप्त सर्पास धजसी जागवण्यास तू ॥१४॥
ज्वलन्तं तेजसा नित्यं क्रोधेन च दुरासदम्।

कस्तं मृत्युमिवासह्यमासादयितुमर्हति॥१५॥
ज्वलन्त तो तेजाने क्रोधाने त्यात दुर्जय।
मृत्यूसम तया कोण योद्धा लढण्या जातसे॥१५॥
संशयस्थमिदं सर्वं शत्रो: प्रतिसमासने ।
एकस्य गमनं तात नहि मे रोचते भृशम् ॥१६॥
शत्रूसवे या लढण्या सर्व सेना जरी उभी ।
तरी जिंकणे तयांचे शंकादायक वाटते ।
त्यामुळे तात एकटे जाणे तुम्हा योग्य नसे॥१६॥

हीनार्थस्तु समृद्धार्थं को रिपुं प्राकृतं यथा।
निश्चितं जीवितत्यागे वशमानेतुमिच्छति॥१७॥
शत्रुसंहारा कटिबद्ध प्राणाचे मोल देउनी।
अशा शत्रूस वश करण्या इच्छे योद्धा कोण॥१७॥
यस्य नास्ति मनुष्येषु सदृशो राक्षसोत्तम।
कथमाशंससे योद्धं तुल्येनेन्द्रविवस्वतो:॥१८॥
इन्द्र सूर्यासम तेजस्वी अतुलनीय मनुष्य जो।
युद्ध त्या श्रीरामासवे करण्या कैसे धजसि तू॥१८॥

एवमुक्त्वा तु संरब्धं कुम्भकर्ण महोदरः।
उवाच रक्षसां मध्ये रावणं लोकरावणम्॥१९॥
कुम्भकर्णास संतप्त हे बोलुनी महोदर ।
रावणा राक्षसांमधे बसलेल्या ऐसे म्हणे ॥१९॥
लब्ध्वा पुरस्ताद् वैदेहीं किमर्थं त्वं विलम्बसे।
यदीच्छसि तदा सीता वशगा ते भविश्यति॥२०॥
वैदेही समोर असता विलम्ब का करता तुम्ही।
इच्छेनुसार तुमच्या वश होईल ती तुम्हा ॥२०॥

दृष्टः कश्चिदुपायो मे सीतोपस्थानकारकः।
रुचितश्चेत् स्वया बुद्ध्या राक्षसेन्द्र ततः श्रुणु॥२१॥
सीतेस वश करण्या सुचतो उपाय मला।
ऐकुनी योग्य वाटेल तर आचरणात आणा॥२१॥
अहं दिजिह्वः संह्रादी कुम्भकर्णो वितर्दनः।
पञ्च रामवधायैते निर्यान्तीत्यवघोषय्॥२२॥
मी स्वतः द्विजिह्व,संह्रादी कुम्भकर्ण वितर्दन।
पांच राक्षस आम्ही हे जातो वधण्या रामास॥२२॥

ततो गत्वा वयं युद्धं दास्यामस्तस्य यत्नतः।
जेष्यामो यदि ते शत्रून् नोपायैः कार्यमस्ति नः॥२३॥
जाउनी प्रयत्ने आम्ही करूनी युद्ध जिंकता।
आवश्यक नसे तुम्हा करण्या अन्य उपाय ॥२३॥
अथ जीवति नः शत्रुर्वयं च कृतसंयुगाः।
ततः समभिपत्स्यामो मनसा यत् समीक्षितम् ॥२४॥
राहे जिवित जर शत्रू रणी आम्हीहि जीवित।
तर उपाय आपण करू जो मम निश्चित मनी॥२४॥

वयं युद्धादिहैष्यामो रुधिरेण समिक्षिता:।
विदार्य स्वतनु बाणे रामनामाङ्कितै: शरै:॥२५॥
भक्षितो राघवोऽस्माभिर्लक्ष्मणश्चेति वादिन:।
तत: पादौ ग्रहीष्यामस्त्वं न: कामं प्रपूरय॥२६॥

राम नामांकित बाणे शरीरे रक्तलाञ्छित ।
रणभूवरुनी परतू सांगत रामा लक्ष्मणा॥२५॥
भक्षिले आम्ही आणि चरणी पडुनि आपल्या।
म्हणू आता आमची ही करा इच्छा पुरी॥२६॥

ततोऽवघोषय पुरे गजस्कंधेन पार्थिव ।
हतो रामः सह भ्रात्रा ससैन्य इति सर्वतः॥२७॥
हत्तीवर बसवुनी कोणा घोषणा नगरी करा।
बन्धु सेनेसह राम युद्धात् वधला आम्ही॥२७॥
प्रीतो नाम ततो भूत्वा भृत्यानां त्वमरिंदम।
भोगांश्च परिवारांश्च कामान् वसु च दापय॥२८॥
ततो माल्यानि वासांसि वीराणामनुलेपनम्।
पेयं च बहु योधेभ्यः स्वयं मुदितः पिब॥२९॥

आनंद दर्शवुनि तुम्ही वीर सेवकां आपल्या।
भोगसामग्री दासी रत्न धनरत्न आभूषण ॥२८॥
अन्य योध्यांनाही द्यावे उपहार त्यासवे।
आनन्दी होत आपण मद्यपाने दर्षवी तसे॥२९॥
ततोऽस्मिन् बहुलीभूते कौलीने सर्वता गते।
भक्षित: रामो राक्षसैरिति विश्रुते॥३०॥
प्रविश्याश्वास्य चापि त्वं सीतां रहसि सान्त्वयन्।
धनधान्यैश्च कामैश्च रत्नैश्चैनां प्रलोभय॥३१॥

जेव्हां लोकांमध्ये वार्ता सर्वत्र पसरे अशी।
श्रीरामा सुहृदांसह राक्षसांनी खाउन् टाकले॥३२॥
सान्त्वनास तेव्हां जावे सीतेच्या स्थानि आपण।
प्रलोभन दाखवावे धनधान्य रत्न भोग तिला॥३३॥
अनयोपधया राजन् भूय: शोकानुबन्धया।
अकामा त्वदृशं सीता नष्टनाथा गमिष्यति॥३२॥
अनाथ मानुनी स्वत:स वाढेल सीतेचा शोक।
इच्छेविरुद्ध अधीन होइल तेव्हां आपल्या॥३२॥

रमणीयं हि भर्तारं भूय: शोकानुबन्धया।न्\
नैराश्यात् स्त्रीलघुत्वाच्च त्वदशं प्रतिपत्स्यते॥३३॥
रमणीय पती नष्ट झाला जाणुनी नैराश्ये।
स्त्रीसुलभ चपलतेमुळे वश होईल तुम्हा ॥३३॥
सा पुरा सुखसंवृद्धा सुखार्हा दु:खकर्शिता।
त्वय्यधीनं सुखं ज्ञात्वा सर्वथैव गमिष्यति॥३४॥
सुखात वाढलेली परि दु:खाने आता दुर्बल्।
मानून तुम्हासवे सुख अधीन तुमच्या होइल॥३४॥

एतत् सुनीतं मम दर्शनेन रामं हि दृष्ट्वैव भवेदनर्थः।
इहैव ते सेत्स्यति मोत्सुको भू महानयुद्धेन सुखस्य लाभः॥३५॥
योग्य नीती हीच असेल रामा पाहुनि होईल अनर्थ।
म्हणुनी युद्धस्थलि न जाता महान लाभ मिळेल ऐसा॥३५॥
अनष्टसैन्यो ह्यनवाप्तसंशयो रिपुं त्वयुद्धेन जयञ्जनाधिपः।
यशश्च पुण्यं च महान्महीपते श्रियं च कीर्तिं च चिरं समश्नुते॥३६॥
युद्धाविना शत्रु जिंकता नष्ट न होइ सेना जीवनहि न उध्वस्त।

यश पुण्य महान मिळवुनि उपभोगी कीर्ति लक्ष्मी दीर्घकाल तो॥३६॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे चतु:षष्टितम: सर्ग:॥६४॥

युद्धकाण्ड सर्ग ६५

स तथोक्तस्तु निर्भयं कुम्भकर्णो महोदरम।
अब्रवीद् राक्षसश्रेष्ठं भ्रातरं रावणं तत:॥१॥
महोदर वदता ऐसे कुम्भकर्ण त्या थाम्बवी।
आणि राक्षसश्रेष्ठा बन्धु रावणास ऐसे वदे ॥१॥
सोऽहं तव भयं घोरं वधात् तस्य दुरात्मन:।
रामस्याद्य प्रमार्जामि निर्वैरो हि सुखी भव॥२॥

वध दुरात्मा रामाचा करुनी दूर तुझे भय ।
मी आज करीन सुखी हो वैरभाव मुक्त् तू॥२॥
गर्जन्ति न वृथा शूरा निर्जला इव तोयदा:।
पश्य सम्पद्यमानं तु गर्जितं युधि कर्मणा॥३॥
न गर्जति व्यर्थ वीर जलहीन मेघासम।
पहा गर्जना करीन पराक्रमे मी रणी॥३॥
न मर्षयन्ति चात्मानं सम्भावयितुमात्मना।
अदर्शयित्वा शूरास्तु कर्मं कुर्वन्ति दुष्करम्॥४॥

न स्वयंस्तुति स्वमुखे शूरवीरां न आवडे।
न बोलता ते करुनी दाखवती पराक्रम ॥४॥
विक्लवानां ह्यबुद्धीनां राज्ञां पण्डितमानिनाम्।
रोचते त्वदचो नित्यं कथ्यमानं महोदर॥५॥
भित्रे मूर्ख खोटे मानती स्वत:स पण्डित ।
अश्या राजांस आवडे बोलता जसे आपण ॥५॥
युद्धे कापुरुषैर्नित्यं भवद्भि: प्रियवादिभि:।
राजानमनुगच्छद्भि: सर्वं कृत्यं विनाशितम्॥६॥

युद्धा घाबरणारे तुम्ही राजाचे स्तुतिपाठक ।
हो हो म्हणुनिया त्यास नाशती त्याचे कर्म॥६॥
राजशेषा कृता लङ्का क्षीण: कोशो बलं हतम्।
राजानमिमयासाद्य सुहृच्चिह्नममित्रकम् ॥७॥
उरे राजा कोश क्षीण सेनाही नष्ट होतसे।
मित्र म्हणुनि राजाचे शत्रुसम वागला तुम्ही॥७॥
एष निर्याम्यहं युद्धमुद्यत: शत्रुनिर्जये।
दुर्नयं भवतामद्य समीकर्तुं महाहवे॥८॥

पहा रणी मी जात आहे जिंकाया शत्रुस।
वर्तने तुमच्या उत्पन्न निवाराया संकट॥८॥
एवमुक्तवतो वाक्यं कुम्भकर्णस्य धीमत्:।
प्रत्युवाच ततो वाक्यं प्रहसन् राक्षसाधिप:॥९॥
बुद्धिमान कुम्भकर्ण ऐसे बोलता वीरोचित।
त्यावर राक्षसराज हंसुनी उत्तर देतसे ॥९॥
महोदरोऽयं रामात् तु परित्रस्तो न संशय:।
न हि रोचयते तात युद्धं युद्धविशारद॥१०॥

हे युद्धविशारद तात भीतसे महोदर रामा ।
त्यामुळे युद्ध करण्याची कल्पना त्या न आवडे ॥१०॥

कश्चिन्मे त्वत्समो नास्ति सौहृदेन बलेन च।
गच्छ शत्रुवधाय त्वं कुम्भकर्ण जयाय च॥११॥

नसे तुजसम कोणी सौहार्द बल यामध्ये ।
जासी तू शत्रुवधास कुम्भकर्णा मिळवी जय॥११॥

शयानः शत्रुनाशार्थं भवान् सम्बोधितो मया।
अयं हि कालः सुमहान् राक्षसानामरिंदम॥१२॥

उठविले तुला सुप्त वीरा शत्रुनाशार्थ मी।
राक्षसांच्या युद्धास्तव हा काल उत्तम असे॥१२॥
संगच्छ शूलमादाय पाशहस्त इवान्तकः।
वानरान् राजपुत्रौ च भक्षयादित्यतेजसौ॥१३॥
जाउनी शूल घेऊनी पाशधारी यम जणु।
टाक खाऊन तेजस्वी राजपुत्रांस वानरां ॥१३॥
समालोक्य तु ते रूपं विद्रविष्यति वानराः।
रामलक्ष्मणयोश्चापि हृदये प्रस्फुटिष्यतः॥१४॥

पळतील वानर सारे पाहुनी रूप हे तुझे।
विदीर्ण हृदय होतील रामलक्ष्मणही तसे ॥१४॥
एवमुक्त्वा महातेजा: कुम्भकर्णं महाबलम् ।
पुनर्जातमिवात्मानं मेने राक्षसपुङ्गव:॥१५॥
महाबली कुम्भकर्णा ऐसे बोलुनि रावण्।
मानतसे पुनर्जन्म जणु होतसे आपला ॥१५॥
कुम्भकर्णबलाभिज्ञो जानंस्तस्य पराक्रमम् ।
बभूव मुदितो राजा शशाङ्क इव निर्मल:॥१६॥

जाणुनी कुम्भकर्णाचे बल आणि पराक्रम ।
होई आनन्दित राजा चन्द्रम्यासम निर्मल॥१६॥
इत्येवमुक्त: संहृष्टो निर्जगाम महाबल:।
राज्ञस्तु वचनं श्रुत्वा योद्धुमुद्युक्तवांस्तदा ॥१७॥
ऐकोनि होइ संतुष्ट राजाचे बोल ऐकुनी।
युद्धा होउनि उद्युक्त निघे लंकापुरीतुनी॥१७॥
आददे निशितं शूलं वेगाच्छत्रुनिबर्हण:।
सर्वं कालायसं दीप्तं तप्तकाञ्चनभूषणम् ॥१८॥

वेगे घेई तीक्ष्ण शूल करण्या शत्रुसंहार ।
लोहमय कृष्णवर्ण तप्त सुवर्णे भूषित॥१८॥
इन्द्राशनिसमप्रख्यं वज्रप्रतिमगौरवम्।
देवदानवगन्धर्वयक्षपन्नगसूदनम् ॥१९॥
इन्द्राच्या अशनीसम भारी वज्रासमान।
देव दानव गन्धर्व यक्ष नाग जो संहरी॥१९॥
रक्तमाल्यमहादामं स्वतश्चोद्गतपावकम् ।
आदाय विपुलं शूलं शत्रुशोणितरञ्जितम्॥२०॥

कुम्भकर्णो महातेजा रावणं वाक्यमब्रवीत् ।
गमिष्याम्यहमेकाकी तिष्ठत्विह बलं मम ॥२१॥
लाल फुलांची माळ करणारी अग्निवर्षाव ।
हाती शत्रुच्या रक्ताने रंगलेला विशाल शूळ ॥२०॥
कुम्भकर्ण महातेजस्वी बोलला रावणा असे।
जाईन एकटा मीच सैन्य येथेच राहुदे ॥२१॥
अद्य तान् क्षुधित: क्रुद्धो भक्षयिष्यामि वानरान्।
कुम्भकर्णवच: श्रुत्वा रावणो वाक्यमब्रवीत्॥२२॥

क्रुद्ध मी क्षुधित आता खाईन सर्व वानरां।
ऐकुनी कुम्भकर्णाचे बोल रावण त्या म्हणे॥२२॥
सैन्यै: परिवृतो गच्छ शूलमुद्गरपाणिभि:।
वानरा हि महात्मान: शूरा: सुव्यवसायिन:॥२३॥
एकाकिनं प्रमत्तं वा नयेयुर्दशनै: क्षयम् ।
तस्मात परमदुर्घर्ष: सैन्यै: परिवृतो व्रज।
रक्षसामहितं सर्वं शत्रुपक्षं निषूदय॥२४॥
सैन्याने परिवृत्त् जा शूलमुद्गर धारुनी।

महामनस्वी वानर असती वीर युध्यज्ञ ॥२३॥
एकटा तुज पाहोनी चावुनी दांतांनी तुला।
करतील नष्ट म्हणुनी रहा सैन्यासह।
राक्षसा अहितकारी कर शत्रुनिर्दालन॥२४॥
अथासनात् समुत्पत्य स्रजं मणिकृतान्तराम्।
आबबन्ध महातेजा: कुम्भकर्णस्य रावण:॥२५॥
उठोनी आसनावरुनी रावण कुम्भकर्णाच्या।
गळ्यात सुवर्णमाला मणियुक्त घालीतसे ॥२५॥

अङ्गदान्यङ्गलीवेष्टान् वराण्याभरणानि च।
हारं च शशिसंकाशमावबन्ध महात्मन:॥२६॥
आभूषण बाजूबन्द लखलखते चन्द्रासम ।
हार चढवी विशाल कुम्भकर्णाच्या देहावर॥२६॥
दिव्यानि च सुगन्धीनि माल्यदामानि रावण:।
मात्रेषु सज्जयामास श्रोत्रयोश्चास्य कुण्डले॥२७॥
तश्याच दिव्य सुगन्धी माला सर्व देहावर् ।
आणि कुण्डल कानात चढवी त्याच्या रावण॥२७॥

काञ्चनाङ्गदकेयूरनिष्काभरणभूषितः।
कुम्भकर्णो बृहत्कर्णःसुहुतिऽग्निरिवाबभौ॥२८॥
भूषित सुवर्णालंकारे कुम्भकर्ण विशालकर्ण।
प्रकाशित अग्नीसम ज्यात आहुति उत्तम॥२८॥
श्रोणीसूत्रेण महता मेचकेन व्यराजत।
अमृतोत्पादने नद्धो भुजङ्गेनेव मन्दरः॥२९॥
विशाल कटीवरील कृष्ण कटिदोऱ्यामुळे।
समुद्रमन्थनसमयी अमृतप्राप्तीस्तव ।

वासुकी आवेष्टित मन्दराचल दिसे जणु ॥२९॥

स काञ्चनं भारसहं निवान्तं विद्युर्प्रभं दीप्तमिवात्मभासा।

आबध्यमान: कवचं रराज् संध्याभ्रसंवीत इवाद्रिराज:॥३०॥

छातीवरी सुवर्णकवच बद्ध अभेद्य दैदिप्यमान दिसे विजेसमान।

बान्धता शोभतसे कुम्भकर्ण गिरिसम आवेष्टित संध्याकालिन् अभ्रे॥३०॥

सर्वाभरण सर्वाङ्ग: शूलपाणि: स राक्षस:।

त्रिविक्रमकृतोत्साहो नारायन इवाबभौ॥३१॥

अलंकृत असा वीर शूलधारि तो राक्षस।

वामनापरि शोभे जो त्रिपद टाकण्या निघे॥३१॥
भ्रातरं परिष्वज्य कृत्वा चापि प्रदक्षिणम् ।
प्रणम्य शिरसा तस्मै प्रतस्थे स महाबल:॥३२॥
आलिंगुनि भ्रात्यास प्रदक्षिणा त्यास घालुनी।
प्रणाम करुनी त्यास निघे तो युद्धास्तव॥३२॥
तमाशीर्भि: प्रशस्ताभि: प्रेषयामास रावण:।
शङ्खदुन्दुभिनिर्घोषै: सैन्यैश्चापि वरायुधै:॥३३॥
आशीर्वचुनी त्यास सुसज्जित सेनेसह ।

पाठवी रावण शंखदुन्दुभीच्या नादासवे ॥३३॥
तं गजैश्च तुरंगैश्च स्यन्दनैश्चाम्बुदस्वनै:।
अनुजग्मुर्महात्मानो रथिनो रथिनां वरम्॥३४॥
गज अश्व मेघासम गर्जणाऱ्या रथी स्वार।
अनेक श्रेष्ठ वीरही जाती कुम्भकर्णासवे ॥३४॥
स्पैरुष्टै: खरैश्चैव सिंहद्विपमृगद्विजै:।
अनुजग्मुश्च तं घोरं कुम्भकर्णं महाबलम् ॥३५॥
सर्प,उंट,मृग,हत्ती पक्ष्यांवरि स्वार होऊनी ।

अनेक राक्षस जाती कुम्भकर्णाबरोबरी॥३५॥

स पुष्पवर्षैरवकीर्यमाणो धृतातपत्र: शितशूलपाणि:।
मदोत्कट शोणितगन्धमत्तो विनिर्ययौ दानवदेवशत्रु:॥३६॥

तयावरि पुष्पवृष्टि शिरावर श्वेतछत्र हाती तीक्ष्ण त्रिशूल धारण।
देवदानव शत्रु ऐसा रक्तगन्ध मत्त कुम्भकर्ण निघे युद्धास्तव रणी॥३६॥

पदातयश्च बहवो महानादा महाबला:।
अन्वयू राक्षसा भीमा भीमाक्षा: शस्त्रपानय:॥३७॥

पैदल राक्षस काही महानाद महाबली।

भीषण नेत्र गर्जणारे हाती शस्त्रे भयानक॥३७॥
रक्ताक्षा: सुबहुव्यामा नीलाञ्जनचयोपमा:।
शूलानुद्यम्य खड्गांश्च निशितांश्च परश्वधान्॥३८॥
भिन्दिपालांश्च परिघान् गदाश्च मुसलानि च।
तालस्कंधांश्च विपुलान् क्षेपणियान् दुरासदान् ॥३९॥
नेत्र लाल अतिशय उंच काळे कोळशासम।
हाती शूल तलवार तीक्ष्ण फर्श्या भयानक॥३८॥
गदा परिघ भिन्दिपाल मुसळे ताड वृक्षही महा।

गोफणीही अभेद्य ऐशी सर्व शस्त्रे घेउनी॥३८॥

अथान्यद्रपुरादाय दारुणं घोरदर्शनम्।
निष्पपात महातेजा: कुम्भकर्णो महाबल:॥४०॥

करी उग्र रूप धारण घोर दर्शन ज्याचे असे।
घेउनी ऐसे रूप युद्धा कुम्भकर्ण्स् निघतसे ॥४०॥

धनु:शतपरीणाह: स षट्शतसमुच्छ्रित:।
रौद्र: शकटचक्राक्षो महापर्वतसंनिभ:॥४१॥

होई विस्तृत सहाशे धनुष्याएवढा तैसा।

शत धनुष्याएवढा उंच नेत्र रथचक्रापरी।
भयंकर दिसे तेव्हां विशाल पर्वतापरी॥४१॥
संनिपत्य च रक्षांसि दग्धशैलोपमो महान्।
कुम्भकर्णो महावक्त्र: प्रहस्न्निदमब्रवीत् ॥४२॥
करुनी व्यूहरचना राक्षसांची महाकाय ।
दावनल दग्ध पर्वतापरी कुम्भकर्ण तो ।
विशाल मुख पसरूनी अट्टाहासे बोलला॥४२॥
अद्य वानरमुख्यानां तानि यूथानि भागश:।

निर्दहिष्यामि संक्रुद्धः पतङ्गानिव पावकः॥४३॥
जाळे पतंगा जशी आग तसा हो उनि क्रुद्ध मी।
करीन भस्म मी मुख्य वानरांना क्रमाक्रमे ॥४३॥
नापराध्यन्ति मे कामं वानरा वनचारिणः।
जातिरस्मद्विधानां सा पुरोद्यानविभूषणं॥४४॥
न करती हे वनचारी मम अपराध वानर ।
ते नगरीचे भूषण म्हणुनी वधण्यायोग्य ना॥४४॥
पुररोधस्य मूलं तु राघवः सहलक्ष्मणः।

हते तस्मिन् हतं सर्वं तं वधिष्यामि संयुगे॥४५॥
कारण रामलक्ष्मण असती वेढण्या लङ्कापुरी।
म्हणुनी मारता त्यांना साथी सर्व मेल्यापरी॥४५॥
एवं तस्य ब्रुवाणस्य कुम्भकर्णस्य राक्षसा:।
नादं चक्रुर्महाघोरं कम्पयन्त इवार्णवम् ॥४६॥
कुम्भकर्ण बोलता ऐसे करती सर्व राक्षस।
भयानक गर्जना जी सागरा कम्पित करी॥४६॥
तस्य निष्पततस्तूर्ण कुम्भकर्णस्य धीमत:।

बभूवुर्घोररूपाणि निमित्तानि समन्तत:॥४७॥
रणभूमीकडे निघता कुम्भकर्ण महाबली।
लागति होण्या सर्वत्र अपशकुन महान ॥४७॥
उल्काशनियुता मेघा बभूवुर्गर्दभारुणा:।
ससागरवना चैव वसुधा समकम्पत॥४८॥
गर्दभासम रंगाचे येती मेघ दाटुनि ।
विजा लागती चमकू उल्कापातासवे ।
समुद्र वनासहित पृथ्वी कम्पित होतसे ॥४८॥

घोररूपा: शिवा नेदु: सज्वालकवलैर्मुखै:।
मण्डलान्यपसव्यानि बबन्धुश्च विहंगमा:॥४९॥
गिधाडे करती नाद अग्नीसवे मुखातुनि।
फिरती दक्षिणावर्त पक्षी मण्डल बान्धुनी॥४९॥
निष्पपात च गृध्रोऽस्य शूले वै पथि गच्छत:।
प्रास्फुरन्नयनं चास्य सव्यो बाहुरकम्पत॥५०॥
बसे गिधाड् येउनि कुम्भकर्ण शूलावरी ।
लवे वामाक्ष त्याचा वामबाहु हो कम्पित॥५०॥

निष्पपात तदा चोल्का ज्वलन्ती भीमनि:स्वना ।
आदित्यो निष्प्रभश्चासीन्न वाति च सुखोऽनिल:॥५१॥
पडती उल्का नाद भयंकर करूनिया।
होतसे सूर्य निस्तेज वेगे वाहतसे हवा॥५१॥
अचिन्तयन् महोत्पातानुदितान् रोमहर्षणान् ।
निर्ययौ कुम्भकर्णस्तु कृतान्तबलचोदित:॥५२॥
रोमहर्षक अनेक जरी उत्पात प्रकटले।
पर्वा न करता त्याची कुम्भकर्ण निघतसे॥५२॥

स लयित्वा प्राकारं पद्भ्यां पर्वतसंनिभः।
ददर्शाभ्रघनप्रख्यं वानरानीकमद्भुतम्॥५३॥
आक्रमे पर्वतासम तो लंकेस दो पदांमध्ये।
दिसे त्या वानरसेना मेघाच्छादित नभासम॥५३॥
ते दृष्ट्वा राक्षसश्रेष्ठं वानराः पर्वतोपमम् ।
वायुनुन्ना इव घना ययुः सर्वा दिशस्तदा ॥५४॥
राक्षसा पर्वताकार पाहुनि समस्त वानर।
पळती सैरावैरा मेघासम वादळातिल॥५४॥

तद् वानरानीकमतिप्रचण्डं दिशो द्रवद्भिन्नमिवाभ्रजालम्।
स कुम्भकर्ण: समवेक्ष्य हर्षान्ननाद भूयो घनवद्घनाभ:॥५५॥

मेघासम पळणाऱ्या वानरांच्या प्रचण्ड सेनेस पाहुनी तो।
कृष्णवर्ण मेघासम कुम्भकर्ण गर्जे सजल जलधरासम॥५५॥

टीप: यात् मेघांचीच उपमा वानरसेना, कुम्भकर्ण व त्याची गर्जना या सर्वांना दिली आहे उपमेचे इतके दुर्भिक्ष का किंवा हव्यास कशासाठी?

ते तस्य घोरं निनदं निशम्य यथा निनादं दिवि वारिदस्य।
पेतुर्धरण्यां बहव: प्लवङ्गा निकृतमूला इव शालवृक्षा:॥५६॥

ऐकोनि ते राक्षसाचा सिंहनाद मेघगर्जनेपरी नभातिल ।
मुळापासूनि काटलेल्या सालवृक्षापरी पडती वानर भूवरी॥५६॥
पुन्हा यात मेघगर्जना आहेच
विपुलपरिघवान् स कुम्भकर्णो रिपुनिधनाय वि:सृतो महात्मा।
कपिगणभयमाददत् सुभीमं प्रभुरिव किंकरदण्डवान् युगान्ते॥५७॥
परिघ विशाल हाती घेउनी तो कुम्भकर्ण शत्रुनाशास्तव निघे।
कालरुद्रासम कालदण्डासह करित भय घोर उत्पन्न कपिसैन्यात ॥५७॥

इत्याचे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे पञ्चषष्टितम: सर्ग:॥६५॥

युद्धकाण्ड सर्ग ६६

स लवयित्वा प्राकारं गिरिकूटोपमो महान् ।
निर्ययौ नगरात् तूर्णं कुम्भकर्णो महाबलः॥१॥
महाबली कुम्भकर्ण भव्य गिरिशिखरापरी।
निघे नगरातुनि वेगे तटबन्दी ओलांडुनी॥१॥
ननाद च महानादं समुद्रमभिनादयन्।
विजयन्निव निर्घातान् विधमन्निव पर्वतान्॥२॥

सागरासम गम्भीर नाद जो गिरि कांपवी।
विद्युत् गर्जनेहुनी भयानक त्याची गर्जना॥२॥
तमवध्यं मघवता यमेन वरुणेन वा।
प्रेक्ष्य भीमाक्षमायान्तं वानरा विप्रदुद्रुवुः॥३॥
अवध्य जो इन्द्र यमा वरुणा त्यास पाहुनी।
निशाचरास लागती पळाया सर्व वानर ॥३॥
तांस्तु विप्रद्रुतान् दृष्ट्वा राजपुत्रोऽङ्गदोऽब्रवीत् ।
नलं नीलं गवाक्षं च कुमुदं च महाबलम् ॥४॥

पाहुनी गवाक्ष नील नल कुमुद महाबली।
पळता त्या संबोधत राजपुत्र अङ्गद असे॥४॥
आत्मनस्तानि विस्मृत्य वीर्याण्यभिजनानि च।
क्व गच्छत भयत्रस्ता: प्राकृता हरयो यथा॥५॥
विस्मरुनी पराक्रम उत्तम कुल आपले।
पळता कुठे तुम्ही रे साधारण वानरांपरी॥५॥
साधु सौम्या निवर्तध्वं किं प्राणान् परिरक्षथ।
नालं युद्धाय वै रक्षो महतीयं बिभीषिका॥६॥

पर्वा न करता प्राणांची परता हा राक्षस।
विशालरूप धारण मायेने हा करीतसे।
न शक्य त्यास करणे युद्ध आमच्यासवे॥६॥
महतीमुत्थितामेनां राक्षसानां बिभीषिकाम् ।
विक्रमाद् विधमिष्यामो निवर्तध्वं प्लवङ्गमा:॥७॥
आपल्यापुढे दिसे जी राक्षसांची बिभीषिका।
पराक्रमे करू नष्ट वानरांनो परत या ॥७॥
कृच्छ्रेण तु समाश्वस्य संगम्य च ततस्तत:।

वृक्षान् गृहीत्वा हरय: सम्प्रतस्थी रणाजिरे॥८॥
कष्टाने धारुनि धैर्य एकत्र येत ते कपि।
वृक्ष हातात घेउनी जाती रणभूमीकडे ॥८॥
ते निवर्त्य तु संरब्धा: कुम्भकर्णं वनौकस:।
निजघ्नु: परमकृद्धा: समदा इव कुञ्जरा:॥९॥
प्रांशुभिर्गिरिशृङ्गैश्च शिलाभिश्च महाबला:।
पादपै: पुश्पिताग्रैश्च हन्यमानो न कम्पते॥१०॥
परतता हत्तीसम मस्त क्रोध रोषासवे।

उंच पर्वतराशिंनी शिळा वृक्षांनी तसे।
कुम्भकर्णावरी करती प्रहार परि न तो।
विचलित नसे होत त्यांच्या त्या हल्ल्यामुळे॥१०॥
तस्य गात्रेषु पतिता भिद्यन्ते बहव: शिला:।
पादपा: पुष्पिताग्राश्च भग्ना: पेतुर्महीतले॥११॥
शिला अंगावरी त्याच्या फुटती वृक्षही तसे।
शरीरावरी पडुनी तुटूनि पडति भूवरी॥११॥
सोऽपि सैन्यानि संक्रुद्धो वानरानां महौजसाम्।

ममन्थ परमायत्तो वनान्यग्निरिवित्थित:॥१२॥

दावाग्नि जसा अरण्या जाळुनी भस्म करी।

तसा वानरसैन्या तो टाकीतसे तुडवूनि ॥१२॥

लोहितार्दास्तु बहव: शेरते वानरर्षभा:।

निरस्ता: पतिता भूमौ ताम्रपुष्पा इव द्रुमा:॥१३॥

कपि रक्ते लथपथ पडता भूवरी तयां।

फेके वर ते दिसती रक्तपुष्प वृक्षापरी॥१३॥

लङ्घयन्तः प्रधावन्तो वानरा नावलोकयन्।
केचित् समुद्रे पतिताः केचिद् गगनमास्थिताः॥१४॥
पळता भूमिवरी वेगे न पाहता सभोवती।
पडती सागरी काही काही उडती नभी ॥१४॥
वध्यमानास्तु ते वीरा राक्षसेन च लीलया।
सागरं येन ते तीर्णाः पथा तेनैव दुद्रुवुः॥१५॥
लीलया राक्षस ज्यांना मारतसे ते वानर।
आले लंकेत मार्गे ज्या त्यावरी पळु लागले॥१५॥

ते स्थलानि तदा निम्नं विवर्णवदना भयात्।
ऋक्षा वृक्षान् समारूढा: केचित् पर्वतमाश्रिता:॥१६॥
भये विवर्णमुख ते पळती खाली पाहुनी।
तरूवर् चढती काही लपती काहि पर्वती॥१६॥
ममज्जुर्णवे केचिद् गुहा: केचित् समाश्रिता:।
निपेतु: केचिदपरे केचिन्नैवावतस्थिरे।
केचिद् भूमौ निपतिता: केचित् सुप्तामृता इव॥१७॥
समुद्री बुडती काही शिरती काही गिरिगुही।

पडती भूवरी काही पळती काही दुजे।
धराशायी काही सुप्त काही मृतापरी॥१७॥
तान् समीक्ष्याङ्गदो भग्नान् वानरानिदमब्रवीत्।
अवतिष्ठत् युध्यामो निवर्तध्वं प्लवंगमा:॥१८॥
पाहुनी पळता त्यांना पुकारे अङ्गद तया।
परता आपण सारे मिळुनिया युद्ध करू॥१८॥
भग्नानां वो न पश्यामि परिक्रम्य महीमिमाम्।
स्थानं सर्वे निवर्तध्वं किं प्राणान् परिरक्षय॥१९॥

पळता न मिळे तुम्हा धरेवरि स्थान राहण्या।
पर्वा न करा प्राणांची या सर्व परतूनिया॥१९॥
निरायुधानां क्रमतामसङ्गगतिपौरुषा:।
दारा झुपहसिष्यन्ति स वै घात: सुजीवताम् ॥२०॥
पळाल टाकुनि शस्त्रे हसतील तुमच्या स्त्रिया।
दु:खदायक ते तुम्हा भासेल मृत्यूसमान ॥२०॥
कुलेषु जाता: सर्वेऽस्मिन् विस्तीर्णेषु महत्सु च।
क्व गच्छत भयग्रसता: प्राकृता हरयो यथा।

अनार्याः खलु यद्धीतास्त्यक्त्वा वीर्यं प्रधावत॥२१॥
विस्तीर्ण कुळे श्रेष्ठ आहात् जन्मला तुम्ही।
भयभीत पळता कैसे साधारण वानरांपरी।
अनार्य ठराल तुम्ही सोडुनि पळता रण॥२१॥
विकत्थनानि वो यानि भवद्भिर्जनसंसदि।
तानि वः क्व नु यातानि सोदग्राणि हितानि च॥२२॥
बोलला जनात् ऐसे महावीर शूर आम्ही ।
स्वामी हितैषी ते सर्व तुमचे व्यर्थ भाषण॥२२॥

भीरो: प्रवादा: श्रूयन्ते यस्तु जीवति धिक्कृत:।
मार्ग: सत्पुरुषैर्जुष्ट: सेव्यतां त्यज्यतां भयम्॥२३॥
धिक्कार त्या जीवितांचा जे जगती अपमानित।
सोडा भय अवलंबा मार्गा सत्पुरुष सेवित॥२३॥
शयामहे वा निहता: पृथिव्यामल्पजीविता:।
प्राप्नुयामो ब्रह्मलोकं दुष्प्रापं च कुयोधिभि:॥२४॥
शत्रुद्वारा मारले जाता रणभूमीत जर निद्रित।
ब्रह्मलोका करू प्राप्त् दुर्लभ कुयोगियांस जो॥२४॥

अवाप्नुयाम: कीर्तिं वा निहत्वा शत्रुमाहवे।
निहता वीरलोकस्य भोक्ष्यामो वसु वानरा:॥२५॥
मारुनी रणी शत्रूस मिळवाल कीर्ति उत्तम्।
मराल तर भोगाल वैभव वीरलोकिचे॥२५॥
न कुम्भकर्ण: काकुत्स्थं दृष्ट्वा जीवन् गमिष्यति।
दीप्यमानमिवासाद्य पतङ्गो ज्वलनं यथा॥२६॥
रामापुढे कुम्भकर्ण नच राहिल जीवित।
जळतो पतंग जैसा प्रज्वलित अग्निपुढे॥२६॥

पलायनेन चोद्दिष्टा: प्राणान् रक्षामहे वयम्।
एकेन बहवो भग्ना यशो नाशं गमिष्यति ॥२७॥
पळून जाउन प्राणा जर वाचविले आपण।
एक योद्धा आम्हा भारी धुळीस मिळवी यश॥२७॥
एवं ब्रुवाणं तं शूरमङ्गदं कनकाङ्गदम् ।
द्रवमाणास्ततो वाक्यमूचु: शूरविगर्हितम्॥२८॥
बोलता अङ्गद ऐसे पळणारे ते वानर ।
उत्तर देती असे जे शूरवीरां न शोभते ॥२८॥

कृतं न कदनं घोरं कुम्भकर्णेन रक्षसा:।
न स्थानकालो गच्छामो दयितं जीवितं हि न:॥२९॥
आरम्भी महा संहार कुम्भकर्ण हा आमचा।
असे प्रिय आम्हा जीव थाम्बणे योग्य ना इथे॥२९॥
एतावदुक्त्वा वचनं सर्वे ते भेजिरे दिश:।
भीमं भीमाक्षमायान्तं दृष्ट्वा वानरयूथपा:॥३०॥
एवढे बोलुन येणाऱ्या कुम्भकर्णास पाहुनी ।
सर्व दिशांना पळती यूथपति वानर ते ॥३०॥

द्रवमाणास्तु ते वीरा अङ्गदेन बलीमुखा:।
सान्त्वनैश्चानुमानैश्च तत: सर्वे निवर्तिता:॥३१॥
पळणाऱ्या वानरांना धीर देत उत्तेजन ।
वळविले अङ्गदाने सम्माने अन् आदरे॥३१॥
प्रहर्षमुपनीताश्च वालिपुत्रेन धीमता।
आज्ञाप्रतीक्षास्तस्थुश्च सर्वे वानरयूथपा:॥३२॥
प्रसन्न केले सर्वांना बुद्धिमान वालिसुते।
उभे राहति मग ते सुग्रीवआज्ञा ऐकण्या ॥३२॥

ऋषभशरभमैन्दधूम्रनीलाः कुमुदसुषेणगवाक्षरम्भतारः।
द्विविदपनसवायुपुत्रमुख्यास्त्वरिततराभिमुखं रणं प्रयाताः॥३३॥
ऋषभ शरभ मैन्द धूम्र नील कुमुद सुषेण गवाक्ष रम्भ तार ।
द्विविद पनस वायुपुत्र सर्व श्रेष्ठ वानरवीर निघती रणाकडे ॥३३॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे षट्षष्टितमः सर्गः॥६६॥

युद्धकाण्ड सर्ग ६७

ते निवृत्ता महाकाया: श्रुत्वाङ्गदवचस्तदा।
नैष्ठिकी बुद्धिमास्थाय सर्वे संग्रमकाङ्गिण:॥१॥
अङ्गदवचना ऐकुनि परतती महाकाय ते।।
मरणे वा मारणे ऐसा करोनिया निश्चय ॥१॥
समुदीरितवीर्यास्ते समारोपितविक्रमा:।
पर्यवस्थापिता वाक्यैरङ्गदेन बलीयसा ॥२॥

वर्णुनी पूर्वपराक्रम तयांचा अङ्गद तया।
बलविक्रमसंपन्न बनवुनी त्यां उभे करी॥२॥
प्रयाताश्च गता हर्षे मरणे कृतनिश्चया:।
चक्रु: सुतुमुलं युद्धं वानरस्त्यक्तजीविता:॥३॥
निश्चये मरू वा मारू हर्षे ते सरती पुढे।
उदार जिवावर् होउनि करती युद्ध भयंकर॥३॥
अथ वृक्षान् महाकाया: सानूनि सुमहन्ति च।
वानरस्तूर्णमुद्यम्य कुम्भकर्णमभिद्रवन्॥४॥

पर्वतशिखरे मोठी त्यांसवे वृक्ष घेउनी।
कुम्भकर्णावर हल्ला करती विशाल वानर॥४॥
कुम्भकर्ण: सुसंक्रुद्धो गदामुद्यम्य वीर्यवान् ।
धर्षयन् स महाकाय: समन्ताद् व्यक्षिपद् रिपून्॥५॥
विक्रमी क्रोधसंतप्त कुम्भकर्ण महाबली।
करी शत्रूंना घायाळ गदा फिरवुनि आपली॥५॥
शतानि सप्त चाष्टौ च सहस्राणि च वानरा:।
प्रकीर्णा:शेरते भूमौ कुम्भकर्णेन ताडिता:॥६॥

सातशे आणखी अष्ट सहस्र कपि होउनी ।
घायाळ् कुम्भकर्णाच्या माराने पडति भूवरी ॥६॥
षोडशाष्टौ च दश च विंशत्त्रिंशतथैव च।
परिक्षिप्य च बाहुभ्यां खादन् स परिधावति॥
भक्षयन् भृशसंकृद्धो गरुडः पन्नगानिव ॥७॥
सोळा आठ दश वीस तीस तीसहि वानरां।
भाहूत धरुनी खाई जैसा गरुड पन्नगां।
तसाच इकडेतिकडे भक्षण करता फिरे ॥७॥

टिप: ही आकडेवारी देण्याची आवश्यकता नव्हती.

कृच्छ्रेण च समाश्वस्ता: संगम्य च ततस्तत:।
वृक्षाद्रिहस्ता हरयस्तुस्थु: संग्राममूर्धनि॥८॥
कष्टाने धारण धैर्य करुनि एकत्र येति ते ।
घेउनि पर्वतशिखरे वृक्ष तैसे हातामध्ये ॥८॥
तत: पर्वतमुत्पाट्य द्विविद: प्लवगर्षभ:।
दुद्राव गिरिशृङ्गाभं विलम्ब इव तोयद:॥९॥
मेघासम विशाल द्विविद वानरशिरोमणी।

उखडुनी पर्वत फेकी पर्वताकार राक्षसावरी॥९॥
तं समुत्पाट्य चिक्षेप कुम्भकर्णाय वानरः।
तमप्राप्य महाकायं तस्य सैन्येऽपतत् ततः॥१०॥
फेकी द्विविद पर्वत कुम्भकर्णावरी परी ।
परि त्यावरि न पडता पडे राक्षससेनेवरी ॥१०॥
ममर्दाश्वान् गजांश्चापि रथांश्चापि गजोत्तमान्।
तानि चान्यानि रक्षांसि एवं चान्यदगिरेः शिरः॥११॥
पर्वतशिखराने त्या अनेक घोडे हत्ती रथ।

तैसे अनेक राक्षस तुडविले जाती एका क्षणी॥११॥

तच्छैलवेगाभिहतं हताश्व हतसारथिम् ।
रक्षसां रुधिरक्लिन्नं बभूवायोधनं महत् ॥१२॥

शैलशिखर वेगाने तुडवले जाती जे ।
रुधिरे राक्षसांच्या त्या युद्धस्थल ओलावले ॥१२॥

रथिनो वानरेंद्राणां शरैः कालान्तकोपमैः।
शिरांसि नर्दतां जह्रुः सहसा भीमनिस्वताः॥१३॥

कापति वानरांची शिरे रथातील राक्षस।

यमराजासम गर्जत भयंकर बाण सोडत॥१३॥

वानरश्च महात्मान: समुत्पाट्य महाद्रुमान्।
रथानश्चान् गजानुष्ट्रान् राक्षसानभ्यसूदयन्॥१४॥

संहारति वानरही वृक्ष मोठे उपटुनी।
रथ घोडे गज उंट रथही राक्षसांसवे॥१४॥

हनूमान् शैलशृङ्गाणि शिलाश्च विविधान् द्रुमान्।
ववर्ष कुम्भकर्णस्य शिरस्यम्बरमास्थित:॥१५॥

हनूमान करी वर्षा आकाशात जाउनी।

पर्वत शिला शिखरे कुम्भकर्णाच्या मस्तकी॥१५॥
तानि पर्वतश्रुङ्गाणि शूलेन स बिभेद ह।
बभञ्ज वृक्षवर्षं च कुम्भकर्णो महाबाल:॥१६॥
फोडिली गिरिशिखरे बाणांनी त्या राक्षसे।
छिन्न भिन्नकरी वर्षा वृक्षांची जी होतसे॥१६॥
ततो हरीणां तदनीकमुग्रं दुद्राव शूलं निशितं प्रगृह्य।
तस्थौ स तस्यापतत: परस्तान्महीधराग्रं हनुमान प्रगृह्य॥१७॥
तीक्ष्ण शूल घेउनिया तो करी आक्रमण भयंकर कपिसेनेवरी।

सामना त्याचा करण्या पर्वतशिखरासह् राही हनुमान् उभा ॥१७॥

स कुम्भकर्णं कुपितो जघान वेगेन शैलोत्तमभीमकायम्।
संचुक्षुभे तेन तदाभिभूतो मेदागात्रो रुधिरावसिक्त:॥१८॥

कोपाने पर्वतशरीरी कुम्भकर्णावर करी वेगे प्रहार तो।
त्यामुळे व्याकुळ कुम्भकर्ण जखमानी रक्ताने न्हातसे॥१८॥

स शूलमाविध्य तडित्प्रकाशं गिरिं यथा प्रज्वलिताग्निशृङ्गम्।
बाह्यन्तरे मारुतिमाजघान गुहोऽचलं क्रौन्चमिवोग्रशक्त्या॥१९॥

तो शूल आपला विजेसमान फिरवुनी मारी छातीवरी मारुतीच्या।

जसा क्रौन्चपर्वतावरी आघात करी कार्तिकेय भयानक स्वशक्तीसवे॥१९॥

स शूल निर्भिन्नमहाभुजान्तर: प्रविह्वल: शोणितमुद्रमन् मुखात्।
ननाद भीमं हनुमान् महाहवे युगान्तमेघस्तनितस्वनोपमम् ॥२०॥

होई विदीर्ण वक्षस्थल मारुतीचे त्यामुळे होतसे विह्वल रक्त ओकी।
पीडित करीतसे भयंकर आर्तनाद जसा प्रलयकाली मेघगर्जना ध्वनी॥२०॥

ततो विनोदु: सहसा प्रहृष्टा रक्षोगणांस्त व्यथितं समीक्ष्य।
प्लवङ्गनास्तु व्यथिता भयार्ता प्रदुद्रुवु: संयति कुम्भकर्णात्॥२१॥

पाहूनि त्या असे व्यथित ते हर्षित राक्षसगण आरोळ्या ठोकती।

भयाने कुम्भकर्णाच्या पीडित वानर पळू लागति सोडुनि रणास ॥२१॥

ततस्तु नीलो बलवान् पर्यवस्थापयन् बलम्।
प्रतिचिक्षेप् शैलाग्रं कुम्भकर्णाय् धीमते॥२२॥

धैर्य वाढवण्या त्यांचे नील बलवान फेकित ।
बुद्धिमान कुम्भकर्णावरि पर्वतशिखर उपटुनी ॥२२॥

तदापतन्तं सम्प्रेक्ष्य मुष्टिनाभिजघान ह।
मुष्टिप्रहाराभिहतं तच्छैलाग्रं व्यशीर्यत
सविस्फुलिङ्गं सज्वालं निपपात महीतले॥२३॥

पाहूनि येता शिखर आघात बुक्क्याने करी
कुम्भकर्णाच्या प्रहारे त्या होई ते चूर्ण शिखर।
अग्निज्वालांसवे पडे पृथ्वीवर शिखर ते॥२३॥
ऋषभ: शरभो नीलो गवाक्षो गन्धमादन:।
पञ्च वानरशार्दूला: कुम्भकर्णमुपाद्रवन्॥२४॥
त्यानन्तर् ऋषभ नील गवाक्ष गन्धमादन।
कुम्भकर्णावरी हल्ला करती वानरवीर हे॥२४॥
शैलैर्वृक्षैस्तलै: पादैर्मुष्टिभिश्च महाबला:।

कुम्भकर्णं महाकायं निजघ्नु: सर्वतो युधि॥२५॥
ते सर्व पर्वत् वृक्ष बुक्क्या लाथांच्या सवे।
घेरुनी कुम्भकर्णाला शरीर त्याचे चेचती॥२५॥
स्पर्शानिव प्रहारांस्तान् वेदयानो न विव्यथे।
ऋषभं तु महावेगं बाहुभ्यां परिषस्वजे॥२६॥
कुम्भकर्णा प्रहारांनी वेदना नच होतसे।
त्यानेच मग ऋषभास बाहूमधे कवळिले॥२६॥
कुम्भकर्णभुजाभ्यां तु पीडितो वानरर्षभ:।

निपपातर्षभो भीम: प्रमुखागतशोणित:॥२७॥

कुम्भकर्णाच्या बाहूत चिरडुनी ऋषभाच्या।
गळुनी रक्त मुखातुनि पडे तो भूमीवरी॥२७॥

मुष्टिना शरभं हत्वा जानुना नीलमाहवे।
आजघान गवाक्षं तु तलेनेन्द्ररिपुस्तदा।
पादेनाभ्यहनत् क्रुद्धस्तरसा गन्धमादनम्॥२८॥

बुक्क्यांनी शरभा मारी गवाक्षा मारि थापडा।
गुडघ्यात रगडी नीला वेगाने गन्धमादना।

मारितसे लाथांनी कुम्भकर्ण इन्द्रद्रोही॥२८॥
दत्तप्रहारव्यथिता मुमुहु: शोणितोक्षिता:।
निपेतुस्ते तु मेदिन्या निकृत्ता इव किंशुका:॥२९॥
प्रहारे वानर त्याच्या मूर्च्छित रक्ते न्हाउनी।
पडती भूवरी काटलेल्या पलाश वृक्षापरी॥२९॥
तेन वानरमुख्यषु पातितेषु महात्मसु।
वानराणां सहस्राणि कुम्भकर्णं प्रदुद्रुवु:॥३०॥
वानरप्रमुख ऐसे पडता घायाळ होउनी।

कपिसहस्र पडती तुटुनी कुम्भकर्णावरी ॥३०॥
तं शैलमिव शैलाभा: सर्वे तु प्लवगर्षभा:।
समारुह्य समुत्पत्य ददंशुश्च महाबला:॥३१॥
कपि पर्वतासम ते चढती राक्षसावरी।
चावती सर्वबाजूनी त्या उड्या मारमारुनी॥३१॥
तं नखैर्दशनैश्चापि मुष्टिभिर्बाहुभिस्तथा।
कुम्भकर्णं महाबाहुं निजग्नु: प्लवगर्षभा:॥३२॥
नखे दांत तसे बाहु यांचा मारा करति ते।

कुम्भकर्णावरी सर्व ते वानरशिरोमणि॥३२॥
स वानरसहस्रेस्तु विचित: पर्वतोपम:।
रराज राक्षसव्याघ्रो गिरिरात्मरुहैरिव॥३३॥
पर्वत जसा वृक्षांनी होतसे सुशोभित।
सहस्रवानरव्याप्त कुंभकर्ण शोभे तसा॥३३॥
बाहुभ्यां वानरान् सर्वान् प्रगृह्य स महाबल:।
भक्षयामास संकृद्धो गरुड: पन्नगानिव॥३४॥
उचलुनि वानरां सर्व क्रुद्ध तो खाउ लागला।

जसा गरुड सर्पांना आहार बनवीतसे ॥३४॥

प्रक्षिप्ता: कुम्भकर्णेन वक्त्रे पातालसंनिभे।
नासापुटाभ्यां संजग्मु: कर्णाभ्यां चैव वानरा:॥३५॥

वानरां पाताळसम मुखे कुम्भकर्णे टाकता।
कानानाकातुनी त्याच्या बाहेर निघती तसे॥३५॥

भक्षयन् भृशसंकृद्धो हरीन् पर्वतसंनिभ:।
बभञ्ज वानरान् सर्वान् संकृद्धो राक्षसोत्तम:॥३६॥

राक्षसे पर्वताकार अतिक्रोधाने भक्षण।

वानरां करता सर्व अंगभंग करोनिया॥३६॥
मांसशोणितसंक्लेदा कुर्वन् भूमिं स राक्षसः।
चचार हरिसैन्येषु कालग्निरिव मूर्च्छितः॥३७॥
चिखल रक्तमांसाचा करित रणभूवरी ।
फिरे प्रलयाग्नीसम वानरसेनेत राक्षस ॥३७॥
वज्रहस्तो यथा शक्र पाशहस्त इवान्तकः।
शूलहस्तो बभौ युद्धे कुम्भकर्णो महाबलः॥३८॥
इन्द्रासम वज्रधारी पाशधारी यमासम्

शूलधारी कुम्भकर्ण रणी फिरताना दिसे॥३८॥
यथा शुष्काण्यरण्यानि ग्रीष्मे दहति पावक:।
तर्हा वानरसैन्यानि कुम्भकर्णो ददाह स:॥३९॥
ग्रीष्मात सुकल्या राना अग्नी जसा जाळतसे।
कुम्भकर्ण तसा सैन्या वानरांच्या गिळतसे॥३९॥
ततस्ते वध्यमानास्तु हतयूथा: प्लवङ्गमा:।
वानरा भयसंविग्ना विनेदुर्विकृते स्वरै:॥४०॥
माराने कुम्भकर्णाच्या ज्यांचे सर्व नष्ट सैनिक ।

उद्विग्न यूथपति ते चित्कारति विकृत स्वरे॥४०॥
अनेकशो वध्यमाना: कुम्भकर्णेन वानरा:।
राघवं शरणं जग्मुर्व्यथिता भिन्नचेतस:॥४१॥
मारता कुम्भकर्णाने भग्नहृदये वानर ।
व्यथित होउनि जाती श्रीरघुनाथा शरण॥४१॥
प्रभग्नान् वानरान् दृष्ट्वा वज्रहस्तात्मजात्मज:।
अभ्यधावत चेगेन क्म्भकर्णं महाहवे॥४२॥
पाहुनि पळता त्यांना वालीकुमार अङ्गद।

महासमरी वेगाने धावे कुम्भकर्णाकडे॥४२॥
शैलशृङ्गं महद् गृह्य विनदन् स मुहुर्मुहुः।
त्रासयन् राक्षसान् सर्वान् कुम्भकर्णपदानुगान्॥४३॥
चिक्षेप शैलशिखरं कुम्भकर्णस्य मूर्धनि।
विशाल शैलशिखरा घेउनी कर्जना करी।
कुम्भकर्णाच्या समस्त राक्षसां भयभीत॥४३॥
करुनी शैलशिखरा फेकी कुम्भकर्णशिरी।
स तेनाभिहतो मूर्ध्नि शैलेनेन्द्ररिपुस्तदा॥४४॥

कुम्भकर्ण: प्रजज्वाल क्रोधेन महता तदा।
सोऽभधावत वेगेन वालिपुत्रममर्षन:॥४५॥
पर्वतशिखर आघाते इन्द्ररिपु तो मस्तकी॥४४॥
असह्य प्रहारे होत क्रोधाने लागला जळू ।
वालिपुत्राकडे मग वेगाने धावू लागला॥४५॥
कुम्भकर्णो महानादस्त्रासयन् सर्ववानरान् ।
शूलं ससर्ज वै रोषादङ्गदे तु महाबल:॥४६॥
वानरां करि संत्रस्त करुनी महागर्जना।

रोषाने शूलप्रहार अङ्गदावरि करी॥४६॥
तदापतन्तं बलवान् युद्धमार्गविशारद:।
लाघवान्मोक्षयामास बलवान् वानरर्षभ:॥४७॥
परि चुकवी युक्तीने युद्धविशारद अङ्गद।
आणि वाचवी स्वत:स शूलापासुनि तदा॥४७॥
उत्पत्य चैनं तरसा तलेनोरस्यताडयत्।
स तेनाभिहत: कोपात् प्रमुमोहाचलोपम:॥४८॥
उडुनी मग वेगाने राक्षसाच्या छातीवरी।

मुष्टिप्रहार करी ज्यामुळे होई राक्षस मूर्च्छित॥४८॥
स लब्धसंज्ञोऽतिबलो मुष्टिं संगृह्य राक्षसः।
अपहस्तेन चिक्षेप विसंज्ञः स पपात ह॥४९॥
परि शुद्धीवर येता वामहस्ते तो अङ्गदा ।
त्वेषे ताडि त्यामुळे तो अचेत पडे भूवरी ॥४९॥
तस्मिन् प्लवगशार्दूले विसंज्ञे पतिते भुवि।
तच्छूलं समुपादाय् सुग्रीवमभिदुद्रुवे॥५०॥
वानरप्रवर अंगद बेशुद्ध पडता भूवरी।

कुम्भकर्ण शूलासह त्या धावे सुग्रिवाकडे॥५०॥
तमापतन्तं सम्प्रेक्ष्य कुम्भकर्णं महाबलम्।
उत्पपात तदा वीर:सुग्रीवो वानराधिप:॥५१॥
पाहुनिया कुम्भकर्णा येताना आपल्याकडे ।
सुग्रीव वानरराज उड्डाण वरती करे॥५१॥
स पर्वताग्रमुत्क्षिप्य समाविध्य महाकपि:।
अभिदुद्राव वेगेन कुम्भकर्ण महाबलम् ॥५२॥
पर्वतशिखरा एक सुग्रीवाने उचलुनि ।

घुमवुनी कुम्भकर्णा वरी वेगाने फेकले॥५२॥

तमापतन्तं सम्प्रेक्ष्य कुम्भकर्ण: प्लवङ्गमम्।
तस्थौ विवृत्तसर्वाङ्गो वानरेन्द्रस्य सम्मुख:॥५३॥

पाहुनिया सुग्रीवाला आक्रमण करताना।
फुलवुनी सर्व अङ्ग कुम्भकर्ण पुढे उभा॥५३॥

कपिशोणितदिग्धाङ्गं भक्षयन्तं महाकपीन् ।
कुम्भकर्णं स्थितं दृष्ट्वा सुग्रीवो वाक्यमब्रवीत् ॥५४॥

माखलेला कपिरक्ते खाता इतर् वानरा।

कुम्भकर्णा अश्या बोले पाहुनी सुग्रीव त्या॥५४॥
पातिताश्च त्वया वीरा: कृतं कर्म सुदुष्करम्।
भक्षितानि च सैन्यानि प्राप्तं ते परमं यश:॥५५॥
त्यज तद् वानरानीकं प्राकृते किं करिष्यसि।
सहस्वैकं निपातं मे पर्वतस्यास्य राक्षस॥५६॥
मारिले वीरां अनेक केले दुष्कर कर्म तू।
खाउनिया सैनिकांस मिळविलेस तू यश॥५५॥
सोड ती वानरसेना विशेष काय त्यामध्ये।

फेकतो पर्वत करी सहन त्याचा मार तू॥५६॥

तद् वाक्यं हरिराजस्य सत्त्वधैर्यसमन्वितम् ।
श्रुत्वा राक्षसशार्दूल: कुम्भकर्णोऽब्रवीद वच:॥५७॥

ते वाक्य कपिराजाचे सत्त्वधैर्ययुक्त ऐकुनी।
बोले राक्षसप्रवर कुम्भकर्ण तयावरी॥५७॥

प्रजापतेस्तु पौत्रस्त्वं तथैवर्लरज:सुत:।
धृतिपौरुषसम्पन्नस्तस्माद् गर्जसि वानर॥५८॥

पुत्र तू ऋक्षरजाचा अससी प्रजापती पौत्र तू।

पौरुषसंपन्न त्यामुळे गर्जना करसी अशी॥५८॥

स कुम्भकर्णस्य वचो निशम्य व्याविध्य शैलं सहसा मुमोच।

तेनाजघानोरसि कुम्भकर्ण शैलेन वज्राशनिसंनिभेन॥५९॥

ते वाक्य ऐकुनि कुम्भकर्णाचे सुग्रीव सोडी फिरवुनि शैलशिखर ।

वज्र अशनि सम जे असे जखम खोल करी कुम्भकर्ण छातीवरी॥५९॥

तच्छैलशृङ्ग सहसा विभिन्नं भुजान्तरे तस्य तदा विशाले।

ततो विषेदु: सहसा प्लवंगा रक्षोगणाश्चापि नुदा विनेदु:॥६०॥

व:क्षस्थले टक्करता परि ते शैलशिखर चूर्ण होतसे।

पाहुनि वानरां सर्व विषाद वाटे राक्षस हर्षे करति गर्जना॥६०॥
स शैलशृङ्गाभिहतश्चुकोप ननाद रोषाच्य विवृत्य वक्त्रम्।
व्याविध्य शूलं स तडित्प्रकाशं चिक्षेप हपृक्षपतेर्वधाय॥६१॥
पर्वतशिखर आघाते क्रोधित कुम्भकर्ण करी जोराने गर्जना।
शूल बिजलीसम जो चमके सुग्रीवावर घुमवुनी फेकी वधास्तव॥६१॥
तत् कुम्भकर्णस्य भुजप्रणुन्नं शूलं शितं काञ्चनधामयष्टिम्।
क्षिप्रं समुत्पत्य निगृह्य दोर्ध्यां बभञ्ज वेगेनसुतोऽनिलस्य॥६२॥
त्या कुम्भकर्णाच्या शूलास तीक्ष्ण सुवर्णवेष्टित दण्ड ज्याचा ।

पकड्नी भुजांमध्ये वायुपुत्र हनुमान वेगपूर्वक टाकी तोडुनी ॥६२॥

कृतं भारसहस्रस्य शूलं कालायसं महत्।
बभञ्ज जानुमारोप्य तदा हृष्टः प्लवङ्गमः॥६३॥

लोहाचा सहस्रभार शूल तो गुडघ्यावरी ।
हनुमान् वायुपुत्र तोडी हर्षे वाकवुनी ॥६३॥

शूलं भग्नं हनुमता दृष्ट्वा वानरवाहिनी।
हृष्टा ननाद् बहुशः सर्वतश्चापि दुद्रुवे॥६४॥

हनुमान शूल तोडी पाहुनी वानरसेना।

सिंहानाद करी हर्षे धावताति चहूकडे॥६४॥
बभूवाथ परित्रस्तो राक्षसो विमुखोऽभवत्।
सिंहनादं च ते चक्रु: प्रहृष्टा वनगोचरा:।
मारुतिं पूजयांचक्रुर्दृष्ट्वा शूलं तथागतम्॥६५॥
भयभीत राक्षस होती उदासमुख दावती।
करताती सिंहनाद परी हर्षाने वानर ॥६५॥
प्रशंसति वायुपुत्रा शूल तो तोडि पाहुनी ।
स तत् तथा भग्नमवेक्ष्य शूलं चुकोप रक्षोधिपतिर्महात्मा।

उत्पाट्य लङ्कामलयात् स श्रुंङ्गं जघान सुग्रीवमुपेत्य तेन॥६६॥

तसा शूल भग्न होई पाहुनी महाक्रोधित महाकाय कुम्भकर्ण।

जवळील मलयपर्वत शिखर उपटुनी मारी सुग्रीवापाशी जाउनी॥६६॥

स शैलशृङ्गाभिहतो विसंज्ञ: पपात भूमौ युधि वानरेन्द्र:।

तं वीक्ष्य भूमौ पतितं विसंज्ञं नेदु: प्रहृष्टा युधि यातुधाना:॥६७॥

त्या शैलशृङ्गाच्या आघाते बेशुद्ध होउनि पडे रणावरि सुग्रीव।

पडता पाहुनी त्या निशाचर प्रसन्न होउनि करती सिहनाद ॥६७॥

समभ्युपेत्याद्भुतघोरवीर्यं स कुम्भकर्णो युधि वानरेन्द्रम् ।

जहार सुग्रीवमभिगृह्य यथानिलो मेघमिवप्रचण्ड:॥६८॥
पराक्रम अद्भुत करणाऱ्या वानरराज सुग्रिवापाशी जाउनी।
कुम्भकर्ण उचलुनी नेई जैसा प्रचंड वात मेघांस नेतसे ॥६८॥
स तं महामेघनिकाशरूपमुत्पाट्य गच्छन् युधि कुम्भकर्ण:।
रराज मेरुप्रतिमानरूपो मेरुर्यथा व्युच्छ्रितघोरशृङ्ग:॥६९॥
कुम्भकर्ण उचलुनी महामेघासम सुग्रीवा जाई रणभूमीवरुनी।
तेव्हां भयानक उंच शिखरयुक्त मेरुपर्वतासम दिसतसे ॥६९॥
ततस्तमादाय जगाम वीर: संस्तूयमानो युधि राक्षसेन्द्र:।

श्रुण्वन् निनादं त्रिदिवालयानां प्लबङ्गराजग्रहविस्मितानाम् ॥७०॥
घेऊनि त्या राक्षसराज जाता सर्व राक्षस करती स्तुति त्याची।
त्यामधुनी देवतांचा आश्चर्येजनित दु:खी स्वर ऐकु येई ॥७०॥
ततस्तमादाय तदा स मेने हरीन्द्रमिन्द्रोपममिन्द्रवीर्य:।
अस्मिन् हते सर्वमिदं हतं स्यात् सराघवं सैन्यमितीन्द्रशत्र:॥७१॥
पकडुनी नेता देवेन्द्रसम वानरराजास कुम्भकर्ण विचार ऐसा करी।
मारता या सर्व वानरसेना रामासहित नष्ट होउनि जाइल ॥७१॥
विद्रुतां वाहिनीं दृष्ट्वा वानराणामितस्तत:।

कुम्भकर्णेन सुग्रीवं गृहीतं चापि वारम्॥७२॥
हनूमश्चिन्तयामास मतिमान् मारुतात्मज:।
एवं गृहीते सुग्रीवे किं कर्तव्यं मया भवेत्॥७३॥
पाहुनी पळता सेना वानरांची इतस्तत:।
कुम्भकर्णाने आणि पकडले असे सुग्रीवा॥७२॥
विचार करि पाहुनी हे हनुमान बुद्धिमान्। ।
करावे काय मी नेता सुग्रीवास पकडुनी॥७३॥
यद्धि न्याय्यं मया कर्तुं तत् करिष्याम्यसंशयम्।

भूत्वा पर्वतस्काशो नाशयिष्यामि राक्षसम्॥७४॥

करणे मज जे योग्य नि:संशय करीन मी।

करीन राक्षसा नष्ट पर्वताकार घेउनि ॥७४॥

मया हते संयति कुम्भकर्णे महाबले मुष्टिविशीर्णदेहे।

विमोचिते वानरपार्थिवे च भवन्तु हृष्टा: प्लवगा: समग्रा:॥७५॥

कुम्भकर्णा मारता मी युद्धात् बुक्के मारमारुनी

आणि वानरराज सुटता होतील सर्व हर्षित वानर॥७५॥

अथवा स्वयमप्येष मोक्षं प्राप्स्यति वानर:।

गृहीतोऽयं यदि भवेत् त्रिदशैः सासुरोरगैः॥७६॥
किंवा सुटेल वानर स्वप्रयत्ने जसा सुटू ।
शकतो देव असुर नाग यांपासूनही ॥७६॥
मन्ये न तावदात्मानं बुध्यते वानराधिपः।
शैलप्रहाराभिहतः कुम्भकर्णेन संयुगे॥७७॥
वाटे सुग्रीव अजुनी शिलाप्रहारे जखमी।
अचेतन झालेला तो अजुनी बेशुद्ध असे॥७७॥
अयं मुहूर्तात् सुग्रीवो लब्धसंज्ञो महाहवे।

आत्मनो वानराणां च यत् पथ्यं तत् करिष्यति॥७८॥

शुद्धीवर एका येता मुहूर्तामधे सुग्रीव ।
करील योग्य असे जे स्वत:स्तव सैन्यास्तव ॥७८॥

मया तु मोक्षितस्यास्य सुग्रीवस्य महात्मन:।
अप्रीतिश्च भवेत् कष्टा कीर्तिनाशश्च शाश्वत:॥७९॥

मी सोडविता सुग्रीवा होईल कष्टी तो मनी।
कारण शाश्वत् त्याच्या कीर्तीचा नाश होईल ॥७९॥

टीप: सुग्रीव राजा असल्याने इतर कोणी त्यास सोडवणे त्याला अपमानास्पद वाटेल् हा भावार्थ.

तस्मान्महूर्तं कांक्षिष्ये विक्रम मोक्षितस्य तु।
भिन्नं च वानरानीकं तावदाश्वासयाम्यहम् ॥८०॥
थाम्बुनी मुहूर्त एक सुटता त्याचा पराक्रम।
पाहीन तोवरी धैर्य इतरांचे वाढवितो॥८०॥
इत्येवं चिन्तयित्वाथ हनूमान् मारुतात्मज:।
भूय: संस्तम्भयामास वानराणां महाचमूम् ॥८१॥
करुनी विचार ऐसा मोठ्या वानरसैन्यास।
करी स्थापित देऊनी हनूमान आश्वासन ॥८१॥

स कुम्भकर्णोऽथ विवेश लङ्कां स्फुरन्तमादाय महाहरिं तम्।
विमानचर्यागृहगोपुरस्थैः पुष्पाग्रयवर्षैरभिपूज्यमानः॥८२॥
प्रवेश लंकेत करि कुम्भकर्ण घेउनी सुग्रीवा तडफडणाऱ्या।
तयावरी करती पुष्पवर्षाव विमानातुनि गोपुरातुनि स्त्रीपुरुष॥८२॥
लाजगन्धोदवर्षैस्तु सेच्यमानः शनैः शनैः।
राजवीथ्यास्तु शीतत्वात् संज्ञा प्राप महाबलः॥८३॥
सुगन्धित जलवर्षावे राजमार्गावरि शीतल।
हळूहळू महाबली सावध होई सुग्रीव ॥८३॥

ततः स संज्ञामुपलभ्य कृच्छ्राद् बलीयसस्तस्य भुजान्तरस्थः।
अवेक्षमाणः पुरराजमार्ग विचिन्तयामास मुहर्महात्मा॥८४॥
बाहूमध्ये बलवान कुम्भकर्णाच्या कष्टाने सावध होत पाहता।
महात्मा सुग्रीव नगर् राजमार्ग विचार् ऐसा वारंवार करीतसे॥८४॥
एवं गृहीतेन कथं नु नाम शक्यं मया सम्प्रतिकर्तुमद्य।
तथा करिष्यामि यथा हरीणां भविष्यतीष्टं च हितं च कार्यम्॥८५॥
असा राक्षसाच्या पकडीत राहुन कसा त्या त्रस्त करू शकेन।
करावे तेच जे असे वानर सैन्या अभीष्ट आणि हितकारक॥८५॥

ततः कराग्रैः सहसा समेत्य राजा हरीणाममरेन्द्रशत्रोः।
खरैश्च कर्णौ दशनैश्च नासां ददर्श पादैर्विददार पार्श्वौ॥८६॥
विचार ऐसा करुनी नखांनी हाताच्या दोन्ही कान फाडी।
दातांनी नाकाचा घेउनि चावा पार्श्वभाग पादनखे फाडी॥८६॥
स कुम्भकर्णो हतकर्णनासो विदारितस्तेन रदैर्नखैश्च।
रोषाभिभूतः क्षतजार्द्रगात्रः सुग्रीवमाविध्य पिपेष भूमौ॥८७॥
नाक कान अर्धे तुटुनी होता विदीर्ण पार्श्वभाग असे शरीर।
कुम्भकर्णाचे रक्तबंबाळ होता आपटि त्याला रागाने भूवरी॥८७॥

स भूतले भीमबलाभिपिष्ट:सुरारिभिस्तैरभिहन्यमान:।
जगाम खं कन्दुकवज्जवेन पुनश्च रामेण समाजगाम॥८८॥
भूमीवरि कुम्भकर्णे रगडित आणि इतर राक्षसही मारता त्यास।
सहसा सुग्रीव वेगपूर्वक चेंडुपरी उसळुनी श्रीरामचन्द्रास मिळे॥८८॥
कर्णनासाविहिनस्तु कुम्भकर्णो महाबल:।
रराज् शोणितोत्सिक्तो गिरि: प्रस्रवणैरिव॥८९॥
कान नाकाविना झरे रक्त पर्वती जसे झरे।
शोभे शैलशिखरासम झरे रक्ताचे ज्यावरी ॥८९॥

शोणितो महाकायो राक्षसो भीमदर्शन:।
युद्धायाभिमुखो भूयो मनश्चक्रे निशाचर:॥९०॥
दिसे महाभयानक राक्षस शोणितलांछित।
करी विचार युद्धाचा शत्रूपुढे जाउनी॥९०॥
अमर्याच्छोणितोद्गारी शुशुभे रावणानुज:।
नीलाञ्जनचयप्रख्य: सस्ध्य इव तोयद:॥९१॥
करता रक्तवमन क्रोधे रावणबन्धु तो।
मेघापरि दिसू लागे काळ्या सायंकालिन ॥९१॥

गते च तस्मिन् सुरराजशत्रु: क्रोधात् प्रदुद्राव रणाय भूय:।
अनायुधोऽस्मीति विचिन्त्य रौद्रो घोरं तदा मुद्गरमाससाद॥९२॥
सुग्रीव जाता पळुनी इन्द्रद्रोही जाहला युद्धास्तव पुन्हा सज्ज ।
नसे शस्त्र जवळी विचारे या महाभयंकर मुद्गर् हाती घेउनी॥९२॥
तत: स पुर्या: सहसा महौजा निष्क्रम्य तद वानरसैन्यमुग्रम्।
बभक्ष रक्षो युधि कुम्भकर्ण: प्रजा युगान्ताग्निरिव प्रवृद्ध:॥९३॥
पुरीतुनी निघे कुम्भकर्ण महाबली प्रजाभक्षक कपिसैन्याकडे।
अग्नीपरी प्रज्वलित तो युद्धस्थली वानरभक्षण लागला करू॥९३॥

बुभुक्षितः शोणितमांसगृनुः प्रविश्य तदा वानरसैन्यमुग्रम्।
चखाद रक्षांसि हरीन् पिशाचानृक्षांश्च मोहाद् युधि कुम्भकर्णः।
यथैव मृत्युर्हस्ते युगान्ते स भक्षयामास हरीश्च मुख्यान् ॥९४॥

बुभुक्षित रक्तमांसास्तव भुकेला प्रवेश करि उग्र वानरसैन्यमध्ये ।
करी आरंभ खाण्यास त्वरेने वानरां अस्वला राक्षासानाहि त्यांसवे ।
करी घास प्रधान वानरांचा जसा प्रलयान्ती प्राण्यांच्या जिवाचा मृत्यु॥९४॥

एकं द्वौ त्रीन् बहून् क्रुद्धो वानरान् सह राक्षसैः।
समादायैकहस्तेन प्रचिक्षेप त्वरन् मुखे॥९५॥

एक दोन तीन किंवा आणखीही वानरां ।
पकडुनी राक्षसांही सवे घालतसे मुखी॥९५॥
सम्प्रस्रवंस्तदा मेदः शोणितं च महाबलः।
वध्यमानो नगेन्द्राग्रैर्भक्षयामास वानरान् ॥९६॥
गिरिशिखरांचा मार खात असताही स्वमुखे।
चरबी रक्त गाळत करी सर्वांचे भक्षण॥९६॥
ते भक्ष्यमाणा हरयो राम जग्मुस्तदा गतिम्।
कुम्भकर्णो भृशं क्रुद्धः कपीन् खादन् प्रधावति॥९७॥

ऐसे भक्षण होताना रामा शरण वानर।
कुम्भकर्ण महाक्रोधे खात धावत त्यांवरी॥९७॥
शतानि सप्त चाष्टौ च वींशत् त्रिंशत् तथैव च ।
सम्परिष्वज्य बाहुभ्यां खादन् विपरिधांवति॥९८॥
सात आठ वीस तीस पकडे हाति वानरां।
धावे आणि तयां खात सर्वत्र रणभूवरी॥९८॥
मेदोवसाशोणितदिग्धगात्रः कर्णावसक्त ग्रथितान्त्रमालः।
ववर्ष शूलानि सुतीक्ष्णदंष्ट्रः कालो युगान्तस्थ इव प्रवृद्धः॥९९॥

शरीर रक्ते मेदे आवृत्त कानावरी माळ आतड्यांची।
तो तीक्ष्णदंष्ट्र काल संहारक जणु शूलवर्षाव करी कपींवरी॥९९॥
तस्मिन् काले सुमित्राया: पुत्र: परबलार्दन:।
चकार लक्ष्मण: कृद्धो युद्धं परपुरंजय:॥१००॥
तेव्हां शत्रुसंहारक सुमित्रापुत्र लक्ष्मण ।
क्रोधे युद्ध करू लागे त्या राक्षसाच्या सवे॥१००॥
स कुम्भकर्णस्य् शरान् शरीरे सप्त वीर्यवान्।
निचखानाददे चान्यान् विससर्ज च लक्ष्मण॥१०१॥

शरीरी कुम्भकर्णाच्या घुसवी सात बाण तो।
घेउनी दुसरे बाण सोडी तेही त्यावरी॥१०१॥
पीड्यमानस्तदस्त्रं तु विशेषं तत् स राक्षसः।
ततश्चुकोप बलवान् सुमित्रानन्दवर्धनः॥१०२॥
करता निःशेष अस्त्रास राक्षसाने पीडित त्या।
बलवान लक्ष्मणास महाक्रोध होई तदा ॥१०२॥
अथास्य कवचं शुभ्रं जाम्बूनदमयं शुभम्।
प्रच्छादयामास शरैः संध्यभ्रमिव मारुतः॥१०३॥

करी झाकुनी कवच सुवर्णमय सुन्दर्।
शरवर्षावे अदृश्य संध्यामेघा वायु जसा ॥१०३॥
नीलाञ्जनचयप्रख्य: शरै: काञ्चनभूषणै:।
आपीड्यमान: शुशुभे मेघै: सूर्य इवांशुमान्॥१०४॥
काजळापरि काळा सुवर्ण बाणे आच्छादित।
दिसे सूर्यासमान आच्छादित मेघांनी जो असे॥१०४॥
तत: स राक्षसो भीम: सुमित्रानन्दवर्धनम् ।
सावज्ञमेव प्रोवाच वाक्यं मेघौघनि:स्वन:॥१०५॥

स्वरे मेघगर्जनेसम गम्भीर राक्षस वदे ।
तिरस्कारयुक्त स्वरे सुमित्रानदन लक्ष्मणा॥१०५॥
अन्तकस्याप्यकष्टेन युधि जेतारमाहवे ।
युध्यता मामभीतेन ख्यापिता वीरता त्वया॥१०६॥
विनाकष्टे यमराजास जिंकण्याची शक्ति मज।
निर्भये मजसी करसी युद्ध अद्भुत वीर तू॥१०६॥
प्रगृहीतायुधस्येह मृत्योरिव महामृधे।
तिष्ठन्नप्यग्रत: पूज्य: किमु युद्धप्रदायक॥१०७॥

महासमरी घेऊन शस्त्र तुजपुढे मी उभा।
राहशील मजपुढे उभा प्रशंसापात्र ते ॥१०७॥
ऐरावतो समारूढो वृत: सर्वामरै: प्रभु:।
नैवं धक्रोऽपि समरे स्थितपूर्व कदाचन॥१०८॥
ऐरावत आरूढ इन्द्रही सर्व देवांसवे ।
शक्तिशाली मजपुढे न टिके युद्धास्तव॥१०८॥
अथ त्वयाहं सौमित्रे बालेनापि पराक्रमै:।
तोषितो गन्तुमिच्छामि त्वामनुज्ञाप्य राघवम्॥१०९॥

बालक असुनी मज तू केलेस संतुष्ट पराक्रमे ।
तव अनुज्ञेने जाउ इच्छितो श्रीरामाकडे ॥१०९॥
यत् तु वीर्यबलोत्साहैस्तोषितोऽहं रणे त्वया।
राममेवैकमिच्छामि हन्तु यस्मिन् हते हतम्॥११०॥
संतोषविले मज तू शौर्य बल उत्साहे रणी।
परि रामा इच्छितो मारू ज्यामुळे सर्व सैन्य मृत॥११०॥
रामे मयात्र निहते येऽन्ये स्थास्यन्ति संयुगे।
तानहं योधयिष्यामि स्वबलेन प्रमाथिना॥१११॥

रामास मारता कोणी अन्य युद्धास्तव उभे।
राहती सर्वांना मी त्या वधीन युद्ध करूनी ॥१११॥
इत्युक्तवाकयं तद् रक्षः प्रोवाच स्तुतिसंहितम्।
मृधे घोरतरं वाक्यं सौमित्रिः प्रहसन्निव॥११२॥
राक्षसाचे असे वाक्य स्तुतिपर ऐकुनि लक्ष्मण।
खदखदा हसुनी रणी कठोर ऐसे बोलला॥११२॥
यस्त्वं शक्रादिभिर्देवैरसह्यः प्राप्य पौरुषम्।
तत् सत्यं नान्यथा वीर दृष्टस्तेऽद्य पराक्रमः॥११३॥

एष दाशरथी रामस्तिष्ठत्यद्रिरिवाचल:।
महान् पौरुषे प्राप्त असह्य इन्द्रा देवतां।
सत्य हे भासे कारण पराक्रम तव पाहिला॥११३॥
पहा उभे हे श्रीराम अविचल् पर्वतासम।
इतिश्रुत्वा ह्यनादृत्य लक्ष्मणं स निशाचर:॥११४॥
अतिक्रम्य च सौमित्रिं कुम्भकर्णो महाबल:।
राममेवाभिदुद्राव कम्पयन्निव मेदिनीम्॥११५॥
ऐकुनि हे सुमित्राचा अनादर करुनि राक्षस॥।११४॥

सोडुनिया घेई धाव श्रीरामाप्रत् करूनिया।
आपल्या पदाघाते जणु कम्पित भूमिस॥११५॥
अथ दाशरथीं रामो रौद्रमस्त्रं प्रयोजयन् ।
कुम्भकर्णस्य हृदये ससर्ज निशितान् शरान् ॥११६॥
पाहुनिया त्या श्रीराम योजुनी रौद्रअस्त्रास।
हृदयी अनेक त्याच्या सोडतसे तीक्ष्ण शर॥११६॥
तस्य रामेण विद्धस्य सहसाभिप्रधावत:।
अङ्गारमिश्रा: क्रुद्धस्य मुखान्निश्चेरुरर्चिष:॥११७॥

घायाळ होउनी त्यांनी पडे तुटुनी त्यावरी।
मुखातुनि अग्निज्वाला निघती त्याच्या जणु॥११७॥
रामास्त्रविद्धो घोरं वै नर्दन् राक्षसपुङ्गवः।
अभ्यधावत संक्रुद्धो हरीन् विद्रावयन् रणे॥११८॥
रामास्त्राने पीडीत करुनी घोर गर्जना।
तुडवीत वानरां धावे क्रोधाने त्यांच्याकडे॥११८॥
तस्योरसि निमग्नास्ते शरा बहिर्णवाससः।
हस्ताच्चास्य परिभ्रष्टा गदा चोर्ध्वा पपात ह॥११९॥

मोरपंख बाणातील कुम्भकर्णाच्या छातित।
घुसता वेदनेने त्या सुटे त्याच्या हातुनि गदा॥११९॥
आयुधान च सर्वाणि विप्रकीर्यन्त भूतले।
स निरायुधमात्मानं यदा मेने महाबल:॥१२०॥
मुष्टिभ्यां च कराभ्यां च चकार कदनं महत्।
आयुधे सर्वच त्याची गळुनी पडती भूवरी।
समजुन मग नसती आयुधे आपल्याकडे॥१२०॥
मुष्टि आणि करांनी संहार कपींचा करी।

स बाणैरतिविद्धांग: क्षतजेन समुक्षित:।
रुधिरं परिसुस्राव गिरि: प्रस्रवणं यथा॥१२१॥
अतिघायाळ बाणांनी रक्ताच्या धारा वाहती।
त्यामुळे दिसे पर्वतासम् झरे ज्यातुनि वाहती॥१२१॥
स तीव्रेण च कोपेन रुधिरेणच मूर्च्छित:।
वानरान् राक्षसानृक्षान् खादन स परिधावति॥१२२॥
रकतलांछित रागाने क्रुद्ध होउनि वानरां ।
राक्षसां रुक्षां तो खात सर्वत्र पळत सुटे ॥१२२॥

अथ शृङ्गं समाविध्य भीमं भीमपराक्रम:।
चिक्षेप राममुद्दिश्य बलवानन्तकोपम:॥१२३॥
यमराज जणु उचली पर्वतशिखरा महा ।
आणि उचलुनी फेकी करुनि लक्ष्य रामास॥१२३॥
अप्राप्तमन्तरा राम: सप्तभिस्तमजिह्मगै:।
चिच्छेद गिरिशृङ्गं तं पुन: संधाय कार्मुकम्॥१२४॥
बाण मारुनि श्रीराम पर्वतशिखरा सात त्या ।
करूनिया शतखंड येऊ जवळ ना देतसे ॥१२४॥

ततस्तु रामो धर्मात्मा तस्य शृङ्गं महत् तदा।
शरै: काञ्चनचित्राङ्गैश्चिच्छेद भरताग्रज॥१२५॥
तन्मेरुशिखराकारं द्योतमानमिव श्रिया।
द्वे शते वानराणां च पतमानमपातयत् ॥१२६॥
तेव्हां धर्मात्मा श्रीराम विचित्र सुवर्णभूषित ।
छेदता मारुनी बाण महान् गिरिशिखरा तदा ॥१२५॥
ते मेरुशिखराकार स्वतेजाने प्रकाशित ।
पडताना धराशायी करी दोनशे वानरां ॥१२६॥

तस्मिन् काले स धर्मात्मा लक्ष्मणो राममब्रवीत्।
कुम्भकर्णवधे युक्तो योगान् परिमृशन बहून्॥१२७॥
कुम्भकर्णा वधण्याच्या अनेक मार्गा चिन्तुनी।
धर्मात्मा लक्ष्मण ऐसे रामास त्यावेळी वदे ॥१२७॥
नैवायं वानरान् राजन् न विजानाति राक्षसान् ।
मत्त: शोणितगन्धेन स्वान् परांश्चैव खादति॥१२८॥
रक्तगन्धे मदोन्मत्त न जाणे राक्षस वानर।
खातस दोन्हीकडिल योद्ध्यांना हा त्यामुळे ॥१२८॥

साध्वेनमधिरोहन्तु सर्वतो वानरर्षभा:
यूथपाश्च यथा मुख्यास्तिष्ठन्त्वस्मिन् समन्तत:॥१२९॥
त्यामुळे याच्यावरती सर्व श्रेष्ठ वानरर्षभ ।
चढुनिया बसावे त्यांनी याच्या शरीरावरी॥१२९॥
अद्यायं दुर्मति: काले गुरुभरप्रपीडित:।
प्रचरन् राक्षसो भूमौ नान्यान् हन्यात् प्लवङ्गमान् ॥१३०॥
भाराने पीडित तेव्हां हा दुर्बुद्धि निशाचर।
न मारू शकेल वानरां अन्य त्यामुळे॥१३०॥

तस्य तद् वचनं श्रुत्वा राकपुत्रस्य धीमत:।
ते समारुरुहुर्हृष्टा: कुम्भकर्ण महाबला:॥१३१॥
लक्ष्मणाचे ऐकुनिया वच यूथपति कपी।
आनन्दे चढुनी बसती राक्षसाच्या देहावरी॥१३१॥
कुम्भकर्णस्तु संक्रुद्ध: समारूढ: प्लवङ्गमै:।
व्यधूनयत् तान् वेगेन दुष्टहस्तीव हस्तिपान्॥१३२॥
कुम्भकर्ण तदा कोपे चढलेल्या वानरांना।
पाडी जसा क्रुद्ध हत्ती माहुता पाडतो तसा॥१३२॥

तान् दृष्ट्वा निधुतान् रामो रुष्टोऽयामिति राक्षसम्।
समुत्पपात वेगेन धनुरुत्तममाददे ॥१३३॥
जाणुनी राक्षस रुष्ट पडताना त्यां पाहुनी।
उत्तम धनु घेउन् हाती धावे राक्षसाकडे॥१३३॥
क्रोधरक्तेक्षणो धीरो निर्दहन्निव चक्षुषा।
राघवो राक्षसं वेगादभिदुद्राव वेगित:।
यूथपान् हर्षयन् सर्वान् कुम्भकर्णबलार्दितान्॥१२४॥
क्रोधाने रक्तनेत्र तो पाही ऐसा रामाकडे ।

जणु आपल्या दृष्टीने दग्ध त्या करु पाहतो।
तेव्हां सर्व पीडित जे वानरयूथपती त्यांचा
वाढवित हर्ष श्रीराम राक्षसावरि धावला॥१२४॥
स चापमादाय भुजंगकल्पं दृढज्यमुग्रं तपनीयचित्रम्।
हरीन् समाश्वास्य समुत्पपात रामो निबद्धोत्तमतूणबाण:॥१३५॥
तो घेऊनी भुजंगासम भयंकर सुवर्णजडित शोभनीय धनूवरी।
चढवून तीर आश्वासून वानरां करी वेगे आक्रमण राक्षसावरी ॥१३५॥
स वानरगणैस्तैस्तु वृत: परमदुर्जयै:।

लक्ष्मणानुचरो वीर: सम्प्रतस्थे महाबल:॥१३६॥
वानरगणे परम दुर्जय आवृत्त श्रीराम तो।
लक्ष्मण पाठीमागे असा तो पुढति जातसे॥१३६॥
स ददर्श महात्मानं किरीटिनमरिंदमम् ।
शोणिताप्लुतरक्ताक्षं कुम्भकर्णं महाबल:॥१३७॥
सर्वान् समभिधावन्तं यथा रुष्टं दिशागजम्।
मार्गमाणं हरीन् क्रुद्धं राक्षसै: परिवारितम्॥१३८॥
पाहि तो शत्रुदमन महाकाय कुम्भकर्णा।

धावता रक्तलाञ्छित कुम्भकर्णा भयंकर॥१३७॥
वानरां शोधित क्रोधे घेरलेला राक्षसे।
दिग्गजासम करता सर्वांवर आक्रमण॥१३८॥
विन्ध्यमन्दरसंकाशं काञ्चनाङ्गदभूषणम् ।
स्रवन्तं रुधिरं वक्त्राद् वर्षमेघमिवोत्थितम्॥१३९॥
विन्ध्यमन्दारासम दिसे सुवर्ण बाहुभूषणे।
रक्तवर्षा करी मुखे जसा मेघ वर्षाकालिन॥१३९॥
जिह्वया परिलिह्यन्तं सृक्किणी शोणितोक्षिते।

मृनन्तं वानरानीकं कालान्तकयमोपमम् ॥१४०॥
जिभेने रक्तलांछित चाटत जबडे धावतसे।
तुडवीत वानरसेना यमराजासम भयंकर ॥१४०॥
तं दृष्ट्वा राक्षसश्रेष्ठं प्रदीप्तानलवर्चसम् ।
विस्पारयामास तदा कार्मुकं पुरुषर्षभ ॥१४१॥
प्रदीप्त अग्नीसम त्या राक्षसश्रेष्ठा पाहुनी।
खेचतसे धनुष्यास तत्काळ श्रीराम आपुल्या॥१४१॥
स तस्य चापनि?षात् कुपितो राक्षसर्षभ ।

अमृष्यमानस्तं घोषमभिदुद्राव राघवम् ॥१४२॥

टणत्कारे धनुष्याच्या होतसे क्रुद्ध राक्षस।

धावे श्रीरामाकडे तो टणत्कार् न साहुनी॥१४२॥

ततस्तु वातोद्धतमेघकल्पं भुजंगराजोत्तमभोगबाहु:।

तमापतन्तं धरणीधराभमुवाच रामो युधि कुम्भकर्णम्॥१४३॥

मेघासम कृष्णवर्ण पर्वताकार कुम्भकर्णा आक्रमण करता ।

वासुकीसम विशाल रुंद बाहु ज्याचे श्रीराम पाहुनी बोले तया॥१४३॥

आगच्छ रक्षोऽधिप मा विषादमवस्थितोऽहं प्रगृहीतचाप:।

अवेहि मां राक्षसवंशमाशनं यस्त्वं मुहूर्ताद् भविता विचेता:॥१४४॥

विषाद न करी येई धनुष्य घेउन मी उभा ।

समजुनी मज राक्षसराज राक्षसवंश विनाशक

काही क्षणात तूही होणार अससी अचेतन ॥१४४॥

रामोऽयमिति विज्ञाय जहास विकृतस्वनम्।

अभ्यधावत संक्रुद्धो हरीन् विद्रावयन् रणे॥१४५॥

हाच राम जाणुनि हे करी विकृत हास्य तो।

सारुनि वानरां दूर क्रोधे त्याकडे धावला॥१४५॥

दारयन्निव सर्वेषां हृदयानि वनौकसाम् ।
प्रहस्य विकृतं भीमं स मेघस्तनितोपमम्॥१४६॥
कुम्भकर्णो महातेजा राघवं वाक्यमब्रवीत्।
नाहं विराधो विज्ञेयो न कबन्धः खरो न च।
न वाली न च मारीचः कुम्भकर्णः समागतः॥१४७॥
विदीर्ण करी हृदया सर्व कपींच्या हासुनी।
स्वरे विकृत मोठ्याने मेघगर्जनेसम आणि॥१४६॥
गम्भीर भयंकर वाणीने रामास बोलला असे।

रामा समज ना मज विराध,कबन्ध,खर।
नच वाली न मारीच मी कुम्भकर्ण येतसे॥१४७॥
पश्य मे मुद्गरं भीमं सर्व कालायसं महत्।
अनेन निर्जिता देवा दानवाश्च पुरा मया॥१४८॥
पहा मुद्गर विशाल कृष्णवर्णलोहनिर्मित।
यानेच पूर्वी परास्त मी केले देवता दानवा ॥१४८॥
विकर्णनास इति मां नावज्ञातुं त्वमर्हसि।
स्वल्पापि हि न मे पीडा कर्णनासाविनाशनात्॥१४९॥

काननाकाविना मी म्हणुनी अवज्ञा मम् ना करी।
दोन्ही नसल्याने मजला अल्पही पीडा नसे ॥१४९॥
दर्शयेक्ष्वाकुशार्दूल वीर्यं गात्रेषु मेऽनघ।
ततस्त्वं भक्षयिष्यामि दृष्टपौरुषविक्रमम् ॥१५०॥
दाखव इक्ष्वाकुवीरा तुझा पराक्रम मजवरी।
पाहुनि तो नन्तर मी भक्षण करीन तुज॥१५०॥
स कुम्भकर्णस्य वचो निशम्य राम: सुपङ्खान् विससर्ज बाणान्।
तैराहतो वज्रसमप्रवेगैन चुक्षुभे न व्यथते सुरारि:॥१५१॥

ते कुम्भकर्णाचे ऐकोनि बोल अनेक बाण सुन्दर् पंखवाले।
सोडी राम वज्रसमान परि न क्षुब्ध राक्षस नच व्यथित॥१५१॥
यै सायकै: सालवरा निकृत्ता वाली हतो वानरपुङ्गवशच।
ते कुम्भकर्णस्य तदा शरीरं वज्रोपमा न व्यथयाम्प्रचक्रु:॥१५२॥
सालवृक्शा काटले बाणांनी ज्या वालीवध ज्याने जाहला।
वज्रोपम बाणानी त्या शरीरा कुम्भकर्णाच्या न पोचे व्यथा॥१५२॥
स वारिधारा इव सायकांस्तान् पिबन् श्रीरेण महेन्द्रशत्रु:।
जघान रामस्य शरप्रवेगं व्याविध्य तं मुद्गरमुग्रवेगम्॥१५३॥

जलधारेसम पिऊन टाकी तो शरवर्षा श्रीरामाची शरिरे आपुल्या।
फिरवुनी स्वमुद्गर भयंकर वेगे करी नष्ट महान वेगा शरांच्या॥१५३॥
ततस्तु रक्षः क्षतजानुलिप्तं वित्रासनं देवमहाचमूनाम्।
व्यावुध्य तं मुद्गरमुप्रवेगं विद्रावमास चमूं हरीणाम् ॥१५४॥
देवमहासैन्या भयभीत करणाऱ्या रक्तलांछित मुद्गरा।
गरगरा फिरवुनि वेगशाली करी घायाळ वानर सैन्यास तो॥१५४॥
वायव्यमादाय ततोऽपरास्त्रं रामः प्रचिक्षेप निशाचराय।
समुद्गरं तेन जहार् अबाहुं स कृत्तबाहुस्तुमुलं ननाद॥१५५॥

वायव्य नामक अन्य अस्त्रा श्रीराम संधान करुनी चालवी।
ज्यामुळे मुद्गरसहित दक्षिणहस्त राक्षसाचा कापला जाई।
बाहू तुटल्यामुळे करुनि भयानक ध्वनी राक्षस ओरडू लागला॥१५५॥
स तस्य बहुर्गिरिश्रुङ्गकल्प:समुद्गरो राघवबाणकृत्त:।
पपात तस्मिन् हरिराजसैन्ये जघान तां वानरवाहिनीं च॥१५६॥
पर्वतशिखरासम बाहू तो पडे वानरसैन्यात मुद्गरासह।
दबुनी ज्याच्याखाली प्राणास मुकती अनेक वानर सैनिक॥१५६॥
ते वानरा भग्नहतावशेषा: पर्यन्तमाश्रित्य तदा विषण्णा:।

प्रपीडिताङ्गा ददृशु: सुघोरं नरेन्द्ररक्षोऽधिपसंनिपातम् ॥१५७॥
त्यातून् उरती जखमी वानर बाजूस जाऊन खिन्न उभे रहाती।
पीडित शरीरे पाहती ते संग्राम श्रीराम कुम्भकर्णाचा चाललेला॥१५७॥
स कुम्भकर्णोऽस्त्रनिकृत्तबाहुमहासिकृत्ताग्र इवाचलेन्द्र:।
उत्पाटयामास करेण वृक्षं ततोऽभिदुद्राव रणे नरेन्द्रम्॥१५८॥
नष्ट बाहु ज्याचा एक कुम्भकर्ण दिसे शिखरहीन पर्वतासम।
उपटे वृक्षा बाहुने एका आणि घेइ धाव त्यासवे श्रीरामाकडे॥१५८॥
तं तस्य बाहुं सहतालवृक्षं समुद्यतं पन्नगभोगकल्पम्।

ऐन्द्रास्त्रयुक्तेन जघान रामो बाणेन जाम्बूनदचित्रितेन॥१५९॥

श्रीराम काढी सुवर्णभूषित बाण ऐन्द्रास्त्रे करुनी त्या अभिमन्त्रित।

आणि वृक्षासह राक्षसाचा कापतसे सर्पासमान जो दुसरा हातही॥१५९॥

स कुम्भकर्णस्य भुजो निकृत्त: पपात भूमौ गिरिसंनिकाश:।

विचेष्टमानो निजघान वृक्षान् शैलान् शिलावानर राक्षसांश्च॥१६०॥

तो बाहु कुम्भकर्णाचा पर्वतशिखरासमान पडे भूवरी ज्याच्या भारे।

वृक्ष शैलशिखरे कित्येक शिला वानर राक्षसही मरती चेंगरुनी ॥१६०॥

तं छिन्नबाहुं समवेक्ष्य राम: समापतन्तं सहसा नन्दतम्।

द्वावर्धचन्द्रौ निशितो प्रगृह्य चिच्छेद पादौ ऱ्धि राक्षस्य॥१६१॥

हस्तविरहित तो आर्तनाद करुनी रामावरी करता आक्रमण।

श्रीराम तीक्ष्ण अर्धचन्द्र बाणांनी दोन्ही पाया टाकी उडवुनी ॥१६१॥

तौ तस्य पादौ प्रदिशो दिशश्च गिरेगुहाश्चैव महार्णवं च ।

लङ्कां च सेनां कपिराक्षससानां निनादयन्तौ विनिपेततुश्च॥१६२॥

ते दोन पाय त्याचे गिरिकन्दरा महासागरा वानर राक्षस सेना।

सर्वां या प्रतिध्वनित करुनी पडती जाउनि दूर कुठेतरी पृथ्वीवरी ॥६२॥

निकृत्तबाहुर्निकृत्तपादो विदार्य वक्त्रं वडवामुखाभम् ।

दुद्राव रामं सहसाभिगर्जन् राहुर्यथा चन्द्रमिवान्तरिक्शे॥१६३॥

दोन्ही हस्त पाद कापले जाता पसरुनी विक्राळ मुख।

गर्जुनी भयानक श्रीरामा ग्रासण्या तुटुनि पडे त्यावरी॥१६३॥

अपूरयत् तस्य मुखं शिताग्रै राम: शरैर्हेमपिनद्धपुकै:।

सम्पूर्णवक्त्रो न शशाक वक्तुं चुकूज कृच्छ्रेण मुमूर्छ चापि॥१६४॥

भरूनि टाकी श्रीराम त्याचे ते मुख सुवर्णपंखी तीक्ष्ण बाणांनी।

त्यामळे बोलण्या असमर्थ कष्टे करुनी आर्तनाद पडे मूर्च्छित॥१६४॥

अथाददे सूर्यमरीचिकल्पं स ब्रह्मदण्डान्तककालकल्पम्।

अरिष्टमैन्द्रं निशितं सुपुङ्ख राम: शरं मारुततुल्यवेगम्॥१६५॥
तं वज्रजाम्बूनदचारुपुङ्ख प्रदीप्तसूर्यज्वलनप्रकाशम्।
महेन्द्रवज्राशनिवेगं राम: प्रचिक्षेप निशाचराय॥१६६॥
सूर्यकिरणांसम उद्दीप्त ब्रह्मदण्ड किंवा विनाशकारी कालासम।
अभिमन्त्रित इन्द्रास्त्रे प्रज्वलित अग्नीसम देदिप्यमान।
सुवर्णविभूषित पंखासह वायु तथा इन्द्रवज्र वा अशनि सम।
भयंकर तीक्ष्ण बाण सोडे श्रीराम निशाचरा लक्ष्य करूनिया ॥१६६॥
तं सायको राघवनाहुचोदितो दिश: स्वभासा दश सम्प्रकाशयन् ।

विधूमवैस्वानरभीमदर्शनो जगाम शक्राशनिभीमविक्रम:॥१६७॥

रघुनाथ हस्ते प्रेरित बाण तो प्रकाशित करित दशदिशा।

वेगे इन्द्रवज्राच्या जाई दिसे जो धुम्ररहित अग्नीसमान ॥१६७॥

स तन्महापर्वतकूटसंनिभं सुवृत्तदंष्ट्रं चलचारुकुण्डलम्।

चकर्त रक्षोऽधिपते:शिरस्तदा यथैव वृत्रस्य पुरा पुरंदर:॥१६८॥

सुन्दर दाढा मनोहर कुण्डलयुक्त मस्तक महान् पर्वतशिखरापरी कुम्भकर्णाचे तो बाण तोडी वृत्रासुराचे इन्द्र पूर्वी जसे॥१६८॥

कुम्भकर्णशिरो भाति कुण्डलालंकृतं महत्।

आदित्येऽभ्युदिते रात्रौ मध्यस्थ इव चंद्रमा॥१६९॥

कुण्डलालंकृत दिसे प्रभाती आकाशामध्ये ।

विराजमान चंद्रम्यासम निस्तेज ते मस्तक॥१६९॥

तद् रामबाणाभिहतं पपात रक्ष:शिर: पर्वतसंन्निकाशम्।

बभञ्ज् चर्यागृहगोपुराणि प्राकारमुच्यं तमपातयच्च ॥१७०॥

ते रामबाणे तुटलेले मस्तक पर्वताकार लंकेत जाउनि पडे।

आणी पाडी ते कित्येक महाल, गृहे,द्वारे जवळपासचे ॥१७०॥

तच्चातिकायं हिमवत् प्रकाशं रक्षस्तदा तोयनिधौ पपात्।

ग्राहान् परान् मीनवरान् भुजंगमान् ममर्द भूमिं च तथा विवेश॥१७१॥

विशालधड राक्षसाचे हिमालयसमान पडे जाउनि समुद्र जलामधे।

ठोकत अनेक मत्स्यां,ग्राहां,आणि सर्पां पृथ्वीच्या आत घुसतसे॥१७१॥

तस्मिन् हते ब्राह्मणदेवशत्रौ महाबले संयति कुम्भकर्णे।

चचाल बूर्भूमिधराश्च सर्वे हर्षाश्च देवास्तुमुलं प्रणेदु:॥१७२॥

शत्रु ब्राह्मण देवांचा कुम्भकर्ण मरता रणी।

पृथ्वी डोलता हलती पर्वत आणि देवता।

हर्षभरे करायास लागती तुमुल नाद ॥१७२॥

ततस्तु देवर्षिमहर्षिपन्नगा: सुराश्च भूतानि सुपर्णगुह्यका:।
सयक्षगन्धर्वगणा नभोगता: प्रहर्षिता रामपराक्रमेण॥१७३॥
त्यामुळे देवर्षि महर्षि नाग देवता भूतगण गरुड गुह्यक।
यक्ष गन्धर्व पाहुनि श्रीराम पराक्रम प्रसन्न होती मनी बहु॥१७३॥
ततस्तु ते तस्य वधेन भूरिणा मनस्विनो नैऋतराजाबान्धवा:।
विनेदुरुच्चैर्व्यथिता रघूत्तमं हरिं समीकश्यैव यथा मतंगजा:॥१७४॥
त्याच्या वधाने राक्षसराज रावणबन्धु होऊनि दु:खी पाहुनि श्रीरामा।
रडती उच्च स्वरे जैसे चित्कारती मत्त गज पाहुनि वनराज सिंहा॥१७४

स देवलोकस्य तमो निहत्य सूर्यो यथा राहुमिखाद् विमुक्तः।
तथा व्यभासीद्धरिसैन्यमध्ये निहत्य रामो युधि कुम्भकर्णम् ॥१७५॥
वधून युद्धे कुम्भकर्णा दु:खद देवलोका वानर सेनेत उभा भगवान् श्रीराम। जणु राहुच्या मुखातुनि सुटुनी अन्धकार नाशित प्रकाशित सूर्यदेव॥१७५॥
प्रहर्षमीयुर्बहवश्च वानराः प्रबुद्धपद्मप्रतिमैरिवाननैः।
अपूजयन् राघवमिष्टभागिनं हते रिपौ भीमबले नृपात्मजम् ॥१७६॥
होती प्रसन्न बहुसंख्य वानर विकसित कमलापरि त्यांची मुखे।
होता मनोरथ सफल प्रशंसा करती भगवान श्रीरामाची उच्चस्वरे॥१७६॥

स कुम्भकर्णं सुरसैन्यमर्दनं महत्सु युद्धेषु कदाचनाजितम्।
ननन्द हत्वा भरताग्रजो रणे महासुरं वृत्रमिवामराधिपः॥१७७॥
जिंकणारा देवसेनेस न होता कधी पराजित अशा कुम्भकर्णा ।
रणी मारुनि प्रसन्न श्रीराम जसा इन्द्र वृत्रासुरा मारुनी ॥१७७॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे सप्तषष्टितमः सर्गः॥६७॥

युद्धकाण्ड सर्ग ६८

कुम्भकर्णं हतं दृष्ट्वा राघवेण महात्मना।
राक्षसा राक्षसेन्द्राय रावणाय न्यवेदयन् ॥१॥
महात्मा श्रीरामाने वधले कुम्भकर्णास ।
पाहुनी राक्षस देती वृत्त त्याच्या राजा रावणा॥१॥
राजन् स कालसंकाश: संयुक्त: कालकर्मणा।
विद्राव्य वानरीं सेनां भक्षयित्वा च वानरान् ॥२॥

भयंकर कालासम कुम्भकर्ण पराक्रमी।
पळवी वानरसेना अनेकांना खाउनी।
परि शेवटि तोसुद्धा काळाच्या जातसे मुखी॥२॥
प्रतपित्वा मुहूर्तं तु प्रशान्तो रामतेजसा।
कायेनार्थप्रविष्ठेन समुद्रं भीमदर्शनम् ॥३॥
निकृत्तनासाकर्णेन विक्षरद्रुधिरेण च ।
रुद्ध्वा द्वारं शरीरेण लङ्काया: पर्वतोपम:॥४॥
कुम्भकर्णस्तव भ्राता काकुत्स्थशरपीडित:।

अगण्डभूतो विवृतो दावदग्ध इव द्रुमः॥५॥

रामतेजे शान्त झाला प्रताप दावुनि आपुला।
भयानक धड त्याचे समुद्रात घुसतसे॥३॥
नाक कान कापलेले रक्त ज्यातुनि वाहते।
मस्तक लङ्काद्वरात त्याचे ऐसे पडतसे॥४॥
कुम्भकर्ण तव बन्धु मस्तकहीन धडे।
दावानल दग्ध नष्ट वृक्षासम तो होतसे॥५॥

श्रुत्वा विनिहतं संख्ये कुम्भकर्ण महाबलम्।

रावण: शोकसंतप्तो मुमोह च पपात च॥६॥
ऐकोनि हत युद्धात कुम्भकर्ण महाबली।
रावण शोकसंतप्त पडे मूर्च्छित भूवरी ॥६॥
पितृव्यं निहतं श्रुत्वा देवान्तकनरान्तकौ।
त्रिशिराश्चातिकायश्च रुरुदु: शोकपीडिता:॥७॥
ऐकुनी मरे काका देवान्तक नरान्तक।
त्रिशिरा नि अतिकाय रडती शोकपीडित॥७॥
भ्रातरं निहतो श्रुत्वा रामेणाक्लिष्टकर्मणा।

महोदरमहापार्थौ शोकाक्रान्तौ बभूवतु:॥८॥
बन्धु मरे क्लिष्टकर्मी ऐकोनि महोदर।
महापार्थ हे सावत्र बन्धु शोकव्याकुल॥८॥
तत: कृच्छ्रात् समासाय संज्ञां राक्षसपुङ्गव:।
कुम्भकर्णवधाद् दीनो विललापाकुलेन्द्रिय:॥९॥
कष्टाने सावध होता राक्षसराज रावण।
विलाप करी दु:खे त्याच्या सर्व इन्द्रियांसवे॥९॥
हा वीर रिपुमर्दन कुम्भकर्ण महाबल:।

त्वं मां विहाय वै दैवाद् यातोऽसि यमसादनाम्॥१०॥
म्हणती हा कुम्भकर्णा रिपुमर्दन महाबली।
सोडुनि मज असहाय यमलोकी जासि तू॥१०॥
मम शल्यमनुद्धृत्य बान्धवानां महाबल:।
शत्रुसैन्यं प्रताप्यैक: क्व मां संत्यज्य गच्छसि॥११॥
आम्हा बान्धवांचे शल्य दूर करता न एकटा ।
जासि मज सोडुनि करुनी संतप्त शत्रुसैन्यास॥११॥
इदानीं खल्वहं नास्मि यस्य मे पतितो भुज:।

दक्षिणोऽयं समाश्रित्य न बिभेमि सुरासुरात्॥१२॥

अस्तित्व नष्ट हो माझे उजवा बाहु मम ।
कुम्भकर्णरूपे पडे गळुनी ज्याच्या वरी ।
भंरवसा त्यामुळे न मी भ्यायलो देवतासुरां॥१२॥

कथमेवंविधो वीरो देवदानवदर्पहा।
कालाग्निप्रतिमो ह्यद्य राघवेण रणे हत:॥१३॥

कसा वीर करणारा दूर देवदानव दर्प जो।
कालाग्निसम जो भासे रामाने रणि मारला॥१३॥

यस्य ते वज्रनिष्प्रेषो न कुर्याद व्यसनं सदा।
स कथं रामबाणार्त: प्रसुप्तोऽसि महीतले॥१४॥
ज्या तुला वज्रप्रहार कष्ट देण्या असमर्थ।
रामबाणे तू तोच भूतली झोपसी कसा॥१४॥
एते देवगणा: सार्धमृषिभिर्गगने स्थिता:।
निहतं त्वां रणे दृष्ट्वा निनन्दन्ति प्रहर्षिता:॥१५॥
रणात मारला जासी आज तू पाहुनी नभी।
ऋषींसह देवता करती हर्षनाद उभे राहुनी॥१५॥

ध्रुवमद्यैव संदृष्टा लब्धलक्षा: प्लवङ्गमा:।
आरोक्ष्यन्तीह दुर्गाणि लङ्काद्वाराणि सर्वश:॥१६॥
हर्षाने वानर आज योग्य वेळी निश्चित।
चढतील दुर्गम द्वारे लंकेची समस्त ते ॥१६॥
राज्येन नास्ति मे कार्यं किं करिष्यामि सीतया।
कुम्भकर्णविहीनस्य जीविते नास्ति मे मति:॥१७॥
कार्य न मम राज्यात सीता तरि कशास्तव ।
कुम्भकर्णविना मज जगण्याची इच्छा नसे ॥१७॥

यद्यहं भ्रातृहन्तारं न हन्मि युधि राघवम्।
ननु मे मरणं श्रेयो न चेदं व्यर्थजीवितम॥१८॥
बन्धूस मम मारी त्या रामास मी नच मारता।
मज श्रेयस्कर् मृत्यु व्यर्थ हे मम जीवन॥१८॥
अद्यैव तं गमिष्यामि देशं यत्रानुजो मम।
नहि भ्रातॄन् समुत्सृज्य क्षणं जीवितमुत्सहे॥१९॥
आज जाईन त्या देशी बन्धु मम गेला असे।
क्षणभरही त्याच्याविण शक्य न मजला राहणे॥१९॥

देवा हि मां हसिष्यन्ति दृष्ट्वा पूर्वापकारिणम् ।
कथमिन्द्रं जयिष्यामि कुम्भकर्ण हते त्वयि॥२०॥
मी ज्यां अपकारले पूर्वी देव हसतील पाहुनी ।
तू नसता मी इन्द्रा कसे जिंकू शकेन रे॥२०॥
तदिदं मामनुप्राप्तं विभीषणवच: शुभम्।
यदज्ञानान्मया तस्य न गृहीतं महात्मन:॥२१॥
उत्तम बिभीषणाचे बोल अव्हेरिले मी।
प्रत्यक्ष घडते आहे तसे माझ्याबरोबर॥२१॥

बिभीषणवचस्तावत् कुम्भकर्णप्रहस्तयो:।
विनाशोऽयं समुत्पन्नो मां वीडयति दारुण:॥२२॥
विनाश दारुण ऐसा प्रहस्त कुंभकर्णाचा
होता लज्जित करति बिभीषणाचे बोल ते॥२२॥
तस्यायं कर्मण: प्राप्तो विपाको मम शोकद:।
यन्मया धार्मिक: श्रीमान् स निरस्तो बिभीषण:॥२३॥
बिभीषणा धार्मिक त्या काढले घराबाहेर मी
कर्माचा भोगाया लागे परिणाम् शोकदायी॥२३॥

इति बहुविधमाकुलान्तरात्मा कृपणमतीव विलप्य कुम्भकर्णम्।
न्यपतदपि दशाननो भृशार्तस्तमनुजमिन्द्ररिपुं हतं विदित्वा॥२४॥
विलाप ऐसा दीनतापूर्वक करुनि व्याकुलचित्त दशानन
स्मरुनि अनुज कुम्भकर्ण वध व्यथित होत पडे धरेवर॥२४॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डेऽष्टषष्टितमः सर्गः॥६८॥

युद्धकाण्ड सर्ग ६९

एवं विलपमानस्य रावणस्य दुरात्मना ।
श्रुत्वा शोकाभिभूतस्य त्रिशिरा वाक्यमब्रवीत्॥१॥
दुरात्मा रावण ऐसा विलाप शोकपीडित ।
पाहुनी करता त्यास त्रिशिराने म्हट्ले असे ॥१॥
एवमेव महावीर्यो हतो नस्तातमध्यम:।
न तु सत्पुरुषा राजन् विलपन्ति यथा भवान् ॥२॥

नि:संशय महावीर मधले काका होती मृत।
परि न ऐसे विलपति सत्पुरुष तुम्हापरी ॥२॥
नूनं त्रिभुवनस्यापि पर्याप्तस्त्वमसि प्रभो।
स कस्मात् प्राकृत इव शोचस्यात्मानमीदृशम् ॥३॥
त्रिभुवना एकटे तुम्ही समर्थ घेण्या टक्कर।
का शोकमग्न होता साधारण पुरुषापरी ॥३॥
ब्रह्मदत्तास्ति ते शक्ति: कवचं सायको धनु:।
सहस्रखरसंयुक्तो रथो मेघसमस्वन:॥४॥

ब्रह्माची शक्ति कवच धनुष्य बाणासहित।
रथ सहस्रखरयुक्त गर्जत मेघगर्जनेसम ॥४॥
त्वया सकृद्धि शस्त्रेण विशस्ता देवदानवा:।
स सर्वायुधसम्पन्नो राघवं शास्तुमर्हसि॥५॥
एका शस्त्रामध्ये तुम्ही जिंकिले देवदानवां ।
आता सर्वास्त्रे संपन्न दंड द्याल रामा तुम्ही ॥५॥
कामं तिष्ठ महाराज निर्गमिष्याम्यहं रणे।
उद्धरिष्यामि ते शत्रून् गरुड: पन्नगानिव॥६॥

धीर धरा महाराज रणी जाउनि मी स्वत:।
उखडीन रणी शत्रूस जसा गरुड पन्नगा॥६॥
शम्बरो देवराजेन नरको विष्णुना यथा।
तथाद्य शयिता रामो मयि युधि निपापित:॥७॥
नरकासुरा विष्णुने शम्बरा इन्द्राने जसा।
तसा मी रामा युद्धात पाडिन् मारुनी भूवरी॥७॥
टीप:महाभारतातील नरकासुर वेगळा हा विप्रचित्ति नामक दानवास सिंहिकेपासून् झालेल्या सात् पुत्रांपैकी एक.

श्रुत्वा त्रिशिरसो वाक्यं रावणो राक्षसाधिपः।
पुनर्जातमिवात्मानं मन्यते कालचोदितः॥८॥
ऐकुनी त्रिशिरबोला जणु पुनर्जात रावण।
कालप्रेरित त्याची बुद्धि भानावर येतसे॥८॥
श्रुत्वा त्रिशिरसो वाक्यं देवान्तकनरान्तकौ।
अतिकायश्च तेजस्वी बभूवुर्युद्धहर्षिताः॥९॥
ऐकुनि त्रिशिरवाक्य देवान्तक नरान्तक।
अतिकाय तेजस्वी युद्धा सर्व उत्साहित॥९॥

ततोऽहमहमित्येवं गर्जन्तो नैर्ऋतर्षभा:।
रावणस्य सुता वीरा: शक्रतुल्य पराक्रमा:॥१०॥
तेव्हां मी मी करती युद्धा तिघे निशाचर।
इन्द्रासम पराक्रमी रावणपुत्र तीन् ते ॥१०॥
अन्तरिक्षगता: सर्वे सर्वे मायाविशारदा:।
सर्वे त्रिदशदर्पघ्ना: सर्वे समरदुर्मदा:॥११॥
सर्व आकाशसंचारी मायाविशारदही तसे।
उतरविणारे गर्व देवतांचा ते रणदुर्मद ॥११॥

सर्वे सुबलसंपन्ना: सर्वे विस्तीर्णकीर्त्य:।
सर्वे समरमासाद्य न श्रूयन्ते स्म निर्जिता:॥१२॥
देवैरपि सगन्धर्वै: सकिन्नरमहोरगै:।
सर्वेऽस्त्रविदुषो वीरा: सर्वे युद्धविशारदा:।
सर्वे प्रवरविज्ञाना: सर्वे लब्धवरास्तथा॥१३॥

बलसम्पन्न सर्व ते तिन्ही लोकी कीर्तिमान्।
समरभूमित गन्धर्व नाग किन्नर देवता॥१२॥
यांपासुनि न ऐकला कधी त्यांचा पराभव।

अस्त्रवेत्ते वीर सर्व निपुण युद्धकलेत ते।
शास्त्रांचे आणि शस्त्रांचे ज्ञानही प्राप्त उत्तम॥१३॥
स तैस्तथा भास्करतुल्यवर्चसै: सुतैर्वृत: शत्रुबलश्रियार्दनै:।
रराज् राजा मघवान् यथामरै तो महादानवदर्पनाशनै:॥१४॥
सूर्यासम तेजस्वी त्या शत्रुसेना आणि सम्पत्ति हिरावणाऱ्या।
पुत्रांमधे राक्षस राज शोभे दानवजेत्या देवामध्ये राजा इन्द्र जसा॥१४॥
स पुत्रान् सम्परिष्वज्य भूषयित्वा च भूषणै:।
आशीर्भिश्च प्रशस्ताभि: प्रेषयामास वै रणे॥१५॥

पुत्रां वक्षास लावून् भूषणांनी सजवुनी।
पाठवी रणभूवरि देउनि आशीर्वच उत्तम॥१५॥
युधोन्मत्तं च मत्तं च भ्रातरौ चापि रावण:।
रक्षणार्थं कुमाराणां प्रेषयामास संयुगे॥१६॥
युद्धोन्मत्त तसा मत्त महापार्श्व महोदर ।
बन्धुना रावण पाठवी रक्षणार्थं रणी सवे।
तेऽभिवाद्य महात्मानं रावणं लोकरावणं ।
कृत्वा प्रदक्षिणं चैव महाकाया: प्रतस्थिरे॥१७॥

रडविणाऱ्या लोकां सर्व रावणा वन्दूनिया।
घालूनि प्रदक्षिणा ते निघती युद्धास्तव ॥१७॥
सर्वोषधीभिर्गन्धैश्च समालभ्य महाबला:।
निर्जग्मुर्नैर्ऋतश्रेष्ठा: षडेते युद्धकांक्षिण:॥१८॥
त्रिशिराश्चातिकायश्च देवान्तकनरान्तकौ।
महोदरमहापार्श्वौ निर्जग्मु: कालचोदिता:॥१९॥
स्पर्शुनी गन्धौषधी सर्व युद्धाभिलाषी वीर ते।
अतिकाय देवान्तक नरान्तक महोदर॥१८॥

त्रिशिरा नि महापार्श्व महावीर ते सहा।
कालप्रेरित निघती निशाचर युद्धास्तव ॥१९॥
ततः सुदर्शनं नागं नीलजीमूतसंनिभम्।
ऐरावतकुले जातमारुरोह महोदरः॥२०॥
महोदर होई स्वार हत्तीवरी 'सुदर्शन'।
ऐरावतकुलि जात कृष्णवर्ण मेघापरी॥२०॥
सर्वायुधसमायुक्तस्तूणीभिश्चाप्यलंकृतः।
रराज गजमास्थाय सवितेवास्तमूर्धनि ॥२१॥

सर्वायुधे संपन्न तूणीरे अलंकृत् महोदर।
गजावरि शोभे जैसा सूर्य अस्ताचलशिखरी॥२१॥
हयोत्तमसमायुक्तं सर्वायुधसमाकुलम्।
आरुरोह रथश्रेष्ठं त्रिशिरा रावणात्मज:॥२२॥
रावणकुमार त्रिशिरा उत्तम रथी आरूढ।
अस्त्र शस्त्रांनी युक्त उत्तम घोडे जोडले॥२२॥
त्रिशिरा रथमास्थाय विरराज धनुर्धर:।
सविधुदुल्क: सज्वाल:सेन्द्रचाप इवाम्बुद:॥२३॥

धनुष्यासह बसता रथी त्रिशिरा शोभला।
मेघासम विद्युत् उल्का ज्वाला इन्द्रधनूपरी॥२३॥
त्रिभि: किरीटैस्त्रिशिरा: शुशुभे स रथोत्तम:।
हिमवानिव शैलेन्द्रस्त्रिभि: काञ्चनपर्वतै:॥२४॥
त्रिकिरिटधारी त्रिशिरा रथी उत्तम शोभत ।
जसा तीन स्वर्णशिखरे गिरिराज हिमालय्॥२४॥
अतिकायोऽतितेजस्वी राक्षसेन्द्रसुतस्तदा ।
आरुरोह रथश्रेष्ठं श्रेष्ठ: सर्व धनुष्मताम्॥२५॥

अतिकाय अतितेजस्वी रावणाचा पुत्र जो
धनुर्धारींमध्ये श्रेष्ठ आरूढ उत्तमरथी ॥२५॥
सुचक्राक्षं सुसंयुक्तं स्वनुकर्षं सुकूबरम्।
तूणीबाणासनैर्दीप्तं प्रासासिपरिघाकुलम्॥२६॥
सर्वपरी रथ श्रेष्ठ धनुष्य तूणीर बाणामुळे ।
उद्दिप्त प्रास खड्गे परिघे यांनी भरला असे॥२६॥
स काञ्चनविचित्रेण किरिटेन विराजता।
भूषणैश्च बभौ मेरु: प्रभामिरिव भासयन् ॥२७॥

शोभे सुवर्णनिर्मित किरीटे अन्य आभूषणे।
जणु स्वप्रभाप्रकाशित भासे मेरुपर्वतासम ॥२७॥
सरराज रथे तस्मिन् राजसूनुर्महाबल:।
वृत्तो नैरृतशार्दूलैर्वज्रपाणिरिवासरै॥२८॥
रथी निशाचरांसह राजपुत्र बसलेला
वज्रपाणि इन्द्रासम देवांसवे दिसतसे ॥२८॥
हयमुच्चै:श्रव:प्रख्यं श्वेतं कनकभूषनम्।
मनोजवं महाकायमारुरोह नरान्तक:॥२९॥

उच्चै:श्रव्यासम अश्वावरि आरूढ नरान्तक।
विशाल सुवर्णभूषित वेगवान मनासम॥२९॥
गृहीत्वा प्रासमुल्काभं विरराज नरान्तक:।
शक्तिमादाय तेजस्वी गुह: शिखिगतो यथा॥३०॥
उल्केसम दीप्तिमान प्रास हाती घेउनि ।
मोरावरी कार्तिकेय तैसा नरान्तक दिसे ॥३०॥
देवान्तक: समादाय परिघं हेमभूषणम्।
परिगृह्य गिरिं दोर्थ्यां वपुर्विष्णोर्विडम्बयन् ॥३१॥

देवान्तक परिघासह स्वर्णभूषित दिसतसे।
जणु विष्णु दोन्ही हाती मन्दराचल उचलीतसे॥३१॥

टीप: समुद्रमन्थनासमयी विष्णूने मन्दराचल उचलला होता तो सन्दर्भ

महापावो महातेजा गदामादाय वीर्यवान् ।
विरराज गदापाणि: कुबेर इव संयुगे॥३२॥
पराक्रमी महातेज महापार्श्व गदेसवे।
शोभे कुबेरासम गदापाणि युद्धस्थली॥३२॥
ते प्रतस्थुर्महात्मानोऽमरावत्या: सुरा इव।

तान् गजैश्च तुरङ्गैश्च रथैश्चाम्बुदनि:स्वनै:॥३३॥
अनूत्पेतुर्महात्मानो राक्षसा: प्रवरायुधा:।
निघती ते लंकेतुन् देव अमरावतीतुन् जसे ।
राक्षस त्यांच्यामागे श्रेष्ठ आयुधांसवे॥३३॥
होउनिया स्वार रथी अश्वावरीही तसे ।
ते विरेजुर्महात्मान: कुमरा: सूर्यवर्चस:॥३४॥
किरीटिन: श्रिया जुष्टा ग्रहा दीप्ता इवाम्बरे।
सूर्यासम तेजस्वी ते किरिट धारुनि मस्तकी॥३४॥

दिसती नभी प्रकाशित ग्रहांसम सुशोभित।
प्रगृहीता बभौ तेषां शस्त्राणामबलि: सिता॥३५॥
शरदभ्रप्रतीकाशा हंसावलिरिवाम्बरे॥
श्वेतपंक्ति शस्त्रास्त्रांची त्यानी धारण केलेली ॥३५॥
दिसे शरद मेघासम शुभ्र हंसश्रेणीसम।
मरणं वापि निश्चित्य शत्रूणां वा पराजयम्॥३६॥
इति कृत्वा मतिं वीरा: संजग्मु:संयुगार्थिन:।
मरू वा निश्चित करू शत्रूंचा पराजय॥३६॥

निश्चय करुनी ऐसा युद्धा जाति ते राक्षस।
जगर्जुश्च प्रणेदुश्च चिक्षिपुश्चापि सायकान्॥३७॥
जगृहुश्च महात्मानो निर्यान्तो युद्धदुर्मदा:।
युद्धदुर्मद निशाचर सिंहनाद करूनिया॥३७॥
हातात बाण घेती शत्रूवरि सोडण्यास्तव।
क्ष्वेडितास्फोटितानां वै संचचालेव मेदिनी॥३८॥
रक्षसां सिंहनादैश्च संस्फोटितमिवाम्बरम्।
ताल ठोकति राक्षस गर्जति त्या सिंहनादे॥३८॥

होतसे कम्पित पृथ्वी फाटू आकाश लागले।
तेऽभिनिष्क्रम्य मुदिता राक्षसेन्द्रा महाबला:॥३९॥
ददृशुर्वारानीकं समुद्यतशिलानगम् ।
आनन्दे नगराबाहेर पडतां त्यांना दिसे॥३९॥
पर्वतशिखर महावृक्ष घेउनी वानर उभे।
हरयोऽपि महात्मानो ददृशू राक्षसं बलम्॥४०॥
हस्त्यश्वरथसम्बाधं किङ्किणीशतनादितम्।
नीलजीमूतसंकाशंसमुद्यतमहायुधम्॥४१॥

राक्षससेनाहि तशी पाहति महात्मा कपि॥४०॥
अश्वगज रथांसह निनादित शत किंकिणी।
मेघासम कृष्णवर्ण हातात शस्त्रे भली॥४१॥
दीप्तानलविप्रखैर्नैर्ऋतै: सर्वतो वृतम्।
तद् दृष्ट्वा बलमायातं लब्धलक्षा: प्लवङ्गमा:॥४२॥
समुद्यतमहअशैला: सम्प्रणेदुमुहुर्मुहु:।
अमृष्यमाणा रक्षांसि प्रतिनर्दन्त वानरा:॥४३॥
तेजस्वी अग्निसूर्यासम घेरती त्यां राक्षस।

पाहुनिया येता त्यां लक्ष्य साधुनि वानर॥४२॥
घेउनी पर्वतशैला गर्जति ते वारंवार।
राक्षसध्वनिवर् मात करण्या अधिक गर्जती॥४३॥
ततः समुत्कृष्टरवं रक्षोगणा वानरयूथपानाम्।
अमृष्यमाणाः परहर्षमुग्रं महाबला भीमतरं प्रणेदुः॥४४॥
तो उच्च रव वानरांचा ऐकुनि बलसंपन्न राक्षस ।
असह्य होउनि हर्ष त्यांचा करू लागति महासिंहनाद॥४४॥
ते राक्षसबलं घोरं प्रविश्य हरियूथपाः।

विचेरुरुद्यतै: शैलैर्नगा: शिखरीणो यथा॥४५॥

भयंकर राक्षससेनेत घुसुनी ते यूथपति
विचरती शैलशृंगांसह शिखरे गिरिंची जशी॥४५॥

केचिदाकाशमाविश्य केचिदुर्व्या प्लवङ्गमा:।
रक्ष:सैन्येषु संक्रुद्धा: केचिद् द्रुमशिलायुधा:॥४६॥

द्रुमांश्च विपुलस्कंधान् गृह्य वानरपुङ्गवा:।
वृक्ष शिला आयुधांसह नभी संक्रुद्ध वानर।
उडुनी विचरती ते इतर काही वानर॥४६॥

मोठमोठ्या वृक्षशाखा घेउनि फिरति भूवरि।
तद् युद्धमभवद् घोरं रक्षोवानरसंकुलम्॥४७॥
ते पादपशिलाशैलैश्चक्रुर्वृष्टिमनूपमाम् ।
बाणौघैर्वार्यमाणाश्च हरयो भीमविक्रमा:॥४८॥
मग घोर युद्ध होई रक्षवानरसंकुले ॥४७॥
बाणसमूह् वर्षावे राक्षस रोकति वानरां।
वृक्षशिलाशिखरे वर्षाव करति ते त्यांवरी॥४८॥
सिंहनादान् विनेदुश्च रणे राक्षसवानरा:।

शिलाभिश्चूर्णयामासुर्यातुधानान् प्लवङ्गमा:॥४९॥
निर्जनु: संयुगे क्रुद्धा: कवचाभरणावृतान्।
रणक्षेत्री सिंहासम दौडति राक्षस वानर।
कवच आभूषण विभूषित राक्षसांच्या ॥४९॥
युद्धस्थली शिळांचा मारा करती कुपित वानर ।
केचिद् रथगतान् वीरान् गजवाजिगतानपि॥५०॥
निर्जनु: सहसाऽऽप्लुत्य यातुधानान प्लवङ्गमा:।
कित्येक वानर रथ हत्ती घोड्यावर स्थित॥५०॥

राक्षसांना उचलुनि बळे मारुनि टाकती ।
शैलशृङ्गान्विताङ्गस्ते मुष्टिभिर्वान्तलोचना ॥५१॥
चेलु: पेतुश्च नेदुश्च तत्र राक्षसपुङ्गवा:।
मुख्य राक्षस शरीरे पर्वतशिखरे आच्छादित॥५१॥
कपींच्या बुक्क्या खाऊन डोळे जाति काहींचे।
कांही पळता पडती आणि करती चित्कार।
राक्षसाश्च शरैस्तीक्ष्णैर्बिभिदु: कपिकुञ्जरान्॥५२॥
शूलमुद्गरखड्गैश्च जघ्नु: प्रासैश्च शक्तिभि:।

राक्षसहि तीक्ष्ण शरे विदीर्ण करती वानरां ॥५२॥
शूल मुद्गर शक्ति प्रासे अनेकांना मारले।
अन्योन्यं पातयामासु: परस्परजयैषिण:॥५३॥
रिपुशोणितदिग्धाङ्गास्तत्र वानरराक्षसा:।
रक्ते माखल्या शरीरे वानर आणि राक्षस॥५३॥
परस्परां धराशायी करती विजयास्तव।
तत: शैलैश्च खड्गैश्च विसृष्टैर्हरिराक्षसै:॥५४॥
मुहूर्तेनावृता भूमिरभवच्छोणितोक्षिता।

खडग् पर्वतशिखरे कपिराक्षस योजित॥५४॥
रक्तप्रवाहे भिजली रणभूमी काही क्षणी।
विकीर्णै: पर्वताकारै रक्षोभिरभिमर्दितै:।
आसीद् वसुमती पूर्णा तदा युद्धमदान्वितै:॥५५॥
मृत शिळांच्या माराने पर्वताकार राक्षस ।
पडता मृत शरीरे भूवरी झाकली धरा॥५५॥
आक्षिप्ता क्षिप्यमाणाश्च भग्नशैलाश्च वानरा:।
पुनरङ्गैस्तदा चक्रुरासन्ना युद्धमद्भुतम् ॥५६॥

शिला ज्यांच्या राक्षसांनी तोडल्या ते वानर।
लाथाबुक्क्यांनीही लढती अद्भुत युद्ध ते ॥५६॥
वानरान् वानरैरेव जघ्नुस्ते नैर्ऋतर्षभा:।
राक्षसान् राक्षसैरेव जघ्नुस्ते वानरा अपि ॥५७॥
एकमेकांवरी कपीना आपटुनी राक्षस ।
मारती तैसे करती कपीही राक्षसांसवे॥५७॥
आक्षिप्य च शिलाञ्जनस्ते राक्षास्तदा।
तेषा चाच्छिद्य शस्त्राणि जजू रक्षांसि वानरा:॥५८॥

शिला शैलशिखरे वानराहातुनि घेउनि।
प्रहारे मारती त्यांना राक्षस तेव्हा वानर
शत्रे हिसकावुनि त्यांची राक्षसांना मारती॥५८॥
निर्जनु: शैलश्रुङ्गैश्च बिभिदुश्चपरस्परम्।
सिंहनादान् विनेदुश्च रणे राक्षसवानरा:॥५९॥
राक्षस वानर दोन्ही योद्धे एकमेकांमध्ये
पर्वतशिखरे शस्त्रे यांनी सिंहासम लढती रणी॥५९॥
छिन्नवर्मतनुत्राणा राक्षसा वानरैर्हता:।

रुचिरं प्रसृतास्तत्र रससारमिवद्रुमा॥६०॥

शरीररक्षा कवच छिन्नभिन्न राक्षसांचे।

त्यामुळे रक्त वाहे तनातुनि जसा वृक्षातुनि रससार॥६०॥

रथेन च रथं चापि वारणेनापि वारणम्।

हयेन च हयं केचिन्निर्जनुर्वानरा रणे॥६१॥

अनेक वानर रथावरी रथ अश्वावरि अश्व

गजावरि गज आपटुनी संपविती रणी॥६१॥

क्षुरप्रैरर्धचन्द्रैश्च भल्लैश्च निशितैः शरैः।

राक्षसा वानरेन्द्राणां विभिदु: पादपान् शिला:॥६२॥
तोडती कपिप्रेरित शिला वृक्षां निशाचर।
बाणांनी क्षुरप्र भल्ल अर्धचन्द्र नामे अशा ॥६२॥
विकीर्णा: पर्वतास्तैव द्रुमच्छिन्नैश्च संयुगे।
हतैश्च कपिरक्षोभिर्दुर्गमा वसुधाभवत् ॥६३॥
प्रेतांवर उभयांच्या पडुनी वृक्ष पर्वत।
कठिण होई करणे हालचाल भूमीवरी॥६३॥
ते वानरा: गर्वितहृष्टचेष्टा: संग्राममासाद्य भयं विमुच्य।

युद्धं स्म सर्वे सह राक्षसैस्ते नानायुधाश्चक्रुरदीनसत्त्वा:॥६४॥
वानर ते सर्व हर्ष उत्साह युक्त न घाबरता रणी ।
शस्त्रे राक्षसांची हिरावुनी युद्ध करती त्यांच्यासवे ॥६४॥
तस्मिन् प्रवृत्ते तुमुले विमर्दे प्रहृष्टमाणेषु वलीमुखेषु।
निपात्यमानेष च राक्षसेषु महर्षयो देवगणाश्च नेदु:॥६५॥
भयंकर त्या चाललेल्या युद्धात प्रसन्न असती वानर।
महर्षीसह देवगण हर्षनाद करती मरुनी पडता राक्षस॥६५॥
ततो हयं मारुततुल्यवेगमारुह्य शक्तिं निशितां प्रगृह्य।

नरान्तको वानरसैन्यमुग्रं महार्णवं मीन इवाविवेश॥६६॥

तेव्हां वायूसम वेगयुक्त स्वार होउनी घोड्यावरि नरान्तक।

तीक्ष्ण शक्तीसवे घुसे वानरसेनेत जणु प्रवेशे मत्स्य सागरी॥६६॥

स वानरान् सप्त शतानि वीर: प्रासेन दीप्तेन विनिर्बिभेद।

एक: क्षणेनेन्द्ररिपुर्महात्मा जघान सैन्यं हरिपुङ्गवानाम्॥६७॥

निशाचर् वीर भाल्याने चमकत्या एकटा चिरुन टाकी सातशे कपि आणि करी

अश्याप्रकारे वानर यूथपतींच्या मोठ्या सेनेचा संहार ॥६७॥

ददृशुश्च महात्मानं हयपृष्ठप्रतिष्ठितम्।

चरन्तं हरिसैन्येषु विद्याधरमहर्षय:॥६८॥
अश्वारूढ त्या वीरास वानरसेनेच्या मध्ये
विद्याधर महर्षी ते विचरताना पाहती॥६८॥
स तस्य ददृशे मार्गो मांसशोणितकर्दम:।
पतितै: पर्वताकारैर्वानरैरभिसंवृत॥६९॥
मार्ग मृत पर्वताकार वानरे दिसे झाकला।
रक्तमांस चिखलासवे ज्यावरुनी तो जातसे॥६९॥
यावद् विक्रमितुं बुद्धिं चक्रु: प्लवगपुङ्गवा:।

तावदेतानतिक्रम्य निर्बिभेद नरान्तक॥७०॥

लढण्याचा विचार करता वानरपुङ्गव।
नरान्तक सर्वां त्या भाल्याने जखमी करे॥७०॥

ज्वलन्तं प्रासमुद्यम्य संग्रामाग्रे नरान्तकः।
ददाह हरिसैन्यानि वनानीव विभावसु॥७१॥

वना शुष्क दावानल जाळुनि टाकतसे जसा।
वानरसैन्या नरान्तक प्रज्वलन्त् प्रासे तसा ॥७१॥

यावदुत्पाटयामासुर्वृक्षान् शैलान् वनौकसः।

तावत् प्रासहता: पेतुर्वज्रकृत्ता इवाचला॥७२॥

वानर पर्वतवृक्ष उखडावया लागती।

तोवरी त्याच्या भाल्याने जखमी वज्रे पर्वत जसा॥७२॥

दिक्षु सर्वासु बलवान् विचचार नरान्तक:।

प्रमृदनन् सर्वतो युद्धे प्रावृट्काले यथानिल॥७३॥

नरान्तक फिरे सर्व दिशांस रणभूमीवरी।

वर्षाकाली जसा वायु विचरे वृक्ष तोडित॥७३॥

न शेकुर्धावितुं वीरा न स्थातुं स्पंदितुं भयात्।

उत्पतन्तं स्थितम् यान्तं सर्वान् विव्याध वीर्यवान्॥७४॥

धावू न शकती वीर भये न् उभेही तसे।

पळणाऱ्या उभ्या वीरां नरान्तक जखमी करी॥७४॥

एकेनान्तककल्पेन प्रासेनादित्यतेजसा।

भग्नानि हरिसैन्यानि निपेतुर्धरणीतले॥७५॥

तेजाने सूर्यासम तो यमासम भयंकर।

करुनी वानरसैन्य भग्न पाडे भूवरी ॥७५॥

वज्रनिष्पेषसदृशं प्रासस्याभिनिपातनम्।

न शेकुर्वानरा: सोढुं ते विनेदुर्महास्वनन्॥७६॥
वज्राहुनि तीव्र आघात प्रास जे करीतसे।
असह्य होऊनिया ते जोराने चित्कारती॥७६॥
पततां हरिवीरानां रूपानि प्रचकाशिरे।
वज्रभिन्नाग्रकूटानां शैलानां पतितामिव॥७७॥
पडता वानरवीर् दिसती त्या पर्वतासम।
वज्राघाते छिन्न ज्यांची शिखरे विदीर्ण ती ॥७७॥
येतु पूर्वं महात्मान: कुम्भकर्णेन पातिता:।

ते स्वस्था वानरश्रेष्ठा: सुग्रीवमुपतस्थिरे॥७८॥

वानर जे कुम्भकर्णे पाडिले रणभूवरी।

राहती स्वस्थ होऊनि सुग्रीवापाशी स्थित॥७८॥

प्रेक्षमाण:स सुग्रीवो ददृशे हरिवाहिनीम्।

नरान्तकभयत्रसतां विद्रवन्तीं यतस्तत:॥७९॥

पाहता सुग्रिव त्यास भयभीत नरान्तके।

इतस्तत: पळताना वानरसेना त्या दिसे॥७९॥

विद्रुतां वाहिनीं दृष्ट्वा स ददर्श नरान्तकम्।

गृहीतप्रासमायान्तं हयपृष्ठप्रतिष्ठितम्॥८०॥
पाहुनी पळती सेना तो नरान्तकास शोधता।
पाही अश्वावरी त्यास हाती भाला घेउनी ॥८०॥
दृष्ट्वोवाच महातेजा: सुग्रीवो वानराधिप:।
कुमारमङ्गदं वीरं शक्रतुल्यपराक्रमम् ॥८१॥
पाहुनि महातेजस्वी वानरराज् सुग्रीव।
कुमार अंगदा बोले इन्द्रासम पराक्रमी॥८१॥
गच्छैनं राक्षसं वीरं योऽसौ तुरगमास्थित:।

क्षोभयन्तं हरिबलं क्षिप्रं प्राणैर्वियोजय॥८२॥

राक्षसवीराकडे जा अश्वावर आरूढ जो।

करी क्षुब्ध कपिसैन्या शीघ्र अन्त त्याचा कर॥८२॥

स भर्तुर्वचनं श्रुत्वा निष्पाताङ्गदस्तदा।

अनीकान्मेघसंकाशादंशुमानव वीर्यवान्॥८३॥

पित्याचे ऐकुनि बोल निघता अंगद तो दिसे।

सूर्यासम जो मेघांच्या आडुनि प्रकट होतसे॥८३॥

शैलसंघातसंकाशो हरीणामुत्तमोऽङ्गद ।

रराजाङ्गदसंनद्धः सधातुरिव पर्वतः॥८४॥

शैलसमूहासम जो कपींत उत्तम अंगद।

भूषणांमुळे भासे सधातु पर्वतासम॥८४॥

निरायुधो महातेजाः केवलं नखदंष्ट्रवान् ।

नरान्तकमभिक्रम्य वालिपुत्रोऽब्रवीद् वचः॥८५॥

शस्त्रहीन वालिपुत्र नखदन्तच शस्त्रे तया।

नरान्तकाजवळी तो जाउनी बोले तया॥८५॥

तिष्ठ किं प्राकृतैरेभिर्हरिभिस्त्वं करिष्यसि।

अस्मिन् वज्रसमस्पर्शं प्रासंक्षिप्र ममोरसि॥८६॥
थाम्ब साधारण कपिंना कश्यास तू मारसि।
वज्रासम तुझा भाला मम छातीवरी मार तू॥८६॥
अङ्गदस्य वच: श्रुत्वा प्रचुक्रोध नरान्तक:।
संदस्य दशनैरोष्ठं नि:श्वस्य च भुजङ्गवत् ।
अभिगम्याङ्गदं क्रुद्धो वालिपुत्रं नरान्तक:॥८७॥
अंगदाचे वच ऐकोनी क्रुद्ध होई नरान्तक।
दांतांनी ओठ चावूनी फुफकारे सर्पासम ।

जाउनी उभा राही वालिपुत्र अंगदाकडे॥८७॥

स प्रासमाविध्य तदाङ्गदाय समुज्ज्वलन्तं सहसोत्ससर्ज।
स वालिपुत्रोरसि वज्रकल्पे बभूव भग्नो न्यपतच्च भूमौ॥८८॥

वेगाने चमकता भाला फिरवुनी मारी अङ्गदवक्षावरी।
असल्याने कठोर वज्रासम ते मोडुनि पडे तो भूवरी॥८८॥

तं प्रासमालोक्य तदा विभग्नं सुपर्णकृत्तोरगभोगकल्पम्।
तलं समुद्यम स वालिपुत्रस्तुरंगमस्याभिजघान मूर्ध्नि॥८९॥

पाहूनि भाला पडे खंडित सर्पशरीर गरूडाकडुनी जसे ।

वालिपुत्र उंचावुनी हस्त मारी नरान्तक अश्व मस्तकी॥८९॥

निमग्नपाद: स्फुटिताक्षितारो निष्क्रान्तजिह्वोऽचलसंनिकाश:।
स तस्य वाजी निपपात भूमौ तलप्रहारेण विकीर्णमूर्धा॥९०॥

फुटे मुख प्रहारामुळे अश्वाचे फुटती डोळे बाहेर जिह्वा येतसे।
पर्वताकार अश्व तो त्यामुळे होऊनि प्राणहीन पडे भूमीवरी॥९०॥

नरान्तकं क्रोधवशं जगाम हतं तुरंगं पतितं समीक्ष्य।
स मुष्टिमुद्यम्य महाप्रभावो जघान शीर्षे युधि वालिपुत्रम्॥९१॥

नरान्तक क्रोधित अत्यन्त होई अश्वास पडता पाहुनी।

मस्तकी करी अंगदाच्या मुष्टिप्रहार तो महाप्रभावी॥९१॥

अथाङ्गदो मुष्टिविशीर्णमूर्धा सुस्राव तीव्रं रुधिरं भृशोष्णम्।
मुहुर्विजज्वाल मुमोह चापि संज्ञां समासाद्य विसिस्मिये च॥९२॥

मुष्टिने अंगद मस्तक भग्न होऊनि वाहे उष्ण रक्तप्रवाह।
प्रज्वलित मस्तक मूर्च्छित तो शुद्धीवरी येता होइ विस्मित ॥९२॥

अथाङ्गदो मृत्युसमानवेगं संवर्त्य मुष्टिं गिरिश्रुङ्गकल्पम ।
निपातयामास तदा महात्मा नरान्तकस्योरसि वालिपुत्र:॥९३॥

तदा अंगद मृत्युसमान वेगे पर्वत शिखरासम मुष्टिप्रहार करी।

महात्मा अंगद करी नरान्तकाच्या छातीवरी प्रहार वालिकुमार॥९३॥

स मुष्टिनिर्भिन्ननिमग्नवक्षा ज्वाला वमन् शोणितदिग्धगात्र:।

नरान्तको भूमितले पपात यथाचलो वज्रनिपातभग्न:॥९४॥

नरान्तक हृदय विदीर्ण होत ओके मुखातुनि अग्निज्वाला।

रक्तलांछित हो सर्व अंग पडे भूवरी जसा वज्रप्रहारे गिरि॥९४॥

तदान्तरिक्षे त्रिदशोत्तमानां वनौकसां चैव महाप्रणाद:।

बभूव तस्मिन् निहतेऽग्रयवीर्ये नरान्तके वालिसुतेन संख्ये॥९५॥

पराक्रमी नरांतक युद्धक्षेत्रे मरे पाहुनि आकाशी करती देवता।

तसाच त्या समयी भूवरि वानरही जोराने करति हर्षनाद ॥९५॥
अथाङ्गदो राममन:प्रहर्षणं सुदुषरं तं कृतवान् हि विक्रमम्।
विसिस्मिये सोऽप्यथ भीमकर्मा पुनश्च युद्धे स बभूव हर्षित॥९६॥
करी पराक्रम दुष्कर असा अंगद हर्ष प्रदान करि मना श्रीरामाच्या।
तसेच करि विस्मितही अंगद पुन्हा युद्धा हर्ष उत्साहे भरूनिया॥९६॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे एकोनसप्ततितम: सर्ग:॥६९॥

युद्धकाण्ड सर्ग ७०

नरान्तकं हतं दृष्ट्वा चुक्रुशुनैर्ऋतर्षभा:।
देवान्तकस्त्रिमूर्धा च पौलस्त्यश्च महोदर:॥१॥
मारिले नरान्तकाला पाहुनी करती गर्जना।
देवान्तक महोदर त्रिशिरा पौलस्त्य जे॥१॥
आरूढो मेघसंकाशं वारणेन्द्रं महोदर:।
वालिपुत्र महावीर्यमभिदुद्राव वेगवान् ॥२॥

मेघासम गजावरी महोदर बैसुनी ।
करि हल्ला वेगाने अङ्गदावर पराक्रमी॥२॥
भ्रातृव्यसनसंतप्तस्तदा देवान्तको बली।
आदाय परिघं घोरमदं समभिद्रवत्॥३॥
संतप्त बन्धुहत्येने बलवान देवान्तक।
घेउनी परिघ घोर अङ्गदावरि जातसे॥३॥
रथमादित्यसंकाशं युक्तं परमवाजिभि:।
आस्थाय त्रिशिरा वीरो वालिपुत्रमथाभ्यगात्॥४॥

उत्तम् घोडे जोडुनि सूर्यतुल्य रथी बैसुनी।
लढण्या वालिपुत्राशी वीर त्रिशिरा येतसे॥४॥
स त्रिभिर्देवदर्पने राक्षसेन्द्रैरभिद्रुतः।
वृक्षमुत्पाटयामास महाविटपमङ्गदः॥५॥
देवान्तकाय तं वीरश्चिक्षेप सहसाङ्गन्दः।
महावृक्षं महाशाखं शक्रो दीप्तामिवाशनिम्॥६॥
देवांना हरविणारे तीन राक्षस येता धावुनि
विशाल शाखा वृक्षा अङ्गद घे उपटुनी॥५॥

प्रज्वलित वज्रे इन्द्र करीत् प्रहार जसा।
तसा देवान्तकावर् तो वृक्षप्रहार करी ॥६॥
त्रिशिरास्तं प्रचिच्छेद सरैराशीविषोपमै:।
स वृक्षं क्रुत्तमालोक्य उत्पपात तदाङ्गद:॥७॥
स ववर्ष ततो वृक्षान् शिलाश्च कपिकुञ्जर:।
तान् प्रचिच्छेद संक्रुद्धस्त्रिशिरा निशितै: शरै:॥८॥
त्रिशिरा बाण विषारी सर्पासम सोडुनी करी।
तुकडे वृक्षाचे तेव्हां नभी उडुनी अङ्गद॥७॥

वर्षाव शिलावृक्षाचा करी परी तो त्रिशिरा।
क्रोधित तीक्ष्ण बाणाने त्यांचेही तुकडे करी॥८॥
परिघाग्रेण तान् वृक्षान् बभञ्ज स महोदरः।
त्रिशिराश्चाड्गदं वीरमभिदुद्राव सायकैः॥९॥
परिघाने आपुल्या वृक्षां तोडीतसे महोदर।
वर्षाव बाणांचा करी त्रिशिरा अड्गदावरी॥९॥
गजेन समभिद्रुत्य वालिपुत्रं महोदरः।
जघानोरसि संक्रुद्धस्तोमरैर्वज्रसंनिभैः॥१०॥

महोदर गजारूढ आक्रमण करूनिया ।
करी तोमरप्रहार वज्रतुल्य अंगदावरी॥१०॥
देवान्तकश्च संक्रुद्धः परिघेण तदाङ्गदम्।
उपगम्याभिहत्याशु व्यपचक्राम वेगवान् ॥११॥
देवान्तकही येउनि क्रोधे परिघे तया।
घाव घालुनि वेगाने दूर तेथुनि जातसे॥११॥
स त्रिभिर्नैरृतश्रेष्ठैर्युगपत् समभिद्रुतः।
न विव्यथे महातेजा वालिपुत्रः प्रतापवान्॥१२॥

जेव्हां तीन निशाचर आक्रमती एकसवे।
मनी न व्यथित होई थोडाही अंगद॥१२॥
स वेगवान् महावेगं कृत्वा परमदुर्जय:।
तलेन समभिद्रुत्यजघानास्य महागजम् ॥१३॥
दुर्जय नि वेगशाली वेगे प्रकट महान् ।
आक्रमी महोदर गज आघाते मस्तकी॥१३ ॥
तस्य तेन प्रहारेण नागराजस्य संयुगे।
पेततुर्नयने तस्य विननाश स कुञ्जर:॥१४॥

प्रहाराने त्या गजाचे दोन्ही डोळे निसटुनी।
पडती भूवरी त्याने मरे तत्काळ गज ॥१४॥
विषाणं चास्य निष्कृष्य वालिपुत्रो महाबलः।
देवान्तकमभिद्रुत्य ताडयामास संयुगे॥१५॥
हत्तीचा उपटुनी दांत युद्धस्थळि धावुनी।
देवान्तकास जखमी करी अंगद त्यासवे॥१५॥
स विह्वलस्तु तेजस्वीवातोद्ध्त इव द्रुमः।
लाक्षारससवर्णं च सुस्राव रुधिरं महत्॥१६॥

प्रहारे व्याकुल कांपे वाते हले वृक्ष जसा।
लाक्षावर्णी रक्त वाहे त्याच्या शरीरातुनि ॥१६॥
अथाश्वास्य महातेजा: कृच्छ्राद् देवान्तको बली।
आविध्य परिघं वेगादाजघान तदाङ्गदम् ॥१७॥
बलवान देवान्तक कष्टाने परिघ उचलुनी।
अङ्गदावरि वेगे प्रहार करी तो फिरवुनी ॥१७॥
परिघाभिहतश्चापि वानरेन्द्रात्मजस्तदा।
जानुभ्यां पतितो भूमौ पुनरेवोत्पपात ह॥१८॥

परिघाघाते अङ्गद जखमी जानु भूवरी।
टेकी परत परंतु उसळी मारुन उठे पुन्हा॥१८॥
तमुत्पतन्तं त्रिशिरास्त्रिभिर्बाणैरजिह्मगै:।
घोरैर्हरिपते: पुत्रं ललाटेऽभिजघान ह॥१९॥
उठता तो त्रिशिराने तीन बाणे भयंकर।
ललाटी जखम खोल पोचवी त्याच्या तदा॥१९॥
ततोऽङ्गदं परिक्षिप्तं त्रिभिर्नैर्ऋतपुङ्गवै:।
हनूमानथ विज्ञाय नीलश्चापि प्रतस्थतु:॥२०॥

निशाचर तीन मुख्य पाहुनि घेरति अङ्गदा।
हनूमान नील दोघे सहाय्यास्तव त्या धावती॥२०॥
ततश्चिक्षेप शैलाग्रं नीलस्त्रिशिरसे तदा।
तद् रावणसुतो धीमान् बिभेद निशितै: शरै:॥२१॥
फेकी पर्वतशिखर नील त्रिशिरावरी।
परि तो रावणपुत्र तीक्ष्ण तीरे तोडि ते॥॥२१॥
तद्बाणशतनिर्भिन्नं विदारितशिलातलम्।
सविस्फुलिङ्गं सज्वालं निपपात गिरे: शिर:॥२२॥

विदीर्ण शतश: तीरे खंड पर्वतशिखराचे।
अग्निज्वाला नि स्फुल्लिंगासवे पडति भूवरी॥२२॥
स विजृम्भितमालोक्य हर्षाद् देवान्तको बली।
परिघेणाभिदुद्राव मारुतात्मजमाहवे॥२३॥
बन्धुपराक्रमे हर्षित बलवान् देवान्तक।
परिघासवे करी हल्ला हनूमानावरी रणी॥२३॥
तमापतन्तमुत्पत्य हनूमान् कपिकुञ्जर:।
आजघान तदा मूनि वज्रकल्पेन मुष्टिना॥२४॥

येता पाहुनि त्याला हनूमान् कपिकुञ्जर।
शिरावर् त्याच्या मारी बुक्का वज्रासारखा॥२४॥
शिरसि प्राहरद् वीरस्तदा वायुसुतो बली।
नादेनाकम्पयच्चैव राक्षसान् स महाकपि:॥२५॥
मस्तकी प्रहार करी हनूमान् महाकपि।
भीषण गर्जना करुनी करी कम्पित राक्षसां॥२५॥
स मुष्टिनिष्पिष्टविभिन्नमूर्धा निर्वान्तदन्ताक्षिविलमबिजिह्व:।
देवान्तको राक्षसराजसूनुर्गतासुरुवा सहसा पपात॥२६॥

त्या प्रहारे देवान्तमस्तक फुटे दन्तनेत्र लाम्ब जिह्वा ।
देवान्तक निष्प्राण राक्षस राजकुमार पडे भूमीवरी ॥२६॥
तस्मिन् हते राक्षसयोधमुख्ये महाबले संयति देवशत्रौ ।
क्रुद्धस्त्रिशीर्षा निशितास्त्रमुग्रं ववर्ष नीलोरसि बाणवर्षम् ॥२७॥
मरता मुख्य राक्षसयोद्धा देवान्तक त्रिशिरा भयंकर क्रोधित
करी नीलाच्या छातीवर तो तीक्ष्ण अनेक बाणांचा वर्षाव॥२७॥
महोदरस्तु संक्रुद्धः कुञ्जरं पर्वतोपमम्।
भूयः समधिरुह्याशु मन्दरं रश्मिवानिव॥२८॥

महोदर क्रुद्ध होत आरूढ पर्वताकार ।
गजावरी होत जसा सूर्य मन्दराचली॥२८॥
ततो बाणमयं वर्षं नीलस्योपर्यपातयत् ।
गिरौ वर्षं तडिच्चक्रचापवानिव तोयद:॥२९॥
तेथुनी करि वर्षाव बाणांचा तो नीलावरी।
जणू वर्षा करती मेघ पर्वतशिखरावरी॥२९॥
तत: शरौत्रैभिवृष्यमाणो विभिन्नगात्र: कपिसैन्यपाल:।
नीलो बभूवाथ विसृष्टगात्रो विष्टम्भितस्तेन महाबलेन ॥३०॥

तीरवर्षावे क्षत विक्षत शरीर शिथिल होत नील वानरसेनापति।
महाबली महोदरे करुनी मूर्च्छित कुण्ठित त्याच्या बलविक्रमा॥३०॥
ततस्तु नील: प्रतिलब्ध संज्ञ: शैलं समुत्पाट्य सवृक्षखण्ड्म्।
तत: समुतत्य महोप्रवेगो महोदरं तेन जघान मूर्ध्नि॥३१॥
शुद्धीवरी येत नील उपटी शैलशिखर वृक्षसमूहयुक्त ।
उडी मारुनि उसळुनी महावेगे मारि ते महोदरमस्तकी॥३१॥
तत: स शैलाभिनिपातभग्नो महोदरस्तेन महाद्विपेन।
व्यामोहितो भूमितले गतासु: पपात वज्राभिहतो यथाद्रि॥३२॥

महोदर शिखराघाते होतसे मूच्छित महान गजराजासवे।
होत खंडित प्राण जाउनि पडे भूवरी वज्रहत पर्वतापरी ॥३२॥
पितृव्यं निहतं दृष्ट्वा त्रिशिराश्चापमाददे।
हनूमन्तं संक्रुद्धो विव्याध निशितै: सरै:॥३३॥
त्रिशिरा अतिक्रोधित पाहुनि काकास मारिले।
धनुष्य घेउनि सोडी तीक्ष्ण बाण हनुमानावरी॥३३॥
स वायुसूनु: कुपितश्चिक्षेप शिखरं गिरे: ।
त्रिशिरास्तच्छरैस्तीक्ष्णैर्बिभेद बहुधा बली॥३४॥

कुपित वायुपुत्र फेकी पर्वतशिखर त्रिशिरावरि।
परि तो तीक्ष्ण बाणांनी शतखण्डित त्या करी॥३४॥
तद् व्यर्थं शिखरं दृष्ट्वा द्रुमवर्ष तदा कपि:।
विससर्ज रणे तस्मिन् रावणस्य सुतं प्रति॥३५॥
शिखर व्यर्थ झालेले पाहुनि त्रिशिरावरी।
करण्या वर्षाव वृक्षांचा आरम्भी कपि तेधवा॥३५॥
तमापतन्तमाकाशे द्रुमवर्ष प्रतापवान्।
त्रिशिरा निशितैर्बाणैश्चिच्छेद च ननाद च॥३६॥

वृक्षवर्षा नभातील छिन्नभिन्न तीक्ष्ण शरे।
करुनि प्रतापी त्रिशिरा जोराने गर्जना करी॥३६॥
हनूमांस्तु समुत्पत्य हयं त्रिशिरस्तदा।
विददार नखै: क्रुद्धो नागेन्द्र मृगराडिव॥३७॥
हनूमान उचलुनी घोड्यास त्रिशिराच्या तदा।
नखाने फाडि जसा वनराज गजराजा जसा॥३७॥
अथ शक्तिं समासाद्य कालरात्रत्रिमिवान्तक:।
चिक्षेपानिलपुत्राय त्रिशिरा रावणात्मज:॥३८॥

शक्ति हाति घे त्रिशिरा यमकालरात्रीसम ।
आणि चालवी ती पवनपुत्र हनुमानावरी ॥३८॥
दिव: क्षिप्तामिवोल्कां तां शक्तिं क्षिप्तामसङ्गताम् ।
गृहीत्वा हरिशार्दूलो बभञ्ज च निनाद च॥३९॥
नभातुनि उल्कापात तशी शक्ति अकुण्ठित।
हनूमान पकडुनि तोडी करुनि महागर्जना॥३९॥
तां दृष्ट्वा घोरसंकाशां शक्तिं भग्नां हनूमता।
प्रहृष्टा वानरगणा विनेदुर्जल्अदा यथा॥४०॥

पाहुनी हनुमान तोडी भयानक शक्तीस त्या।
करती वानरवृन्द हर्षे मेघासम गर्जना॥४०॥
ततः खड्गं समुद्यम्य त्रिशिरा राक्षसोत्तमः।
निचखान तदा खड्गं वानरेन्द्रस्य वक्षसि॥४१॥
उचलुनी खड्गा त्रिशिरा राक्षसशिरोमणी ।
घोर घाव घाली वक्षी कपिश्रेष्ठाच्या तदा॥४१॥
खडग्प्रहाराभिहतो हनूमान् मारुतात्मजः।
आजघान त्रिमूर्धानं तलेनोरसि वीर्यवान्॥४२॥

खड्गप्रहारे घायाळ हनूमान मारुतात्मज।
करी आघात त्याच्या वक्षावर महाबले॥४२॥
स तलाभिहतस्तेन स्रस्तहस्तोयुधो भुवि।
निपपात महातेजास्त्रिशिरास्त्यक्तचेतन:॥४३॥
आघाताने त्या त्रिशिरा होउनीया अचेतन ।
हातातिल शस्त्र सोडुनी पडे तो भूमीवरी॥४३॥
स तस्य पतत: खड्गं तमाच्छिद्य महाकपि:।
ननाद गिरिसंकाशस्त्रासयन् सर्व राक्षसान् ॥४४॥

पडताना त्याचे शस्त्र हिरावुनी भयभीत।
राक्षसां करुनी गर्जे हनुमान् महाकपि॥४४॥
अमृष्यमानस्तं घोषमुत्पात निशाचर:।
उत्पत्य च हनूमतं ताडयामास मुष्टिना॥४४॥
चवताळे गर्जनेने राक्षस उठुनी उभा।
आणि हनुमानावर करीत मुष्टिप्रहार ॥४४॥
तेन मुष्टिप्रहारेण संचुकोप महाकपि:।
कुपितश्च निजग्राह किरीटे राक्षसर्षभम्॥४६॥

त्याच्या मुष्टिप्रहारे हो क्रोधित हनूमान्।
आणि मुकुटमण्डित पकडे त्याच्या मस्तका॥४६॥
स तस्य शीर्षाण्यसिना शितेन किरीटजुष्टानि सकुण्डलानि।
क्रुद्धः प्रचिच्छेद सुतोऽनिलस्य त्वष्टः सुतस्यैव शिरांशि शक्रः॥४७॥
त्वष्टासुताचि जशि मस्तके तीन पूर्वी इन्द्रे वज्रे कापिली।
तशी किरिटकुण्डलसहित त्रिशिराची वायुपुत्रे खडगे कापिली॥४७॥
तान्यायतामाण्यगसंनिभानि प्रदीप्तवैश्वानरलोचनानि।
पेतुः सिरांसीन्द्ररिपोः पृथिव्यां ज्योतीषि मुक्तानि यथार्कमार्गे॥४८॥

विशाल सर्व इन्द्रिये त्या शिरांची नेत्र् प्रदीप्त अग्निसमान।
शिरे तीन त्रिशिराची भूवरी पडती जशी तुटुनी आकाशातिल तारे॥४८॥
तस्मिन् हते देवरिपो त्रिशीर्षे हनूमता शक्रपराक्रमेण।
नेदु: प्लवङ्गा: प्रचचाल भूमौ रक्षांस्यथो दुद्रुविरे समन्तात॥४९॥
त्या मारता इन्द्रतुल्य पराक्रमी हनूमाने त्रिशिरास देवरिपु जो।
वानरे हर्षनाद करती कांपते धरती पळती राक्षस चारी दिशांस ॥४९॥
हतं त्रिशिरसं दृष्ट्वा तथैव च महोदरम्।
हतो प्रेक्ष्य दुराधर्षो देवान्तकनरान्तकौ॥५०॥

चुकोप परमामर्षी मत्तो राक्षस पुङ्गवः
जग्राहार्चिष्मतीं चापि गदां सर्वायसीं तदा ॥५१॥

पाहुनी मृत त्रिशिरा महोदरासही तसे।
देवान्तक नरान्तक वीर दुर्जयही तसे॥५०॥
महाक्रोधी महापार्श्व क्रोधाने घे हाती गदा।
तेजस्विनी जी असे पूर्ण लोहाने बनवीयली॥५१॥

हेमपट्टपरिक्षिप्तां मांसशोणितफेनिलाम्।
विराजमानां विपुलां शत्रुशोणिततर्पिताम्॥५३॥

सोन्याने मढवलेली रक्तमांसे माखलेली।
तृप्त होणारी शत्रूचे पिउनी रक्त आकंठ॥५३॥
तेजसा सम्प्रदीप्तायां तक्तमाल्यविभूषिताम्।
ऐरावतमहापद्मसार्वभौमभयावहम्॥५३॥
प्रज्वलित अग्रे तेजस्वी रक्तरंगे विभूषित।
ऐरावत पुण्डरीक सार्वभौम यांसारख्या ।
दिग्गजांनाही भयभीत् करणारी ती असे ॥५३॥
गदामादाय संक्रुद्धो मत्तो राक्षसपुङ्गवः।

हरीन् समभिदुद्राव युगान्ताग्निरिव ज्वलन् ॥५४॥
गदा घेउनी संक्रुद्ध मत्त राक्षसपुङ्गव।
प्रज्वलित प्रलयाग्नि सम धावे वानरांकडॆ॥५४॥
अथर्षभ: समुत्पत्य वानरो रावणानुजम्।
मत्तनीकमुपागम्य तस्थौ तस्याग्रतो बली॥५५॥
तेव्हां ऋषभ वानर बलवान उडी मारुनी ।
रावणानुज मत्तापुढे राही उभा जाउनि ॥५५॥
तं पुरस्तात् स्थितं दृष्ट्वा वानरं पर्वतोपमम् ।

आजघानोरसि क्रुद्धो गदया वज्रकल्पया॥५६॥
पाहुनि उभा समोर पर्वताकार वानरा।
प्रहार वज्रगदेचा वक्षावरी त्याच्या करी ॥५६॥
स तयाभिहतस्तेन गदया वानरर्षभ:।
भिन्नवक्षा: समाधूत: सुस्राव रुधिरं बहु॥५७॥
गदेच्या प्रहारे त्याच्या कपि छिन्नवक्षस्थल।
कांपे तो रक्ताचा पाट आणि वाहू लागला॥५७॥
स सम्प्राप्य चिरात् संज्ञामृषभो वानरेश्वर:।

क्रुद्धो विस्फुरमाणौष्ठो महापार्श्वमुदैक्षत॥५८॥
कांही वेळात शुद्धीत येता वानर ऋषभ ।
क्रोधे फडकता ओष्ठ पाही महापार्श्वाकडे॥५८॥
स वेगवान् वेगवदभ्युपेत्य तं राक्षसं वानरवीरमुख्य:।
संवर्त्य मुष्टिं सहसा जघान बाह्यन्तरे शैलनिकाशरूप:॥५९॥
तो वेगवान वानर मुख्य वीर वेगाने राक्षसावरी धावुनी।
जवळी जाउनि वक्षावरी त्याच्या त्वेषाने प्रहार् करी॥५९॥
स कृत्तमूल: सहसेव वृक्ष: क्षितौ पपात क्षतजोक्षिताङ्ग:।

तां चास्य घोरां यमदण्डकल्पां गदां प्रगृह्याशु तदा निनाद ॥६०॥

तदा महापार्श्व रक्तलांछित पडे भूवरी तुटलेल्या वृक्षापरी।

यमदण्डासम गदा त्याची घेउनि शीघ्र हाती गर्जना करी ऋषभ ॥६०॥

मुहूर्तमासीत् स गतासुकल्प: प्रत्यागतात्मा सहसा सुरारि:।

उत्पत्य संध्याभ्रसमानवर्णस्तं वारिराजात्मजमाजघान ॥६१॥स

प्रेतासम पडलेला महापार्श्व शुद्धीवर येता उडी मारुनि उठे।

शरीरे रक्तरंजित सन्ध्यामेघांसम ऋषभा करी जखम खोल॥६१॥

स मूर्च्छितो भूमितले पपात मुहूर्तमुत्पत्य पुन: ससंज्ञ:।

तामेव तस्याद्रिवराद्रिकल्पां गदा समाविध्य जघान संख्ये॥६२॥
तो मूर्च्छित होउनि पडे भूवरी काही क्षणात शुद्धीवर येउन ।
गदा महापार्श्वाची पडलेली उचलुनी फिरवुनी मारे निशाचरा॥६२॥
सा तस्य रौद्रा समुपेत्य देहं रौद्रस्य देवाध्वरविप्रशत्रो:।
बिभेद वक्ष: क्षतजं च भूरि सुस्राव धात्वम्भ इवाद्रिराज:॥६३॥
रौद्र शरीरा देवब्राह्मणयज्ञशत्रूच्या त्या विदीर्ण करुनि वक्षस्थला।
वाहू लागे ओघ रक्ताचा हिमालये जसा गेरु आदि धातूंचा ओघ॥६३॥
अभिदुद्राव वेगेन गदां तस्य महात्मन:।

तां गृहीत्वा गदां भीमामाविध्य च पुन: पुन:॥६४॥
मत्तनीकं महात्मा स जघान रनमूर्धनि।
धावे राक्षस गदा घेण्या ऋषभाच्या हातुनी।
परि तो त्याच गदेने प्रहार् महापार्श्वावरी॥६४॥
अनेक करुनी मत्ता त्या संपवी रणभूवरी।
स स्वया गदया भग्नो विशीर्णदशनेक्षण:॥६५॥
निपपात तदा मत्तो व्ज्राहत इवाचल:।
स्वगदेनेच महापार्श्व नेत्र दांत गमावुनी॥६५॥

धराशायी होई वज्रे पर्वतशिखर जणु।
विशीर्णनयने भूमौ गतसत्त्वे गतायुषि।
पतिते राक्षसे तस्मिन् विद्रुतं राक्षसं बलम्॥६६॥
पृथ्वीवरी पडे राक्षस नष्ट नयन् चेतना।
राक्षस पडता सेना पळुनी सर्व जातसे ॥६६॥
तस्मिन् हते भ्रातरि रावणस्य तन्नैर्ऋतानां बलमर्णवाभम्।
त्यक्तायधं ज्केवलजीविता दुद्राव भिन्नार्णवसंनिकाशम॥६७॥
होता मृत महापार्श्व रावणबन्धु सेना विशाल समुद्रासमान।

पळू लागे शस्त्रे फेकुनि दिसे जणु महासागर फुटुनी वाहतो॥६७॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे सप्ततितम: सर्ग:॥७०॥

युद्धकाण्ड सर्ग ७१

स्वबलं व्यथितं दृष्ट्वा तुमुलं लोमहर्षणम् ।
भ्रात्रूंश्च निहतान् दृष्ट्वा शक्रतुल्यपराक्रमान्॥१॥
पितृव्यौ चापि संदृश्य समरे संनिपातितौ।
युद्धोन्मत्तं च मत्तं च भ्रातरौ राक्षसोत्तमौ॥२॥
चुकोप च महातेजा ब्रह्मदत्तवरो युधि।
अतिकायोऽद्रिसंकाशो देवदानवदर्पहा॥३॥

पाहुनी लोमहर्षण स्वसैन्य होत व्यथित ।
बन्धुना मारले गेले इन्द्रा सम पराक्रमी॥१॥
युद्धोन्मत्त महोदर महापार्श्व मत्त असे।
काकाहि मारले जाती युद्धात पराक्रमी ॥२॥
अतिक्रोधित होई महातेजस्वी निशाचर ।
अतिकाय उतरवी देवदानवांचा दर्प जो ॥३॥
स भास्करसहस्रस्य् संघातमिव भास्वरम्।
रथमारुह्य शक्रारिरभिदुद्राव वानरान् ॥४॥

सहस्रसूर्यांसम तेजस्वी रथी आरूढ होउनी।
इन्द्रशत्रु तो चालुनि जाई कपिसैन्यावर॥४॥
स विस्फार्य तदा चापं किरीटी मृष्टकुण्डलः।
नाम संश्रावयामास ननाद च महास्वनम् ॥५॥
किरिट कुण्डलासह तो स्वधनुष्या ताणुनी।
उच्चारुनिया स्वनाम गर्जना जोराने करी ॥५॥
तेन् सिंहप्रणादेन मानविश्रावणेन च ।
ज्याशब्देन च भीमेन त्रासयामास वानरान् ॥६॥

भयभीत वानरांना करी सिंहनादे तथा।
स्वनाम घोषणेने टणत्कारे स्वधनुच्या॥६॥
तं दृष्ट्वा देहमाहात्म्यं कुम्भकर्णोऽयमुत्थित:।
भयार्ता वानरा: सर्वे संभ्रयन्ते परस्परम्॥७॥
पाहुनी देहा त्याच्या कुम्भकर्णच जणू पुन्हा।
भासुनी भयपीडित एकमेका धरती कपि॥७॥
ते तस्य रूपमालोक्य यथा विष्णोस्त्रिविक्रमे ।
भयाद् वानरयोद्धास्ते विद्रवन्ति ततस्तत:॥८॥

पाहुनी त्याचे रूप विक्रमावतारे विष्णूसम ।
इतस्तत: कपिसैनिक भयाने पळु लागती ॥८॥
तेऽतिकाय समासाद्य वानरा मूढचेतस:।
शरण्यं शरणं जग्मुर्लक्ष्मणाग्रजमाहवे ॥९॥
अतिकायाजवळी जाता मूढचित्त ते वानर।
लक्ष्मणाग्रज श्रीरामा जाती शरण युद्धात ॥९॥
ततोऽतिकायं काकुत्स्थो रथस्थं पर्वतोपमम्।
ददर्श धन्विनं दूराद् गर्जन्तं कालमेघवत् ॥१०॥

पर्वतोपम अतिकाया पाही श्रीराम रथी ।
धनुष्यासह करताना मेघासम गर्जना ॥१०॥
स तं दृष्ट्वा महाकायं राघवस्तु सुविस्मित:।
वानरान् सान्वयित्वा च बिभीषणमुवाच ह॥११॥
महाकायास त्या पाहुनि श्रीरामचन्द्र विस्मित।
वानरा सान्त्वना देत बिभीषणा विचारीतसे॥११॥
कोऽसौ पर्वतसंकाशो धनुष्मान् हरिलोचन:।
युक्ते हयसहस्रेण विशाले स्यन्दने स्थित:॥१२॥

कोण हा पर्वताकार सहस्राश्वरथि बैसुनी।
धनुष्य घेउनि हाती तेजस्वी हरिलोचन॥१२॥
स एष निशितैः शूलैः सुतीक्ष्णैः प्रासतोमरैः।
अर्चिष्मद्भिर्वृतो भाति भूतैरिव महेश्वरः॥१३॥
तीक्ष्ण शूल अत्यन्त तेजस्वी प्रासतोमर।
या सर्वांनी शोभे भूतनाथ महादेवासम॥१३॥
कालजिह्वाप्रकाशाभिर्य र्षोऽभिविराजते।
आवृतो रथशक्तीभिर्विद्युद्भिरिव तोयदः॥१४॥

प्रकाशित कालजिह्वेसम आवृत्त रथशक्तिने।
निशाचर विद्युन्माला आवृत्त मेघासम ॥१४॥
धनूंषि चास्य सज्जानि हेमपृष्ठानि सर्वश:
शोभयन्ति रथश्रेष्ठं शक्रचापमिवाम्बरम् ॥१५॥
रथाच्या सर्व बाजूंस धनुष्ये सुवर्णांकित।
सज्ज शोभति नभात जसे इन्द्रधनु शोभते॥१५॥
य एष रक्ष:शार्दूलो रणभूमिं विराजयन् ।
अभ्येति रथिनां श्रेष्ठो रथेनादित्यवर्चसा॥१६॥

राक्षसांत सिंहासम पराक्रमी रणि येतसे।
रथींत श्रेष्ठ बैसोनी सूर्यतुल्य तेजस्वी रथी॥१६॥
ध्वजशृङ्गप्रतिष्ठेन राहुणाभिविराजते ।
सूर्यरश्मिप्रभैर्बाणैर्दिशो दश विराजयन्॥१७॥
राहुचिह्न पताका ध्वजशिखरी अंकित।
प्रकाशित दाहीदिशा बाणे सूर्यकिरणासम॥१७॥
त्रिनतं मेघनिर्हादं हेमपृष्ठमलंकृतम् ।
शतक्रतुधनु:प्रख्यं धनुश्चास्य विराजते॥१८॥

सुवर्णांकित असे धनु अलंकृत पुष्पे तसे।
तीन जागी वक्र करी टणत्कार मेघासम।
राक्षस धनु ते शोभे इन्द्रधनुष्यापरी ॥१८॥

सध्वज: सपताकश्च सानुकर्षो महारथ:।
चतु:सादिस्मायुक्तो मेघस्तनितनि:स्वन:॥१९॥

ध्वजा पताका अनुकर्ष युक्त विशाल रथ।
चार सारथि नियन्त्रित गर्जत मेघासम ॥१९॥

विंशतिर्दश चाष्टौ च तूणास्य रथमास्थिता:।

कार्मुकाणि च भीमानि ज्याश्च काञ्चनपिङ्गला:॥२०॥
रथावरि तरकस वीस दहा धनु भयंकर।
असती पिङ्गल वर्ण प्रत्यंचा अष्ट सुवर्ण ॥२०॥
द्वौ च खड्गो च पार्श्वस्थौ प्रदीप्तो पार्श्वशोभितौ।
चतुर्हस्तत्सरुयुतौ व्यकतहस्तादशायतौ॥२१॥
दोन्हीकडे खड्ग दोन दहा हात लांबी ज्यांची ।
मुठी चार हात लांब अशा तेजाने तळपती॥२१॥
रक्तकण्ठगुणो धीरो महापर्वतसंनिभ:।

काल: कालमहावक्त्रो मेघस्थ इव भास्कर:॥२२॥
रक्तमाला कण्ठी महापर्वताकार राक्षस।
विशाल मुखे तो शोभे मेघस्थ सूर्यासम॥२२॥
कांचनांगदनद्धाभ्यां भुजाभ्यामेष शोभते।
श्रुंगाभ्यामिव तुङ्गाभ्यां हिमवान् पर्वतोपम:॥२३॥
बाजूबन्द सुवर्णाचे भुजांवरती शोभती।
दोन उंच शिखरासह शोभे हिमालय जणु ॥२३॥
कुण्डलाभ्यामुभाभ्यां च भाति वक्त्रं सुभीषणम्।

पुनर्वस्वन्तरगतं परिपूर्णो निशाकर:॥२४॥
भीषण मुखमण्डल मण्डित दो कुण्डलासह।
दोन पुनर्वसु नक्षत्रांमध्ये चन्द्रमा जणु ॥२४॥
आचक्ष्व मे महाबाहो त्वमेनं राक्षसोत्तमम्।
यं दृष्ट्वा वानरा: सर्वे भयार्ता विद्रुता दिश:॥२५॥
सांग कोण महाबाहो राक्षस तो श्रेष्ठ ज्या।
पाहुनी सर्व वानर भयाने पळती दिशोदिशी॥२५॥
स पृष्टो राजपुत्रेण रामेणामिततेजसा।

आचचक्षे महातेजा राघवाय बिभीषण:॥२६॥
पुसता श्रीरामाने अमित तेजस्वी असे ।
बिभीषण महातेजस्वी उत्तर देई असे॥२६॥
दशग्रीवो महातेजा राजा वैश्रवणानुज:।
भीमकर्मा महात्मा हि रावणो रावणेश्वर:॥२७॥
तस्यासीद् वीर्यवान् पुत्रो रावणप्रतिमो बले।
वृद्धसेवी श्रुतिधर: सर्वास्त्रविदुषां वर:॥२८॥
कुबेरानुज महाकाय भीमकर्मा दशमुख।

राक्षसराज रावण त्याचा पुत्र पराक्रमी॥२७॥
त्याच्यासम असे तोही वृद्धसेवी पराक्रमी ।
ज्ञाता वेदशास्त्रांचा अस्त्रवेत्त्यांत श्रेष्ठ जो ॥२८॥
अश्वपृष्ठे नागपृष्ठे खड्गे धनुषि कर्षणे।
भेदे सान्त्वे च दाने च नये मन्त्रे च सम्मत:॥२९॥
गजाश्वखडग धनुष्य चालने लक्ष्य साधणे ।
साम दान प्रयोग मन्त्रणेत निपुण तथा।
आचरण न्याययुक्त सम्मानित तो असे॥२९॥

यस्य बाहुं समाश्रित्य लङ्का भवति निर्भया।
तनयं धान्यमालिन्या अतिकायमिमं विदु:॥३०॥
असे बलावरि ज्याच्या लंका नगरि निर्भय।
धान्यमालिनीचा पुत्र नामे अतिकाय असे॥३०॥
एतेनाराधितो ब्रह्मा तपसा भावितात्मना।
अस्त्राणि चाप्यवाप्तानि रिपवश्च पराजिता:॥३१॥
विशुद्ध अन्त:करणे केली ब्रह्मोपासना।
ब्रह्माजी कडुनि प्राप्त दिव्यास्त्रे तो करितसे

आणि बळावर् त्यांच्या अनेक शत्रूंस् जिंकिले॥३१॥

सुरासुरैरवध्यत्वं दत्तमस्मै स्वयंभुवा।
एतव्य कवचं दिव्यं रथश्च रविभास्वर:॥३२॥
वरे ब्रह्माजीच्या अवध्य तो देवतां असुरां।
दिव्य कवच तेजस्वी सूर्यासम रथ त्या मिळे॥३२॥

एतेन शतशो देवा दानवाश्च पराजिता:।
रक्षितानि च रक्षांसि यक्षाश्चापि निषूदिता:॥३३॥
देवदानवा शतदा पराजित केले असे।

यक्षां पराभूत करुनी राक्षसांना रक्षिले॥३३॥
वज्रं विष्टम्भितं येन बाणैरिन्द्रस्य धीमता।
पाश: सलिलराजस्य युद्धे प्रतिहतस्तथा॥३४॥
बाणाने कुंठित केले इन्द्रवज्रास राक्षसे।
वरुणपाशा युद्धात असफल केले असे॥३४॥
एषोऽतिकायो बलवान् राक्षसानामथर्षभ:।
स रावणसुतो धीमान् देवदानवदर्पहा॥३५॥
रावणसुत अतिकाय बुद्धिमान् बलवान् महा।

देवदानवांचे त्याने गर्वहरण केले असे॥३५॥

तदस्मिन् क्रियतां यत्नः क्षिप्रं पुरुषपुङ्गवः।
पुततितोऽकायो बलवान् प्रविश्य हरिवाहिनीम्।
विस्फारयामास धनुर्नाद च पुनः पुनः॥३७॥

बोलणे चालता ऐसे बलवान् अतिकाय तो ।
घुसतसे वानरांच्या सेनेमध्ये करीत तो ।
गर्जना वारंवार टणत्कार धनुचा करी॥३७॥

तं भीमवपुषं दृष्ट्वा रथस्थं रथिनां वरम्।

अभिपेतुर्महात्मान: प्रधाना ये वनौकस:॥३८॥
कुमुदो दिविदो मैन्दो नील: शरभ एव च।
पादपैर्गिरिश्रृंगैश्च युगपत् समभिद्रवन्॥३९॥
त्या भीमदेहा रथात बैसुनि येता पाहता।
कुमुद द्विविद मैन्द नील शरभादि मुख्य॥३८॥
वानर महामनस्वी वृक्षा पर्वतशिखरा ।
एकत्र घेउनि हाती तुटुनी पडती त्यावर॥३९॥
तेषां वृक्षांश्च शैलांश्च शरै: कनकभूषणै:।

अतिकायो महातेजाश्चिच्छेदास्त्रविदां वर:॥४०॥
त्यांच्या वृक्षांस शैलांस बाणे सुवर्णभूषित।
महातेजस्वी श्रेष्ठ अतिकाय टाकी तोडुनि ॥४०॥
तांश्चैव सर्वान् स हरीन् शरै: सर्वायसैबली।
विव्याधाभिमुखान् संख्ये भीमकायो निशाचर:॥४१॥
निशाचर भीमकाय रणी इतरां वानरां।
बांधुनि टाकी सर्वांना लोखंडी बाण योजुनी ॥४१॥
तेऽर्दिता बाणवर्षेण भिन्नगात्रा: प्राजिता:।

न शेकुरतिकायस्य प्रतिकर्तुं महाहवे॥४२॥
बाणांनी क्षतविक्षत देह सर्वांचे होति त्या।
असमर्थ राक्षसाशी लढण्या हार मानती॥४२॥
तत् सैन्यं हरिवीराणां त्रासयामास राक्षसः।
मृगयूथमिव क्रुद्धो हरियौवनदर्पितः॥४३॥
क्रुद्ध सिंह भयभीत मृगकळपा जसा करी ।
तसा वानरवीरां राक्षस त्रास देतसे ॥४३॥
स राक्षसेन्द्रो हरियूथमध्ये नायुध्यमानं निजघान कंचित्।

उत्पत्य रामं स धनु:कलापी सगर्वितं वाक्यमिदं बभाषे॥४४॥
तो राक्षसेन्द्र कपियूथमध्ये न मारी कुणा जो न लढे तयासी।
रामाजवळी उडी मारुनि येउनि गर्वाने त्यास ऐसे वदे तो॥४४॥
रथे स्थितोऽहं शरचापपाणिर्न प्राकृतं कंचन योधयामि।
यस्यास्ति शक्तिर्व्यवसाययुक्तो ददातु मे शीघ्रमिहाद्य युद्धम्॥४५॥
रथी बसे मी शरचाप धारुनी न लढीन साधारण प्राणि जो असे।
शक्ति साहस उत्साह ज्यापाशी त्याने युद्धास सन्धि द्यावी मज॥४५॥
तत् तस्य वाक्यं ब्रुवतो निशम्य चुकोप सौमित्रिरमित्रहन्ता।

अमृष्यमानश्च समुत्पपात जग्राह चापं च तत: स्मयित्वा॥४६॥
ऐकून् अहंकारयुक्त शब्द त्याचे हो क्रुद्ध लक्ष्मण शत्रुहन्ता।
असह्य होउनि बोल त्याचे उचली स्वधनूस स्मितहास्य करुनी॥४६॥
क्रुद्ध सौमित्रिरुत्पत्य तूणादाक्षिप्य सायकम्।
पुरस्तादतिकायस्य विचकर्ष महद्धनु:॥४७॥
क्रुद्ध लक्ष्मण येतसे उसळुनी अतिकायापुढे।
विशाल धनु खेची तो भात्यातुन् बाण काढुनी॥४७॥
पूरयन् स महीं सर्वामाकाशं सागरं दिश:।

ज्याशब्दो लक्ष्मणस्योग्रस्त्रासयन् रजनीचरान् ॥४८॥

धनुप्रत्यंचानाद त्याचा असे भयंकर।
निनादे ज्यामुळे पृथ्वी आकाश समुद्र तसे।
सर्व दिशांना घुमुनी निशाचरांना त्रासिले ॥४८॥

सौमित्रेश्चापनिर्घोषं श्रुत्वा प्रतिभयं तदा।
विसिस्मिये महातेजा राक्षसेन्द्रात्मजो बली॥४९॥

टणत्कार लक्ष्मणाच्या ऐकुनी तो भयानक्।
अतिकाय राक्षसपुत्र अतिविस्मित होतसे ॥४९॥

तदातिकाय: कुपितो दृष्ट्वा लक्ष्मणमुत्थितम्।
आदाय निशितं बाणमिदं वचनमब्रवीत्॥५०॥
लक्ष्मणा पाहुनि येता अतिकाय क्रुद्ध होतसे।
घेउनी हातात तीक्ष्ण बाण ऐसे बोलला ॥५०॥
बालस्त्वमसि सौमित्रे विक्रमेष्वविचक्षण:।
गच्छ किं कालसंकाशं मां योधयितुमिच्छसि॥५१॥
अससी बालक सौमित्रा अकुशल विक्रमात तू।
मागे जा मी तुझा काळ कशास लढण्या पाहसी॥५१॥

नहि मद्बाहुसृष्टानां बाणानां हिमवानपि।
सोढुमुत्सहते वेगमन्तरिक्षमथो मही॥५२॥
न सहे मम बाणांस गिरिराज हिमालय।
आकाश पृथ्वीही तसे सहन करती तयां॥५२॥
सुखप्रसुप्तं कालाग्नि विबोधयितुमिच्छसि।
न्यस्य चापं निवर्तस्व प्राणान्न जहि मद्गत:॥५३॥
प्रज्वलित का करसी सुप्त प्रलयाग्नीस तू।
जा सोडुनि धनु प्राणां वाचवी मजपासुनी॥५३॥

अथवा त्वं प्रतिस्तब्धो न निवर्तितुमिच्छसि।
तिष्ठ प्राणान् परित्यज्य गमिष्यसि यमक्षयम्॥५४॥
अथवा तू अहंकारी न जासि परत रहा।
उभा हरुनि प्राणांस यात्रा यमलोकी करी॥५४॥
पश्य मे निशितान् बाणान् रिपुदर्पनिषूदनान्।
ईश्वरायुधसंकाशांस्तप्तकाञ्चनभूषणम्॥५५॥
मग पहा मम बाणां करती रिपुगर्व दूर जे
तप्त सुवर्णभूषित शंकराच्या त्रिशूलासम ॥५५॥

एष ते सर्पसंकाशो बाण: पास्यति शोणितम्।
मृगराज इव क्रुद्धो नागराजस्य शोणितम्।
त्र्येवमुक्त्वा संकृद्ध: शरं धनुषि संपदे॥५६॥
कृद्ध वनराज जसा हत्तीचे रक्त पीतसे।
भयंकर सर्पासम तव रक्तपान हा शर ।
करील म्हणुनी ऐसे चढवी शर धनूवरी॥५६॥
श्रुत्वातिकायस्य वच: सरोषं सगर्वितं संयति राजपुत्र:।
स संचुकोपायिबलो मनस्वी उवाच वाक्यं च ततो महार्थम्॥५७॥

ऐकुनी वचना अतिकायाच्या मनस्वी राजकुमार लक्ष्मण।
बलशाली क्रोधित तो बोले महान अर्थयुक्त या वचना॥५७॥
न वाक्यमात्रेण भवान् प्रधानो न कत्थनात् सत्पुरुषा भवन्ति।
मयि स्थिते धन्विनि बाणपाणौ निदर्शयस्वात्मबलं दुरात्मन् ॥५८॥
बडबडीने न होसि महान् न बढाईने श्रेष्ठ पुरुष दुरात्म्या तू।
घेउनि धनुष्य बाण हाती मी उभा दाखव बल मज्ला तुझे ॥५८॥
कर्मणा सूचयात्मानं न विकथितुमर्हसि।
पौरुषेण तु यो युक्तः स तु शूर इति स्मृतः॥५९॥

कृतीने करी सिद्ध बढाई मारुनी नको।
त्यालाच मानती शूर पुरुषार्थ युक्त जो असे॥५९॥
सर्वायुधसमायुक्तो धन्वी त्वं रथमास्थित:।
शरैर्वा यदि वाप्यस्त्रैर्दर्शयस्व पराक्रमम्॥६०॥
शस्त्रे सर्व तुझ्यापाशी रथी बससी धनूसवे।
बाणे वा अन्य शस्त्रांनी पराक्रम दावि आपुला॥६०॥
तत: शिरस्ते निशितै: पातयिष्याम्यहं शरै:।
मारुत: कालसम्पक्वं वृन्तात् तालफलं यथा॥६१॥

तीक्ष्ण बाणांनी मस्तक तुझे कापुनी पाडिन।
जसा पक्व ताडफळा वायु उखडे मुळातुनी॥६१॥
अद्य ते मामका बाणास्तप्तकाञ्चनभूषणा:।
पास्यन्ति रुधिरं गात्राद् बाणशल्यान्तरोत्थितम् ॥६२॥
तप्तसुवर्णभूषित मम बाण करतील।
रक्तपान तव शरीरा पाडुनि छिद्र त्यातुनी॥६२॥
बालोऽयमिति विज्ञाय न चावज्ञातुमर्हसि।
बालो वा यदि वा वृद्धो मृत्युं जानीहि संयुगे॥६३॥

हे पोर म्हणुनी माझी न करी अवहेलना।
बालक किंवा वृद्ध युद्धात् काळ मी तुझा॥६३॥
बालेन विष्णुना लोकस्त्रय: क्रान्तास्त्रिविक्रमै:।
लक्ष्मणस्य वच: श्रुत्वा हेतुमत् परमार्थवत्।
अतिकाय: प्रचुक्रोध बानं चोत्तममाददे॥६४॥
बालक विष्णु व्यापी पावलें तीन त्रैलोक्य।
ऐकुनी लक्ष्मण बोल सयुक्तिक सत्यही तसे।
अतिकाय अतिक्रोधे घे करी बाण उत्तम ॥६४॥

ततो विद्याधरा भूता देवा दैत्या महर्षय:।
गुह्यकाश्च महात्मानस्तद् युद्धं द्रष्टुमागमन्॥६५॥
तदा विद्याधर भूत महर्षि दैत्य देवता ।
गुह्यकगण महात्मा येती पाहण्या युद्ध ते॥६५॥
ततोऽतिकाय: कुपितश्चापमारोप्य सायकम्।
लक्ष्मणाय प्रचिक्षेप संक्षिपन्निव चाम्बरम्॥६६॥
चढवी उत्तम बाण अतिकाय धनूवरी।
आकाशा गिळण्या जैसा चालवी लक्ष्मणावरी ॥६६॥

तमापतन्तं निशितं शरमाशीविषोपमम्।
अर्धचन्द्रेण चिच्छेद लक्ष्मण: परवीरहा॥६७॥
शत्रुसंहारी लक्ष्मण अर्धचन्द्राकार तीरे।
सर्पविषतुल्य बाणा टाकी मध्ये छेदुनी॥६७॥
तं निकृत्तं शरं दृष्ट्वा कृत्तभोगमिवोरगम्।
अतिकायो भृशं कृद्ध: पञ्च बाणान् समादधे॥६८॥
पाहुनी शरा खण्डित फणा सर्पाचा जसा।
अतिक्रोधे अतिकाये बाणपंचक योजिले॥६८॥

तान् शरान् सम्प्रचिक्षेप लक्ष्मणाय निशाचरः।
तानप्राप्तान शितैर्बाणैश्छिच्छेद भरतानुज॥६९॥
सोडि लक्ष्मणावरि तो शर पोचण्यापूर्वीच ते।
लक्ष्मण तयां खण्डित तीक्ष्ण बाणाने करी॥६९॥
स तान् छित्वा शितैर्बाणैर्लक्ष्मणः परवीरहा।
आददे निशितं बाणं ज्वलन्तमिव तेजसा॥७०॥
छेदुनिया त्या बाणांना लक्ष्मण घेइ हातात ।
एक ज्वलन्त बाण तेजाने तळपत् जो ॥७०॥

तमादाय धनु:श्रेष्ठे योजयामास लक्ष्मण:।
विचकर्ष च वेगेन विससर्ज च सायकम् ॥७१॥
ठेवी लक्ष्मण आपुल्या धनुष्यावरी बाण तो।
आणि अतिवेगाने सोडी तो अतिकायावरी ॥७१॥
पूर्णायतविसृष्टेन शरेण नतपर्वणा।
ललाटे राक्षसश्रेष्ठमाजघान स वीर्यवान् ॥७२॥
पूर्ण् खेचुनि सोडलेल्या बाणाने त्या लक्ष्मण।
ललाटे तीव्र आघात अतिकायाच्या तो करी॥७२॥

स ललाटे शरो मग्नस्तस्य भीमस्य रक्षस:।
ददृशे शोणितनाक्त: पन्नगेन्द्र इवाचले॥७३॥
भयानक राक्षसाच्या भाळि दिसे बाण तो।
रक्तलांछित नागासम सरपटणाऱ्या पर्वती॥७३॥
राक्षस: प्रचकम्पेऽथ लक्ष्मणेषु प्रपीडीत:।
तुद्रबानहतं घोरं यथा त्रिपुरगोपुरम्॥७४॥
चिन्तयामास चाश्वास्य विमृश्य च महाबल:।
कांपे राक्षस पीडित लक्ष्मण बाणे जसे

रुद्रबाणे आहत त्रिपुराचे भयंकर गोपुर॥७४॥
चिन्तेत पडुनी काही विचार करुनी बोलला।
साधु बाण निपातेन श्लाघनीयोऽसि मे रिपु:॥७५॥
विधायैव विदार्यास्यं नियम्य च महाभुजौ।
स रथोपस्थमास्थाय रथेन प्रचचार् ह॥७६॥
धन्य तू बाणप्रयोगे स्पृहणीय मम शत्रु तू॥७५॥
बोलुनी ऐसे अतिकाय विशाल् भुजांनी आपल्या।
आवरुनी रथी बैसे मागे नेई पुढे तया॥७६॥

एवं त्रीन् पंचसप्तेति सायकान् राक्षसर्षभः।
आददे संदधे चापि विचकर्षोत्ससर्ज च॥७७॥
एक तीन पांच सात तीर क्रमशः चढवी।
धनूवरी चालवी वेगपूर्वक खेचुनी प्रत्यंचा ॥७७॥
ते बाणाः कालसंकाशा राक्षसेन्द्रधनुश्च्युताः।
हेमपुङ्खा रविप्रख्याश्चक्रुर्दीप्तमिवाबरम्\।७८॥
राक्षसाने सोडलेले सूर्यतुल्य तेजस्वी
कालसम भयंकर नभ प्रकाशे भरले॥७८॥

ततस्तान् राक्षसोत्सृष्टान् शरौघान् राघवानुजः।
असंभ्रान्तं प्रचिच्चेद निशितैरबहुभिः शरैः॥७९॥
निशाचरे सोडलेल्या बाणसमूहा लक्ष्मण
छेदुनी टाकी तेजस्वी सायकानी अनेक ॥७९॥
तान् शरान् युधि सम्प्रेक्ष्य निकृत्तान् रावणात्मजः।
चुकोप त्रिदशेन्द्रारिर्जग्राह निशितं शरम्॥८०॥
पाहुनि विफल झाले ते शर रावणात्मज।
होई क्रोधित घे हाती इन्द्रारि अतितीक्ष्ण शर॥८०॥

स संधाय महातेजास्तं बाणं सहसोत्सृजत्।
तेन सौमित्रिमायान्तमाजघान स्तनान्तरे॥८१॥
सोडी सहज तो बाण महातेजस्वी वीर तो।
छातीवर लक्ष्मणाच्या आघात त्याने होतसे॥८१॥
अतिकायेन सौमित्रिस्ताडितो युधि वक्षसि।
सुस्राव रुधिरं तीव्रं मदं मत्त इव द्विपः॥८२॥
अतिकाय लक्ष्मणास छातीवरि छेदता।
रकताची धार वाहे मत्त गजाच्या मदासम॥८२॥

स चकार तदात्मानं विशल्यं सहसा विभु:।
ज्ग्राह च शरं तीक्ष्णमस्त्रेणापि समाददे॥८३॥
काढुनि टाकी लक्ष्मण छातीतुनि बाण तो।
आणि तीक्ष्ण बाण करी दिव्यास्त्र संयोजित॥८३॥
आग्नेयेन तदास्त्रेण योजयामास सायकम्।
स जज्वाल तदा बाणो धनुष्यस्य महात्मन:॥८४॥
आग्नेयास्त्रे करी बाण अभिमंत्रित लक्ष्मण।
ठेवता धनुषी बाण होई तत्काल प्रज्वलित ॥८४॥

अतिकायोऽतितेजस्वी रौद्रमस्त्रं समाददे।
तेन बाणं भुजङ्गाभं हेमपुङ्खमयोजयत्॥८५॥
रौद्रास्त्रा सुवर्णपंखी सर्पाकार बाणावर ।
समायोजित तेजस्वी अतिकाय तदा त्वरे॥८५॥
तदस्त्रं ज्वलितं घोरं लक्ष्मण: शरमाहितम्।
अतिकयाय चिक्षेप कालदण्डमिवान्तक:॥८६॥
त्यापूर्वी लक्ष्मण सोडी शर दिव्यास्त्रासवे।
यमराज कालदण्ड जैसा अतिकायावरी ॥८६॥

आग्नेयास्त्राभिसंयुक्तं दृष्ट्वा बानं निशाचर:।
उत्ससर्ज तदा बाणं रौद्रं सूर्यास्त्रयोजितम्॥८७॥
आग्नेयास्त्रासवे येता बाण पाहुनि निशाचर।
सूर्यास्ते अभिमन्त्रित बाण त्यावरि सोडित ॥८७॥
तावुभावम्बरे बाणावन्योन्यमभिजघ्नतु:।
तेजसा सम्प्रदीप्तायौ कृद्धाविव भुजङ्गमौ॥८८॥
तावन्योन्य विनिर्दह्य पेततु: पृथिवीतले॥८९॥
आकाशी ते दोन आदळति एकमेकावरी।

प्रदीप्त होत तेजाने जणु क्रुद्ध भुजंगम।
दग्ध एकमेकां करुनी पडती भूमीवरी॥८९॥
निरर्चिषौ भस्मकृतौ न भ्राजेते शरोत्तमौ।
तावुभौ दीप्यमानौ स्म न भ्राजेते महीतले॥९०॥
उत्तम शर ते होते स्वदीप्तीने प्रकाशित।
भस्म होता निष्प्रभ हो।उनी विशोभित॥९०॥
ततोऽतिकाय: संक्रुद्धस्त्वाष्ट्रमैषीकमुत्सृजत्।
ततश्चिच्छेद सौमित्रिरस्त्रमैन्द्रेण वीर्यवान् ॥९१॥

अतिकाय तेव्हां क्रुद्ध त्वष्टामन्त्रित करुनी।
सोडी बाण ऐन्द्रास्त्रे त्या लक्ष्मण निष्प्रभ करी॥९१॥
ऐषीकं निहतं दृष्ट्वा कुमरो रावणात्मज:।
याम्येनास्त्रेण संक्रुद्धो योजयामास सायकम्॥९२॥
ततस्तदस्त्रं चिक्षेप लक्ष्मणाय निशाचर:।
वायव्येन तदस्त्रेण निजघान स लक्ष्मण:॥९३॥
ऐषीक नष्ट पाहूनी अतिकाय अतिक्रोधित।
याम्याने अभिमन्त्रित सायकास करीतसे॥९२॥

लक्ष्मणा करुनी सोडी लक्ष्य तेव्हां लक्ष्मण।
सोडुनी वायव्यास्त्रा नष्ट त्यास करीतसे॥९३॥

टीप: ऐषीक म्हणजे त्वष्टामन्त्रित बाण

अथैनं शरधाराभिर्धाराभिरिव तोयद:
अभ्यवर्षत संक्रुद्धो लक्ष्मणो रावणात्मजम्॥९४॥

जसा करी वर्षा मेघ तैसा कोपित लक्ष्मण।
वर्षाव बाणधारांचा अतिकायवरी करी ॥९४॥

तेऽतिकायं समासाद्य कवचे वज्रभूषिते।

भग्नाग्रशल्या: सहसा पेतुर्बाणा महीतले॥९५॥
अतिकायावरी जाती लक्ष्मणबाण ज्यामुळे।
हिरेजडित कवचाचे त्याच्या हिरे गळति भूवरी॥९५॥
तान्मोघानभिसम्प्रेक्ष्य लक्ष्मन: परवीरहा।
अभ्यवर्षत बाणानां सहस्त्रेण महायशा:॥९६॥
होता असफल बाण शत्रुसंहारी लक्ष्मण।
सहस्त्रावधि बाणांचा पुनश्च वर्षाव करी॥९६॥
स वृष्यमाणो बाणौधैरतिकायो महाबल:।

अवध्यकवच: संख्ये राक्षसो नैव विव्यथे॥९७॥

वर्षाव बाणाचा होता अभेद्य कवचामुळे।
व्यथित नसे होत अतिकाय महाबल॥९७॥

शरं चाशीविषाकारं लक्ष्मणाय व्यपासृजत्।
स तेन विद्ध:सौमित्रिर्ममदेशे शरेण ह॥९८॥

बाण विषारी सर्पसम चालवी लक्ष्मणावरि।
त्यामुळे विद्ध होतसे मर्मस्थली लक्ष्मण॥९८॥

मुहूर्तमानं नि:संज्ञो ह्यभवच्छत्रुतापन:।

ततः सज्ञामुपालभ्य चतुर्भिः सायकोत्तमैः॥९९॥
निजघान हयान् संख्ये सारथिं च महाबलः।
ध्वजस्योन्मथनं कृत्वा शरवर्षेरिंदमः॥१००॥

अचेत काही काळ लक्ष्मण शत्रुतापन।
शुद्धीवरी परी येता वर्षाव बाणांचा करी॥९९॥
शत्रुच्या रथाची ध्वजा त्यामुळे नष्ट होतसे।
पुन्हा योजुनि लक्ष्मण चार् बाण उत्तम।
अश्व सारथि रथाचे यमलोकास पाठवी ॥१००॥

असंभ्रान्त: स सौमित्रिस्तान् शरानभिलक्षितान्।
मुमोच लक्ष्मणो बाणान् वधार्थं तस्य राक्षस:॥१०१॥
न शशाक रुजं कर्तुं युधि तस्य नरोत्त्म:।
लक्ष्मण विचारपूर्वक ज्ञात सर्व अमोघ त्या।
राक्षसावरि सोडी बाण् तथापि घेति न ते॥१०१॥
शरीराचा राक्षसाच्या समराङ्गणि वेध ते।
अथैनमभ्युपागम्य वायुर्वाक्यमुवाच ह॥१०२॥
ब्रह्मदत्तवरो ह्येष अवध्यकवचावृत:।

ब्राह्मणास्त्रेण भिन्ध्येनमेष वधो हि नान्यथा।
अवध्य एष ह्यन्येषामस्त्राणां कवची बली॥१०३॥
वायुदेवता नंतर त्याजवळी जाउनि वदे॥१०२॥
राक्षसास असे प्राप्त वरदान ब्रह्माजिचे।
कर विदीर्ण तू यास ब्रह्मास्त्रास योजुनि।
अवध्य अन्य अस्त्रे हा अभेध्य कवचामुळे॥१०३॥
ततस्तु वायोर्वचनं निशम्य सौमित्रिरिन्द्रप्रतिमानवीर्य:।
समादधे बाणमथोग्रवेगं तद्ब्राह्ममस्त्रम् सहसा नियुज्य॥१०४॥

ऐकोनि ते वचन वायुदेवाचे इन्द्रासम पराक्रमी लक्ष्मण।
बाणावर् योजूनि अतिवेगशाली ब्रह्मास्त्र ठेवी स्वधनूवरी ॥१०४॥
तस्मिन् वरास्त्रे तु नियुज्यमाने सौमित्रिणा बाणवरे शिताग्रे।
दिशश्च चन्द्रार्कमहाग्रहाश्च नभश्च तत्रास ररास चोर्वी॥१०५॥
वरास्त्रा त्या योजितसे लक्ष्मण बाणावरी आपुल्या तदा।
दिशा सर्व चन्द्रार्क महाग्रह नभ त्रासति प्रभावे तयाच्या॥१०५॥
तं ब्रह्मणोऽस्त्रे नियुज्य चापे शरं सपुंखं यमदूतकल्पम्।
सौमित्रिरिन्द्रारिसुतस्य् तस्य ससर्ज बाणं युधि वज्रकल्पम्॥१०६॥

ते ब्रहमणास्त्र योजुनि धनूवरी तीरे सपुंख यमदूतच जणु।
सोडी लक्ष्मण इन्द्रशत्रु सुतावरी युद्धात वज्रासम बाण तो॥१०६॥
तं लक्ष्मणोत्सृष्टविवृद्धवेगं समापतन्तं श्वसनोग्रवेगम्।
सुपर्णवज्रोत्तमचित्रपुङ्खम् तदातिकाय: समरे ददर्श॥१०७॥
तो लक्ष्मणे सोडलेला वेगवान् बाण श्वसनवेगे पडे जो
सुपर्ण वज्रासम शोभित विचित्र अतिकाय पाही रणात॥१०७॥
तं प्रेक्षमाण: सहसातिकायो जघान बाणैर्निशितैरनैकै:।
स सायकस्तस्य सुपर्णवेगस्तथातिवेगेन जगाम पार्श्वम्॥१०८॥

त्या पाहुनि अतिकाय सोडीतसे अनेक तीक्ष्ण बाण त्यावरी।
तरीही तो ब्रह्मास्त्रयुक्त बाण् अतिवेगे येताना दिसे तया ॥१०८॥

तमागतं प्रेक्ष्य तदातिकायो बाणं प्रदीप्तान्तककालकल्पम्।
जघान शक्त्यृष्टिगदाकुठारै:शूलै: सरैश्चाप्यविपन्नचेष्ट:॥१०९॥

पाहून येता तया अतिकाय जो बाण् कालाग्निसम प्रज्वलित
नष्ट करण्या योजि अतिकाय शक्ति ऋष्टि गदा कुठार् शूल॥१०९॥

तान्यायुधान्यद्भुतविग्रहाणि मोघानि कृत्वा स शरोऽग्निदीप्त:
प्रगृह्य तस्यैव किरीटजुष्टं तदातिकायस्य शिरो जहार॥११०॥

परन्तु त्या सर्वां अस्त्रां व्यर्थ करी तो शर अग्निप्रदीप्त।
आणि अतिकायाच्या मुकुटमण्डित शिरा तोडी धडापासुनी॥११०॥
तच्छिर: सशिरास्त्राणं लक्ष्मणेषुप्रमर्दितम्।
पपात सहसा भूमौ शृंगं हिमवतो यथा॥१११॥
ते शिर सशिरस्त्राण् जे लक्ष्मणबाणे तुटे।
हिमालय शैखरापरि पडे जाउनि भूवरी ॥१११॥
तं भूमौ पतितं दृष्ट्वा विक्षिप्ताम्बरभूषणम्।
बभूवुर्व्यथिता: सर्वे हरशेषा निशचरा:॥११२॥

भूवरी पाहुनी पड्ता वस्त्रभूषण विखरुनी।
निशाचर वाचलेले होती समस्त व्यथित॥११२॥
ते विषण्णमुखा दीना: प्रहारजनितश्रमा:।
विनेदुरुच्चैर्बहव: सहसा विस्वरै: स्वरै:॥११३॥
विषण्णमुख ते दीन थकलेले युद्धश्रमे।
विव्हळती जोराने विकृत स्वर् काढुनी॥११३॥
ततस्तत्परितं याता निरपेक्षा निशाचरा:।
पुरीमभिमुखा भीता द्रवन्तो नायके हते॥११४॥

त्यामुळे निशाचरांचा नष्ट उत्साह होउनी।
नष्टनायक भयभीत पुरीस जाती त्वरित॥११४॥
प्रहर्षयुक्ता बहवस्तु वानरा: प्रफुल्लपद्मप्रतिमाननास्तदा।
अपूजयैल्लक्ष्मणमिष्टभागिनं हते रिपो भीमबले दुरासदे॥११५॥
हर्षित उत्साहित वानर सर्व प्रफुल्लित कमलासम मुखे ।
करती विजयी वीर लक्ष्मणाची प्रशंसा मारता दुर्जय शत्रुस ॥११५॥
अतिबलमतिकायमभ्रकल्पं युधि विनिपात्य स लक्ष्मण: प्रहृष्ट:।
त्वरितमथ तदा स रामपार्श्वं कपिनिवहैश्च सुपूजितो जगाम॥११६॥

मारुनी अतिबलवान मेघासम विशाल अतिकाया प्रसन्न लक्ष्मण।
होउनी सन्मानित सर्व वानरे जाती ते त्वरित श्रीरामचन्द्राकडे॥११६॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाणे एकसप्ततितम: सर्ग:॥७१॥

युद्धकाण्ड सर्ग ७२

अतिकायं हतं श्रुत्वा लक्ष्मणेन महात्मना।
उद्वेगमगमद् राजा वचन् चेदमब्रवीत् ॥१॥
लक्ष्मणाने अतिकाया मारिले वृत्त ऐकुनी।
उद्विग्न होउनि राजा रावण ऐसे बोलला॥१॥
धूम्राक्ष: परमामर्षी सर्वशस्त्रभृतां वर:।
अकम्पन: प्रहस्तस्य कुम्भकर्णतथैव च॥२॥

एते महाबला वीरा राक्षसा युद्धकांक्षिण:।
जेतार:परसैन्यानां परैर्नित्यापराजिता:॥३॥
ससैन्यास्ते हता वीरा रामेणाक्लिष्टकर्मणा।
राक्षसा: सुमहाकाया नानाशस्त्रविशारदा:॥४॥
अन्ये च बहव: शूरा महात्मानो निपातिता:।
धूम्राक्ष शत्रुहन्ता शूर शस्त्रधारी मध्ये।
अकम्पन कुम्भकर्ण प्रहस्तही तयांसवे॥२॥
ऐसे महाबली वीर युद्धकांक्षी राक्षस।

जिंकणारे शत्रुसैन्या सर्वदा अपराजित॥३॥
राक्षसांना महाकाय नानाशस्त्र विशारदा।
सैन्यासह मारी त्यांना श्रीराम महाबली॥४॥
अन्यही शूरवीरांना श्रीरामाने मारले।
प्रख्यातबलवीर्येण् पुत्रेणेन्द्रजिता माम॥५॥
तौ भ्रातरौ तदा बद्धौ घोरेर्दत्तवरै: शरै:।
यन्न शक्यं सुरे: सर्वैरसुरैर्वा महाबलै:॥६॥
प्रख्यात बलवान वीर इन्द्रजिताने मम॥५॥

बन्धूंस बान्धले त्याने घोर प्राप्त वरे शरे।
जे न शक्य सुरां तसे असुरांही महाबली॥६॥
मोक्तुं तद्बन्धनं घोरं यक्षगन्धर्व पन्नगै:।
तन्न जाने प्रभावैर्वा मायया मोहनेन वा॥७॥
शरबन्धात् विमुक्तौ तौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ।
ये योधा निर्गता शूरा राक्षसा मम शासनात्॥८॥
मुक्त त्यांना करणे यक्षगन्धर्वपन्नगा।
न जमे परि प्रभावाने मायेने वा मोहने॥७॥

मुक्त शरबन्धातून बन्धु ते रामलक्ष्मण।
योद्धे राक्षस जे शूर माझे सैनिक॥८॥
ते सर्व निहता युद्धे वानरैः सुमहाबलैः।
तं न पश्याम्यहं युद्धे योऽद्य रामं सलक्ष्मणम्॥९॥
नाशयेत् सबलं वीरं सुग्रीवं बिभीषणम्।
अहो सुबलवान् रामो महदस्त्रबलं च वै॥१०॥
धावती त्या सर्वांना मारती वानरवीर ते।
न दिसे कोणी मज जो करिल नाश युद्धात॥९॥

श्रीराम लक्ष्मणासह सुग्रीवा नि बिभीषणा।
खरोखर बलवान राम महा अस्त्रबलासह॥१०॥
यस्य विक्रममासाद्य राक्षसा निधनं गता:।
तं मन्ये राघवं वीरं नारायणमनामयम्॥११॥
ज्याच्या पराक्रमाने पावती निधन राक्षस।
तो राघव मज वाटे नारायण दुसरा जणु॥११॥
तद्भयाद्धि पुरी लंका पिहितद्वारतोरणा।
अप्रमत्तैश्च सर्वत्र गुल्मे रक्ष्या पुरी त्वियम्॥१२॥

त्याच्या भयाने लंकेचे रक्षिणे द्वारतोरण।
नगरीमध्ये जेथे वस्ती सावध तेथे रहा ॥१२॥
अशोकवनिका चैव यत्र सीताभिरक्ष्यते।
निष्क्रमो वा प्रवेशो वा ज्ञातव्य: सर्वदैव न:॥१३॥
अशोकवनिका जेथे सीतेस रक्षणि ठेवले।
प्रवेशे कोण निघे कोण ठेवा ज्ञात आम्हा।
यत्र यत्र भवेद् गुल्मस्तत्र तत्र पुन: पुन:।
सर्वतश्चापि तिष्ठध्वं स्वै: स्वै: परिवृता बलै:॥१४॥

जिथे जिथे असे वस्ती त्याठिकाणी पुन:पुन्हा।
राहुनिया सैन्यासह लक्ष ठेवा सर्वत्र् ॥१४॥
द्रष्टव्यं च पदं तेषां वानराणां निशाचरा:।
प्रदोषे वार्धरात्रे वा प्रत्यूषे वापि सर्वश:॥१५॥
निशाचर वानरांवरी लक्ष ठेवा जाती कुठे।
प्रात:काली सायंकाळि किवा अर्धरात्रीसही॥१५॥
नावज्ञा तत्र कर्तव्या वानरेषु कदाचन्।
द्विषतां बलमुद्युक्तमापतत् किं स्थितं यथा॥१६॥

वानरांकडे दुर्लक्ष कधीही करू नका।
जरी शस्त्रासह येती अथवा राहती स्थित॥१६॥
ततस्ते राक्षसा: सर्वे श्रुत्वा लङ्काधिपस्य तत्।
वचनं सर्वमातिष्ठन् यथावत् तु महाबला:॥१७॥
तेव्हां ते सर्व राक्षस ऐकुनि लङ्काधिपाचे ।
वचन सर्व रहाती योग्य प्रकारे महाबली॥१७॥
तान् सर्वान् हि समादिश्य रावणो राक्षसाधिप:।
मन्युशल्यं वहन् दीन: प्रविवेश स्वमालयम्॥१८॥

सूचना अश्या सर्वांना देउनि राक्षसाधिप।
बाळगीत मनि चिन्ता प्रवेशी स्वप्रासादी॥१८॥
तत: स सन्दीपितकोपवह्निर्निशाचराणामधिपो महाबल:।
तदेव पुत्रव्यसनं विचिन्तयन् मुहुर्मुहुश्चैव तदा विनिश्वसन्॥१९॥
तेव्हां रागाचा पारा चढलेला निशाचरपति महाबली।
पुत्रमृत्यु संकटाचा विचार करीत निश्वास सोडी हळूहळू॥१९॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे द्विसप्ततितम: सर्ग:॥७२॥

युद्धकाण्ड सर्ग ७३

ततो हतान् राक्षसपुङ्गवांस्तान् देवान्तकादित्रिशिरोऽतिकायान्।
रक्षोगणास्तत्र हतावशिष्टास्ते रावणाय त्वरिता: शशंसु॥१॥
मरता असे राक्षस वीर मुख्य देवान्तक त्रिशिर अतिकाय सर्व।
राक्षसगण त्यातुन राहती जिवंत रावणा त्वरित जाउनि भेटताती ॥१॥
ततो हतांस्तान् सहसा निशम्य राजा महाबाष्पपरिप्लुताक्ष:।
पुत्रक्षयं भ्रातृवध् च घोरं विचिन्त्य राजा विपुलं प्रदध्यौ ॥२॥

मृत् जे तयां आठवून येती भरून डोळे अश्रुनी राजाचे तदा।
पुत्रांसवे बन्धूचा वध घोर यांच्या विचारे राजा अतिदु:खि होई॥२॥
ततस्तु राजानमुदीक्ष्य दीनं शोकार्णवे सम्परिपुप्लुवानम्।
रथर्षभो राक्षसराजसूनुस्तमिन्द्रजिद् वाक्यमिदं बभाषे॥३॥
पाहूनि राजास असे दीन होत बुडूनि जाता शोकसागरी।
रथात बसलेला राक्षसराजपुत्र् इन्द्रजित् बोलत वाक्य ऐसे ॥३॥
न तात मोहं परिगन्तुमर्हसे यत्रेन्द्रजिज्जीवति नैॠतेश।
नेन्द्रारिबाणाभिहतो हि कश्चित् प्राणान् समर्थ: समरेऽभिपातुम्॥४॥

न दु:ख करणे योग्य तात तुम्हा जोवरी जीवित असे इन्द्रजित।
हा इन्द्रशत्रु न बाणा कुणाच्या घाबरे प्राणही समरी देऊ शकतो॥४॥
पश्याद्य रामं सह लक्ष्मणेन मद्बाणनिर्भिन्नविकीर्णदेहम्।
गतायुषं भूमितले शयानं शितै:सरैराचितसर्वगात्रम्॥५॥
पाह्शील मम बाणे छिन्नदेह रामासह लक्ष्मणासही तू।
मरूनि भूमीवरी पडतील ते छिन्न शरीरे मम बाणांनी ते॥५॥
इमां प्रतिज्ञा शृणु शक्रशत्रो: सुनिश्चितां पौरुषदैवयुक्ताम्।
अद्यैव रामं सह लक्ष्मणेन संतर्पयिष्यामि शरैरमोघै:॥६॥

प्रतिज्ञा या इन्द्रशत्रुची ऐक पौरुष दैवयुक्त सुनिश्चित।
आजच रामासह लक्ष्मणा करीन ठार मम बाणे अमोघा॥६॥
अद्यैन्द्रवैवस्वतविष्णुरुद्र साध्याश्च वैश्वानरचन्द्रसूर्याः।
द्रक्ष्यन्ति मे विक्रममप्रमेयं विष्णोरिवोग्रं बलियज्ञवाटे ॥७॥
पाहतील वैवस्वत विष्णु रुद्र तसेच वैश्वानर चन्द्रसूर्य
आजच मम पराक्रम अप्रतिम विष्णुच्या बलियज्ञापरी ॥७॥
स एवमुक्त्वा त्रिदशेन्द्रशत्रुरापृच्छय राजानमदीनसत्त्वः।
समारुरोहानिलतुल्यवेगं रथं खरश्रेष्ठसमाधियुक्तम्॥८॥

बोलून ऐसे तो इन्द्रशत्रु पुसूनि दीन झालेल्या पित्यास ।
चढे रथी वेग ज्याचा वाऱ्यासमान जोडले खर श्रेष्ठ वेगवान्॥८॥
समास्थाय महातेजा रथं हरिरथोपमम्।
जगाम सहसा तत्र यत्र युद्धमरिंदम॥९॥
बैसे चढुनि महातेज रथी हरिरथासम्।
त्वरेने जातसे जेथे युध्ह चाले भयंकर॥९॥
तं प्रस्थितं महात्मानमनुजग्मुर्महाबला:।
संहर्षमाणा बहवौ धनु:प्रवरपाणय:॥१०॥

निघालेल्या महात्म्या त्या अनेक अनुसरति।
हर्षाने घेउनि हाती महावीर धनुबाणासवे ॥१०॥
गजस्कंधगता: केचित् केचित् परमवाजिभि:।
व्याघ्रवृश्चिकमार्जारखरोष्ट्रैश्च भुजङ्गमै:॥११॥
जाती हत्तीवरुनी काही काही घोड्यावरुनी।
वाघ वृश्चिक मार्जारखर उंट भुजगासवे॥११॥
वराहै:श्वापदै: सिहैर्जम्बुकै: पर्वतोपमै:।
काकहंसमयूरैश्च राक्षसा भीमविक्रमा:॥१२॥

श्वापदे डुक्कर् सिंह कोल्हे पर्वतोपम।
काकहंसमयूर यांनी भीमविक्रम राक्षस॥१२॥
प्रास पट्टिशनिस्त्रिंशपरश्वधगदाधरा:।
भुशुण्डिमुद्गरायष्टिशतघ्नीपरिघायुधा:॥१३॥
शस्त्रे युक्त तसे प्रास पट्टिश परुश गदा।
भुशुण्डि मुद्गर यष्टिशतग्नी परिघांसह॥१३॥
स शङ्खनिनदै: पूर्णैर्भेरीणां चापि नि:स्वनै:।
जगाम त्रिदशेन्द्रारिराजिं वेगेन वीर्यवान॥१४॥

ते शंखनिनादे उच्च भेरींच्या गर्जनेमुळे।
वेगामुळे उच्च स्वरे त्रिदशेन्द्रा जागविती॥१४॥
स शङ्खशशिवर्णेन छत्रेण रिपुसूदनः।
रराज प्रतिपूर्णेन नभश्चन्द्रमसा यथा॥१५॥
शशिवर्णी शंखधारी छत्राने रिपुसूदन।
नभातिल परिपूर्ण चन्द्रापरि विराजत॥१५॥
वीज्यमानस्ततो वीरो हेमैर्हेमविभूषणः।
चारुचामरमुख्यैश्च मुख्यः सर्व धनुष्मताम्॥१६॥

सुवर्णभूषणे भूषित हेम सुन्दर चामरे।
झळकतसे मुख्य तो सर्व धनुर्धारींचा तदा॥१६॥
स तु दृष्ट्वा विनिर्यान्तं बलेन महता वृतम्।
राक्षासाधिपतिः श्रीमान् रावणः पुत्रमब्रवीत्॥१७॥
मोठ्या सैन्यासवे ऐशा निघता त्यास पाहुनि। ।
राक्षसाधिप रावण स्वपुत्रा बोलला असे॥१७॥
त्वमप्रतिरथः पुत्र त्वया वै वासवो जितः।
किं पुनर्मानुषं धृष्यं निहनिष्यसि राघवम्॥१८॥

पुत्रा अजिंक्य अससी इन्द्रास जिंकलेस तू।
मग राघव तर माणुस त्याची काय कथा॥१८॥
तथोक्तो राक्षसेन्द्रेण् प्रत्यगृह्णान्महाशिष:।
तत्स्त्वन्द्रजिता लङ्का सूर्यप्रतिमतेजसा॥१९॥
असे बोलुनि रावण देतसे त्या महाशिष।
सूर्यासम झळके ज्या लंका सोडता तया॥१९॥
रराजाप्रतिवीर्येण द्यौरिवार्केण भास्वता।
स सम्प्राप्य महातेजा युद्धभूमिमरिंदम:॥२०॥

अतुल्य पराक्रमे राजा चमके सूर्यासम ।
शत्रुविजयी महातेज पोचतसे रणावरी॥२०॥
स्थापयामास रक्षांसि रथं प्रति समन्तत:।
ततस्तु हुतभोक्तारं हुतभुक्सदृशप्रभ:॥२१॥
ठेवितसे राक्षसांना रथाच्याभोवती तदा।
दिसे आहुति देणाऱ्यां झळके आहुतीसम॥२१॥
जुहुवे राक्षसश्रेष्ठो विधिवन्मन्त्रसत्तमै:
सहविर्लाजसत्कारैर्माल्यगन्धपुरस्कृतै:॥२२॥

राक्षसश्रेष्ठ विधिवत् मन्त्रे करती हवन।
यज्ञात आहुती देती योग्य पुष्पे गन्धित॥२२॥
जुहुवे पावकं तत्र राक्षसेन्द्र प्रतापवान्।
शस्त्राणि शरपत्राणि समिधोऽथ बिभीतका:॥२३॥
राक्षसराज्ञे तेव्हां अग्नीत शस्त्रे अर्पिली।
तशीच् शरपत्रेही समिधा अग्नी बिभितिका॥२३॥
लोहितानि च वासांसि स्रुवं काष्णायसं तथा।
स तत्राग्नि समास्तीर्य शरपत्रै: सतोमरै:॥

घालुनिया वस्त्रे लाल कर्णभूषणे सुन्दर।
शर पर्णे तोमरे ते आग पसरवती॥२४॥
छागस्य कृष्णवर्णस्य गलं जग्राह जीवत:।
सकृदेव समिद्धस्य विधूमस्य महार्चिष:॥२५॥
जिवंत काळ्या बोकडा गळा कापुनि अर्पिला।
यज्ञबळीच्या ज्वाला शान्त होती तदा॥२५॥
बभूवुस्तानि लिङ्गानि विजयं मान्यदर्शयन्।
प्रदक्षिणावर्तशिखस्तप्तकाञ्चनसंनिभ:॥२६॥

ती अशी असती प्रतीके विजय दर्शक।
प्रदक्षिणामार्ग दिसे ज्व्वलन्त सुवर्णापरी॥२६॥
हविस्तत् प्रतिजग्राह पावक: स्वयमुत्थित:।
सोऽस्त्रमाहारयामास ब्राह्मस्त्रविशारद:॥२७॥
स्वत:अग्नी उठुनी स्वीकारी आहुति तदा ।
ब्रह्मास्त्र पारंगत तो करी ते शस्त्र धारण॥२७॥
धनुश्चात्मरथं चैव सर्व तत्राभ्यमन्त्रयत्।
तस्मिन्नाहूयमानेऽस्त्रे हूयमाने च पावके।

सार्कग्रहेन्दुनक्षत्रं वितत्रास नभस्थलम्॥२८॥

धनुष्य आपला रथ अभिमन्त्रित तो करी।

करिता आवाहन त्याने अस्त्रां अग्नीस तेधवा।

सूर्य ग्रह चन्द्रमा तदा नभी जाति त्रासुनी॥२८॥

स पावकं पावकदीप्ततेजा हुत्वा महेन्द्रप्रतिमप्रभाव:।

स चापबाणासिरथाश्वसूत:खेऽन्तर्दधेऽऽत्मानमचिन्त्यवीर्य:॥२९॥

तो अग्निला अग्नितेजे इन्द्रासम वैभवे आहुति अर्पित।

अचिन्त्य वीर तो भगवान सचापबाण विलीन होत नभी॥२९॥

ततो हय रथाकीर्णं पताकाध्वजशोभितम्।
निर्ययौ राक्षसबलं नर्दमानं युयुत्सया॥३०॥
रथावरि आरूढ जे पताकाध्वज शोभित।
निघे राक्षससैन्य करित महागर्जना ॥३०॥
ते शरैर्बहुभिश्चित्रैस्तीक्ष्णवेगैरलंकृतै:।
तोमरैरङ्कुशैश्चापि वानराञ्जघ्नुराहवे॥३१॥
चित्रविचित्र आणि तीक्ष्ण शर घेउनी।
तोमर अंकुश यानी वानरां वधण्यास्तव॥३१॥

रावणिस्तु सुसंकृद्धस्तान् निरीक्ष्य निशाचरान्।
हृष्टा भवन्तो युध्यन्तु वानराणां जिघांसया॥३२॥|
इन्द्रजित हृष्ट पाहूनी निशाचरांना क्रोधित ।
आणि युद्धास्तव युयुत्सु वानरांच्या सवे॥३२॥
ततस्ते राक्षसा: सर्वे गर्जन्तो जयकांक्षिण:।
अभ्यवर्षस्ततो घोरं वानरान् शरवृष्टिभि:॥३३॥
जिंकण्या उत्सुक सर्व राक्षस गर्जती तदा।
करती शरवर्षाव घोर ते वानरांच्यावरी॥३३॥

स तु नालीकनाराचैर्गदाभिर्मुसलैरपि।
रक्षोभि: संवृत्: संख्ये वानरान् विचकर्ष ह॥३३॥
तसेच नालीक नाराच गदा मुसळांसह।
राक्षसांनी आवृत्त वानरां युद्धात ओढि तो॥३३॥
ते वध्यमाना: समरे वानरा: पादपायुधा:।
अभ्यवर्षन्त सहसा रावणिं शैलपादपै:॥३५॥
तेही रणात उतरुनि वृक्षशस्त्रे योजुनी।
राक्षसांवरि वर्षाव करती वृक्षशिळांचा॥३३॥

इन्द्रजित् तु तदा क्रुद्धो महातेजा महाबलः।
वानराणां शरीराणि व्यधमद् रावणात्मजः॥३६॥
इन्द्रजित् महातेज क्रुद्ध होत महाबली।
शरीरां वानरांच्या तो शस्त्रे जखमी करी॥३६॥
शरेणैकेन च हरीन् नव पंच च सप्तच।
बिभेद समरे क्रुद्धो राक्षसान सम्प्रहर्षयन्॥३७॥
एकाच बाणाने तो नऊ पांच सात असे।
मारे वानरां पाहुनी राक्षस अतिहर्षित॥३७॥

स शरैः सूर्यसंकाशैःशातकुम्भविभूषणैः।
वानरान् समरे वीरः प्रममाथ सुदुर्जयः॥३८॥
सूर्यासम तेजस्वी बाणांनी विभूषित।
वीर दुर्जय समरी तो वानरां त्रस्त करी॥३८॥
ते भिन्नगात्रा समरे वानराः शरपीडिताः।
पेतुर्मथितसंकल्पाः सुरैरिव महासुराः॥३९॥
युद्धात जखमी होती वानर बाणावर्षावे।
माघार घेऊ लागति असुरासमोर जसे सुर॥३९॥

ते तपन्तनिवादित्यं घोरैर्बाणगभस्तिभि:।
अभ्यधावन्त संक्रुद्धा: संयुगे वानरर्षभा:॥४०॥
बाणांनी राक्षसांच्या सूर्यासम तापदायक।
पळू लागति युद्धात रणी वानरवीर ते॥४०॥
ततस्तु वानरा: सर्वे भिन्नदेहा विचेतस:।
व्यथिता विद्रवन्ति स्म रुधिरेण समुक्षिता:॥४१॥
सर्व वानर तेव्हां अचेत जखमी होउनी।
रक्ताने जणु न्हालेली व्यथित रण सोडती॥४१॥

रामस्यार्थे पराक्रम्य वानरांस्त्यक्तजीविता:।
नर्दन्तस्तेऽनिवृत्तस्तु समरे सशिलायुधा:॥४२॥
रामास्तव लढूनी देती प्राण तरी कपि।
माघार न घेता लढती शिळाहाती घेउनी॥४२॥
ते द्रुमै: पर्वताग्रैश्च शिलाभिश्च प्लवङ्गमा:।
अभ्यवर्षन्त समरे रावणिं समवस्थिता:॥४३॥
पर्वताग्रे तसे वृक्ष शिळा मोठ्या घेउनी।
रावणसैन्यावरी रणी मारा करती वानर॥४३॥

तं द्रुमाणां शिलानां च वर्षं प्राणहरं महत्।
व्यपोहत महातेजा रावणै: समितिंजय:॥४४॥
वृक्ष आणि शिळांचा मारा तो प्राणहारक।
करी नष्ट महातेज रावणपुत्र पराक्रमी॥४४॥
तत: पावकसंकाशै: शरैराशीविषोपमै:।
वानराणामनीकानि बिभेद समरे प्रभु:॥४५॥
तेव्हां अग्नीसम विषारी शरवर्षावे।
अनेक वानरांना प्रभु युद्धात् ठार करी॥४५॥

अष्टादशशरैस्तीक्ष्णै: स विद्ध्वा गन्धमादनम्।
विव्याध नवभिश्चैव नलं दूरादवस्थितम्॥४६॥
गन्धमादना वर तो सोडी अठरा तीक्ष्ण बाण।
दूरस्थ नलावरती नऊ बाण सोडीतसे ॥४६॥
सप्तभिस्तु महावीर्यो मैन्दं मर्मविदारणै:।
पंचभिर्विंशिखैश्चैव गजं व्इव्याध संयुगे॥४७॥
मर्मविदारक सात बाणांनी वेधि मैंदास तो।

पांच बाणांनी युद्धात गजास जखमी करी॥४७॥

जाम्बवन्तं तु दशभिर्नीलं त्रिंशद्भिरेव च।

सुग्रीवमृषभं चैव सोऽङ्गदं द्विविदं तथा॥४८॥

जाम्बवन्ता दहा बाण तीस नीलास मारले।

सुग्रीव ऋषभा तैसे अंगदा द्विविदा तसे॥४८॥

घोरैर्दत्तवरैस्तीक्ष्णैर्निष्प्राणानकरोत् तदा।

अन्यानपि तथा मुख्यान् वानरान् बहुभि:शरै:॥४९॥

करी निष्प्राण तो मुख्य अन्यही वानरांस तो।

वरे प्राप्त घोर तीक्ष्ण अनेक बाण योजुनी॥४९॥
अर्दयामास संकृद्धः कालाग्निरिव मूर्च्छितः।
स शरैः सूर्यसंकाशैः सुमुक्तैः शीघ्रगामिभिः॥५०॥
कालाग्निसम संकृद्ध तेजस्वी सूर्यासम ।
सोडुनी वेगाने तीर करी मूर्च्छित तयां॥५०॥
वानराणामनीकानि निर्ममन्थ महारणे।
आकुलां वानरीं सेना शरजालेन पीडिताम्॥५१॥
वानरांपैकी अनेकांचे तो रणी मन्थन करी।

वानरसेना पीडित त्याच्या बाणांनी होतसे॥५१॥
हृष्टः स परया प्रीत्या ददर्श क्षतजोक्षिताम्।
पुनरेव महातेजा राक्षसेन्द्रात्मजो बली॥५२॥
त्याना घायाळ झालेले पाहुनी राक्षसात्मज।
अति आनंदित होई महातेजस्वी तो पुन्हा॥५२॥
संसृज्य बाणवर्षं च शस्त्रवर्षं च दारुणम्।
ममर्द वानरानीकं परितस्त्विन्द्रजिद् बली॥५३॥
वर्षाव बाणांचा तसा शस्त्रांचा भयानक।

करुनि वानरसैन्या इन्द्रजित् घायाळ करी॥५३॥
स्वसैन्यमुत्सृज्य समेत्य तूर्णं महाहवे वानरवाहिनीषु।
अदृश्यमान: शरजालमुग्रं ववर्ष नीलाम्बुधरो यथाम्बु॥५४॥
सोडूनि स्वसैन्य जाइ वेगे विशाल वानरसैन्यात शिरे तो।
अदृश्य राहूनि सोडी शर उग्र जणु जल नीलमेघातुनि ॥५४॥
ते शक्रजिद्बाणविशीर्णदेहा मायाहता विस्वरमुन्नदन्त:।
रणे निपेतुर्हरयोऽद्रिकल्पा यथेन्द्रवज्राभिहता नगेन्द्रा:॥५५॥
इन्द्रजितबाणे विशीर्ण देह होती ते आणि विह्वळती रणी ।

पडती वानर गिरीसम जशी इन्द्रवज्रे हत पर्वताग्रे॥५५॥
ते केवलं संददृशु: शिताग्रान् बाणान् रणे वानरवाहिनीषु।
मायाविगूढं च सुरेन्द्रशत्रुं न चात्र तं ताक्षसमप्यपश्यन्॥५६॥
वानरसैन्यात केवळ तीक्ष्ण बाण रणी दिसती तयां।
परि मायेने अदृश्य इन्द्रशत्रु इन्द्रजिता न पाहू शकती॥५६॥
तत: स रक्षोधिपतिर्महात्मा सर्वा दिशो बाणगणै: शिताग्रै:।
प्रच्छादयामास रविप्रकाशैर्विदारयामास च वानरेन्द्रान्॥५७॥
तदा तो राक्षसनायक महान् सोडीत तीक्ष्ण बाण सर्व दिशांना।

सूर्यकिरणांपरी उच्छाद मांडी करूनि घायाळ सर्व वानरेन्द्रा॥५७॥

स शूलनिस्त्रिंशपरश्वधानिव्याविद्धदीप्तानलसप्रभाणि।

सविस्फुलिङ्गोज्ज्वलपावकानि ववर्ष तीव्रं प्लवगेन्द्रसैन्ये॥५८॥

भाले कुऱ्हाडी तलवार शस्त्रे वापरुनी धगधगत्या अग्नीप्रमाणे।

करी जणु तीव्र वर्षाव अग्निस्फुल्लिंगांचा प्लवगेन्द्रसैन्यावरी॥५८॥

ततो ज्वलनसंकाशैर्बाणैर्वानरयूथपा:।

ताडिता: शक्रजिदबाणै: प्रफुल्ला इव किंशुका:॥५९॥

तेव्हां इन्द्रजिताचे अग्निसम बाण लागुनी।

दिसती वानरवीर घायाळ पळसापरी॥५९॥
तेन्योन्यमभिसर्पन्तो निनदन्तश्च विस्वरम्।
राक्षसेन्द्रास्त्रनिर्भिन्ना निपेतुर्वानरर्षभा:॥६०॥
एकमेकावरी पडती विव्हळत उच्च स्वरे।
शस्त्रांनी राक्षसेन्द्राच्या घायाळ होउनि ते॥६०॥
उदीक्षमाणा गगनं केचिन्नेत्रेषु ताडिता:।
शरैर्विविशुरन्योन्यं पेतुश्च जगतीतले॥६१॥
पाहता काहि आकाशी नेत्र ताडित होउनी।

काही लागुनिया तीर पडती धरणीतली॥६१॥

हनूमन्त च सुग्रीवमङ्गदं गन्धमादनम्।
जाम्बवन्तं सुषेणं च वेगदर्शिनमेवच॥६२॥
मैन्दं च द्विविदं नीलं गवाक्षं गवयं तथा।
केसरिं हरिलोमानं विद्युद्दंष्ट्रं च वानरम् ॥६३॥
सूर्याननं ज्योतिर्मुखं तथा दधिमुखं हरिम्।
पावकाक्षं नलं चैव कुमुदं चैव वानरम्॥६४॥
प्रासैः शूलैः शितर्बाणैरिन्दजिन्त्रसंहितैः।

विव्याध हरिशार्दूलान् सर्वास्तान् राक्षसोत्तमः॥६५।

सुग्रिवासह हनुमन्त गन्धमादन अङ्गद।
जाम्बवन्त सुषेणही वेगदर्शिनही तसे॥६२॥
मैन्द द्विविद नि नील गवक्ष गवय तसे।
केसरि हरिलोमान विद्युद्ष्ट्रादि वानर॥६३॥
ज्योतिर्मुख सूर्यानन तसेच दधिमुख वानर।
पावकाक्ष नल आणि कुमुद इत्यादि कपि॥६४॥
सोडुनी मन्त्रभारित भाले तीर इन्द्रजित।

वानरवीरां सर्व करी घायाळ त्यांसवे॥६५॥

स वै गदाभिर्हरियूथमुख्यान् निर्भिद्य बाणैस्तपनीय वर्णै:
ववर्ष रामं शरवृष्टिजालै: सलक्ष्मणं भास्कररश्मिकल्पै:॥६६॥

संहारि गदा वापरुनी वानरमुख्यवीरा योजुनि तीर तैसे।
करुनि शरवृष्टि लक्ष्मणासह रामावरी सूर्यकिरणासम जणु॥६६॥

स बाणवर्षैरभिवृष्यमाणो धारानिपातानिव तानचिन्त्य।
समीक्षमाण: परमाद्भुत श्रीरामस्तदा लक्ष्मणमित्युवाच॥६७॥

पाहूनि बाणवर्षाव त्यांच्यावरी करता तया परमाद्भुत श्रीराम।

पाहुनि करुनिया विचार लक्ष्मणास ऐसे म्हणे॥६७॥

असौ पुनर्लक्ष्मण राक्षसेन्द्रो ब्रह्मास्त्रमाश्रित्य सुरेन्द्रशत्रु:।
निपातयित्वा हरिसैन्यमस्मान् शितै: शरैर्दयति प्रसक्तम्॥६८॥

योजि जो ब्रह्मास्त्र सुरेन्द्र शत्रूवरी आपले वानरसैन्य तसे।
राक्षसेन्द्र तो नष्ट करुनी बाणवर्षाव करी आपल्यावरी ॥६८॥

स्वयंभुवा दत्तवरो महात्मा समाहितोऽन्तर्हितभीमकाय:।
कथं नु शक्यो युधि नष्टदेहो निहन्तुमद्येन्द्रजिदुद्यतास्त्र:॥६९॥

वरे स्वयंभू अश्या महात्म्या आणि जो भीमकाय जो न दिसे।

युद्धात् कसे मारणे शक्य जो इन्द्रजित चाल करी आम्हावरी॥६९॥
मन्ये स्वयंभूर्भगवानचिन्त्यस्तस्यैतदस्त्रं प्रभवश्च योऽस्य।
बाणवपातं त्वमिहाद्य धीमन् मया सहाव्यग्रमना: सहस्व॥७०॥
वाटे मला जणु त्यास करी सहाय्य भगवान त्यामुळे।
अस्त्र प्रभावी त्याचे मजसवे करी सहन तूही बाणवर्षाव त्याचा॥७०॥
प्रच्छादयत्येष हि राक्षसेन्द्र: सर्वां दिश: सायकवृष्टिजालै:।
एतच्च सर्वं पतिताग्र्यशूरं न भ्राजते वानरराजसैन्यम्॥७१॥
करूनि वर्षाव सर्व दिशांना बाणाचा राक्षस छळतसे सर्वां आपणां।

हे सर्व पडले वानरशूरवीर करू न शकती काही त्याच्यापुढे ॥७१॥

आवां तु दृष्ट्वा पतितो विसज्ञौ निवृत्तयुद्धौ हतहर्षरोषौ।
ध्रुवं प्रवेक्ष्यत्यमरारिवासमसौ समासाद्य रणाग्र्यलक्ष्मीम्॥७२॥

बेशुद्धा पाहुनि आम्हा पडता सोडूनि युद्धा हर्ष आनंदाविना।
करील प्रवेश धामी अमरांच्या तो निश्चित रणलक्ष्मीसवे॥७२॥

ततस्तु ताविन्द्रजितोऽस्त्रजालैर्बभूवतुस्तत्र तदा विशस्तौ।
स चापि तौ तत्र विषादयित्वा ननाद हर्षाद् युधि राक्षसेन्द्रः॥७३॥

इन्द्रजितास्त्र जाली उभय ते होती पराभूत आणि दु:खी होता।

आनंद होउनी तो राक्षसेन्द्र हर्षाने गर्जना करीतसे ॥७३॥

ततस्तदा वानरसैन्यमेवं रामं च संख्ये सह लक्ष्मणेन।
विषादयित्वा सहसा विवेश पुरीं दशग्रीवभुजाभिगुप्ताम्।
संस्तूयमान: स तु यातधानै: पित्रे च सर्वं हृषितोऽभ्युवाच॥७४॥

होता तसे वानरसैन्य राम आणि लक्ष्मणासवे।
करूनि दु:खी सर्वां इन्द्रजित करी प्रवेश पुरीत।
दशग्रीव जिथे असे प्रशंसित् इन्द्रजित तेव्हां।

सांगे पित्यास राक्षसांस काय घडले ते आनंदे ॥७४॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे त्रिसप्ततितम: सर्ग:॥७३॥

युद्धकाण्ड सर्ग् ७४

तयोस्तदासादितयो रणाग्रे मुमोह सैन्यं हरियूथपानाम्।
सुग्रीवनीलाङ्गदजाम्बवन्तो न चापि किंचित् प्रतिपेरिदे ते॥१॥
त्यामुळे पराभूत सैन्य आणि वानरप्रमुख रणी उदास होत।
सुग्रीव नील अङ्गद जाम्बवन्त उपाय् काय् सुचे न त्यांना॥१॥
ततो विषण्णं समवेक्ष्य सर्वं बिभीषणो बुद्धिमतां वरिष्ठः।
उवाच शाखामृगराजवीरानाश्वासयन्नप्रतिमैवचोभिः॥२॥

पाहूनि तेव्हां विषण्ण सर्वां बिभीषण वरिष्ठ बुद्धिमन्त।
उद्देशुनी सर्व शाखामृगराजवीरा वच आश्वासक बोलतसे॥२॥
मा भैष्ट नास्त्यत्र विषादकालो यदार्यपुत्रौ ह्यवशौ विषण्णौ।
स्वयंभुवो वाक्यमथोद्वहन्तौ यत्सादितावेन्द्रजितास्त्रजालै:॥३॥
भिऊ नका नका करू विषाद जरी आर्यपुत्रही उदास होती।
सांगितले स्वत: ब्रह्मदेवांनी जेव्हां इन्द्रजिता अस्त्र दिले॥३॥
तस्मै तु दत्तं परमास्त्रमेतत् स्वयंभुवा ब्राह्ममोघवीर्यम्।
तन्मानयन्तौ युधि राजपुत्रौ निपातितौ कोऽत्र विषादकाल”॥४॥

तया दिलेले अमोघ अस्त्र ब्रह्मदेवे ब्राह्म अमोघ जे असे।
त्यामुळे जरी राजपुत्र मूर्च्छित तरी विषाद करणे कशास्तव॥४॥
ब्राह्ममस्त्रो ततो धीमान् मानयित्वा तु मारुतिः।
बिभीषणवचः श्रुत्वा हनूमानिदमब्रवीत्॥५॥
ब्रह्मास्त्र असे ते हे मारुती मान्य करी।
बिभीषण वच ऐकुनि मग तोही बोलला॥५॥
अस्मिन्नस्त्रहते सैन्ये वानराणां तरस्विनाम्।
यो यो धारयते प्राणांस्तं तमाश्वासयामहे॥६॥

वेगवान् वानरसैन्यात या अस्त्रापासुनि जे।
जिवंत राहू शकले त्यांना आश्वासन देत मी॥६॥
तावुभौ युगपद् वीरौ हनूमद्राक्षसोत्तमौ।
उल्काहस्तौ तदा रात्रौ रणशीर्षे विचेरतु:॥७॥
ते दोघे महान् वीर हनूमान् बिभीषण।
मशाली घेउनि हाती रात्री फिरती रणी॥७॥
भिन्नलाङ्गूलहस्तोरुपादाङ्गुकिशिरोधरै:।
स्रवद्भि: क्षतजं गात्रै: प्रस्रवद्भि: समन्तत:॥८॥

तुटलेले हातपाय मस्तका पाहती तयां
जखमांनी भरती गात्रे रक्त त्यातुनि वाहता॥८॥
पतितैः पर्वताकाराइर्वानरैरभिसंवृताम्।
शस्त्रैश्च पतितैर्दीप्तैर्ददृशाते वसुंधराम्॥९॥
पर्वताकार वानर पड्ल्याने झाकली जातसे।
तशीच राक्षसशस्त्रे दैदीप्य यांनी वसुंधरा॥९॥
सुग्रीवमङ्गदं नीलं शरभं गन्धमादनम्।
जाम्बवन्तं सुषेणं च वेगदर्शिनमेव च॥१०॥

मैन्दं नलं ज्योतिर्मुखं द्विविदं चापि वानरम्।
बिभीषणो हनूमाश्च ददृशाते हतान् रणे॥११॥
सुग्रीव अङ्गद नील शरभासह् गन्धमादन।
जाम्बवन्त सुषेण तैसे वेगदर्शिन त्यांसवे।
मैन्द नल ज्योतिर्मुख द्विविद आदि वानर।
पाहती हत रणी त्यां हनुमान बिभीषण॥१०-११॥
सप्तषष्टिर्हता: कोट्यो वानराणां तरस्विनाम्।
अह्न: पंचमशेषेण वल्लभेन स्वयंभुव:॥१२॥

दिवसाच्या पांच प्रहरात सदुसष्ट् कोटी वानर।
चपळ मारले जाती इन्द्रजिताच्या युद्धात॥१२॥
सागरौनिभं भीमं दृष्ट्वा बाणार्दितं बलम्।
मार्गते जाम्बवन्तं च हनूमान् सविभीषण:॥१३॥
सागरासम सैन्यात बाणे घायाळ झालेल्या।
शोधती जाम्बवन्तास हनूमान् बिभीषण॥१३॥
स्वभावजरया युक्तं वृद्धं शरशतैश्चितम्।
प्रजापतिसुतं वीरं शाम्यन्तमिव पावकम्॥१४॥

विद्ध जो शतबाणांनी वयाने वृद्ध जो असे।
प्रजापतिसुता वीरा विझणाऱ्या अग्नीपरी॥१४॥
दृष्ट्वा समभिसंक्रम्य पौलस्त्यो वाकयमब्रवीत्।
कच्चिदार्य शरैस्तीक्ष्णैर्न प्राणा ध्वंसितास्तव॥१५॥
त्याच्या जवळ जाऊनी बिभीषण विचारी त्या।
हे आर्य तीक्ष्ण बाणांनी तव जीव न घेतला॥१५॥
बिभीषणवच: श्रुत्वा जाम्बवानृक्षपुङ्गव:।
कृच्छ्रादभ्युदगिरन् वाक्यमिदं वचनमब्रवीत्॥१६॥

वाक्या ऐकुनिया त्याच्या अस्वलमुख्य जाम्बवान।
कष्टाने उठुनी मोठ्या ऐसे वचन बोलला॥१६॥
नैर्ऋतेन्द्र महावीर्य स्वरेण त्वाभिलक्षये।
विद्धगात्र: शितबाणैर्न त्वां पश्यामि चक्षुषा॥१७॥
नैऋत्येन्द्रा महावीरा आवाजे ओळखतो तुज।
तीक्ष्ण बाणांनी विद्ध पाहू न शकतो तुज॥१७॥
अञ्जना सुप्रजा येन मातरिश्वा च सुव्रत ।
हनूमान् वानरश्रेष्ठ: प्राणान् धारयते क्वचित्॥१८॥

अंजनी माता ज्याची सुपुत्र जो असे तिचा।
हनूमान् वानरश्रेष्ठ असे का प्राण धारुनि॥१८॥
श्रुत्वा जाम्बवतो वाक्यमुवाचेदं बिभीषण:।
आर्यपुत्रावतिक्रम्य कस्मात् पृच्छसि मारुतिम् ॥१९॥
जाम्बवन्ताचे ऐकुनी बिभीषण वाक्य बोलला।
आर्यपुत्रा सोडुनि का पुससी मारुतीविषयी ॥१९॥
नैव राजनि सुग्रीवे नाङ्गदे नापि राघवे।
आर्त संदर्शित: स्नेहो यथा वायुसुते पर:॥२०॥

वायुसुतावरी स्नेह तू दाखवतोस कशास्तव
राजा सुग्रीव अङ्गद वा राघवाप्रति जो नसे॥२०॥
बिभीषणवचः श्रुत्वा जाम्बवान् वाक्यमब्रवीत्।
शृणु नैरुतशार्दूलं यस्मात् पृच्छामि मारुतिम्॥२१॥
ऐकोनि बिभीषणवाक्य जाम्बवान् देइ उत्तर्।
ऐक नैर्ऋतशार्दूल का पुसतो मारुतीविषयी ॥२१॥
अस्मिज्जीवति वीरे तु हतमप्यहतं बलम्।
हनूमत्युज्झितप्राणे जीवन्तोऽपि मृता वयम्॥२२॥

जरी जीवित आपण सैन्य मात्र मृत असे।
हनूमान सोड्ता प्राण जिवन्त जरि मृत आपण॥२२॥
धरते मारुतिस्तात मारुतप्रतिमो यदि।
वैश्वानरसमो वीर्ये जीविताशा ततो भवेत्॥२३॥
असता जीवित मारुति प्रतिमामारुत तरी।
वीर वैश्वानरासम जीविताशा तदा असे ॥२३॥
ततो वृद्धमुपागम्य विनयेनाभ्यवादयत् ।
गृह्य जाम्बवत: पादौ हनूमान् मारुतात्मज:॥२४॥

तेव्हां वृद्धाजवळ जाऊनी विनये अभिवादुनी।
पदस्पर्श जाम्बुवन्ताचा करुनी बोले मारुती॥२४॥
श्रुत्वा हनुमतो वाक्यं तदा विव्यथेन्द्रिय:।
पुनर्जातमिवात्मानं मन्यते स्मर्क्षपुङ्गव:॥२५॥
जरी असे कष्टात मारुतीवाक्य ऐकुनी।
जणु पुनर्जीवित वाटे त्या रुक्षपुङ्गवा ॥२५॥
ततोऽब्रवीन्महातेजा हनूमन्तं स जाम्बवान् ।
आगच्छ हरिशार्दूल वानरांस्त्रातुमर्हसि॥॥२६॥

जाम्बुवन्त तदा बोले हनूमाना महातेजस्वी।
हे वानरसिंहा तू कपींचे अस्त्र अससी ॥२६॥
नान्यो विक्रमपर्याप्तस्त्वमेषां परम: सखा।
त्वत्पराक्रमकालोऽयं नान्यं पश्यामि कञ्चन॥२७॥
नसे कोणी तुजसम विक्रमी परम सख्या ।
तुझा पराक्रमकाल हा नान्य कोणी दिसे मज ॥२७॥
ऋक्षवानरवीराणामनीकानि प्रहर्षय ।
विशल्यो कुरु चाप्येतौ सादितौ रामलक्ष्मणौ॥२८

अस्वले वानरवीरां करी तू प्रोत्साहित ।
राम लक्ष्मणा बेशुद्ध् करी सावध वीर तू॥२८॥
गत्वा परममध्वानमुपर्युपरि सागरम्।
हिमवन्तं नगश्रेष्ठं हनूमन् गन्तुमर्हसि ॥२९॥
सागरावरुनी जाई ओलांडून सागरा।
पर्वतश्रेष्ठ हिमालयि तुला गेले पाहिजे॥२९॥
ततः काञ्चनमत्युच्चमृषभं पर्वतोत्तमम् ।
कैलासशिखरं चात्र द्रक्ष्यस्यरिनिषूदन॥३०॥

तेथे अत्युच्च काञ्चन ऋषभ पर्वतोत्तम।
शत्रुघ्ना पाहशिल तू कैलासशिखरा त्यावरी॥३०॥
तयो: शिखरयोर्मध्ये प्रदीप्तमतुलप्रभम्।
सर्वौषधियुतं वीर द्रक्ष्यस्योषधिपर्वतम् ॥३१॥
शिखरांमध्ये अतुल तेजयुक्त प्रदीत ।
सर्व औषधिंनी युक्त पाहशील तू पर्वत॥३१॥
तस्य वानरशार्दूल चतस्रो मूर्ध्नि सम्भवा:।
द्रक्ष्यस्योषधयो दीप्ता दीपयन्तीर्दिशो दश॥३२॥

माथ्यावरी त्याच्या चार् वानरवीरा औषधी
पहा झळकति तेजाने प्रकाशत दश दिशा॥३२॥
मृतसञ्जीवनीं चैव विशल्यकरणीमपि।
सुवर्णकरणी चैव संधानीं च महौषधीम्॥३३॥
मृतसञ्जीवनी तैसी विशल्यकरणी तश्या।
सुवर्णकरणी ऐशा असती महौषधि तिथे॥३३॥
ता: सर्वा हनुमन् गृह्य क्षिप्रमागन्तुमर्हसि।
आश्वासय हरीन् प्रानैर्योज्य गन्धवहात्मज॥३४॥

त्या सर्व घेउनी तुजला त्वरित यायला हवे।
आणि तव गन्धे प्राणे आश्वासी सर्व वानरां॥३४॥
श्रुत्वा जाम्बवतो वाक्यं हनूमान् मारुतात्मज:।
आपूर्यत बलोद्धर्षैर्वायुवेहैरिवार्णव:॥३५॥
वाक्या जाम्बुवन्ताच्या हनूमान् ऐकूनिया।
हर्षाने वायुवेगाने जाइ पार करुनी सागरा॥३५॥
स पर्वततटाग्रस्थ: पीडयन् पर्वतोत्तमम् ।
हनूमान् दृश्यते वीरो द्वितीय इव पर्वत:॥३६॥

तो जाता पर्वतशिखरी तुडवुनी पर्वतोत्तमा।
दिसे हनुमान तेथे जणु दुसरा पर्वत॥३६॥
हरिपादविनिर्भग्नो निषसाद स पर्वत:।
न शशाक तदात्मानं वोढुं भृशनिपीडित:॥३७॥
भग्न मारुतिपदे बसे खाली तो पर्वत।
सावरणे स्वत:स भारावल्यामुळे न जमे॥३७॥
तस्य् पेतुर्नगा भूमौ हरिवेगाच्च जज्वलु:।
शृङ्गाणि च विकीर्यन्त पीडितस्य् हनूमता॥३८॥

त्याच्या वेगाने जळुनी पडला जो पर्वत।
हनूमाने पीडित गळती शिखरे त्याची भूवरी॥३८॥
तस्मिन् सम्पीड्यमाने तु भग्नद्रुमशिलातले।
न शेकुर्वानरा: स्थातुं घूर्णमाने नगोत्तमे॥३९॥
तश्या त्या कोसळलेल्या भग्न वृक्ष शिलांवरी।
न उभी राहू शकती वानरे नगोत्तमावरति त्या॥३९॥
सा घूर्णितमहाद्वारा प्रभग्नगृहगोपुरा ।
लङ्का त्रासाकुला रात्रौ प्रनृत्तेवाभवत् तदा॥४०॥

कोसळता महाद्वार भग्न गृहे नि गोपुरे।
तुडवुनि कोणि जाई तशी लंका त्रासली॥४०॥
पृथिविधरसंकाशो निपीड्य पृथिवीधरम्।
पृथिवीं क्षोभयामास सार्णवां मारुतात्मज:॥४१॥
पृथ्वीधरासम पर्वता त्रस्त करूनिया।
सागरासह करी क्षुब्ध पृथ्वीस मारुतात्मज॥४१।
आरुरोह तदा तस्माद्धरिर्मलयपर्वतम्।
मेरुमन्दारसंकाशं नानाप्रस्रवणाकुलम्॥४२॥

मारुती नंतर चढती मलय पर्वतावरी।
मेरुमन्दारासम जो ज्यात अनेक झरे॥४२॥
नानाद्रुमलताकीर्णं विकासिकमलोत्पलम्।
सेवितं देवगन्धरवै: षष्टियोजनमुच्छ्रितम्॥४३॥
नानावेलींनी समृद्ध कमलतलावांसह् ।
राहती देवगन्धर्व साठ योजन विस्तृत॥४३॥
विद्याधरैर्मुनिगणैरप्सरोभिर्निषेवितम्।
नानामृगगणांकीर्णं बहुकन्दरशोभितम्॥४४॥

विद्याधर मुनीगणांसह अप्सरा वसती जिथे।
अनेक वसती प्राणी अनेक गुहांत शोभती॥४४॥
सर्वानाकुलयंस्तत्र यक्षगन्धर्वकिन्नरान्।
हनूमान् मेघसंकाशो ववृधे मारुतात्मज:॥४५॥
यक्ष गन्धर्व किन्नरां सर्वांना व्याकुल करी।
मेघासम वाढणाऱ्या हनूमाना पाहूनिया॥४५॥
पद्भ्यां तु शैलमापीड्य वडवामुखवन्मुखम्।
विवृत्योग्रं ननादोच्चैस्त्रासयन् रजनीचरान्॥४६॥

वडवामुखासम जो पर्वत पायी ओलांडुनी।
अरोळी उग्र ठोकूनी टाकी त्रासुनि राक्षसां॥४६॥
तस्य नानद्यमानस्य श्रुत्वा निनदमुत्तमम्।
लङ्कास्था राक्षसव्याघ्रा न शेकु: स्पन्दितुं क्वचित्॥४७॥
आरोळी ठोकता त्याची ऐकोनी नाद तिचा।
लंकेत राक्षसव्याघ्र न आवाज शकती करू ॥४७॥
नमस्कृत्वा समुद्राय मारुतिर्भीमविक्रम:।
राघवार्थे परं कर्म समीहत परंतप॥४८॥

नमूनिया समुद्रास भीमविक्रम मारुती।
महान् कार्य राघवाचे करण्या सरसावे पुढे॥४८॥
स पुच्छमुद्यम्य भुजङ्गकल्पं विनम्य पृष्ठं श्रवणे निकुच्य।
विवृत्य वक्त्रं वडवामुखाभमापुप्लुवे व्योम्नि स चण्डवेग:॥४९॥
उंचावूनि पुच्छ आपले भुजगासमान वाकवी पाठ कानापाशी।
वासूनि मुख वडवामुखासम करी उड्डाण आकाशि महावेगे॥४९॥
स वृक्षखण्डांस्तरसा जहार शैलान् शिला: प्राकृतवानरांश्च।
बाहूरुवेगोद्धतसम्प्रणुन्नास्ते क्षीणवेगा: सलिले निपेतु:॥५०॥

येवढ्या वेगाने हनूमान उडे ज्यामुळे वृक्षखण्ड डोंगर कडे।
कांही वानरसुद्धा ओढले जात त्यामागे पडती ते सागरामधे॥५०॥
स तौ प्रसार्योरगभोगकल्पौ भुजौअ भुजंगारिनिकाशवीर्य:
जगाम शैलं नगराजमग्र्यं दिश: प्रकर्ष्अन्निव वायुसूनु:॥५१॥
पसरूनि दोन्ही हात भुजंगापरी वेगाने गरुडाच्या मारुती।
दिशा सर्व कापत तो झेपावे थेट् पर्वतराज हिमालयाकडे॥५१॥
स सागरं घूर्णितवीचिमालं तदम्भसा भ्रामितसर्वसत्त्वम्।
समीक्षमाण: सहसा जगाम चक्रं यथाविष्णुकराग्रमुक्तम्॥५२॥

वेगे तयाच्या घुसळता सागर जीव त्यातीलहि लागती फिरु।
जाई पुढे आकाशातुनि तो विष्णुने सोडलेल्य सुदर्शन चक्रापरी॥५२॥
स पर्वतान् पक्षिगणान् सरांसि नदीस्तटाकानि पुरोत्तमानि।
स्फीताञ्जनांस्तानपि सम्प्रवीक्ष्य जगाम वेगात् पितृतुल्यवेग:॥५३॥
खाली दिसे त्यास पर्वत पक्षीगण सरोवरे नदीतटे महानगरे।
जाई पुढे पाहत् सर्व वेगाने तो आपल्या पित्याच्या सम॥५३॥
आदित्यपथमाश्रित्य जगाम स गतश्रम:।
हनूमांस्त्वरितो वीर: पितुस्तुक्यपराक्रम:॥५४॥

सूर्याच्या मार्गाने जाई मुळीच थकता नच।
हनूमान वेगे वीर पित्यासम पराक्रमी॥५४॥
जवेन महता युक्तो मारुतिर्वातरंहसा।
जगाम हरिशार्दूलो दिश: शब्देन नादयन्॥५५॥
वेगाने वाऱ्यासमान दिशा दणाणुनि टाकत्।
आपुल्या गर्जनेने तो वानरवीर जातसे॥५५॥
स्मरञ्जाबवतो वाक्यं मारुतिर्भीमविक्रम:।
ददर्श सहसा चापि हिमवन्तं महाकपि:॥५६॥

अचानक दिसे त्यास हिमालय पर्वत पुढे।
आणि आठवे त्यास जाम्बवन्ताचे बोल ते॥५६॥
अनेक निर्झरयुक्त गुहा धबधब्यांसह।
शुभ्र मेघ संचयासम शिखरे अतिसुन्दर्।
नटलेला पर्वत तो विविध वृक्षांनी दिसे॥५७॥
स तं समासाद्य महानगेन्द्रमतिप्रवृद्धोत्तमहेमशृंगम्।
ददर्श पुण्यानि महाश्रमाणि सुरर्षिसङ्घोत्तमसेवितानि॥५८॥
तो पोचता महानगाप्रति उत्तम हिमशिखरे जयावरी।

महाऋषींचे आश्रम पुण्यवान जे सेवित सुरर्षि संघे॥५८॥
स ब्रह्मकोशं रजतालयं च शक्रालयं रुद्रशरप्रमोक्षम्।
हयाननं ब्रह्मशिरश्च दीप्तं ददर्श वैवस्वतकिंकरांश्च ॥५९॥
दिसे त्यास ब्रह्मकोश कैलास चमके जो रजतासम्।
इन्द्राचे स्थान् तसेच स्थान सोडे रुद्र बाण जिथे।
स्थान विष्णूचे स्थान जिथे ब्रह्म्याचे शिर पडे।
तसेच दिसे त्यास स्थान् जिथे सूर्या आणि त्याचे सेवक्॥५९॥
वह्न्यालयं वैश्रवणालयं च सूर्यप्रभं सूर्यनिबन्धनं च।

ब्रह्मालयं शंकरकार्मुकं च ददर्श नाभिं च वसुन्धराया॥६०॥

वज्रालय कुबेरस्थान सूर्यास विश्वकर्मा बान्धितसे जिथे।

ब्रह्मालय शिवधनुष्य जिथे आणि नाभी वसुन्धरेची॥६०॥

कैलासमग्र्यं हिमवच्छिलां च तथर्षभं काञ्चनशैलमग्र्यम्।

प्रदीप्तसर्वौषधिसम्प्रदीप्तं ददर्श सर्वौषधिपर्वतेन्द्रम्॥६१॥

कैलास श्रेष्ठ शिला हिमाच्या तसा ऋषभ जो सुवर्णपर्वत।

लखलखे जो दिव्य औषधींमुळे पाहि जाम्बुवन्ते वर्णिला॥६१॥

स तं समीक्ष्यानलराशिदीप्तं विसिस्मिये वासवदूतसूनुः।

आप्लुप्त्य तं चौषधिपर्वतेन्द्रं तत्रौषधीनां विचयं चकार॥६२॥
अग्नीपरी चमकणारा पाहुनि विस्मित इन्द्रदूत मारुती।
प्रदक्षिणा घालुनी त्यास शोधावया औषधि प्रारंभ करी॥६२॥
स् योजनसहस्राणि समतीत्य महाकपि:।
दिव्यौषधिधरं शैलं व्यचरन्मारुतात्मज:॥६३॥
चाले योजनसहस्र शोधण्या तो महाकपि।
पर्वतावर ज्यावरी असति दिव्य औषधी॥६३॥
महौषध्यस्तत: सर्वास्तस्मिन् पर्वतसत्तमे।

विज्ञायार्थिनमायान्तं ततो जग्मुरदर्शनम्॥६४॥

महौषधि ज्या सर्व असति पर्वतोत्तमे।

जाणुनी नेण्या आला अदृश्य जाती हो उनी॥६४॥

स ता महात्मा हनुमानपश्यंश्चुकोप रोषाच्च भृशं ननाद।

अमृष्यमाणोऽग्निसमानचक्षुर्महीधरेन्द्रं तमुवाच वाक्यम्॥६५॥

पाहूनि ते हनुमान महात्मा कोपित हो उनी करी निनाद।

अग्नीसम लाल डोळे करुनी महापर्वता तो असे वाक्य बोले॥६५॥

किमेतदेवं सुविनिश्चितं ते यद् राघवे नासि कृतान्तकम्पः।

पश्याद्य मद्बाहुबलाभिभूतौ विकीर्णमात्मानमथो नगेन्द्र॥६६॥

काय तू ठरवसी ऐसे राघवाविषयी न अनुकम्पा दावण्या।
मग पहा बाहुबला मम ज्यामुळे होशील तू स्वत: विशीर्ण ॥६६॥

स तस्य शृङ्गं सनगं सनागं सकांचनंधातुसहस्रजुष्टम्।
विकीर्णकूटं ज्वलिताग्रसानुं प्रगृह्य वेगात् सहसोन्ममाथ॥६७॥

वृक्ष नग सुवर्णाकार धातूनी मन्डित शिखर्।
ज्वलन्त कूटांसहिते वेगाने उपटीत् कपि ॥६७॥

स तं समुत्पाट्य खमुत्पपात् वित्रास्य लोकान् ससुरासुरेन्द्रान्।

संस्तूयमान: खचरैरनेकैर्जगाम् वेगाद् गरुडोग्रवेग:॥६८॥
उपटूनि त्यास उडे नभात् दे त्रास लोकां ससुरासुरेन्द्रा।
करता देवगन्धर्व स्तुती त्याची गरुडासम वेगे जात् तो असे॥६८॥
स भास्कराध्वानमनुप्रपन्नस्तं भास्कराभं शिखरं प्रगृह्य।
बभौ तदा भास्करसंनिकाशो रवे: समीपे प्रतिभास्कराभ:॥६९॥
तो भास्कराजवळूनि उडता घेऊन भास्करासम शिखर हाती।
दिसे तदा भास्करासम तो सूर्याजवळि जणु सूर्य दुसरा ॥६९॥
स तेन् शैलेन भृशं रराज शैलोपमो गन्धवहात्मजस्तु।

सहस्रधारेण सपावकेन् चक्रेण खे विष्णुरिवार्पितेन॥७०॥

हनूमान् तो पर्वताएवढा पर्वतासह् दिसे विष्णूसम चक्रधारी।

हातात एका पर्वत पेटलेला दिसे जो सुदर्शन् चक्रासमान॥७०॥

तं वानरा: प्रेक्ष्य तदा विनेदु: स तानपि प्रेक्ष्य मुदा ननाद्।

तेषां समुत्कृष्टरवं निशम्य लङ्कालया भीमतरं विनेदु:॥७१॥

पाहूनि आनन्दित वानरे आणि तोही मोदे करति गर्जना।

त्यांच्या त्या गर्जनेने लंकेत मात्र भीतीने ओरड्ती राक्षस॥७१॥

ततो महात्मा निपपात तस्मिन् शैलोत्तमे वानरसैन्यमध्ये।
हर्युत्तमेभ्य: शिरसाभिवाद्य विभीषणं तत्र च सस्वजे स:॥७२॥
तेव्हां महात्मा उतरे वानरसैन्य मध्ये उत्तम पर्वतावरी ।
आणि सर्व मुख्य वानरां बिभीषणासह करी प्रणाम मस्तके॥७२॥
तावप्युभौ मानुषराजपुत्रौ तं गन्धमाघ्राय महौषधीनाम्।
बभूवस्तत्र तदा विशल्यावुत्तस्थुरन्ये हरिप्रवीरा:॥७३॥
महौषधीचा केवळ गन्ध घेता श्रीराम आणि लक्ष्मणासह।
सर्व बेशुद्ध वानरवीरसुद्धा शुद्धीत येती जणु झोपेतून उठती॥७३॥

सर्वे विशल्या विरुजा: क्षणेन हरिप्रवीराश्च हताश्च ये स्यु:।
गन्धेन तासां प्रवरौषधीनां सुप्ता निशान्तेष्विव सम्प्रबुद्धा॥७४॥
सर्व वानरवीर मेलेलेदेखिल होती बाणरहित वेदनारहित् ।
त्या औषधींच्या वासाने उथून बसति जागृत निद्रेतुनी॥७४॥
यदाप्रभृति लङ्कायां युध्यन्ते हरिराक्षसा:।
तदाप्रभृति मानार्थमाज्ञया रावनस्य च॥७५॥
जेव्हां पासून लंकेत लढती राक्षस वानर।
तेव्हांतेव्हां मान देण्या रावणाच्या आज्ञेस॥७५॥

ये हन्यते रणे तत्र राक्षसा: कपिकुञ्जरै:।
हता हतास्तु क्षिप्यन्ते सर्व एव तु सागरे॥७६॥
राक्षस मरती जे रणी त्यांना वानरवीर ते।
मरती तदा तत्काळ फेकुनि देती सागरी॥७६॥
ततो हरिर्गन्धवहात्मजस्तु तमौषधीशैलमुदग्रवेग:।
निनाय वेगाद्धिमबन्तमेव पुनश्च रामेण समाजगाम ॥७७॥

मग् तो महात्मा हनूमान उचलुनी त्या औषधी ।
मूळ जागेवरी ठेवी नेउनी आणि पुन्हा येई रामाकडे॥७७॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे चतुस्सप्ततितम: सर्ग:॥७४॥

युद्धकाण्ड सर्ग ७५

ततोऽब्रवीन्महातेजा: सुग्रीवो वानरेश्वर:।
अर्घ्यं विज्ञापयंश्चापि हनूमन्तमिदं वच:॥१॥
पुढिल कृत्यासाठी हनूमाना असे वच
वानरेश्वर सुग्रीव महातेजस्वी बोलला॥१॥
यतो हत: कुम्भकर्ण: कुमाराश्च निषूदिता:।
नेदानीमुपनिर्हारं रावणो दातुमर्हसि॥२॥

कुम्भकर्ण माराला जाई तसे रावणपुत्रही।
त्यामुळे रावण् आता तह करणार् नाही॥२॥
ये ये महाबला: सन्ति लघवश्च प्लवङ्गमा:।
लंकामधिपतन्त्वाशु गृह्योल्का: प्लवगर्षभा:॥३॥
जे जे बलवान आहेत तसे छोटेही वानर ।
घेऊनी मशाल हाती लंकेवरी जाति चालुनी॥३॥
ततोऽस्तं गत आदित्ये रौद्रे तस्मिन् निशामुखे।
लङ्कामभिमुखा: सोल्का जग्मुस्ते प्लवगर्षभा:॥४॥

तेव्हां मावळता सूर्य भीषण त्या रात्रीमध्ये।
लंकेच्या दिशेने जाती मशालींसह वानर॥४॥
उल्काहस्तैर्हरिगणै: सर्वत: समभिद्रुता:।
आरक्षस्था विरूपाक्षा: सहसा विप्रदुद्रुवु:॥५॥
मशालीसह सर्वत्र हल्ला करिता वानर।
भयाने पळुनी जाती पहारेकरी राक्षस ॥५॥
गोपुराट्टप्रतोलीषु चर्यासु विविधासु च।
प्रासादेषु च संहृष्टा: ससृजस्ते हुताशनम्॥६॥

वानर हर्षे लंकेची तटबन्दी मुख्य द्वारही।
रस्ते चौक प्रासाद सर्वत्र आग लावती॥६॥
तेषां गृहसहस्राणि ददाह् हुतभुक् तदा।
प्रासादा: पर्वताकारा: पतन्ति धरणीतले॥७॥
अग्नीने जाळली तेव्हां हजारो त्यांची घरे।
पर्वताकार प्रासाद पडती जळुनि खालती॥७॥
अगुरुर्दह्यते तत्र परं चैव सुचन्दनम्।
मौक्तिका: मनय: स्निग्धा वज्र चापि प्रवालकम्॥८॥

अगुरु जळते तेथे तसेच पिवळे चन्दन।
मोती माणिक रम्य हिरे पोवळे त्यासवे ॥८॥
क्षौमं च दह्यते तत्र कौशेयं चापि शोभनम्।
आविकं विविधं चौर्णं काञ्चनं भाण्डमायुधम्॥९॥
सुती वस्त्रे रेशमीही लोकरीची वस्त्रे तशी।
तशीच सुवर्णपात्रे सुवर्णशस्त्रे जळती तशी॥९॥
नानाविकृतसंस्थानं वाजिभाण्डपरिच्छदम्।
गजग्रैवेयकक्ष्याश्च रथभाण्डांश्च संस्कृतान्॥१०॥

नाना आकार महाल् खोगिरांसह अश्वही।
तसेच झूलीसह हत्ती उत्तम रथही तसे॥१०॥
तनुत्राणि च योधानां हस्त्यश्वानां च वर्म च।
खड्गा धनूंषि ज्याबाणास्तोमराङ्कुशशक्तय:॥११॥
चिलखते तशि योद्ध्यांची गज अश्व चिलखते
खड्गे धनुष्ये बाण तोमर अंकुश शस्त्रे अशी॥११॥
रोमजं वालजं चर्म व्याघ्रजं चाण्डजं बहु ।
मुक्तामणिविचित्रांश्च प्रासादांश्च समन्तत:॥१२॥

प्राण्यांचे केस नि चर्म यांची वस्त्रे तशी
विविध प्रासादांसह जळती मुक्तामणि तसे॥१२॥
विविधानस्त्रसंघातानग्निर्दहति तत्र वै ।
नानाविधान् गृहांश्चित्रान् ददाह हुतभुक् तदा॥१३॥
शस्त्रांचे विविध समूह जळूनि जाती तिथे।
तशीच नाना प्रकारची घरेही जळती अग्निने॥१३॥
आवासान् राक्षसानाम् च सर्वेषां गृहगृध्नुनाम्।
हेमचित्रतनुत्रानां स्रग्भाण्डाम्बरधारिणाम्॥१४॥

राक्षसांची घरे सर्व घराचा लोभ बहु ज्यां।
घालती विविध रंगी पोषाक पुष्पहार जे ॥१४॥
सीधुपानचलाक्षाणाम् मदविह्वलगामिनाम्।
कान्तालम्बितवस्त्राणां शत्रुसंजातमन्युनाम्॥१५॥
उसापासुनि केलेले मद्य पिउनी धुंद जे ।
स्त्रियांची लोम्बती वस्त्रे शत्रूवर क्रुद्ध होत जे॥१५॥
गदाशूलासिहस्थानां खादता पिबतामपि।
शयनेषु महार्हेषु प्रसुप्तानां प्रियैःसह॥१६॥

गदा शूल धारी काही काही खातपीत असता।
काही महाली सुप्त आपल्या प्रिय व्यक्तीसह ॥१६॥
त्रस्तानां गच्छतां तूर्णं पुत्रानादाय सर्वत:
तेषां शतसहस्राणि तदा लंकानिवासिनाम्॥१७॥
भयभीत पुत्रांसह वेगे पळती जे इतस्तत:।
असे अनेक सहस्र राक्षस लंकेत राहती॥१७॥
अदहत् पावकस्तत्र जज्वाल च पुन: पुन:।
सारवन्ति महार्हाणि गम्भीरगुणवन्ति च॥१८॥

उत्तम बान्धलेली सुखदायक घरे अशी।
अग्नी जाळुनि टाकी पुन: पुन: उफाळुनी॥१८॥
हेमचन्द्रार्थचन्द्राणि चन्द्रशालोन्नतानि च।
तत्र चित्रगवाक्षाणि साधिष्ठानानि सर्वश:॥१९॥
सुवर्णचन्द्रकोरींसह उंच उंच घरे अशी।
नक्षीदार गवाक्षे ज्यां जाती भस्म हो उनी॥१९॥
मणिविद्रुमचित्राणि स्पृशन्तीव दिवाकरम्।
क्रौन्चबर्हिणवीणानां भूषणानां च नि:स्वनै:॥२०॥

घुमती जेथे बगळे मोर वीणा यांचे स्वर।
असे मणिभूषित प्रासाद नभा जणु टेकती॥२०॥
नादित्यान्यचलाभानि वेश्मान्यग्निर्ददाह सः।
ज्वलनेन परीतानि तोरणानि चकाशिरे॥२१॥
पर्वतासम भव्य संगीत नृत्य घुमे जेथे।
ऐसी लंकेतील घरे जाळली जाति अग्निने॥२१॥
विद्युद्भिरिव नद्धानि मेघजालानि घर्मगे।
ज्वलनेन परीतानि गृहाणि प्रचकाशिरे॥२२॥

उन्हाळ्यातिल मेघ विद्युतभारित जसे।
जळणारी घरे तैसी चमकती आगीमुळे॥२२॥
दावाग्निदीप्तानि यथा शिखराणि महागिरे:।
विमानेषु प्रसुप्ताश्च दह्यमाना वराङ्गना:॥२३॥
त्यक्ताभरणसंयोगा हाहेत्युच्चैर्विचुक्रुशु: ।
तत्र चाग्निपरीतानि निपेतुर्भवनान्यपि॥२४॥
वणव्यासम जळणाऱ्या गृही पर्वतासम।
झोपलेल्या राक्षसांच्या स्त्रिया जळता अग्नीत।

त्यजुनी वस्त्राभूषणा मोठ्याने नाद करूनी।
आगीने जळणाऱ्या घरांना पळती सोडूनिया ॥२३ -२४॥
वज्रिवज्रहतानीव शिखराणि महागिरे:।
तानि निर्दह्यमानानि दूरत: प्रचकाशिरे॥२५॥
महापर्वत शिखरे वज्राने भंगता जशी।
तशी जळणारी घरे दिसती भग्न दुरून॥२५॥
हिमवच्छिखराणीव दह्यमानानि सर्वश:।
हर्म्याग्रैर्दह्यमानैश्च ज्वालाप्रज्वलितैरपि॥२६॥

जळणाऱ्या घरांची शिखरे ज्वालांनी वेढलेली
दिसती सर्वबाजूनी प्रज्वलित हिमशिखरासम ॥२६॥
रात्रौ सा दृश्यते लङ्का पुष्पितैरिव किंशुकि:।
हस्त्यध्यक्षैर्गजैर्मुक्तैश्च तुरगैरपि।
बभूव लङ्का लोकान्ते भ्रान्तग्राह इवार्णव:॥२७॥
दिसे लंका रात्री फुललेल्या पळसापरी।
हत्ती घोडे सैरावरा पळती लंका त्यामुळे
सागरापरि दिसे ज्यात पळती मगरी जणु॥२७॥

अश्वं मुक्तं गजो दृष्ट्वा क्वचित् भीतोऽपसर्पति।
भीतो भीतं गजं दृष्ट्वा क्वचिदश्वो निवर्तते॥२८॥
पाहुनी अश्व मुक्त गजही पळती भये।
गजां भ्यालेले पाहुनि अश्व घाबरती तदा॥२८॥
लङ्कायां दह्यमानायां शुशुभे च महोदधिः।
छायासंसक्तसलिलो लोहितोदं इवार्णवः॥२९॥
प्रतिबिंम्ब जळणाऱ्या लंकेचे सागरी पडे।
आणि रक्तापरी लाल शोभे अर्णव त्यामुळे॥२९॥

सा बभूव मुहूर्तेन हरिभिर्दीपिता पुरी।
लोकस्यास्य क्षये घोरे प्रदीप्तेव वसुन्धरा॥३०॥
वानरे पेटवलेली लंका ऐसी दिसू लागली।
जणु प्रलयकाळी पृथ्वी पेटे धडाडुनी॥३०॥
नारीजनस्य धूमेन व्याप्तस्योच्चैर्विनेदुष:।
स्वनो ज्वलनतप्तस्य शुश्रुवे शतयोजनम् ॥३१॥
धुरामुळे व्याप्त नारी जळुनी तप्त होउनी।
आक्रोश करती ऐकू येत शतयोजन दूर तो॥३१॥

प्रदग्धकायानपरान् राक्षसान् निर्गतान् बहिः।
सहसा ह्युत्पतन्ति स्म हरयोऽथ् युयुत्सवः॥३२॥
आगीत भाजलेले राक्षस पडती बाहेर जे।
वानर बाहेर उभे करती हल्ला त्यांच्यावरी॥३२॥
उद्धृष्टं वानराणां च राक्षसानां च निःस्वनम्।
दिशो दश समुद्रं च पृथिवीं च व्यनादयत्॥३३॥
हल्ल्यामुळे वानरांच्या आक्रोश जो राक्षसांचा।
दशदिशा भरुनी जाती पृथ्वी जाइ निनादुन्॥३३॥

विशल्यौ च महात्मानौ तावुभौ रामलक्ष्मणौ।
असम्भ्रान्तौ जगृहतुस्ते उभे धनुषी वरे॥३४॥
रामलक्ष्मण् ते दोघे शल्यमुक्त झाल्यामुळे।
निर्भय होऊन दोघे धनुष्य करती धारण॥३४॥
ततो विस्फारयामास रामश्च धनुरुत्तमम्।
बभूव तुमुल:शब्दो राक्षसानां भयावह:॥३५॥
करी सज्ज तदा राम उत्तम धनु आपले।
टणत्कार ऐकुनिया घाबरूनी जाति राक्षस॥३५॥

अशोभत तदा रामो धनुर्विस्फारयन् महत्।
भगवानिव संक्रुद्धो भवो वेदमयं धनु:॥३६॥
शोभतसे तदा राम विस्फारुनि महाधनु।
जणु भगवान शंकर वेदमय धनूसवे॥३६॥
उद्धुष्टं वानराणां च राक्षसानां च निस्वन:।
ज्याशब्दस्तावुभौ शब्दावति रामस्य शुश्रुवे॥३७॥
वानरोद्धुष्टघोषश्च रामस्य त्रयं व्याप दिशो दश
ज्याशब्दश्चापि रामस्य् त्रयं व्याप दिशो दश॥३८॥

वानरांचा उद्घोष राक्षसांचा उच्च स्वर।
दोन्हींवर टणत्कार करी धनुष्य रामाचे॥३७॥
उद्घोष वानरांचा राक्षसांचा उच्च स्वर।
टणत्कार या तिन्हींनी व्यापुनि जाती दश दिशा॥३८॥
तस्य कार्मुकनिर्मुक्तैः शरैस्तत्प्रगोपुरम्।
कैलासशृङ्गप्रतिमं विकीर्णमभवद् भुवि॥३९॥
धनुष्यातिल रामाच्या बाणाने लंकागोपुर।
कैलासशिखरासम जे तुटुनी पडे भूवरी ॥३९॥

ततो रामशरान् दृष्ट्वा विमानेषु गृहेषु च।
संनाहो राक्षसेन्द्रानां तुमुल: समपद्यत॥४०॥
पाहुनि रामाचे बाण विमान आणि घरातुनी।
रावणसैन्यातले वीर युद्धा सज्ज होउ लागती॥४०॥
तेषां संनह्यमानानां सिंहनादं च कुर्वताम्।
शर्वरी राक्षसेन्द्राणां रौद्रीव समपद्यत॥४१॥
त्यांच्या तयार् होण्याचा आणि आरोळ्यांचा तसा।
आवाजाने भरुनि रात्र भयानक वाटली॥४१॥

आदिष्टा वानरेन्द्रास्ते सुग्रीवेण महात्मना।
आसन्नं द्वारमासाद्य युध्यध्वं च प्लवङ्गमा:॥४२॥
आदेश सुग्रीव देत वानरांचा प्रमुख जो।
आता पडता द्वार प्रारंभ युद्धास करा ॥४२॥
यश्च वो वितथं कुर्यात् तत्र तत्राप्युपस्थित:।
स हन्तव्योऽभिसम्प्लुत्य राजशासनदूषक”॥४३॥
जो न करतसे युद्धा कपि तेथे उपस्थित।
राजाज्ञाभंग करी तो त्यास टाका मारुनी॥४३॥

तेषु वानरमुख्येषु दीप्तोल्कोज्ज्वलपाणिषु।
स्थितेषु द्वारमाश्रित्य रावणं क्रोध आविशत्॥४४॥
पाहुनी वानरमुख्यां मशाली हाति घेउनी।
द्वाराजवळि आलेले रावणा क्रोध होतसे॥४४॥
तस्य जृम्भितविक्षेपाद् व्यामिश्रा वै दिशो दश।
रूपवानिव रुद्रस्य मन्युर्गात्रेष्वदृश्यत॥४५॥
त्याच्या जांभया विक्षेपे कांपती दाही दिशा।
रागामुळे रुद्रासम रूप भीषण त्याचे दिसे ॥४५॥

स कुम्भं च निकुम्भं च कुम्भकर्णात्मजावुभौ।
प्रेषयामास संक्रुद्धो राक्षसैर्बहुभिः सह॥४६॥
कुम्भ आणि निकुम्भ पुत्रां कुम्भकर्णाच्या।
रागाने पाठवी युद्धा अनेक राक्षसांसह ॥४६॥
यूपाक्षः शोणिताक्षश्च प्रजङ्घः कम्पनस्तथा।
निर्ययुः कौम्भकर्णिभ्यां सह रावन शासनात्॥४७॥
यूपाक्ष शोणित आणि प्रजङ्घ कम्पन तदा।
हेही जाती रावणाज्ञेने कुम्भकर्णपुत्रांसवे ॥४७॥

शशास चैव तान् सर्वान् राक्षसान् स महाबलान्।
राक्षसा गच्छताद्यैव सिंहनादं च नादयन् ॥४८॥
आज्ञापी राक्षसां सर्व महाबलवान् असति जे।
निघा युद्धास सर्व सिंहनाद करोनिया॥४८॥
ततस्तु चोदितास्तेन राक्षसा ज्वलितायुधा:।
लङ्काया निर्ययुर्वीरा: प्रणदन्त: पुन: पुन:॥४९॥
घेउनी रावणाज्ञेने तळपती शस्त्रे करी।
निघति लंकेबाहेर सिंहनादे पुन:पुन्हा॥४९॥

रक्षसां भूषणस्थाभिर्भाभि: स्वाभिश्च सर्वश:।
चक्रुस्ते सप्रभं व्योम् हरयश्चाग्निभि: सह॥५०॥
तेजाने राक्षसांच्या आणि त्यांच्या आभूषणांच्या
वानरांच्या मशालींच्या उजळीत नभप्रभा ॥५०॥
तत्र ताराधिपस्याभा ताराणां भा तथैव च।
तयोराभरणाभा च ज्वलिता द्यामभासयत् ॥५१॥
नभी चन्द्रताऱ्यांचा प्रकाश भरला असे।
त्यात राक्षसाभरणांचा मिळुनी चमके नभ॥५१॥

चन्द्राणां भूषणाभां च ग्रहाणां ज्वलता च भा।
हरिराक्षससैन्यानि भ्राजयामास सर्वत:॥५२॥
चन्द्र ग्रह तारे यांचा प्रकाश भूषणतेजही।
यामुळे चमके सैन्य उभय बाजूंचे सवे॥५२॥
तत्र चार्थप्रदीप्तानां गृहानां सागर: पुन:।
भाभि: संसक्तसलिलश्चलोर्मि: शुशुभेऽधिकम्॥५३॥
जळणाऱ्या घरांचे तैसे प्रतिबिंब पडूनिया।
शोभती सागरातील लाटा अधिक त्यामुळे॥५३॥

पताकाध्वजसंयुक्तमुत्तमासिपरश्वधम्।
भीमाश्वरथमातङ्गं नानापत्तिसमाकुलम्॥५४॥
फडकति पताका झेंडे शस्त्रे तळपती तशी।
अश्व रथ गज् तैसे सैनिक ते दोन्हीकडे॥५४॥
दीप्तशूलगदाखड्गप्रासतोमरकार्मुकम्।
तद् राक्षसबलं भीमं घोरविक्रमपौरुषम्॥५५॥
त्रिशूळ चमकणारे गदा भाले तलवारी।
धनुष्यासह सैन्य राक्षसांचे पराक्रमी॥५५॥

ददृशे ज्वलितप्रासं किंकिणीशतनादितम्।
हेमजालाचितभुजं व्यावेष्टितपरश्वधम्॥५६॥
घेउनी पेटते भाले शेकडॊ घुंगरांचा नाद।
घेउनिया बाजूबन्द आणि फरशा हाती।
होउनी ऐसे सज्ज राक्षससैन्य येतसे ॥५६॥
व्याघूर्णतमहाशस्त्रं बाणसंसक्तकार्मुकम्।
गन्धमाल्यमधूत्सेकसम्मोदितमहानिलम्॥५७॥
घोरं शूरजनाकीर्णं महाम्बुधरनि:स्वनम्।

तद् दृष्ट्वा बलमायातं राक्षसानां दुरासदम्॥५८॥
गरगरा फिरवित शस्त्रे धनुष्या बाण लावुनी।
पसरीत सुगन्ध सर्वत्र माला आणि मधासवे॥५७॥
शूर वीरांनी भरलेले ढगांसम गडगडणारे।
येता पाहुनि सैन्य राक्षसांचे भयंकर॥५८॥
संचचाल प्लवंगानां बलमुच्चैर्ननाद च।
जवेनाप्लुत्य च पुनस्तद् बलं रक्षसां महत्॥५९॥
अभ्ययात् प्रत्यरिबलं पतंगा इव पावकम्।

तेषां भुजपरामर्शव्यामृष्टपरिघाशनि॥६०॥

मोठ्याने करुनी नाद सैन्य वानरांचे तदा।
चालुनि जाई सैन्यावर राक्षसांच्या जे महा॥५९॥
तुटुनि पडती वानर पतंग आगीवर जसे।
करित दूर हाताने शस्त्रे राक्षसांची तदा॥६०॥

राक्षसानां बलं श्रेष्ठं भूयः परमशोभत ।
तत्रोन्मता इवोत्पेतुर्हरयोऽथ युयुत्सवः॥६१॥

राक्षसांचे सैन्य श्रेष्ठ असे दिसत् शोभुनी।

उत्साही वानरसैन्य भिडे त्यां मारित उड्या॥६१॥
तरुशैलेभिघ्नन्तो मुष्टिभिश्च् निशाचरान्।
तथैवापततां तेषां हरीणां निशितै: शरै:॥६२॥
शिरांसि सहसा जह्रू राक्षसा भीमविक्रमा:।
दर्शनैर्हतकर्णाश्च मुष्टिभिर्भिन्नमस्तका:।
शिलाप्रहारभग्नाङ्गा विचेरुस्तत्र राक्षसा:॥६३॥
वृक्ष शैल आणि मुष्टि लढती कपिवीर त्यां।
राक्षस तीक्ष्ण बाणांनी शिरे त्यांची उडविती॥६२॥

काही वानर कान राक्षसांचे दन्ते चावुनी।
कोणी बुक्क्या मारुनि त्यांची डोकी फोडती।
शरीरे भग्न राक्षस शिलाप्रहारे दिसती॥६३॥
तथैवाप्यपरे तेषां कपीनामसिभि: शितै:।
प्रवरानभितो जघ्नुर्घोररूपा निशाचरा:॥६४॥
निशाचर घोररूप लागती मारण्या तीक्ष्ण।
वानरांतील महावीरां तलवारीने आपल्या॥६४॥
घ्नन्तमन्यं जघानान्य: घातयन्तमपातयत्।

गर्हमाणं जगर्हान्यो दशन्तमपरोऽदशत् ॥६५॥

मारी एक दुसऱ्याला तिसरा त्या मारतसे।

पाडती चावती तैसे एकमेकां देती शिव्या॥६५॥

देहीत्यन्यो ददातन्यो ददामीत्यपर: पुन:।

किं क्लेशयसि तिष्ठेति तत्रान्योन्यं बभाशिरे॥६६॥

ओरडूनि मागती शस्त्रे देति ओरडुनि तसे।

“का त्रास देसी थाम्ब”ऐसे काही बोलती॥६६॥

विप्रलम्भितशस्त्रं च विमुक्तकवचायुधम्।

समुद्यतमहाप्रासं मुष्टिशूलासिकुन्तलम्॥६७॥

शस्त्रे विखरुनी पडती कवचेही इतस्तत:।
भाले उगारलेले बुक्क्या तलवारी त्रिशूळ।
योजुनी एकमेकां मारती कपि राक्षस ॥६७॥

प्रावर्तत महारौद्रं युद्धं वानरराक्षसाम्।
वानरान् दश सप्तेति राक्षसा जघ्नुराहवे॥६८॥

भयंकर युद्ध चाले राक्षसावानरांमध्ये।
एका वेळी राक्षस मारती सप्तदश कपि॥६८॥

राक्षसान् दश सप्तेति वानराश्चाभ्यपातयन्।
विप्रलम्भितवस्त्रं च विमुक्तकवचध्वजम्।
बलं राक्षसमालम्ब्य वानरा: पर्यवारयन्॥६९॥
वानरही मारती तैसे सप्त दश राक्षसां।
वस्त्रे ते फाडती त्यांची कवच ध्वजही तसे।
ऐसे वानर राक्षसां सर्व बाजूनी घेरती ॥६९॥

इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये युद्धकाण्डे पञ्चसप्ततितम: सर्ग:॥७५॥

श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची इतर नऊ पुस्तकं.
यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.


श्याम कुलकर्णी
तुझी माझी मोटी

हास्यरंगी रंगले
श्याम कुलकर्णी


श्याम कुलकर्णी
हमरी बारी
INSURANCE
STAMPING
VISA
IMMIGRATION


महाकविकालिदासविरचित
मेघदूत
श्याम
कुलकर्णी

श्याम
कुलकर्णी

तिची सतार


मराठी श्लोकानुवाद- श्री श्याम कुलकर्णी
॥ श्रीमद्भगवद्गीता ॥

लवकरच येत आहे.

श्री श्याम कुलकर्णी अनुवादित

मूळ वाल्मिकी रामायण मराठी श्लोकमय पुढील भाग

www.esahity.com

9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव व गाव Whatsapp करा)